वरील योजना महिला सबळीकरणाकरिता कार्यरत आहेत यांची माहिती महिलाना करून देणे गरजेचे आहे. रोजगाराद्वारे महीलाचे सबळीकरण होणे म्हणजे शक्तीमान होणे महिला सबलीकरण ही अशी प्रक्रीया आहे की, ज्याव्दारे महिला सामुहीकपणे व सार्वांगिन उन्नतीच्या समान विचाराने क्रियाशिल राहतात. पूर्वापार चालत आलेल्या रुढी, परंपरांच्या ओखडाखाली दबलेली महिला नेहमीच साधनसंपत्ती पासून वंचीत राहीलेली आहे. स्त्रि शिक्षणाच्या व्यापक चळवळीमुळे अलीकडेयात काही अंशी फरक झालेला आहे. महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाव्यात त्यांचा जीवनस्तर सुधारावा, त्यांना शिक्षणाचे महत्व कळावे त्यांच्या कुटूंबाचा सर्वांगिण विकास व्हावा. तसेच त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती होवून त्याचा लाभ त्यांना मिळावा.

## निष्कर्ष :

ग्रामीण समाजात कुटूंब हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र मानले जाते.त्यांना बाहेरच्या समाजात सहभागी होण्याची संधी मिळत नाही. सर्व क्षेत्रात निर्णय घेण्याचे अधिकार पुरुषांकडे असतात. देशातील मानवीय साधनसंपत्तीचा देशाच्या नैतिक आणि भौतिक प्रगतीत योग्य प्रकारे उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने महिलांचा देशाच्या आर्थिक विकासात सहभाग वाढावा त्यांचा कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक स्तर उंचावून त्या आर्थिक दृष्टीने सक्षम होणे आवश्यक आहे. आर्थिक स्वावलंबनातून आत्मविश्वास वाढतो. अन्याय व अत्याराविरुध्द संघर्ष करण्याची संधी उपलब्ध होवू शकते. म्हणूनच अर्थाजनाकरिता योग्य संधी उपलब्ध करुन स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण महत्वाचे ठरते. देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तर उंचावण्याच्या दष्टीकोनातून महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे, जोपर्यंत आर्थिक बाबींचे नियंत्रण हातात येत नाही. तोपर्यंत महिलांना त्यांच्या कल्याणासाठी होणाऱ्या विविध उपक्रमांना बळ प्राप्त होणार नाही. हे बळ प्राप्त होण्यासाठी महिलांना रोजगार विषयक योजनांची माहिती असणे आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. पाटील मनोज, विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स.
२. शर्मा रमा/मिश्रा एम. के., महिला विश्वकोष : भाग १, अर्जुन पब्लिकेश हाउस प्रलहाद गळी दरियागंज, नवी दिल्ली.
३. डॉ. मुलाणी एम. यु., अल्पबचत नियोजन, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
४. प्रा. दांडेकर लक्ष्मण, कुलकर्णी प्रमोद, कुलकर्णी विजय, महिलांचे सबलीकरण दारिद्र्य निर्मुलन व स्वयंसहाय्य गट, मुक्त विद्यापीठ, नाशिक
५. बनकर के.एस., ग्रामीण विकासाच्या योजनांची माहिती पुस्तिका, नाशिक
६. फरकाडे त्रिवेणी, गोंगे सुलभा 'कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिकेशन, नागपूर
७. दासगुप्ता कविता, देसाई रविंद्र, महिलांचे सबलीकरण, 'दारिद्र्य निर्मुलन व स्वयंसहाय्यता गट', डायमंड पब्लिकेशन, पुणे

❖❖❖

# रवींद्र ठाकूर : जीवन आणि साहित्य

प्रा. डॉ. विनोद दे. राठोड
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड
ता. शिराळा, जि. सांगली
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महाराष्ट्र (India)
Email: rvinod2404@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३२७२४०४

रवींद्र ठाकूर हे मराठीतील एक नामवंत ललित लेखक आणि समीक्षक आहेत. त्यांनी कविता, कथा, कादंबरी, ललित गद्य, अनुवाद, समीक्षा अशा बहुविध स्वरूपाचे लेखन केले आहे. याशिवाय त्यांनी काही ग्रंथांचे संपादनही केले आहे. प्रा.डॉ.रवींद्र ठाकूर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचा तीन वेळा विभागप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी एम.फिल. आणि पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले आहे.

रवींद्र नारायण ठाकूर यांचा जन्म १४ एप्रिल १९५५ रोजी जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यात 'उत्राण' या एका छोट्याशा खेडेगावात झाला. वडिल प्राथमिक शिक्षक असल्यामुळे त्यांचे शालेय शिक्षण खांदेशातल्या अनेक गावांमध्ये झाले. त्यानंतर औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव येथे त्यांनी बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. एम.ए.साठी त्यांनी औरंगाबादचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गाठले. तेथे त्यांनी 'कमवा व शिका' हा कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मार्ग अंगीकारला. पेपर टाकण्यापासून पडतील ती कामे करीत शिक्षण पूर्ण केले. मराठवाडा विद्यापीठात त्यांना डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांच्यासारखा गुरू भेटला. कोत्तापल्लेंनी त्यांना भालचंद्र नेमाडे यांची 'जरीला' ही कादंबरी वाचायला दिली. सरांच्या प्रोत्साहनावरून त्यांनी 'जरीला'च पुस्तक परीक्षण लिहिलं. ते 'दै. मराठवाडा' च्या रविवार पुरवणीत छापून आलं. तेव्हापासून ठाकूर यांच्या लेखनाला सुरूवात झाली जे आजतागायत सुरू आहे.

एम.ए. होताच त्यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर कॉलेज, औराद शहाजानी येथे कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी मिळाली. तेथे दोन वर्षे अध्यापन केल्यानंतर १९८० मध्ये त्यांना उदगीरच्या उदयगिरी महाविद्यालयात संधी मिळाली. पुढे १९८४ ते १९८५ या कालावधीत ते पुणे जिल्ह्यातील दौंड येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत राहिले. १५ जून १९८५ रोजी ते कोल्हापूरच्या के.एम.सी. महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून रुजू झाले. याचसुमारास डॉ.आनंद यादव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'र.वा.दिघे यांच्या साहित्याचा अभ्यास' या विषयावर पुणे विद्यापीठातून पीएच.डी. पदवी प्राप्त केली. १९९२ मध्ये ते शिवाजी विद्यापीठात रुजू झाले आणि कालांतराने विभागप्रमुखही झाले. ते काही काळ विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य होते. तसेच शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले. वयाच्या साठाव्या वर्षी सेवानिवृत्त होत असतांना त्यांना अधिक दोन वर्ष सेवेची संधी वाढवून मिळाली. एकूणच विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आणि लेखक या दोन्ही आघाड्यांवर त्यांनी आपला लौकिक कायम टिकवून ठेवला.

## ठाकुरांचे काव्यलेखन :

रवींद्र ठाकूर यांनी १९८१ पासून विविधांगी लेखन केले आहे. त्यांनी काव्यलेखनापासून साहित्यलेखनाला प्रारंभ केला. त्यांचा सामाजिक जाणिवा व प्रेमभावना व्यक्त करणारा 'अनिकेत' हा पहिला काव्यसंग्रह १९८१ साली प्रकाशित झाला. त्यांच्या या काव्यलेखनाला फ.म.शहाजिंदे यांचे प्रोत्साहन लाभले. या संग्रहातील त्यांच्या कविता सामाजिक विषमता, अन्याय यामुळे दुखावलेल्या तरुण मनाच्या वेदना व्यक्त करणाऱ्या आहेत. सामाजिक अन्याय व विषमता नष्ट करता येत नाही याची कवी म्हणून त्यांना असलेली खंत या कवितांमधून व्यक्त होते. तारुण्याच्या उंबरठ्यावरील हा काव्यसंग्रह असल्यामुळे काही कवितांमधून तारुण्यसुलभ प्रेमभावनाही अभिव्यक्त होतांना दिसतात. त्यानंतर ते संशोधन आणि अन्य ललित लेखनाकडे वळले असले तरी त्यांचे काव्यलेखन थांबलेले नव्हते. २००४ मध्ये 'दस्तुरखुद्द' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत ते लिहितात, ''मी पहिल्यांदा कवी आहे. त्यानंतर कादंबरीकार आहे आणि त्यानंतर समीक्षक आहे. ज्या माणसाला कविता कळत नाही किंवा कविता आवडत नाही असा माणूस साहित्याचा अभ्यासक कसा होऊ शकतो असा प्रश्न मला पडतो.'' या विधानातून त्यांची रोखठोक भूमिका स्पष्ट होते. त्यांची ही कविता दु:ख, दैन्य, दांभिकता आणि अन्याय याविरूद्ध आवाज उठवताना दिसते. यासाठी ती कधी ओवी, अभंग, तर कधी मुक्तछंदातून आविष्कृत होते. जागतिकीकरण

आणि चंगळवाद यामधून मानवी नातेसंबंधामध्ये जो दुरावा निर्माण झाला आहे त्याविषयीचे चिंतन करणारी ही कविता आहे.

## ठाकुरांचे कादंबरीलेखन :

मराठी साहित्यात रवींद्र ठाकूर यांना एक कादंबरीकार म्हणून ओळखले जाते. आजअखेर चार कादंबऱ्या लिहून त्यांनी विविध विषयांना स्पर्श केला आहे. साहित्य संमेलनांच्या आयोजनामागील राजकारणावर लिहिलेल्या 'उद्या पुन्हा हाच खेळ'(१९९९) या कादंबरीमधून 'साहित्य संमेलन' हा एक खेळ झालेला असून उद्या पुन्हा हाच खेळ खेळल्या जाणार आहे, याची जाणीव ठाकूर करून देतात. ठाकुरांनी या कादंबरीत साहित्यसंमेलनातील राजकारणाचे अंतरंग उघड केले आहे. साहित्य कसे निर्माण होते, लेखक महान साहित्यिक म्हणून कसे मिरवून घेतात, साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष होण्यासाठी, निवडून येण्यासाठी कसे मार्ग अवलंबिले जातात. साहित्यसंमेलनाला आलेले यात्रेचे स्वरूप, सत्कार, स्वागत यासाठी हपापलेले साहित्यिक आणि त्याचबरोबर राजकारणी यांची सांगड कशी जुळून येते. संमेलनांमध्ये लेखक, कवी, कवयित्री, प्रकाशक, प्राध्यापक, संस्थापक, पत्रकार हे खोटी प्रतिष्ठा जपत, स्वार्थासाठी नीतीमूल्ये गहाण टाकून कशी श्रेष्ठपणा मिरवतात, याचे वास्तव चित्रण ठाकुरांनी केले आहे. या कादंबरीनंतर त्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनचरित्रावर 'महात्मा'(१९९९) ही कादंबरी लिहिली. ही महात्मा फुले यांच्या जीवनचरित्रावर लिहिलेली कादंबरी असून या कादंबरीमधून फुलेंच्या संपूर्ण जीवनाचा आलेख पाहावयास मिळतो. बालवयापासून फुले यांची तयार होत गेलेली मानसिकता, त्यांच्यावर झालेला अन्याय, त्यांच्यावरील अपमानाचा प्रसंग, त्यातून आकारास येत गेलेले त्यांचे ध्येय, या ध्येयांकडे केलेली वाटचाल, त्यासाठी त्यांना मिळालेले सहकार्य, त्यांच्या आयुष्याची अखेर, हे सर्व ठाकुरांनी या कादंबरीत रेखाटले आहेत. ही एक चरित्रात्मक कादंबरी असल्याने फुलेंच्या जीवनाविषयीचे व तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीचे आकलन या कादंबरीतून होते. ठाकुरांनी कादंबरीत इतिहास आणि कादंबरी यांचा मेळ घातलेला आहे. दोन घटना प्रसंगांमधील जागा त्यांनी आपल्या कल्पनाशक्तीने भरून काढल्या आहेत. त्यामुळे दोन्ही घटनांमध्ये एकसंघपणा राहून प्रत्यक्ष घटनाच आपल्यासमोर घडते आहे असा भास होतो. फुलेंच्या आयुष्यातील घडलेल्या घटनानंतर होणारी मानसिक अवस्था, विचारमंथन आणि संघर्ष यांचे तपशिलाने दर्शन कादंबरीत घडत जाते.

कर्णाच्या जीवनावर त्यांनी 'धर्मयुद्ध'(२००३) ही कादंबरी लिहिली असून या कादंबरीविषयीची भूमिका व्यक्त करतांना ठाकूर लिहितात, "महाभारत कथेतील ज्या अनेक व्यक्तिरेखा भारतीय जनमानसात खोलवर रुतून बसल्या आहेत त्यामध्ये कर्ण ही एक प्रमुख व्यक्तिरेखा आहे. कर्णकथेला कवचकुंडलांची पुटं चढवण्यात आली असली तरी त्यापलीकडे उभा असलेला आणि तत्कालीन वर्णव्यवस्थेशी संघर्ष देत आपली योग्यता सिद्ध करणारा कर्ण सतत आपले लक्ष वेधून घेत राहतो. त्याच्या व्यक्तिरेखेला असलेले कारूण्याचे हेच गडदगहिरे परिमाण कलावंतांना आकर्षित करत असावे. योग्यता असूनही पावलोपावली अवमानित झालेला, डावलला गेलेला कर्ण हे तेजोभंगाचे जिवंत प्रतीक आहे. भोवतालच्या विषम सामाजिक वातावरणात कर्णाची वेदना आजही तेवढ्याच तिव्रपणे सामोरी येत राहते. आज आधुनिक काळात जगणाऱ्या माणसालाही कर्ण आपला जिवलग सखा वाटतो तो यामुळेच. एकंदरीत कर्णाची जीवनकथा ही एक भळभळती जखम असून ती कुठवर भळभळत राहणार आहे हाच प्रश्न आहे. पारंपारिक दृष्टिकोन निग्रहाने अव्हेरून एका अभिनव भूमिकेतून कर्णकथेचा शोध घेण्याचा एक लक्षणीय प्रयत्न म्हणजे कर्णपर्व." या कादंबरीत पारंपारिक दृष्टिकोन झुगारून एका नव्या मानवी मूल्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न ठाकुरांनी केला आहे.

रवींद्र ठाकूर यांची 'व्हायरस'(२००८) ही शैक्षणिक वातावरणावर, शिक्षणक्षेत्रातल्या अपप्रवृत्तींवर लिहिलेली कादंबरी आहे. ही कादंबरी एका विद्यापीठाचे वास्तवदर्शी सूत्र घेऊन वाचकांसमोर येते. विविध विद्यापीठातून समाजात जे चाललेलं आहे त्याचं छोटं पणं परिपूर्ण रुप या कादंबरीत प्रकट झालं आहे. कादंबरी ज्या वातावरणात घडत गेली त्या वातावरणाचा प्रभाव लेखकावर असल्यामुळे त्यातील बारीकसारीक तपशिलांसह ती अवतरली आहे. कादंबरीतील घटना केवळ विशिष्ट परिणाम साधण्यासाठी रंगवलेल्या नाहीत तर स्वत: लेखक नोकरी करत असलेल्या अनुभवाचे पाठबळ त्याला आहे. त्यामुळे नोकरदार समाजाचे, त्यातील परस्परसंबंधाचे त्यांनी जवळून निरीक्षण केले आहे. याचा 'व्हायरस' मधून प्रत्यय येतो. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात शिरलेल्या अनिष्ठ प्रवृत्तींचा व्हायरस डिटेक्ट करणारी भेदक कादंबरी म्हणून ठाकूर ही कादंबरी वाचकांकडे सोपवतात. तर 'दाही दिशा' ही त्यांची कादंबरी प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

## ठाकुरांचे नाट्यलेखन :

कादंबरीकार म्हणून यश संपादन करणाऱ्या रवींद्र ठाकुरांनी नाटक हा वाङ्मयप्रकारही हाताळला आहे. त्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनचरित्राचा वेध घेण्यासाठी 'क्रांतिसंगर'(२०११) हे नाटक लिहिले आहे तर 'महारथी कर्ण'(२०१७) हे नाटक 'धर्मयुद्ध' या कादंबरीवरुन घेतले आहे. एकंदरीत कर्णाची जीवनकथा ही एक भळभळती जखम असून ती कुठवर भळभळत राहणार आहे हाच खरा प्रश्न ठाकूर वाचकांसमोर उभा करतात. पारंपारिक दृष्टिकोन निग्रहाने अव्हेरून एका अभिनव भूमिकेतून कर्णकथेचा शोध घेण्याचा एक लक्षणीय आणि नाट्यरूप प्रयत्न म्हणजे महारथी कर्ण आहे.

## ठाकुरांचे समीक्षालेखन :

ठाकुरांचे समीक्षालेखनही महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या 'मराठी ग्रामीण कादंबरी'(१९९३), 'आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्.मय'(१९९३), 'कादंबरीकार र.वा.दिघे'(१९९५), 'साहित्य : समीक्षा आणि संवाद'(१९९९), 'प्रवाह आणि प्रतिक्रिया'(१९९९), 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा'(२००७), 'साहित्यिक आनंद यादव'(२०११), 'चर्चा आणि चिकित्सा'(२०११) या समीक्षा ग्रंथांमधून समीक्षक म्हणून त्यांनी आपली भूमिका विशद केली आहे. 'मराठी ग्रामीण कादंबरी' या पहिल्या समीक्षाग्रंथात त्यांनी संपूर्ण ग्रामीण कादंबरीचा समालोचनात्मक आढावा घेतला आहे. 'साहित्य : समीक्षा आणि संवाद' हा ग्रंथ दोन भागात विभागला असून पहिल्या भागात प्रामुख्याने त्यांची तात्त्विक समीक्षा संकलित झाली आहे तर दुसऱ्या भागात अनेक साहित्यकृतींची समीक्षात्मक मांडणी केली आहे. साहित्यातील विविध प्रवृत्ती—प्रवाह, साहित्याचे समाजशास्त्र यासारखी आधुनिक समीक्षापद्धती आणि कविता, कादंबरी या साहित्यप्रकारांविषयीची तात्विक आणि लक्षणीय साहित्यकृतींची विवेचक समीक्षा संकलित झाली आहे. 'चर्चा आणि चिकित्सा' या ग्रंथात समकालीन साहित्य समीक्षेत नित्य चर्चिल्या जाणाऱ्या अनेक विषयांची परखड चिकित्सा आढळते. त्याचबरोबर तौलनिक साहित्य, समाजशास्त्रीय समीक्षा या नव्या समीक्षापद्धतींचा यथायोग्य परिचय करून देणारी उपयोजित समीक्षाही येथे आढळते. 'प्रवाह आणि प्रतिक्रिया' या ग्रंथात त्यांनी १९७५ नंतरच्या कवितेचा साक्षेपी आढावा घेतला आहे. या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या काव्यसंग्रहांची सूची परिशिष्टात दिली असल्यामुळे हा ग्रंथ अधिक महत्वपूर्ण ठरतो. र.वा.दिघे आणि आनंद यादव यांच्या साहित्याचा विचार करतांना त्यांनी काळ, वाङ्.मयीन परंपरा, वाङ्.मय प्रकार व लेखकाचे व्यक्तिमत्व ही चार परिमाणे समोर ठेवून अगदी तटस्थ व निर्भिड निष्कर्ष मांडले आहेत. 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा' या ग्रंथात मराठी कादंबरीच्या उगमापासून ते समकालीन कादंबरीपर्यंत बहुविध मराठी कादंबरीची समाजशास्त्रीय चिकित्सा करण्यात आली आहे. मराठी कादंबरीला समाजशास्त्रीय चौकटीमध्ये बसवतांना त्यांच्या वाङ्मयीन मूल्यांची हानी होणार नाही याची खबरदारी ठाकुरांनी घेतली आहे.

## ठाकुरांची संपादने :

कविता, कादंबरी, समीक्षा इत्यादी स्वरूपाच्या लेखनासोबतच ठाकुरांनी काही महत्त्वाची संपादनेही केली आहेत. 'क्रांतिजागर' (१९९९) या ग्रंथात त्यांनी महात्मा फुले यांच्या समग्र कवितेचे सटीप संपादन केले आहे. लोकांच्या मनामध्ये फुल्यांविषयी जी विपर्यस्त प्रतिमा पसरवल्या गेली आहे ती नष्ट करण्याच्या हेतूने त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि विचारांचा यथार्थ परिचय वाचकांना व्हावा या भूमिकेतून ठाकुरांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. ना.वि. जोशीकृत 'पुणे वर्णन'(२००१) हा ग्रंथ म्हणजे पुणे शहराचे वर्णन करणारा दुर्मिळ असा सांस्कृतिक दस्तऐवज आहे. यामध्ये केवळ स्थलवर्णन आलेले नसून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे वस्तुस्थितीदर्शक चित्रण आले आहे. हा ग्रंथ पेशवाईचा अस्त आणि इंग्रजी अंमल या मधल्या काळातील पुण्याचे वास्तव आणि वस्तुस्थितीचे चित्रण करणारा महत्वाचा दस्तऐवज आहे. या ग्रंथाचे ठाकूर यांनी केलेले संपादन बहुचर्चित आणि उल्लेखनीय ठरले. 'समीक्षापद्धती : सिद्धांत आणि उपयोजन' या ग्रंथाचे डॉ.नंदकुमार मोरे यांच्या सहकार्याने संपादन केले असून या ग्रंथात त्यांनी विविध समीक्षा पद्धतींचा यथायोग्य परिचय करून दिला आहे. तसेच 'समाजशास्त्रीय समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन' या निबंधात १८व्या शतकात सामाजिक—राजकीय जाणिवांच्या पार्श्वभूमीवर समाजशास्त्रीय समीक्षापद्धतीचा उदय कसा झाला, तिचे गृहितप्रमेय कोणते या विषयांचा ऊहापोह केला असून या समीक्षापद्धतीवर घेतल्या गेलेल्या आक्षेपांचाही तर्कशुद्ध प्रतिवाद केला आहे. शिवाजी विद्यापीठाने २००३मध्ये बी.ए.भाग १ साठी लावलेल्या 'साहित्य संवाद' या ग्रंथाच्या संपादनात तसेच पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रमात लावलेल्या 'आत्मसंवाद' या ग्रंथाच्या संपादनात त्यांचा सहभाग होता. ठाकूर यांनी संपादनाबरोबरच अनुवादही केला आहे. 'निवडणुकीतील घोटाळा' हा एका हिंदी ग्रंथाचा २००१ मध्ये त्यांनी केलेला पहिला अनुवाद आहे.

## ठाकुरांचे मार्गदर्शन :

रवींद्र ठाकूर शिवाजी विद्यापीठाचे एम.फिल, पीएच.डी. चे मार्गदर्शक असतांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. बाबासाहेब नाईक यांनी 'महादेव मोरे यांच्या कथालेखनाचे विशेष', दीपा कुलकर्णी यांनी 'माधव कोंडविलकर यांच्या कादंबऱ्या', अशोक पाटील यांनी 'धग : एक अभ्यास', माधव पाटील यांनी '१९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी', गुणवंती खोत यांनी 'नागनाथ कोत्तापल्ले यांची कथा', भीमाशंकर खुळपे यांनी 'उद्धव शेळके यांची कथा', अशोक कांबळे यांनी 'मराठी कादंबरीतील देवदासी जीवनाचे चित्रण', जालंधर पाटील यांनी 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील कर्ण : एक अभ्यास', सुरेश वडराळे यांनी 'वि.स. खांडेकर यांच्या साहित्याची वर्णनात्मक सूची', एकनाथ पाटील यांनी 'वि.स.खांडेकर यांचे ललितगद्य', भाग्यश्री कुलकर्णी यांनी 'बंगाली कादंबरीचा मराठी कादंबरीवरील प्रभाव', माधवी देसाई यांनी 'ग्रेस यांच्या कवितेचा स्वरूपशोध', सुभाष जाधव यांनी 'मराठी कादंबरीतील धरणग्रस्तांचे चित्रण', सदाशिव पाटील यांनी 'एस.एल.भैरप्पा यांच्या कादंबरीचा अभ्यास', उमा गायकवाड यांनी 'बहिणाबाई चौधरी यांची कविता', मोहन चव्हाण यांनी 'सदानंद देशमुख यांच्या बारोमास या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास', संदीप जकाते यांनी 'आनंद यादव यांचे ललितगद्य', संतोष मिठारी यांनी 'लोकसखा ज्ञानेश्वर : एक अभ्यास', प्रियांका कुंभार यांनी 'एस.एल.भैरप्पा यांच्या पर्व कादंबरीचा अभ्यास', या विषयावर एम.फिल.चे संशोधन पूर्ण केले आहे.

जी.पी.माळी यांनी 'रणजित देसाई यांच्या साहित्याचा अभ्यास', जयवंत व्हटकर यांनी 'शंकरराव खरात यांच्या वाङ्मयाचा अभ्यास', महेंद्र कदम यांनी 'कादंबरीची संकल्पना आणि मराठी नवकादंबरी', तेजस्विनी मुडेकर यांनी 'अर्थकारणाचे मराठी कादंबरीतील प्रतिबिंब', शिवाजी पाटील यांनी 'वसुधा पाटील यांच्या साहित्याचा अभ्यास', दीपक चव्हाण यांनी 'भाई माधवराव बागल : व्यक्ती आणि वाङ्मय', सुरेश शिंदे यांनी 'महात्मा फुले यांच्या समग्र कवितेचा अभ्यास', जालंधर पाटील यांनी 'महाभारत कथेचा सामाजिक अन्वयार्थ आणि मराठी कादंबरी', माधवी देसाई यांनी 'पु.शि.रेगे आणि ग्रेस यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा', गोपाळ गावडे यांनी 'भा.वि.वरेरकर यांच्या साहित्याचा अभ्यास', माधव पाटील यांनी 'प्रादेशिक मराठी कादंबरी आणि आचलिक हितो उपन्यास', सागर लटके यांनी 'अनुष्टुभ नियतकालिकांचे वाङ्मयीन कार्य', विनोद राठोड यांनी 'त्र्यं.वि.सरदेशमुख : व्यक्ती आणि वाङ्मय', गीता गवस यांनी '१९८० नंतरच्या कवितेतील स्त्रीवादी जाणिवा', उमा गायकवाड यांनी 'मराठी साहित्यातील छत्रपती शाहू महाराजांची प्रतिमा : एक अभ्यास', रामा रोकडे यांनी 'मराठी विज्ञान कादंबरी', मोहन चव्हाण यांनी 'धनंजय कीर यांचे साहित्य : एक अभ्यास', प्रियांका कुंभार यांनी 'एस.एल.भैरप्पा यांच्या मराठी अनुवादित साहित्याचा अभ्यास', लोमेश कोळेकर यांनी 'गिरीश कर्नाड यांच्या मराठी अनुवादित नाटकांचा अभ्यास', नम्रता हत्तळगे यांनी 'स्त्रियांच्या कथालेखनाचा समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास', शर्मिला घाटगे यांनी 'शिवराम कारंत यांच्या मराठी अनुवादित कादंबऱ्यांचा अभ्यास' या विषयांवर रवींद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले आहे.

## ठाकुरांचा साहित्यगौरव :

रवींद्र ठाकूर यांना साहित्यसेवेबद्दल अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'मराठी ग्रामीण कादंबरी' या पहिल्या समीक्षा ग्रंथास १९९५ चा 'भि.ग.रोहमारे' हा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार मिळाला. 'आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय' या ग्रंथास शिवाजी विद्यापीठाने १९९५ मध्ये उत्कृष्ट ग्रंथ पुरस्काराने गौरविले. 'कादंबरीकार र.वा.दिघे' या त्यांच्या समीक्षाग्रंथास १९९६ चा 'महानुभाव विश्वभारती' (अमरावती) पुरस्कार प्राप्त झाला. 'महात्मा' या कादंबरीला मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांच्या वतीने दिला जाणारा 'रणजित देसाई पुरस्कार'(२०००) आणि 'रा.तु.पाटील परखड पुरस्कार'(२००२) प्राप्त झाले. तसेच 'साहित्य : समीक्षा आणि संवाद' या ग्रंथास शिवाजी विद्यापीठाचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार (२००६) मिळाला. 'साहित्यिक आनंद यादव' या ग्रंथास स्नेहवर्धन प्रकाशन पुणे यांच्या मार्फत दिला जाणारा 'वि.भि.कोलते ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार (२०१३) प्रदान करण्यात आला. तसेच त्यांच्या एकूण साहित्यसेवेबद्दल दिलिपराज प्रकाशन पुणे यांच्या वतीने त्यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. विशेष बाब म्हणजे २००७ मध्ये शिवाजी विद्यापीठाने त्यांना गुणवंत शिक्षक या पुरस्काराने सन्मानित केले होते.

एकूणच विविध स्वरूपाचे लेखन करून रवींद्र ठाकूर यांनी मराठी साहित्यात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे मराठी साहित्यातील एक साक्षेपी लेखक म्हणून ते ओळखले जातात. त्यांच्या साहित्यावर महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांमधून एम.फिल आणि पीएच.डी. चे संशोधन झाले आहे आणि अजूनही होत आहे. उत्तरोत्तर ठाकुरांची लेखणी सतत प्रवाही होत राहो ही अपेक्षा.

❖❖❖

# स्त्रीदास्याची वैचारिक भूमिका

प्रा. मृदुला नि. रायपुरे–जांगडेकर
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर, महाराष्ट्र (India)
Email: mrudulajanglekar@gmail.com भ्रमणध्वनी ९९७५०३३०२७

## सारांश :–

मानवाने आपल्या उत्क्रांतीनंतर जसजशी प्रगती केली तसतसे त्याचे जीवन जटील होत गेले. स्त्री–पुरूष हे दोन आधारस्तंभ, समाजाचे. मात्र स्त्रीनामक आधारालाच निराधार करून दास्याच्या घनगर्द खाईत लोटल्या गेले. कैक वर्षे गुलामीचे भोग भोगत ती थोडी स्वतंत्र वाटा चोखाळू लागली. तिच्या सोबतीला अनेक विचारवंतही आले. उत्तरोत्तर ती जसा विकास करत होती तशी तिची अधोगतीही होत होती. आता या प्रक्रियेत तिची होणारी ओढाताण कमी किंवा नष्ट करायची असेल तर विशेष प्रयत्न करावे लागतील. सन्मानाने समाजाने तिला वागवावे लागेल.

बीजसंज्ञा:– स्त्रीदास्याचा इतिहास, दास्यमुक्तीचे प्रयत्न.

## प्रस्तावना:–

स्त्रियांचा दर्जा हा पुरूषापेक्षा दुय्यम किंवा तिचे दास्य ही नैसर्गिक बाब आहे, असे काल परवा पर्यंत आपल्या मेंदूत बसले होते. मात्र प्राचीन इतिहास पाहता तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा पुरूषाच्या बरोबरीचा होता व तिचे कुटुंबात व समाजातही मानाचे स्थान होते. ऐतिहासिक स्त्रीची छबी आणि आधुनिक स्त्रीची धुसर झालेली छबी यात एवढी तफावत कशी आली? तिच्या स्वातंत्र्याचे हळूहळू पारतंत्र्यात होत गेलेले परिवर्तन यामागे नेमके कुठले कारण होते? या स्त्रीदास्याविषयीच्या मूलभूत प्रश्नांचा विचार जर केला तर त्याची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला त्या काळात शिरावे लागेल ज्या काळी स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. त्यापुढचा काळ हा तिच्या दर्जात होत गेलेल्या परिवर्तनाचा काळ आहे.

स्त्रियांच्या दर्जात हा जो बदल झाला त्याच्या मुळाशी उत्पादनाच्या साधनांमधील बदल आहे, असे मत एंगल्सने मांडले. ''प्राचीन शेतकी समाजामध्ये स्त्रिया बागांची मशागत करत असत आणि पुरूष शिकार करत असत. त्या वेळी सामाजिक उत्पादनामध्ये स्त्रियांचा भाग पुरूषांच्या इतकाच महत्वाचा होता. परंतु जेव्हा पशुसंवर्धनाचा काळ सुरू झाला तेव्हा गुरांच्या व मेंढयांच्या कळपांचे मालक बनलेले पुरूष प्रबळ झाले आणि स्त्रिया त्यांच्यावर अवलंबून राहणाऱ्या, त्यांच्या घरादाराची काळजी वाहणाऱ्या त्यांच्या गुलाम बनल्या''?[१] या संदर्भाचा थोडा अधिक विचार केला की, हे स्पष्ट होते की, शेतीच्या शोधानंतर स्त्रिया स्थिरस्थावर आयुष्य जगू लागल्या. त्यांची भटकण्याची अवस्था संपली. मात्र पशूपालनासाठी पुरूष भटकंती करत होता. त्यामुळे नैसर्गिकरित्या शारीरिकदृष्टया पुरूष बलवान तर स्त्रिया नाजूक बनत गेल्या. संततीनिर्मिती ही स्त्रियांच्या यातुशक्तीतुन होत नाही तर पुरूषबीजापासून होते हे उलगडल्यावर पुरूषांच्या आधिपत्याची पकड आणखीच घट्ट होत गेली आणि समाजातील स्त्रियांचे महत्व हळूहळू कमी होत गेले. कुटुंब संस्था म्हणजे स्त्रीचा आयुष्यभराचा हक्काचा पिंजरा ! या पिंजऱ्यात तिला एकदाचे बंदिस्त केल्यानंतर मग पुढे पाहायचेच नव्हते. संरक्षणाची हमी देऊन या कुटुंबसंस्थेने तिच्या अस्तित्वाचे शोषणच केले. आजही कुटुंबात न राहणाऱ्या, एकटीने जीवन जगणऱ्या महिलेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन निकोप नाही. कुटुंबसंस्थेचे उदात्तीकरण नको तेवढे करण्यात आले आणि त्याचे फायदेही स्त्रियांच्या मनावर बिंबविण्यात आले. त्यामुळे कितीही अन्याय–अत्याचार कुटुंबात राहून स्त्रियांवर झाला तरी एकतर त्यांना तो अन्याय वाटत नाही, नाही तर त्या अन्यायाविरूध्द ब्र काढण्याची त्यांची हिंमत होत नाही. वास्तविक स्त्रियांवर सर्वात अधिक अत्याचार हा कुटूंबातच होत असतो.

या कुटुंबसंस्थेची उभारणी विवाहसंस्थेवर झाली आहे. स्त्री–पुरूषांच्या कामवासनेची तृप्ती करणारी समाजाकडून मान्यता प्राप्त झालेली ही संस्था आहे. पण ह्या जैविक गरजपूर्तीपेक्षा कितीतरी स्त्रिदास्यासंदर्भात मोठे काम ही विवाहसंस्थाही करत असते. कुटुंब आणि विवाह याच्या बाहेर स्त्रीला अस्तित्वच नाही. तिच्याही आयुष्याची सारी धडपड या दोन गोष्टींसाठीच असते. म्हणून कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्था हया दोनही बाबी स्त्रीदास्याला

कारणीभूत झाल्या. ''पुरूष वंशाप्रमाणे चालणारी, एक पती–पत्नीवर आधारलेली कुटुंबव्यवस्था अनादी 'नैसर्गिक' नसून तिचा उगम समाज–परिस्थितितून झालेला आहे आणि ती खाजगी मालमत्ता व स्त्रियांचे दास्य हयावर आधारलेली आहे.''[२]हा संदर्भ महत्वाचा आहे. समाज संघटनेच्या प्रारंभिक अवस्थेत जन्माला आलेल्या मुलाचे कुल आईवरून ठरत होते. ही स्त्रीहक्काची परंपरा होती. या मध्ये स्त्रियांच्या परंपरेने वंश चालत होता. मात्र खाजगी मालमत्तेची संकल्पना हळूहळू वाढत गेली आणि समाजव्यवस्थेत परिवर्तन होऊन कुलपरंपरा भंग पावली. खाजगी मालमत्ता पुरूषाची झाली आणि आपला वारसा आपल्या मुलाला मिळावा अशी पुरूषाला इच्छा झाली. याचे पर्यवसान पुरूषसत्तेत झाले.

दुसऱ्या एका विचार धारेप्रमाणे प्राचीन भारतातील मूळनिवासी हे स्त्रीसत्ताक होते. पुरूषांची भूमिका स्त्रीसत्तेचे संरक्षण–जतन करणे हे होते. मात्र त्यानंतर बाहेरून आलेल्या आर्यांनी जे पितृसत्ताक होते, त्यांना नामोहरम केले आणि आपली संस्कृती त्यांच्यावर लादली. या काळात ज्या स्त्रियांनी त्यांचा कडवा विरोध केला त्यांना समाजाबाहेर काढून त्यांच्यावर अत्याचार केले आणि 'वेश्या' हे नामाभिधान देऊन त्यांना बाजारू करून टाकले. काही स्त्रियांना कुलटा, चेटकीण म्हणून त्यांची संभावना केली. ज्या स्त्रिया त्यांना शरण गेल्या त्यांना त्यांनी आपल्यात सामावून तर घेतले पण गुलाम म्हणून. याच दरम्यान विवाहसंस्था, कुटुंबसंस्था तयार करून स्त्रियांच्या दास्याची चौकट आणखी भक्कम करण्यात आली, ती आजतागायत सुरू आहे. ''स्त्रीसत्तेमध्ये स्त्रीवैद्याला 'कुलटा' म्हणत असत, ज्याचा अर्थ असा होता, जी कुलाचे स्वास्थ्य सांभाळते ती. त्यानंतरच्या पुरूषसत्तेने या शब्दाला 'वाईट स्त्री' असा अर्थ लावून दिला. आज आपल्याला तोच अर्थ माहित आहे. चित्रलेखा कौसल यांनी आपल्या पुस्तकात स्त्रीदास्याचा परामर्श घेतला आहे. त्यात त्यांनीही स्त्रियांचा जो विवाह होतो ते प्रतिक आहे तिच्या गुलामीचे असेच म्हटले आहे. त्या लिहितात, ''कन्या शब्द की उत्पत्ति, कम धातू से हुई और इसका अर्थ है– चाहे जिस पुरूष की इच्छा कर सकनेवाली. स्त्रीराज्य की स्त्री अपनी शर्तो पर जबतक टिकी रही तबतक अपने अर्थो की सिध्दी करती रही किन्तू पुरूषसत्ताक व्यवस्था में वे पिता की पुत्री/कन्या बनी. शुरू–शुरू में वे किसी की पुत्री न होने के कारण इस कन्या को भोगने के बाद या प्राप्ती के बाद स्त्री और दुसरे को दान में देने का चलन था, जिसकी आवश्यकता खत्म हो गयी उसे दान करना पडता था. कन्यादान में इसके लिये पिता होना जरूरी नहीं था, किन्तू आधुनिक परिवार में नातेदारी निश्चीत होने से पिता ही कन्यादान करता है. उसे पुत्री को भोगना निषिध्द है.''[३] या वक्तव्यावरून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, स्त्रीदास्य मजबूत आणि टिकाऊ राहण्यासाठी त्यावर कुटूंब आणि विवाह नामाच्या कवचाची प्रक्रिया केली गेली. टप्प्या–टप्प्याने बदलत गेलेल्या कुटुंब आणि विवाहाचे आजचे स्वरूप आणि प्रारंभिक स्वरूप यात बरेच अंतर आहे, हे अंतर का पडले, कसे पडले हा स्वतंत्र विषय आहे. मात्र एवढे नक्की की कुटुंब आणि विवाह यांच्या बुरूजाआत स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व गाडण्यात आले. वारंवार तिच्या मानवी अधिकारांचे उल्लंघन करण्यात आले.

## दास्यमुक्तीचे प्रयत्न :–

लेनिन यांनी म्हटले होते की स्त्रियांना राजकारणात आणल्याशिवाय जनतेला राजकारणात आणणे अशक्य आहे. म्हणजे स्त्रीचे महत्व लेनिन ओळखून होता. भारताबद्दल बोलायचे म्हणजे राजकारण तर दुरच पण समाजात त्यांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह होते. म्हणून अगदी पहिल्या पातळीवरून तिला मुक्त करायचे होते. धर्माने ज्या अवस्थेत तिला पोचवले, त्यातून बाहेर काढण्यासाठी भारताला १९ वे शतक पाहावे लागले. सर्वप्रथम तिच्या उन्नतीचा मार्ग खुला केला तो फुले दंपती यांनी. स्त्रीशिक्षणाला सुरूवात करून म. जोतिबा आणि सावित्रीबाई यांनी स्त्रीदास्याच्या शृखंला तोडायला सुरूवात केली. भारतीय स्त्रीपुढे कमी समस्या नाहीत. वैयक्तिक पातळीपासून ते त्याची सुरूवात होते ती कुठेही थांबतांना दिसत नाही. या क्रांतिवाद्यांनी स्त्रीला दास्यातून मुक्त करण्यासाठी केलेल्या प्रयत्नातूनच आज तिला आत्मभान आले आहे. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वात प्रथम स्त्रियांच्या प्रगतीत जी विघ्ने आहेत त्यांना दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी असा मजबूत दिवाणी कायदा बनविला जो समान तत्वांवर आधारीत आहे व त्याची व्याप्ती एवढी मोठी आहे की हा कायदा समाजाच्या दुसऱ्या क्षेत्रात पण प्रभावशाली म्हणून सिध्द होईल. डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी जो प्रामाणिक प्रयत्न केला तो अतुलनीय आहे.''[४]याशिवाय भारतीय स्त्रियांसाठी एक कौटुंबिक कायदा संसदेत मांडण्याचा मानस डॉ. आंबेडकर यांनी व्यक्त केला. मात्र हिंदू कट्टरवाद्यांनी याला कडवा विरोध केला. विरोध करणाऱ्यांमध्ये बाबू राजेंद्र प्रसाद, पं. नेहरू यांच्या मंत्रिमंडळातले मंत्री, मुस्लीम, ख्रिश्चन यांचा समावेश होता. हे चित्र पाहून त्रंस्त झालेले डॉ. आंबेडकर यांनी १९५२ मध्ये कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला. पं. नेहरूंनी हिंदू स्त्रियांसाठी हिंदू कोड बिल संसदेत मांडण्याचा नंतर प्रयत्न

केला. पण हिंदू महासभा, रामराज्य परिषद यांनी देवासच्या राजकन्या प्रभावती देवींच्या नेतृत्वाखाली हिंदू कोड बिलाविरूध्द प्रचार केला. त्या दरम्यान हिंदू कोड बिलाचे समर्थन करणाऱ्या भारतीय महिला फेडरेशनच्या नेत्या हाजरा बेगम यांच्यावर हल्ला करण्यात आला. एवढे असूनही हिंदू कोड बिलाला मोठा पाठिंबा मिळाला आणि १९५६ साली ते पास करणे संसदेला भाग पडेल. मात्र त्याची अंमलबजावणी हवी तशी झाली नाही, हा भाग वेगळा.

हिंदू कोड बिलात, प्रामुख्याने स्त्रीला संपत्तीचा अधिकार मिळाला. वारसाहक्क मिळाला. शिवाय निर्वाह, विवाह, घटस्फोट व दत्तक घेण्याचा अधिकार सज्ञान व पालकत्व इ. चा अधिकार कायद्याने मिळाला. हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने भारतीय स्त्री काही अंशी दास्याच्या विळख्यातून बाहेर पडली. बाकी सारे तिच्यावर झालेल्या संस्कारामुळे तिला मिळाले नाही. सामाजिक दृष्टीकोणात व मानसिकतेत बदल झाल्याशिवाय स्त्रीदास्य संपणार नाही, हे अटळ आहे. त्यानंतर स्त्रीसक्षमीकरणासाठी जी धोरणे—उद्दीष्टे शासन ठरवत होती ती कागदावरच राहिली आणि स्त्रीचे सबलीकरण होऊ शकले नाही. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना मतदानाचा हक्क तर दिला मात्र तेही बऱ्याच जणांना रूचले नाही आणि 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी' हाच विचार पुढे रेटल्या गेला. स्त्रीदास्याला कारणीभूत एक—दोन घटक नाहीत. म्हणून अत्यंत सूक्ष्मपणे त्याचा विचार करून स्त्रीला अवसर दिला पाहिजे. डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या भाषेत बोलायचे झाले तर ''महिलांच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारांच्या पाठीशी स्वत:ची शक्ती उभी करणे हीच म. ज्योतीराव फुल्यांना योग्य आदरांजली ठरेल!''[५] स्त्रीला मागे खेचणाऱ्यांची संख्या तिच्या पाठीशी उभे राहणाऱ्यांपेक्षा जास्त आहे. या संख्येत घट व्हायला हवी. पुरूष समाजाची तिला सोबत मिळाली तर आगामी चित्र खूप सुंदर राहील!

## निष्कर्ष :—

१. स्त्रियांचा दर्जा हा निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. त्यांचे सामाजिक दौर्बल्य सामाजिक स्थानानुसार अस्तित्वात आले.
२. स्त्रियांच्या अत्याचाराचे केंद्रबिंदू कुटुंब व विवाहसंस्था आहे. स्त्रियांच्या मानवी अधिकारांचे उल्लंघनही येथेच सर्वात अधिक होते. म्हणून या दोनही संस्थांच्या स्वरूपात फेरबदल होण्याची अत्यंत गरज आहे.
३. भारतीय स्त्रियांना पारंपारिक दास्यातून मुक्त करण्याचे महनीय कार्य आधुनिक काळात महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. दास्यात ढकललेल्या स्त्रियांना महापुरूषांनी त्यातून बाहेर काढले, हे विशेष.

## संदर्भ :—


१. कारखानीस सरला—अनुवाद, स्त्रिया आणि कम्युनिझम, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र.आ. १९५२, पृ. १
२. तत्रैव, पृ. २
३. कौसल चित्रलेखा, भारतीय मुलनिवासी महिलाओं के गुलामी का रहस्य, बांधव प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २०१४, पृ. १४.
४. खांडेकर—गवई आशा, महिलांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००९, पृ. ५२.
५. गोऱ्हे नीलम, समाज आणि महिला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००१, पृ. ६५.


❖❖❖

# कोवीड – १९ महामारीच्या काळात महिला सरपंचांनी केलेल्या कामाचा अभ्यास

प्रा.डॉ. अरुण शेंडे
सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email: arundshende@gmail.com भ्रमणध्वनी ९६२३४३३४३८

## सारांश :–

२०१९–२० या वर्षात कोवीड १९ हया विषाणुच्या रूपाने भारतामध्येच नव्हे; तर संपूर्ण जगामध्ये हया महामारीने विळखा घातला आहे. हया विषाणुच्या भयाने, दहशतीने व प्रसाराने सामाजिक, आर्थिक जीवन ढवळून निघाले आहे. प्रारंभी शहरी भागात पाय पसरलेल्या हया विषाणुने ग्रामीण भागात सुध्दा प्रवेश केला. हया विषाणुच्या संसर्गामुळे शासनाला अनेकवेळा टाळेबंदी करावी लागली. हयामुळे ग्रामीण भाग सुध्दा प्रभावीत झालेला आहे. अशावेळी महिला सरपंचाची भुमिका कशी राहिली, अशा स्थितीत आलेल्या परिस्थितीशी सामना कसा केला. दरम्यानच्या काळामध्ये विकासाची कामे कशी मार्गी लावली. प्रशासन कसे सांभाळले. हया सर्व बाबींचा आढावा प्रस्तुत संशोधनामध्ये घेण्यात आला आहे.

बीजसंज्ञा :–
कोवीड १९, महामारी, महिला सरपंचांची कामे

## प्रस्तावना :–

भारताच्या स्वातंत्र्यानंतर व पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतर भारतात ग्रामीण विकासाची पहिली सामुदायीक विकास योजना २ ऑक्टोबर १९५२ ला सुरु झाली. शासनस्तरावर ग्रामीण विकासाकरीता सुरु झालेली ही पहिली योजना. या योजनेच्या माध्यमातून प्रायोगिक दृष्टीकोनातून देशाच्या विविध भागामध्ये प्रकल्प सुरु करण्यात आले. ग्रामस्तरावर काही मुलभूत स्वरुपाच्या सुविधा उपलब्ध करून देणे व कृषीविकासाला चालना देणे या हेतूने प्रामुख्याने ज्या भौगोलीक प्रदेशामध्ये वीज आणि पाण्याची सोय आहे. व विस्थापीतांचे पुनर्वसन करण्यासाठी २ ऑक्टोबर १९५२ ला भारताचे तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु हयांच्या हस्ते राजस्थान राज्यातील नागोर जिल्हयातील एका खेडयातील रस्ताबांधणीच्या भुमीपूजनाने हया योजनेचा आरंभ झाला. ही योजना प्रायोगिक स्वरुपाची असल्यामुळे हया योजनेची उपयुक्तता लक्षात घेता हया योजनेला कायम मान्यता देण्यासाठी व हया योजनेचे विस्तारीकरण करण्यासाठी ही योजना सुरु झाल्याच्या बरोबर एक वर्षानी म्हणजेच २ ऑक्टोबर १९५३ ला राष्ट्रीय विस्तार योजना सुरु करण्यात आली. सामुदायिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजना यामधील फरक एवढाच की, सामुदायिक विकास योजना हा प्रायोगिक स्वरुपाचा प्रकल्प असून राष्ट्रीय विस्तार योजना ही कायम संघटना आहे. राष्ट्रीय विस्तार योजनेच्या विकास गटांचे संपूर्ण देशामध्ये विस्तारीकरण करण्यात आले. या योजनेच्या विकास कार्यासाठी मुलभूत संघटना, शासकीय कर्मचारी अशा प्रकारची यंत्रणा असणार आहे. कमीत कमी संसाधने व आर्थिक स्त्रोतांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. सामुदायिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजनेचे काम सुरु असताना हया योजनेचे मुल्यमापन करण्याचे शासनाने योजले व १६ जानेवारी १९५७ मध्ये बळवंतराव मेहता हयांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरण समितीची स्थापना झाली. या समितीने आपला अहवाल शासनाला २४ नोव्हेंबर १९५७ ला सादर केला. या अहवालामध्ये बळवंतराव मेहता समितीने ग्रामीण स्थानिक शासनाची त्रिस्तरीय योजना मांडली. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यातील पंचायत समिती घटकाकडे आवश्यक ती कार्यकारी सत्ता सुपुर्द करण्याची व जिल्हा परिषदेकडे समन्वयाचे कार्य सुपुर्द करण्याची शिफारस मेहता समितीने केली. भारत सरकारने मेहता समितीच्या शिफारसी विचारार्थ प्रत्येक राज्याकडे पाठविल्या. या आधारे महाराष्ट्र सरकारने वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने अभ्यास करुन आपला अहवाल महाराष्ट्र सरकारला सादर केला. महाराष्ट्र सरकारने ज्या शिफारशी स्विकारून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मंजुर केला.

१९५९ मध्ये बळवंतराव मेहता समितीने स्थानिक संस्थेतील महिलांच्या प्रतिनिधीत्वासाठी विशेष प्रयत्न केले. ज्यामुळे काही राज्यांनी महिला प्रतिनिधीत्वाची व्यवस्था केली. त्याच काळात महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, हरियाणा या राज्यांमध्ये एकही स्त्री सदस्य वा सरपंच निवडून न आल्यामुळे त्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला गेला.

१९६० ला महाराष्ट्रमध्ये वसंतराव नाईक समितीने अशी शिफारस केली की, जर पंचायतीमध्ये स्त्रियांना प्रतिनिधीत्व नसेल तर अशावेळी दोन स्त्री प्रतिनिधींची नियुक्ती करावी व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार जिल्हा परिषदेवर जर एकही स्त्री निवडून आली नसेल तर अशावेळी दोन स्त्रियांची स्विकृत सदस्य म्हणून नियुक्ती केल्या गेली.

भारत सरकारने १९७७ ला अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली. या समितीने पंचायतीमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढावा या हेतुने दोन जागा आरक्षित असाव्या अशी शिफारस केली. जर दोन स्त्रिया पंचायतीमध्ये निवडून आल्या नाही तर अशा वेळी दोन स्त्री प्रतिनीधींची पंचायतीवर नियुक्ती करावी.

## ७३ वी घटनादुरुस्ती :–

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांच्या प्रतिनिधीत्वाला ७३ व्या घटनादुरुस्तीने संवैधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. यापूर्वी देशातल्या विविध राज्यांनी अध्यादेशाद्वारे पंचायत संस्थावर स्त्रियांच्या ज्या नियुक्त्या केल्या होत्या, त्याला घटनात्मक आधार नव्हता. सोबतच पंचायत व्यवस्थेमध्ये देशातल्या विविध राज्यांमध्ये एकवाक्यता नव्हती. परंतु ७३ व्या घटनादुरुस्तीने केंद्रशासनाच्या निर्देशानुसार आपल्या राज्यांमध्ये कायदे केले व देशातील संपूर्ण राज्यातील पंचायत राज व्यवस्था एकसमान काम करू लागली.

७३ व्या घटनादुरुस्तीच्या विधेयकाला लोकसभेने २२ डिसेंबर १९९२ ला लोकसभेने व २३ डिसेंबर १९९२ ला राज्यसभेने या विधेयकाला मान्यता दिली व ७३ वे घटनादुरुस्ती विधेयक १९९२ या स्वरूपात ते मान्य झाले. व जानेवारी १९९३ पासून ७३ वे घटनादुरुस्ती विधेयक संमत झाले व २४ एप्रिल १९९३ ला ते कार्यान्वीत झाले.

श्या विधेयकामुळे स्त्रियांना स्थानिक संस्थामध्ये ३३% वाटा मिळाला. केवळ सदस्य म्हणूनच नाही तर अध्यक्ष, सभापती व सरपंच या पदावर विराजमान होण्याचा अधिकार या विधेयकामुळे प्राप्त झाला. जो घटक सत्तेपासून कित्येक वर्षे वंचित होता. अशा आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या घटकांतील स्त्रियांना देखील पंचायत संस्थामध्ये प्रतिनिधीत्व दिल्या गेले.

केंद्र सरकारने २००९ ला एक कायदा करून महिलांसाठी पंचायत संस्थामध्ये असलेले ३३% चे आरक्षण ५०% वर आणले. महाराष्ट्र सरकारने पंचायतीमधील स्त्रियांच्या ५०% आरक्षणाला २०११ च्या एका विधेयकाद्वारे संमती दिली. त्यामुळे लोकसंख्येत स्त्री पुरुषांचा समान वाटा असताना स्थानिक संस्थाच्या सत्तेत देखील स्त्रियांना ५०% वाटा मिळाला.

## कोवीड १९ ची परिणामकारकता :–

कोरोना विषाणु काय आहे, आणि त्या विषाणुच्या संसर्गाची दाहकता काय आहे, हे ज्यांना माहिती नव्हते, ते मार्च २०२० मध्ये लहान थोरांपासून कोरोना काय आहे, ते सगळयांना माहिती झाले. चीन देशातील ज्या वुहान शहरातून हया विषाणुचा जन्म झाला, त्या विषाणुने अवघ्या काही दिवसात जगावर कब्जा केला. भारतामध्ये ३० जानेवारी २०२० ला केरळ राज्यात पहिला कोरोना पॉझीटीव्ह रुग्ण आढळला. केरळ शासनाने हया रुग्णाला बरे करण्यात यश मिळविले. परंतु परदेशातून भारतात आलेल्या मुळ भारतीयांच्या आगमनाने हया रोगांचा मोठया प्रमाणात प्रसार झाला व आज संपूर्ण भारतभरात कोरोना रुग्णांची संख्या लाखोच्या घरात पोहोचली. व कोरोना विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी केंद्रशासनाने पहिली टाळेबंदी दि. १५ मार्च २०२० ला घोषीत केली. लोकांची गर्दी कमी असून देखील रुग्णांची संख्या कमी होत नाही असे लक्षात येताच शासनाने अनुक्रमे १५ एप्रिल २०२०, ४ मे २०२०, १८ मे २०२० असे एकूण चार वेळा शासनाला टाळेबंदी करावी लागली. एवढे करूनही कोरोनाचा संसर्ग वाढत आहे.

या टाळेबंदीच्या दरम्यान शहरी भागातच नव्हे, तर ग्रामीण भागात मोठया समस्या निर्माण झाल्या. प्रामुख्याने बेरोजगारी, शिक्षण, कौटुंबिक हिंसाचार, व्यासनाधीनता अशा अनेक समस्यांना कोरोना विषानुने नव्याने जन्म दिला.

## कोरोना प्रतिबंध: सरपंचाची कार्ये :—

शहरी भागाचा विचार केला तर पोलीस यंत्रणा मोठया प्रमाणात असल्यामुळे लोक गर्दी कमी करतात, परंतु ग्रामीण भागात पोलीस यंत्रणा नसते. त्यामुळे शासनाने ग्रामस्तरावर सरपंचाच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीमध्ये तलाठी, पोलीस पाटील, आशा वर्कर, सामाजिक कार्यकर्ते हे सदस्य असतील. यामध्ये सरपंचाची प्रमुख जबाबदारी असते. तेव्हा या काळात महिला सरपंचावर मोठी जबाबदारी आली. तेव्हा त्यांनी या काळात जबाबदारी कशी पार पाडली, हा देखील या अभ्यासाचा हेतु आहे.

## अध्ययन पद्धती :—

प्रस्तुत अध्ययनाकरीता द्वितीयक तथ्यांचा वापर करण्यात आला. यामध्ये विषयाच्या अनुषंगाने संदर्भ ग्रंथ, विविध जर्नल्स, विविध संकेतस्थळावर प्रकाशित माहिती, वृत्तपत्रीय बातम्या इत्यादीचा संदर्भ घेऊन तथ्याचे विश्लेषण करण्यात आले. व त्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले.

## अध्ययनाचे उद्देश :—

१) टाळेबंदीच्या काळात महिला सरपंचानी केलेल्या कामाचा आढावा घेणे.
२) कोवीड—१९ महामारीच्या काळात महिला सरपंचासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.
३) कोवीड—१९ महामारीच्या काळात महिला सरपंचानी घेतलेल्या लोकसहभागाचा अभ्यास करणे.

## उपकल्पना :—

१) महिला सरपंचानी कोरोना विषाणुचा संसर्ग रोखण्यासाठी गावपातळीवर उपाययोजना केल्या.
२) कोवीड—१९ महामारीच्या काळात महिला सरपंच अनेक आव्हानांना सामोरे गेल्या.
३) कोवीड—१९ महामारीच्या काळात महिला सरपंचानी लोकसहभाग घेतला.

## विश्लेषण :—

कोरोना विषाणु प्रादुर्भावाच्या कालखंडात गावपातळीवर ज्या लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला, वा जे पुण्या मुंबईवरून वा इतर महानगरांमधून आपल्या मुळ गावी परतले. त्यांना गावातील जिल्हापरिषदेच्या शाळेत विलगीकरण करण्यात आले. अशा विलगीकरण कक्षात ठेवलेल्या रुग्णांची काळजी, देखभाल व त्यांचे निवास, भोजन इत्यादी जबाबदारी सरपंचावर देण्यात आली. हे काम सांभाळत असताना हयाचा अनेक महिला सरपंचांना त्रास झाला. विलगीकरण कक्षात ठेवलेले व्यक्ती एका ठिकाणी न थांबता ते गावात फिरायचे. इतरही विरोधी गटातील सदस्य त्यांच्यासोबत तोंडाला मास्क न बांधता घोळक्या घोळक्याने चर्चा करीत बसायचे. अशावेळी सरपंचाने हटकले तर विरोधी गटातील लोक जुमानत नसत. अशावेळी पोलीस संरक्षण दयावे, अशा तक्रारीचे निवेदन सरपंच परिषदेच्या वतीने नगर तहसिलचे नायब तहसिलदार श्री. राजू दिवाण हयांना देण्यात आले. हया निवेदनावर नांदगांवच्या सरपंचा सुनिता सखाराम सरख हयांची देखील सही आहे. ( दै. पुढारी दि. २३ जून २०२०)

चंद्रपूर जिल्हयातील वरोरा तालुक्यातील वनोजा हे तीनशे कुटुंबाच गांव. हया गावच्या सरपंचा निर्मला गेघाटे यांनी कोरोना महामारीच्या काळात अत्यंत संघर्षात्मक भुमिका बजावली. टाळेबंदी काळामध्ये निर्मला ताईंनी लोकांना सामाजिक अंतर पाळण्यासाठी प्रबांधन केले. व गावाच्या प्रवेशद्वारावर बाहेरगावची व्यक्ती येऊ नये, यासाठी गस्त वाढविली. निर्मला ताईंनी कोवीड—१९ पासून गावाचा बचाव करण्यासाठी एक गट तयार केला. बचत गटातील स्त्रियांवर निर्मलाताईंचा चांगला प्रभाव होता, त्यांनी बचत गटातील स्त्रियांना आपले कुटुंब व गावाच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने सुचना दिल्यात व कोरोना संसर्गाच्या बचावासाठी वारंवार हात धुवावे, सामाजिक अंतर पाळावे, या अनुषंगाने मार्गदर्शन केले. यासोबत प्रत्येक कुटुंबाला शासकीय मदत पुरविण्याचे काम केले. हया दरम्यान निर्मला ताईंनी बहुउद्देशीय स्वरूपाची कामे केली. गावाला केवळ कोरोनापासून सुरक्षित ठेवणे, एवढेच निर्मलाताईंसमोर आव्हान नव्हते, तर टाळेबंदीच्या काळात जी उपासमार होणार होती, ती थांबविणे देखील गरजेचे होते.

हरियाणा राज्यातील पानीपत जिल्हयातील मनाना हे गांव. या गावच्या ३२ वर्षे वयाच्या सरपंच सुनीता हयांनी कोरोना विषाणुचा संसर्ग व त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी चांगलाच लढा दिला. सरपंच सुनीता हयांनी पुढाकार घेऊन ७,००० लोकांना मास्कचे वाटप केले. व विषाणुचा जंतुप्रसार होऊ नये, यासाठी गावामध्ये फवारणी

केली. व कोरोना विषाणुच्या प्रसाराच्या अनुषंगाने जनजागृती केली. टाळेबंदीच्या काळात गावातील लोक घराच्या बाहेर निघून एकत्र जमायचे, गावात फिरायचे, लोकांमध्ये जागृतीचा अभाव असल्यामुळे ''आम्हाला काही होत नाही'' हयाच मानसिकतेमध्ये लोक असायचे. तेव्हा हया परिस्थितीत लोकांना सांभाळणे हे सरपंच सुनीता समोर आव्हान होते. परंतु प्रत्येकच आव्हानांना सरपंच सुनीताने समर्थपणे तोंड दिले. कोवीड–१९ ला सामना देण्यासाठी सुनीता ताईने लोकसहभाग घेतला. गावातील काही स्वयंस्फुर्त स्वयंसेवकांची फळी तयार केली. व बाहेर गावाहून येणाऱ्या लोकांचा गावात शिरकाव होऊ नये यासाठी पहारा लावला. दररोज २५ ते ३० गावकरी आळीपाळीने पहारा देण्याचे काम करायचे. साधारणत: पहारा दोन पाळीमध्ये असायचा. सकाळी ६.००ते सायं. ७.०० व सायंकाळी ७.०० ते सकाळी ६.००. या दोन पाळयांमध्ये गावातील स्वयंस्फुर्त स्वयंसेवक पहारा दयायचे. यासाठी सरपंच सुनीताने हया लोकांना प्रवृत्त केले. गावातील जे लोक गावाच्या बाहेर जात होते, तेव्हा त्यांनी गावाबाहेर जाणे आवश्यक आहे का? एकूण त्याची निकड विचारात घेऊनच त्याला बाहेरगावी जाण्याची परवानगी दिली जात असे. परंतु ती व्यक्ती परत आल्यानंतर त्याने अंघोळ केली की, नाही स्वच्छता केली की, नाही. यासाठी स्वयंसेवक बारकाईने लक्ष ठेवत होते. गावातील इतर जिल्हयातून किंवा परप्रांतातून येणाऱ्या व्यक्तींची ग्रामपंचायत मार्फत तपासणी व आवश्यक उपचार देखील केले जात होते. अशा नागरीकांना त्यांच्या घराशेजारचे नागरीक त्यांना घरी राहू देण्यास मनाई करीत होते, अशा आव्हानांना देखील सरपंच सुनीताला सामोरे जावे लागले. गावातील मुळ नागरीक परंतु परदेशातून परतलेले चार नागरीक, ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन त्यांची ताबडतोब वैद्यकीय तपासणी करून त्यांना विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले. हया विलगीकरण कक्षाची सोय शासकीय मुलींच्या शाळेत करण्यात आली. या ठिकाणी ४०० लोकांची राहण्याची व्यवस्था होती. यासोबतच शुध्द पिण्याचे पाणी व जेवणाची देखील व्यवस्था करण्यात आली.

गावात दारुची दुकान पण आहे. शासनाच्या निर्देशानुसार २१ मार्च २०२० पासून ही दुकाने बंद करण्यात आली. व त्यावर नियंत्रण ठेवण्यात आले. काही किराणा वा तत्सम दुकानदारांनी आपल्या दुकानातील वस्तुंच्या किमती वाढवून विक्री करायला सुरुवात केली, तेव्हा सरपंच सुनीता हयांनी पोलीसांना बोलावून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. कौटुंबिक छळाची एकही तक्रार गावकऱ्यांकडून आली नसली तरी जर असे निदर्शनास आले तर असे प्रकरण लगेच पोलीसांकडे दाखल केल्या जात असे. पंचायतीच्या सर्व सदस्यांना सोबत घेऊन सुनीताताई दर दोन दिवसांनी व्यक्तीगत तपासणी करायच्या.

सरपंच सुनीतासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे गरीब लोकांना धान्य पुरविण्याचे. शासनाच्या निर्देशानुसार ज्यांच्याजवळ बी. पी. एल. चे कार्ड आहे, त्यांना रास्त भाव धान्य दुकानातून मोफत धान्य पुरवठा केला जायचा. परंतु प्रश्न होता, ज्यांच्याजवळ बी. पी. एल. कार्ड नाही, त्यांचा? अशावेळी सुनीताताईंनी स्वत: निधी तयार केला. गावात व बाहेरगांवी जे धनवान लोक होते, त्यांचे सहाय्य घेतले. व जे कार्डधारक नाही, अशांना राशन दुकानातून धान्याचा पुरवठा केला.

राधादेवी, भडसिया गावाची सरपंच. हे गांव राजस्थान राज्यातील नागौर तहसिल येथे आहे. राधादेवी हयांनी कोरोना हया विषाणुपासून गावाला सुरक्षित ठेवले. जिल्हाप्रशासन व गटविकास अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली राधादेवीने स्थानिक सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती विचारात घेत स्थानिक पातळीवर कोरोनाच्या संरक्षणार्थ उपाययोजना शोधल्या.

शासनाने तयार केलेल्या कोवीड–१९ च्या प्रतिबंधात्मक मार्गदर्शिकेची काटेकोर अंमलबजावणी करून अत्यंत संघर्षरत परिस्थितीत अन्नसुरक्षा कार्यक्रम राबविला.

आपत्ती व्यवस्थापनाचे कुठलेही प्रशिक्षण नसताना अत्यंत समर्थपणे गावातील लोकांना कोवीड–१९ पासून सुरक्षीत ठेवले.

हरियाणा राज्यातील महेंद्रगढ नजदीक पंचनोटा गावाच्या सरपंच चंद्रकलादेवी असून त्यांनी पुढाकार घेऊन संपूर्ण गांव सॅनिटाईज केले. त्यांनी एक नियम कठोरपणे राबविला तो असा की, जे कामगार बाहेरगांवाहून परत आले. त्यांची नारनूल तहसिलच्या निर्देशानुसार वैद्यकीय तपासणी करून घेतली. चंद्रकलादेवी हयांनी पंचायत सदस्यांच्या सहभागाने गावाच्या वेशीवर म्हणजे प्रवेशद्वारावर चेकपोस्ट केले. हया चेकपोस्टवर गावातून बाहेर जाणाऱ्या व बाहेरून येणाऱ्या व्यक्तीची चौकशी केली जायची. त्यासाठी आळीपाळीनी लोक काम करायचे. यासाठी चंद्रकलादेवी हयांनी सदस्यांबरोबरच गावातील प्रमुख लोकांचा सहभाग देखील घेतला. दिवसाच्या वेळेला या चेकपोस्टवर स्त्रिया पहारा दयायच्या, तर रात्रीच्या वेळी पुरुष पहारा दयायचे.

## निष्कर्ष :—

१) टाळेबंदीच्या काळात महिला सरपंचांनी विलगीकरण कक्षाची सोय, भोजन व्यवस्था, गावच्या वेशीवर चेकपोष्ट इत्यादी कामे केली.
२) कोवीड—१९ महामारीच्या काळात महिला सरपंचांसमोर जी आव्हाने होती, त्या आव्हानांना महिला सरपंचांनी समर्थपणे तोंड दिले.
३) कोवीड—१९ महामारीच्या काळात महिला सरपंचांनी ग्रामपंचायत सदस्य, स्वयंसहायता गटाच्या स्त्रियांचा गाव कोरोना विषाणुपासून सुरक्षीत ठेवण्यासाठी सहभाग घेतला.

## संदर्भ :—

दर्शनकार, अर्जुनराव (२०१७). पंचायत राज आणि नागरी प्रशासन. औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन
देवगांवकर, एस. जी. (२०१५). पंचायत राज आणि सामुहिक विकास. नागपूर : श्री. साईनाथ प्रकाशन
नांदेडकर, व्ही. जी. (२०१७). पंचायती राज : एक विश्लेषणात्मक परामर्श. पुणे : के. सागर पब्लिकेशन
ठोंबरे, सतीश (२०१६). ग्रामप्रशासन. औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन
वानखेडे, कैलास संपा (२०१६). भारतीय स्त्री : काल, आज आणि उद्या. औरंगाबाद : अजंठा प्रकाशन
दै. पुढारी दि. २३ जून २०२०
An International Multidisciplinary Quarterly Research Journal, Volume – IX, Issue – II 2019, Aurangabad : Ajanta Prakashan.
www.outlookindia.com> story dt. 6/09/2020
www.thehindu.com> other states dt. 6/09/2020
www.counterview.net dt. 8/09/2020
www.marthafarrellfoundation.org> dt. 9/09/2020
www.indiawaterportal.org> article dt. 7/09/2020

❖❖❖

# करोना **(Covid-19)** महामारीची पार्श्वभूमी आणि शिक्षण क्षेत्रासमोरील ई—लर्निंगचे आव्हान: एक विश्लेषण

प्रा.डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे
सहा. प्राध्यापक—समाजशास्त्र विभाग
सावित्री जोतिराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email: seemavshete@gmail.com भ्रमणध्वनी ९४०४३७३२८२

## सारांश:— **(Abstract)**

महात्मा गांधीजी म्हणतात, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे, शिक्षणाने व्यक्तीला प्राप्त साधनसंपत्तीचा विकास व उपयोग करून घेता येतो. या विचारांना प्रत्यक्षात उतरवण्याची खरी वेळ करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शिक्षण प्रक्रियेला निरंतर ठेवण्यासाठी येऊन ठेपली आहे. करोना संसर्गाचा वाढता प्रसार आणि धोका लक्षात घेता प्रत्यक्ष शिक्षण प्रक्रिया सुरू करणे सद्यस्थितीत तरी अशक्य आहे, अशा स्थितीत ई—लर्निंग सारख्या दुरस्थ शिक्षणाच्या माध्यमाने शिक्षणाची प्रक्रिया क्रियान्वीत करणे क्रमप्राप्त झाले आहे, परंतू ई—लर्निंग हे माध्यम भारतीय समाजात सर्वच ठिकाणी पुरेपुर अमंलात आणणे शक्य होईल का? त्याची उपयोगिता वाढेल का? त्याचा अवलंब सर्वांना शक्य होवून शिक्षणाचा उद्देश व प्रक्रिया पुर्णत्वास जाईल का? या प्रश्नांची उकल करण्यासाठी सदर विषयाचे विचार मंथन करण्यात आले, प्राथमिक आकलनावरून असे लक्षात आले की, ई—लर्निंग सद्यस्थिती अत्यंतिक उपयुक्त साधन असले तरी त्यास वास्तवात उतरवणे एक आव्हान आहे. शिक्षण संस्था, शिक्षक, विद्यार्थी व पालक या घटकांना प्रत्यक्षात वापर करतांना अनेक मर्यादांचा सामना करावा लागतो आहे, म्हणून ई—लर्निंग त्यांच्या दृष्टिनेही एक आव्हानच आहे, असे स्पष्ट होते. संबंधित स्मार्ट साधनांचा, प्रभावी इंटरनेट सुविधा उपलब्धतेचा, एकाग्रतेचा, ई—लर्निंग प्रक्रियेच्या सवयीचा अभाव यामुळे अनेक अडचणी निर्माण होवून शिकण्यात मर्यादा येत आहेत. असे असले तरी ई—लर्निंग हे करोना काळात शिक्षण पध्दतीला अखंडीत ठेवण्याचे वरदानच ठरले आहे. परिस्थिती आणि काळाची गरज लक्षात घेऊन ई—लर्निंगच्या माध्यमातून शिक्षण प्रक्रियेला न्याय देण्याचा प्रयत्न सर्वोतोपरी होणे आवश्यक आहे. दुर्गम भाग, आदिवासी भाग, ग्रामीण भाग, आर्थिक दृष्टया कमकुवत घटकांतील विद्यार्थ्यांना अन्य कोणत्या मार्गाने प्रभावीपणे शिक्षण देता येईल याची विचार करून अंमल बजावणी करण्याची सक्त गरज आहे, त्याबाबतही विचार होणे क्रमप्राप्त आहे.

बीजशब्द:— covid-19, करोना महामारी, टाळेबंदी, शिक्षण, पारंपारीक शिक्षण पद्धती, ई—लर्निंग, आव्हान, स्मार्ट साधने, दुर्गम भाग

## प्रास्ताविक:

करोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे सर्व जगभरात मानवी जीवन विस्कळीत झाले आहे, त्याची तिव्रता कमी अधिक स्वरूपात आढळून येते. covid–19 या विषाणूचा मानवी शरीरावरील कब्जा आणि तिव्र प्रसार यामुळे कांही देशात अधिक प्रमाणात जिवीत व वित हानी होत आहे. करोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे अनेक क्षेत्र प्रभावित झाली आहेत, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य या क्षेत्रांवरही मोठा विपरित परिणाम झाला आहे, ज्यामुळे समाजात विविधांगी प्रश्न वा समस्या निर्माण झाल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून शिक्षण क्षेत्रावर देखील करोना महामारीच्या प्रादुर्भावझालेला दिसून येतो. भारतात साधारणत: १६ मार्च २०२० पासून शाळा, महाविद्यालये विद्यार्थ्यांसाठी बंद करण्यात आली, तर २४ मार्च पासून देशभर टाळेबंदी घोषित करण्यात आली आणि तेथून शिक्षणाची प्रक्रिया ''वर्क फर्म होम'' या संकल्पनेत बांधली गेली. वर्गखोलीतील शिकवणी, मुल्यमापन, परिक्षा याबाबी गौण झाल्या. कारण करोना वाढता प्रसार, पुर्व सोयीसुविधांचा अभाव, बालक व तरूणाई ची सुरक्षितता, करोना काळात भौतिक आंतर राखण्याची गरज यामुळे शिक्षण प्रक्रियेला मर्यादा निर्माण झाल्या.

ॲड. कासरेकर आणि वाढवणे आपल्या 'Impact of COVID-19 on Education System in India' या लेखात मांडतात, कीकरोना महामारीच्या पार्श्वभूमीमुळे देशव्यापी बंदमुळे जगातील जवळपास ९१टक्के विद्यार्थीसंख्या प्रभावित होत आहे, अनेक देशातील लाखो शिकणाऱ्यांवर स्थानिक बंदी लागू केल्या आहेत. युनेस्कोच्या अहवालानूसार करोना विषाणूच्या साथीच्या रोगाचा २२ देशांमधील २९० दशलक्ष विद्यार्थ्यांवर प्रतिकूल परिणाम

होईल. युनेस्कोच्या अंदाजानूसार शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यासह सुमारे ३२ कोटी विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. याच अनुषंगाने शाळा, महाविद्यालये दुष्परीणामांना सामोरे जावू नयेत व अधिक असुरक्षित आणि वंचित घटकांसाठी दूरस्थ शिक्षणाद्वारे शिक्षणाची प्रक्रिया सुरू ठेवण्याचा आग्रह युनोस्को द्वाराही केला जात आहे.

मागील सहा महिन्यापासून खंडित झालेली शिक्षणाची प्रक्रिया महामारीच्या परिस्थितीत अखंडित राहावी म्हणून शिक्षणाचे नव माध्यमे वा पर्याय अवलंबणे क्रमप्राप्त झाले आहे, कारण भारतात आजवर पारंपारीक शिक्षण पध्दतीवरच अधिक भर दिला जात होता, परंतू बदलत्या परिस्थितीनूसार 'ई—लर्निंग चे माध्यम' अधिक उपयुक्त ठरेल असे वाटते, म्हणून त्याआधारे करोनाच्या सावटात शिक्षण प्रक्रियेला अखंडित ठेवता येऊ शकते. याच बाबीस अधोरेखीत करून शिक्षणाची प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी कोणती माध्यमे उपयुक्त ठरतील? ई लर्निंगच्या माध्यमाने सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचेल का? ई लर्निंग च्या माध्यमाला अवलंब कितपत यश मिळेल? ई लर्निंगची प्रभावशिलता किती असेल? शिक्षण संस्था, शिक्षक व विद्यार्थी—पालक यांना कोणत्या आव्हानांना/समस्यांना सामोरे जावे लागत असेल या बाबीचा शोध घेण्याकरीता उपरोक्त विषयाचे अध्ययन करण्यात येत आहे.

## अध्ययनाचे उद्देश:—

१. करोनाची वाटचाल व टाळेबंदी आणि शिक्षण क्षेत्रावर झालेला प्रभाव/सहसंबंध अभ्यासणे.
२. करोना महामारीची पार्श्वभूमी आणि शिक्षण क्षेत्रातीन बदल याचा धांडोळा घेणे.
३. करोना महामारीची पार्श्वभूमी व ई—लर्निंग अवलंब वा उपयुक्तता अभ्यासणे.
४. शिक्षण प्रक्रियेत ई—लर्निंग समोरील आव्हानांचा शोध घेणे.
५. करोना महामारीच्या परिस्थितीत अखंडित शिक्षणाची प्रक्रियेकरीता उपाययोजना सूचवणे.

## अध्ययनाचे गृहितके :—

१. वाढत्या करोना प्रसार नियंत्रणात ठेवण्यासाठीचा एक भाग म्हणून टाळेबंदीचा अवलंब करण्यात आला ज्याचा प्रभाव शिक्षण क्षेत्रावरही मोठया प्रमाणात दिसून येतो.
२. करोना महामारीच्या पार्श्वभूमीमुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होवून नव्या पद्धतींचा अवलंब केला जात आहे.
३. ई—लर्निंग या साधनामुळेमहामारीच्या परिस्थिती मध्ये शिक्षण प्रक्रीया अखंडीतपणे सुरू आहे परंतू त्यास अनेक मर्यादा असल्याचे प्रकर्षाने जाणवते.
४. शिक्षण क्षेत्रासमोरील ई—लर्निंग पुरेपूर वास्तवात उतरवणे, एक आव्हान आहे असे वाटते.

अध्ययन पध्दती:—प्रस्तुत अध्ययनासाठी प्रामुख्याने दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये ग्रंथ, अहवाल व इंटरनेट वरील संबंधीत उपलब्ध माहितीचा अवलंब करण्यात आला आहे, तर प्राथमिक तथ्य संकलनामध्ये साधारणत: १० प्राध्यापकांशी, २० खाजगी व शासकीय शाळा शिक्षकांशी विषयांनुशंगाने संवाद साधला. व निरीक्षण तंत्राचाही अवलंब करण्यात आला आहे.

## तथ्यांचे निर्वचन / अर्थनिर्वचन/ स्पष्टीकरण :—

१) करोनाची वाटचाल व टाळेबंदी आणि शिक्षण क्षेत्रावर झालेला प्रभाव/सहसंबंध अभ्यासणे.

आपल्या देशात ११ फेब्रुवारी २०२० रोजी कर्नाटक राज्यात पहिला रूग्ण आढळला. आज दि. ७/सप्टें/ २०२० रोजी करोना बाधित रूग्णांची संख्या ३९,३६,७४७ इतकी असून ती अतीशय जलद गतीले वाढते आहे. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात तर दिवसागणिक ७० हजार पेक्षा अधिक रूग्ण संख्या वाढत आहे. व करोना बाधितांची मृत्यू संख्या ६८,४७२ झाली असून मृत्यूदर देखील वाढतो आहे. ही चिंतेची बाब आहे. हा रूग्णवाढीचा उद्रेक वाढू नये, व प्रशासनाला पायाभूत सेवा सुविधा करता याव्यात म्हणून टाळेबंदी चा अवलंब करण्यात आला होता.टाळेबंदी/लॉकडाउन अनुक्रमे : पहिले: २४ मार्च ते १४ एप्रिल, दुसरे: १५ एप्रिल ते ३ मे, तिसरे: ४ मे ते १७ मे, आणि चौथे: १८ मे ते ३१ मे २०२० या चार टप्यात लावण्यात आली. ज्यामुळे बऱ्याच प्रमाणात या विषाणूचे संक्रमण आटोक्यात होते. परंतू या टाळेबंदीचा दुरगामी परिणाम मात्र सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रावर होऊ लागला. लोकांच्या जगण्याचे, उदरनिर्वाहाचे आणि आर्थिक जीवनप्रणालीचे प्रश्न अधिक तिव्र बनू लागले. या बाबींना पुर्ववत आणण्यासाठी शासनाने १जून २०२० पासून अनलॉक करण्याचे ठरविले, त्यासोबत विशिष्ट निर्बंधेही

घालून दिले, जेणेकरून करोना संसर्ग प्रसाराची स्थिती अनियंत्रित होवू नये. जमाव बंदी, दळणवळण सुविधा नियंत्रण, सिनेमागृहे –सार्वजनिक जागा नियंत्रण, दुकानांच्या नियोजित वेळा.....वगैरे. यादरम्यान शाळा, विद्यालये, महाविद्यालये १६ मार्च पासून विद्यार्थ्यांसाठी प्रतिबंधित करण्यात आली होती, तर पुढे टाळेबंदीमुळे शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे देखील बंद झाली यातून विद्यार्थ्यांचे, शिक्षण क्षेत्राचे मोठे नुकसान झाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. विद्यार्थ्यांच्या नियोजित तासिका, परिक्षा, प्रात्यक्षिके, निकाल, पुढील प्रवेशाचे नियोजन, प्रवेश प्रक्रिया यासर्व बाबी अस्थिर झाल्या, करोनाच्या सावटामुळे याबाबत कोणतीही फारशी स्पष्टता विद्यार्थ्यांच्या हाती येत नाही. एकंदरीत गोंधळाची, अस्पष्टतेची वा अस्थिरतेची स्थिती निर्माण झाली आहे. ज्यातून विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असे प्रकर्षाने जाणवते.

यासोबतच पदवी शिक्षणाच्या अंतिम वर्षाच्या परिक्षा बाबतचा तिढा सतत अस्पष्ट राहिला, ज्यामुळे विद्यार्थी बिनधास्त झाले, अभ्यासाची सातत्य सुटले, कांहीची पुस्तके, नोट्स शहरात राहिली तर ते विद्यार्थी गावी अडकलेत, अशा अनेक अडचणी आहेत, आता ऑक्टोबर महिन्यात परिक्षा होणार म्हटले की, विद्यार्थी पुन्हा गोंधळले आहेत, या सर्व बाबी अशा आपत्तीच्या काळाचा परिणाम असेलच परंतू हे सर्व घडतय, जे सुस्थिर नाहीय. म्हणून समाजात नेहमी हा प्रयत्न केला जातो की, समाज सुस्थिर राहावा, व लोकांना जीवन जगणे सुलभ व्हावे परंतू या वैश्विक महामारीमुळे विपरीत परिणाम विविध घटकांवर प्रकर्षाने जाणवत आहेत.

शालेय मुलांचे केवळ शैक्षणिक नुकसान झाले असे म्हणता येणार नाही, तर त्यांचे हसणे हरवले असे म्हणावे लागेल, पुणे विद्यापिठातील मानसशास्त्रज्ञ डॉ. जूही देशपांडे विचार व्यक्त करतांना म्हणतात की, 'सध्याची टाळेबंदी, मुखपटीचा अवलंब आणि सतत घरात कोंडून असणं हया बाबी मुलांच्या चेहऱ्यावरचं हसू हिरावून घेतात, त्यांना कुणी हसतमुख दिसत नाही, त्याचं समवस्कां सोबतच हसणं, खेळणं, बागडणं, खोडया करणं' असा जगण्यातला जीवंतपणा हिरावला गेला आहे, ''रविंद्रनाथ टागोर म्हणतात, कह 'खरे शिक्षण म्हणजे जीवनाचा एक अविभाज्य भाग जो माणूस बनवितो, तेच शिक्षण होय तसेच शारीरिक, मानसिक, नैतिक, अध्यात्मीक यांचा विकास म्हणजे शिक्षण होय'' ही मुले आपली शाळा, शिक्षक, वर्गमित्र–मैत्रिण, मैदानावरचं खेळण सर्व कांही आठवण करीत आहेत, म्हणून मुलांचं शैक्षणिक नुकसाना सोबत इतरही मानसिक, भावनिक, व्यक्तीमत्व विकसनाचे नुकसान झाले आहे असे स्पष्ट होते, हया बाबी वेगवेगळया स्तरातील शालेय विद्यार्थ्यांशी केलेल्या चर्चेतून समोर आल्या आहेत.

युनेस्को ने भाकित केले, की''करोना काळ आणि त्याचा झालेला शिक्षण क्षेत्रावरील विपरीत परिणाम यामुळे मुले बालमजूरीकडे लोटली जाऊ शकतात.'' हा एक मोठा धोका आहे, तर कांही पालकांनी या काळात मुलींचे शिक्षण बाजूला ठेवून विवाह जूळवून दिले आहेत. अशा अनेक समस्या मुळ धरू लागल्या आहेत.

करोना महामारीच्या प्रादूर्भावाचा दुरगामी परिणाम विद्यार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, संचालक यांच्या वरहीझाला आहे. इतकेच नाही तर शैक्षणिक क्षेत्राशी निगडीत जे व्यावसायिक, नोकरदार होते ते देखील आर्थिक दुष्टया अस्थिर बनले आहेत.

२) करोना महामारीची पार्श्वभूमी आणि शिक्षण क्षेत्रातीन बदल याचा धांडोळा घेणे.

स्माजशास्त्रज्ञांच्य मते कोणतीही आपत्ती आली की, त्यामुळे आमुलाग्र बदल समाजात होतात, एकप्रकारची अस्थिरता समाजात निर्माण होते, ज्यामुळे अनेक बदलांचा स्विकार करावा लागतो. करोना महामारीची पार्श्वभूमी लक्षात घेता शिक्षण क्षेत्रात अनेक बदलावर अवलंब करावा लागतो आहे. एकुणच करोनाची वाढती रूग्णसंख्या आणि इस्त्राईल सारख्या देशाने शाळा सुरू करण्याचा केलेला प्रयत्न आणि हजारो विद्यार्थ्यांना झालेला करोना संसर्ग हया बाबी पाहता आपल्या देशात सद्यस्थितीत तरी शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष सुरू होतील असे वाटत नाही, म्हणून पुर्व प्राथमिक पासून तर उच्च शिक्षणापर्यंत ऑनलाईन–ऑफलाईन ई–लर्निंग शिक्षण प्रणालीचा अवलंब करण्यावर भर देण्यात आला. तसे आवाहन ही करण्यात आले आहे.

यादरम्यान उच्च शिक्षणासंदर्भात विविध ऑनलाईन परिषदा, कार्यशाळा, वेबीनार, FDP, STC, RC Courses अशा अनेक बाबींचे आयोजन करण्यात आले ज्याचा लाभ मोठया प्रमाणात उच्च शिक्षणातील घटकांनी घेतला. एखाद्या वेबिनार ला हजारो प्राध्यापकवर्ग देशाच्या कान्या–कोपऱ्यातून प्रवेशित होवून त्याचा लाभ घेत होते. याच दरम्यान ऑनलाईल शिक्षण प्रक्रिया कशी चालवावी याबाबतचे ही कोर्स चालवले गेले त्याचाही लाभ अनेकांनी घेतला परंतू त्यांची उपयोगीता किती अमंलात आली ही बाब अस्पष्ट आहे.

नागरी भागात शालेय स्तरापासून तर उच्च शिक्षणापर्यंत ऑनलाईन–ऑफलाईन तंत्राचा अवलंब करून शिक्षण प्रक्रियेस गतिशिल ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे, यामध्ये नागरी भाग अग्रेसर आहे, निमनागरी, ग्रामीण भागात हा प्रयत्न सुरू आहे, तांत्रिक माहिती, त्याचे महत्व, शिक्षक, विद्यार्थ्यांजवळ असलेली संसाधनांची उपलब्धता,

शिक्षणाचे महत्व  याबाबी अधिक महत्वाच्या ठरतात, ग्रामीण, निमशहरी, आदिवासी भागात यासंदर्भात मर्यादा दिसून येतात म्हणूनच याची फारशी उपयुक्तता आढळत नाही. असे असले तरी सध्याच्या महामारीच्या पार्श्वभूमीवर आधारित ऑनलाईन व ऑफलाईन या पध्दतीशिवाय दुसरा पर्याय नाही म्हणून ई लर्निंगचा अवलंब हा क्रमप्राप्त भाग बनला आहे.

३. करोना महामारीची पार्श्वभूमी व ई—लर्निंग अवलंब वा उपयुक्तता अभ्यासणे.

४. शिक्षण प्रक्रियेत ई—लर्निंग समोरील आव्हानांचा शोध घेणे.

सध्याच्या पार्श्वभूमी वर आधारित ई लर्निंगचा आग्रह आणि अवलंब शालेय स्तरापासून तर उच्च शिक्षण स्तरापर्यंत सर्रास केला जातोय, ज्यामुळे घरबसल्या शिक्षणाची प्रक्रिया कार्यान्वीत केली जात आहे, मुलांचे अभ्यासक्रम ऑनलाईन शिकवणीच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहेत, zoomapp, skype app, google meet (Online) & Google classroom, google form, What's app(offline)सारख्या अनेक माध्यमातून ई लर्निंग द्वारे ही प्रक्रिया कार्यान्वीत केली जात आहे. अगदी पुर्वप्राथमिकते पासून तर उच्च शिक्षणापर्यंत ही प्रक्रिया सुरू झालेली दिसून येते. यामध्ये 'स्पर्धात्मक वातावरणामुळे खाजगी शाळा अग्रेसर असल्याचे प्रकर्षाने जाणवते.' ई—लर्निंगच्या माध्यमातून खंडीत झालेली शिक्षण प्रक्रिया अखंडित ठेवण्यात यश येत आहे यात काही शंका नाही. परंतू या ई—लर्निंगचा प्रभाव मुलांपर्यत प्रभावीपणे पोहचते का? त्यास ते मनापासून स्विकारतात का? समजून घेतात का? शिकण्याची प्रक्रिया म्हणून त्याचा अवलंब करतात का? या प्रश्नांची उत्तरे असमाधानकारक स्वरूपाची आहेत, कारण प्रत्यक्ष आंतरक्रियेच्या माध्यमातून शिकवणं, शैक्षणिक वातावरणात शिकणं, प्रत्यक्ष नियंत्रणात शिकणं याची प्रभावशिलता अधिकच असणार, आणि याउलट कोणत्याही ई—साधनांशी शिक्षणासाठीची एकाग्रता टिकून राहण्याची मर्यादा यामुळे या माध्यमातून कितीही आकर्षक शिक्षण दिलं जात असलं तरी मुलांपर्यंत फारसं पोहचत नाही. असाच अनुभव अनेक पाल्य व पालकांशी झालेल्या चर्चेतून समोर आला.

यासोबतच ई—साधनांच्या(मोबाईल, लॉपटॉप, संगणक) उपलब्धतेचा प्रश्न, कनेक्टीव्हीची प्रश्न, तांत्रीक दृष्टया साधने हाताळणे, वा त्या विशिष्ट प्रक्रियेनूसार हाताळणे, त्याचे ज्ञान आणि प्रत्यक्ष हाताळतांना येणाऱ्या अडचणींचा प्रश्न हा देखील ई—लर्निंग मधिल अडथळा होय,एवढेच नाहीतर शालेय मुले अभ्यासा व्यतीरिक्त अन्य मनोरंजन बाबीकडे वळू शकतात. मुलांचे ई—साधनांचा वापर वाढल्यांने त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होवू शकतो. पालकांच्या दृष्टिने इंटरनेट सुविधा ठेवणे ही खर्चिक बाब तर आहेच, यासोबत पालकांसमोर ई—साधने हाताळण्याच्या तांत्रिक ज्ञानाचा अभाव आणि मुलांना अभ्यासाला गुंतवून ठेवणे हे एक आव्हानचआहे.

प्रत्येकच शिक्षक शिक्षणाचे साधन म्हणून ई—साधनांचा वापर सहजतेने करू शकत नाही परंतू सध्याच्या बदलत्या गरजे नूसार त्यांना या साधनांचा अवलंब करणे कठिण जात आहे, शिक्षक वर्गासही ई—लर्निंगचा अवलंब करणे व सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे एक मोठे आव्हान बनले आहे, कारण शहर असोवा ग्रामीण भाग ऑनलाईन वर्गाला साधारणतः ३५ टक्के पर्यंत विद्यार्थीसंख्या जोडली जात आहेत, त्या विद्यार्थ्यांसाठी (Youtube) सारख्या माध्यमातून शिकवण्याचे व्हीडीओ पोहचवले जातात, परंतू त्याचाही विद्यार्थी किती उपयोग करतील हा देखील प्रश्न आहे.

शिक्षण संस्था समोर ई—लर्निंगची सुविधा करून देणे हे एक आर्थिक दृष्टया खर्चिक बाब निर्माण झाली आहे, तसेच सर्व विद्यार्थी शिक्षणाच्या प्रक्रियेत येतील व त्यांच्या पर्यंत शिक्षणाची प्रक्रिया पोहचेल हे देखील आव्हान बनले आहे. विद्यापीठा समोर देखील ई—लर्निंग प्रक्रिया प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत कशी पोहचावी व त्यामाध्यमातून शिक्षण प्रक्रिया कशी पुढे न्यावी हा देखील एक कांहीसा प्रश्न आहेच.

## निष्कर्षः—

१. देशात करोना संसर्ग रूग्णसंख्या प्रसार सातत्याने वाढतो आहे, त्यासोबतच संसर्गजन्य रूग्णांची मृत्यू दरही बळावला आहे.

२. करोनाचा वाढता प्रभाव आणि टाळेबंदी यामुळे इतर क्षेत्राप्रमाणे शिक्षण क्षेत्रावरही दुरगामी प्रभाव पडला आहे. ज्यामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदलांची गर्दी दिसून येत आहे.

३. करोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक विविध स्तरातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, त्यांच्यात शैक्षणिक दृष्टया अस्थिरता निर्माण झाली आहे.

४. करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर आधारित शिक्षण क्षेत्रात अनेक बदलांचा स्विकार करून शिक्षणाच्या प्रक्रियेला अखंडित ठेवण्यासाठी 'ई—लर्निंग' हे माध्यम व त्याचा अवलंब प्रभावी ठरला आहे

५. ई—लर्निंग प्रत्यक्षात उतरवणे वा प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे हे शिक्षण क्षेत्रासमोरील एक आव्हानच आहे हे स्पष्ट झाले आहे.

६. करोना काळ आणि ई—लर्निंग चा अवलंब हे शिक्षण संस्था, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. म्हणून त्याच्यासाठी ई—लर्निंग एक आव्हानच आहे.

## उपाययोजना:—

१. करोनाचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी समाजातील सर्व स्तरातील घटकांनी स्वत:ची व इतरांची योग्य काळजी घेवून सुरक्षित राहीले पाहीजे.

२. शिक्षणाची प्रक्रिया अखंडीत राहण्यासाठी सर्वच शिक्षण प्रक्रियेतील सर्व घटकांनी एकमेकांना सहाय्य केले पाहिजे.

३. करोना महामारीची पार्श्वभूमी लक्षात घेऊन नवबदलांचा स्विकार करून त्याचे आकलन करण्याचा प्रयत्न केला जावा.

४. मुलांचे शैक्षणिक भवितव्य लक्षात घेता 'ई—लर्निंग' या माध्यमाचा अवलंब व त्यास येणाऱ्या अडी अडचणींना सामंजस्याने सोडवणे, त्याचा स्विकार करून शिक्षण प्रक्रियेवर भर देणे हे सर्वच घटकांवर बंधनकारक आहे.

५. ज्या विद्यार्थ्यांकडे ई—साधने नाहीत त्यांनी स्थानिक पातळीवर कोणता पर्यायी मार्ग अवलंबता येईल याचा विचार करून प्रत्यक्षात उतरावा, वा अशा विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन मार्गाने कसे शिक्षण पोहचवले जाईल याचाही विचार व्हावा.

६. करोना काळातील विपरित परिस्थिती आणि अखंडित शिक्षण सुरू ठेवण्याचे आव्हान सोडवण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न व्हावा.

बीजशब्द:—

1) covid-19:— या नावाचा संसर्गजन्य विषाणू आहे ज्यास कोविड—१९ हे नाव जागतिक आरोग्य संघटनेने दिलेले आहे.

२) करोना महामारी :—कोविड संसर्गाने जी जगभरात संगर्गजन्य परिस्थिती उद्‌भवली व त्यामुळे होणारी जीवीत हानी यामुळे यास आंतरराष्ट्रीय पातळीवर साथीचा रोग वा करोना महामारी म्हणून घोषित केले गेले.

३) टाळेबंदी:— साथीचा रोगाचा संसर्ग टाळण्यासाठी आपत्ती व्यवथापन व नियंत्रण कायद्याअंतर्गत टाळेबंदीचा निर्णय शासन घेवू शकते ती टाळेबंदी सर्व अर्थाने बंद स्वरूपाची होती.

४) शिक्षण:— मानवी विकासाचे वा परिवर्तनाचे साधन म्हणजे शिक्षण होय,

५) पारंपारीक शिक्षण पद्धती:— भारतात जी आजवर वर्गखोलीतील रूढ होत आलेली शिक्षण प्रणाली म्हणजे पारंपारीक शिक्षण पद्धती होय.

६) स्मार्ट साधने:— जे अधिक सहज काम करू शकतील विजेवर, इंटरनेटवर काम करणाऱ्या मशीन जसे मोबाईल, लॅपटॉप, संगणक, .... ईत्यादी होय.

७) ई—लर्निंग:— स्मार्ट साधने, इंटरनेट या माध्यामातून शिकणे व शिकवण्याची प्रक्रिया म्हणजे ई—लर्निंग होय.

८) आव्हान:— कोणत्याही गोष्टीला प्रत्यक्षात उतरवतांना वा अंमलांत आणतांना येणाऱ्या अडथळे वा प्रश्नांना आव्हान म्हणता येईल.

९) दुर्गम भाग:— विकसीत सोयी सुविधांपासून दूर, जंगल दऱ्या—खोऱ्यातील भाग, जिथे पायाभूत सोयी सुविधांचा अभाव आढळतो.

## संदर्भ ग्रंथ सूची :—

१. बोधनकर सु. व अलोणी, (२००३), 'सामाजिक संशोधन पद्धती', नागपूर, श्री. साईनाथ प्रकाशन
२. Kasrekar D. & Wadhavane T, (2020), 'Impact of COVID-19 on Education System in India', pune
३. www.mathrubhumi.com
४. www.google.com
५. en.wikipedia.org/wiki/impact of_the covid 19.pan on edu.
६. दै. लोकसत्ता. सप्टे २०२०
७. डोंगरे ग, 'माध्यमिक शिक्षण'

❖❖❖

# गोंदिया जिल्ह्यातील भूमी उपयोजनातील बदलांचे भौगोलिक विश्लेषण (२००१—२०११)

प्रा. एन. व्ही. नरूले
भूगोल विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email: narulenilkantha3@gmail.com भ्रमणध्वनी ९९२३९०९२९६

## सारांश :—

कोणत्याही प्रदेशाच्या विकासाच्या अध्ययनाचे भूमी उपयोजन हे आवश्यक परिमाण असून भूमीच्या वापराचे सर्वकष ज्ञान हे त्या प्रदेशातील भूमी उपयोजनाच्या अध्ययननातून होते. भूमी उपयोजनाच्या अध्ययनातून प्राकृतिक व मानवी आंतरसंबंधांचे अध्ययन होते. कोणत्याही प्रदेशाच्या नियोजनात भूमी उपयोजनाचा आकृतीबंध माहित असणे गरजेचे असून त्याआधारे प्रादेशिक विषमतेचे तसेच स्थळकाळपरत्वे झालेल्या बदलांचे अध्ययन सुलभ होते. गोदिंया जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील एक मागास तसेच आदिवासी बहूल प्रदेश म्हणून ओळखला जात असून या प्रदेशातील सामान्य भूमी उपयोजनात इतर प्रगत जिल्हयांच्या तुलनेत विषमता आढळते. त्यामुळे या जिल्हयाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून येथे होणारे भूमी उपयोजन योग्य की अयोग्य हे अभ्यासण्याकरीता प्रस्तुत शोधनिबंधाच्या आधारे परामर्श धेतला असता असे दिसते की, गोंदिया जिल्हयात २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये एकूण भूमी उपयोजनात जंगलव्याप्त क्षेत्र, लागवडीखालील क्षेत्र तसेच इतर उपयोगाखालील क्षेत्राचे प्रमाण वाढत असून संरक्षित क्षेत्रात देखिल वाढ करण्यात आलेली आढळते. परंतु इतर भूमी उपयोजनाच्या घटकांचे प्रमाण हे कमी कमी होत असल्याचे आढळून येते म्हणजेच आजही येथे वनाधिरीत व्यवसाय आजही मोठया प्रमाणात होत असून कृषी व्यवसायाचाही विकास होताना आढळतो.

## बीजसंज्ञा :—

कृषी विकास, भूमी उपयोजन, भूमी उपयोजनातील बदल

## प्रस्तावना:—

मानवाच्या प्राचीनतम व्यवसायापैकी सर्वात प्राचीन व्यवसाय हा कृषी व्यवसाय असून मानवाच्या विकासासोबतच कृषीचा विकासही होतांना आढळून येतो. कृषी व्यवसायातील गतिशिलता राखण्याकरीता योग्य भूमी उपयोजन असणे गरजेचे असते तसेच प्रादेशिक नियोजनातही भूमी उपयोजनास महत्व असल्याने भूमी उपयोजन संकल्पना समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते.

'विशिष्ट भूमीचा प्रत्यक्षात केलेला वापर म्हणजे भूमी उपयोजन होय.' (डॉ. फुले सुरेश (२०००), पृ. क्र. १७०)

आर. पी. सिंग यांच्या मतानुसार, जमीन, पाणी, हवा आणि मानव यांच्या कार्यातून भूमी उपयोग निर्माण होतो. (डॉ. फुले सुरेश (२०००), पृ. क्र. १७०)

म्हणजेच विशिष्ट प्रदेशातील जमीन, पाणी, हवा आणि मानव यांच्या कार्यातून निर्माण होणारा जमिनीचा वापर होय. जो भौतिक गरजेनुसार बदलत्या स्वरूपाचा असतो. कोणत्याही प्रदेशातील कृषी विकासाचा मुळाधार हा त्या प्रदेशात होणारे भूमी उपयोजन आहे. तसेचप्रदेशाच्या नियोजनाच्या दृष्टिकोनातूनही भूमी उपयोजनास महत्व असल्याने दिसते. कारण कोणत्या घटकाखाली कितपत भूमीचा उपयोग होतो याच्या अभ्यासातून त्या प्रदेशाच्या विकासाचे गमक समजण्यास मदत होते. ज्या प्रदेशात योग्य प्रकारे भूमी उपयोजन होते त्या प्रदेशाचा पर्यायाने कृषीचा विकास होतो. तर अयोग्य भूमी उपयोजन असलेल्या प्रदेशाचा तुलनात्मक दृष्या विकास मंदावलेला असून त्या प्रदेशात अनेकविध समस्यांची निर्मिती होतांना दिसून येते. म्हणूनच गोंदिया जिल्हयातील २००१ ते २०११ या काळातील भूमी उपयोजनाचा तसेच भूमी उपयोजनाच्या घटकांमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास या शोध निबंधात करण्यात आलेला आहे.

## उद्दिष्टे:—

प्रस्तुत शोध निबंध पुढील उद्दिष्टये ठरवून पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. गोंदिया जिल्हयातील २००१ ते २०११ या काळातील भूमी उपयोजनाचा अभ्यास करणे.
२. अभ्यास प्रदेशातील भूमी उपयोजनाच्या घटकांतील बदलांचे तालुकानिहाय विश्लेषण करणे.
३. जिल्हयातील २००१ ते २०११ या काळातील भूमी उपयोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## गृहितक:—

गोदिंया जिल्हयातील भूमी उपयोजनात काळाच्या ओघात बदल होत असून लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण वाढत आहे. म्हणजेच या जिल्हयात कृषीचा विकास होत आहे.

## माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती:—

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने व्दितीय स्त्रोताव्दारे प्राप्त केलेल्या समकांच्या व माहितीच्या आधारे पूर्ण करण्यात आलेला असून त्याकरीता विषयास अनुसरून जनगणना अहवाल, सामाजिक व आर्थिक समालोचन तसेच कृषी अहवाल — गोंदिया जिल्हा (२००१ व २०११) चा आधार घेण्यात आलेला आहे. तसेचप्राप्त माहितीचे संस्करण करून सांख्यकीय पद्धतीच्या आधारे सारण्या, आलेख व नकाशा तयार करण्यात आलेला आहे.

## अभ्यास क्षेत्र:—

गोंदिया जिल्हयात बहुसंख्य आदिवासी समाज राहत असून ते वनावर आधारित गोंद व लाख गोळा करण्याचे कार्य करतात त्यामुळे इंग्रज कालखंडापासूनच या प्रदेशास गोंदिया नावाने ओळखले जात असून हा जिल्हा पूर्वी भंडारा जिल्हयाचाच भाग होता. महाराष्ट्र राज्याच्या पूर्वेकडे गोंदिया जिल्हा असून भंडारा जिल्हयाची पूनर्रचना करण्यात आली व १९९९ साली गोदिंया जिल्हा तयार करण्यातआला. गोंदिया जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार हा २०°३९’ उत्तर अक्षांश ते २१°३८’ उत्तर अक्षांशाच्या दरम्यान असून रेखावृत्तीय विस्तार हा ७९°२७’ पूर्व रेखांश ते ८०°४२’ पूर्व रेखांशाच्या दरम्यान असल्याचे दिसते. गोंदिया जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र हे ५२३४ चौ.कि.मी इतके असून या जिल्हयाची समुद्र सपाटीपासूनची सरासरी उंची ही ३६० मीटर असल्याचे आढळते. (नकाशा क्र. १)




गोंदिया जिल्हयाच्या उत्तरेस मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्हा असून दक्षिणेस महाराष्ट्र राज्यातील भंडारा जिल्हा आहे तर पूर्वेस छत्तीसगड राज्यातील राजनांदगाव जिल्हा असून पश्चिमेस महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्हा असल्याचे आढळते. या जिल्हयास प्रमुख ०४ विभागात विभागण्यात आलेले असून जिल्हयात ०८ तालुके आहेत. गोंदिया जिल्हयातील एकूण लोकसंख्या ही १३२२५०७ इतकी असून त्यापैकी स्त्रियांची लोकसंख्या ही ६६०९५३ (४९.९७%) तर पुरूषांची लोकसंख्या ही सुमारे ६६१५५४ (५०.०३%) इतकी २०११ च्या जनगणनेनुसार

असल्याचे आढळते. जिल्हयातील लोकसंख्येची घनता ही २५३ इतकी असून लिंग गुणोत्तर हे ९९९ इतके असल्याचे आढळते. तर येथिल साक्षरतेचे अध्ययन केले असता असे दिसते की, जिल्ह्याची एकूण साक्षरता ही ८४. ५९% इतकी असून त्यापैकी पुरूषांची साक्षरता ही ९२.०४% तर स्त्रियांची साक्षरता ही७७.८९% इतकी आढळते.

## गोंदिया जिल्हा –भूमी उपयोजन (२००१)

गोंदिया जिल्हयातील भूमी उपयोजनाचा अभ्यास केला असता असे दिसते की, २००१ या काळात एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी सर्वाधिक क्षेत्र (१९७५७१ हेक्टर) हे लागवडीखाली असून त्याचे प्रमाण हे ३३.७२% इतके असल्याचे आढळते. त्यानंतर सुमारे १२३५५०५ हेक्टर (५०.०३%) इतके क्षेत्र जंगलाखाली असल्याचे आढळते तसेच अभ्यास प्रदेशातील भूमी उपयोजनात इतर व संरक्षित क्षेत्र हे ११६७७७ हेक्टर (१९.९३%) इतके आढळते मात्र जिल्हयात शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र व पडीत जमिनी व्यतीरिक्त लागवड न केलेल्या जमिनीचे क्षेत्र हे अनुक्रमे ६६९८३ हेक्टर (११.४३%) व ६६२८५ हेक्टर (११.३१%) इतकी असल्याचे दिसून येते. तर सर्वात कमी क्षेत्र हे पडीत जमीनीच्या क्षेत्राने व्यापलेले दिसते. हे क्षेत्र १४८०७ हेक्टर (२.५३%) इतके असल्याचे आढळून येते. (सारणी क्र. १)

सारणी क्र. १

गोंदिया जिल्हयातील सामान्य भूमी उपयोजन – २००१

| अ क्र | तालुका | एकूण भौगोलीक क्षेत्र | जंगल व्याप्त क्षेत्र | शे. प्रमाण | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र | शे. प्रमाण | पडीत जमीनी व्यतीरिक्त लागवड न केलेली जमीन | शे. प्रमाण | पडीत जमीन | शे. प्रमाण | लागवडी खालील निव्वळ क्षेत्र | शे. प्रमाण | इतर | शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तिरोडा | ५२७८६ | ३९०५ | ७.४० | ६५९८ | १२.५० | ४२०७ | ७.९७ | २९७४ | ५.६३ | ३१२८८ | ५९.२७ | ३८१४ | ७.२३ |
| २ | गोंदिया | ६५८७८ | ५३०२ | ८.०५ | ६८१५ | १०.३४ | ७९९७ | ६.३९ | ३४७६ | ५.२८ | ३९७०४ | ६०.२७ | २५८४ | ३.९२ |
| ३ | गोरेगांव | ५८०३९ | १५४३६ | २६.६० | ३९५३ | ६.८१ | ७१७७ | १२.३७ | १५०९ | २.६० | २३०५९ | ३९.७३ | ६९०५ | ११.९ |
| ४ | आमगांव | ३४३८९ | ३९९५ | ११.६२ | ४२२१ | १२.२७ | ३८५४ | ११.२१ | १२११ | ३.५२ | २०९६२ | ६०.९६ | १४६ | ०.४२ |
| ५ | सालेकसा | ६१४८० | १३९३२ | २२.६६ | ७४५० | १२.१२ | ४१३८ | ६.७३ | १२६८ | २.०६ | १६०८९ | २६.१७ | १८६० ३ | ३०.२६ |
| ६ | सडक अर्जुनी | ५५८१४ | १७१८९ | ३०.८० | ६१६८ | ११.०५ | ११३१३ | २०.२७ | ११०२ | १.९७ | १९७१४ | ३५.३२ | ३२८ | ०.५९ |
| ७ | अर्जुनी मोरगाव | ११६२५० | १८१९० | १५.६५ | १५८६ ७ | १३.६५ | १४९१९ | १२.८३ | १२२९ | १.०६ | २३५७७ | २०.२८ | ४२४६ ८ | ३६.५३ |
| ८ | देवरी | १०५८४५ | ४५५५६ | ४३.०४ | १५९११ | १५.०३ | १२६८० | ११.९८ | २०३८ | १.९३ | २३१७८ | २१.९० | ६४८२ | ६.१२ |
| | आरक्षित | ३५४१४ | | | | | | | | | | | ३५४१४ | |
| | एकूण | १२३५०५ | १२३५०५ | २१.०८ | ६६९८३ | ११.४३ | ६६२८५ | ११.३१ | १४८०७ | २.५३ | १९७५७१ | ३३.७२ | ११६७४४ | १९.९३ |

स्त्रोत : गोंदिया जिल्हा – सामाजिक व आर्थिक समालोचन (२००१)

आलेख क्र. १

गोंदिया जिल्हयातील सामान्य भूमी उपयोजन – २००१



## गोंदिया जिल्हा — भूमी उपयोजन (२०११)

गोंदिया जिल्हयातील भूमी उपयोजनाचा अभ्यास केला असता असे दिसते की, २००१ या काळात एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी सर्वाधिक क्षेत्र (१९७५७१ हेक्टर) हे लागवडीखाली असून त्याचे प्रमाण हे ३३.७२% इतके असल्याचे आढळते. त्यानंतर सुमारे १२३५५०५ हेक्टर (५०.०३%) इतके क्षेत्र जंगलाखाली असल्याचे आढळते तसेच अभ्यास प्रदेशातील भूमी उपयोजनात इतर व संरक्षित क्षेत्र हे ११६७७७ हेक्टर (१९.९३%) इतके आढळते मात्र जिल्हयात शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र व पडीत जमिनी व्यतीरिक्त लागवड न केलेल्या जमिनीचे क्षेत्र हे अनुक्रमे ६६९८३ हेक्टर (११.४३%) व ६६२८५ हेक्टर (११.३१%) इतकी असल्याचे दिसून येते. तर सर्वात कमी क्षेत्र हे पडीत जमीनीच्या क्षेत्राने व्यापलेले दिसते. हे क्षेत्र १४८०७ हेक्टर (२.५३%) इतके असल्याचे आढळून येते. गोंदिया जिल्हयातील तालुकानिहाय भूमी उपयोजनाचाही अभ्यास करण्यात आलेला असून २०११ या काळातील तालुकानिहाय सामान्य भूमी उपयोजन सारणी क्र. २ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

सारणी क्र. २

गोंदिया जिल्हयातील सामान्य भूमी उपयोजन — २०११

| अ क्र | तलुका | एकूण भौगोलीक क्षेत्र | जंगल व्याप्त क्षेत्र | शे. प्रमाण | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र | शे. प्रमाण | पडीत जमीनी व्यतीरिक्त लागवड न केलेली जमीन | शे. प्रमाण | पडीत जमीन | शे. प्रमाण | लागवडी खालील निव्वळ क्षेत्र | शे. प्रमाण | इतर | शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तिरोडा | ५१६७६ | ६८२५ | १३.२१ | ६९३३ | १३.४२ | ८८८ | १.७२ | २४५९ | ४.७६ | ३११७६ | ६०.३३ | ३३९५ | ६.५७ |
| २ | गोंदिया | ५८९०१ | ४५९५ | ७.८० | ६८७३ | ११.६७ | ३२६० | ५.५३ | २६०८ | ४.४३ | ३७३८० | ६३.४६ | ४१८५ | ७.११ |
| ३ | गेरेगांव | ५९१०७ | १९२७० | ३२.६० | ५५३२ | ९.३६ | ७३८९ | १२.५० | १५९० | २.६९ | २४०९८ | ४०.७७ | १२२८ | २.०८ |
| ४ | आमगांव | २५२६९ | २५६४ | १०.१५ | २१९ | ०.८७ | ६३६ | २.५२ | १०९१ | ४.३२ | २०२८५ | ८०.२८ | ४७४ | १.८८ |
| ५ | सलेकसा | ५९९५९ | १९८३७ | ३३.०८ | ७४९१ | १२.४९ | १९३४ | ३.२३ | १६०४ | २.६८ | १९२८७ | ३२.१७ | ९८०६ | १६.३५ |
| ६ | सडक अर्जुनी | ५५८८९ | १७१८९ | ३०.७६ | ५३१२ | ९.५० | ७८४४ | १४.०३ | ६५४ | १.१७ | १९४७१ | ३४.८४ | ५४१९ | ९.७० |
| ७ | अर्जुनी मोरगाव | १०८०४५ | ३१३३७ | २९.०० | १८४४९ | १७.०८ | ५५३४ | ५.१२ | ५१९ | ०.४८ | २३५२३ | २१.७७ | २८६८३ | २६.५५ |
| ८ | छेवरी | १२१३५५ | ५७३९८ | ४७.३० | २०८९ | १.७२ | ४४१५ | ३.६४ | २७८५ | २.२९ | २५२७९ | २०.८३ | २९३८९ | २४.२२ |
| आरक्षित | | ४५६९४ | | | | | | | | | | | ४५६९४ | |
| एकूण | | ५८५८९५ | १५९०१५ | २७.१४ | ५२८९८ | ९.०३ | ३१९०० | ५.४४ | १३३१० | २.२७ | २००४९९ | ३४.२२ | १२८२७३ | २१.८९ |

स्त्रोत : गोंदिया जिल्हा — सामाजिक व आर्थिक समालोचन (२०११)

## गोंदिया जिल्हा —तालुका निहाय भूमी उपयोजन (२००१—२०११)

गोंदिया जिल्हयातील भूमी उपयोजनाच्या विविध घटकांचा तालुकानिहाय अभ्यास पुढील प्रमाणे करण्यात आलेला आहे.

### अ. जंगलाखालील क्षेत्र

गोंदिया जिल्हयातील जंगलाखालील क्षेत्राचा तालुकानिहाय अभ्यास केला असता, २००१ मध्ये देवरी, सडक अर्जुनी, गोरेगाव तसेच सालेकसा या तालुक्यांमध्ये जंगलाखालील क्षेत्राचे प्रमाण हे २०% पेक्षा अधिक असून तिरोडा व गोंदिया तालुक्यात हे क्षेत्र १०% पेक्षा कमी असल्याचे दिसते तर उर्वरित तालुक्यांमध्ये हे क्षेत्र १०% ते २०% च्या दरम्यान असल्याचे आढळते. तर २०११ या काळातही देवरी, सडक अर्जुनी, गोरेगाव तसेच सालेकसा याच तालुक्यांमध्ये २०% पेक्षा अधिक असून केवळ गोंदिया तालुक्यात हे क्षेत्र १०% पेक्षा कमी असल्याचे दिसते तर उर्वरित तालुक्यांमध्ये हे क्षेत्र १०% ते २०% च्या दरम्यान असल्याचे आढळते.

### ब. शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र

अभ्यास प्रदेशातील शेतीला उपलब्ध नसलेल्या क्षेत्राचा तालुकानिहाय अभ्यास केला असता, २००१ मध्ये केवळ देवरी या तालुक्यांमध्ये शेतीला उपलब्ध नसलेल्या क्षेत्राचे प्रमाण हे १५% पेक्षा अधिक असून १०% पेक्षा कमीशेतीला उपलब्ध नसलेल्या क्षेत्राचे प्रमाणअसलेला केवळ गोरेगाव हा तालुका असल्याचे दिसते तर उर्वरित तालुक्यांमध्ये हे क्षेत्र १०% ते १५% च्या दरम्यान असल्याचे आढळते. तर २०११ या काळात अर्जुनी मोरगाव तालुक्यात शेतीला उपलब्ध नसलेल्या क्षेत्राचे प्रमाण हे १५%पेक्षा अधिक असून तिरोडा, गोंदिया, सालेकसा या

तालुक्यांमध्ये १०% ते १५% च्या दरम्यान असल्याचे आढळते. तर आमगाव, गोरेगाव, सडक अर्जुनी या तालुक्यात हे क्षेत्र १०% पेक्षा कमी असल्याचे दिसते.

### क. पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेल्या जमिनीचे क्षेत्र

प्रस्तुत प्रदेशातील पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेल्या जमिनीच्या क्षेत्राचा तालुकानिहाय अभ्यास केला असता, २००१ मध्ये केवळ सडक अर्जुनी या तालुक्यांमध्ये पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेल्या जमिनीच्या क्षेत्राचे प्रमाण हे १५% पेक्षा अधिक असून तिरोडा, गोंदिया व सालेकसा या तालुक्यात हे क्षेत्र १०% पेक्षा कमी असल्याचे दिसते तर उर्वरित तालुक्यांमध्ये हे क्षेत्र १०% ते १५% च्या दरम्यान असल्याचे आढळते. तर २०११ या काळात पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेल्या जमिनीच्या क्षेत्राचे प्रमाण हे १५% पेक्षा अधिक असलेला एकही तालुका नसून गोरेगाव, सडक अर्जुनी या दोनच तालुक्यात हे प्रमाण १०% ते १५% च्या दरम्यान आढळते. तर उर्वरित तालुक्यांमध्ये हे प्रमाण १०% पेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

### ड. पडीत जमिनीचे क्षेत्र

प्रस्तुत प्रदेशातील पडीत जमिनीच्या क्षेत्राचा तालुकानिहाय अभ्यास केला असता, २००१ मध्ये तिरोडा, गोंदिया या ०२ तालुक्यांमध्ये पडीत जमिनीच्या क्षेत्राचे प्रमाण हे ४% पेक्षा अधिक असून सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव व देवरी या ०३ तालुक्यात हे क्षेत्र ०२% पेक्षा कमी असल्याचे दिसते तर गोरेगाव, आमगाव तसेच सालेकसा या ०३ तालुक्यांमध्ये हे क्षेत्र ०२% ते ०४% च्या दरम्यान असल्याचे आढळते. तर २०११ या काळात तिरोडा, गोंदिया व आमगाव या तालुक्यात पडीत जमिनीच्याक्षेत्राचे प्रमाण हे ०४% पेक्षा अधिक असून गोरेगाव, सालेकसा व देवरी तालुक्यात हे प्रमाण ०२% ते ०४% च्या दरम्यान आढळते. तर अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी या दोनच तालुक्यांमध्ये हे प्रमाण १०% पेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

### इ. लागवडीखालील निव्वळ क्षेत्र

अभ्यासप्रदेशातील लागवडीखालील निव्वळ क्षेत्राचा तालुकानिहाय अभ्यास केला असता, २००१ मध्ये गोंदिया व आमगाव या तालुक्यांमध्ये लागवडीखालील निव्वळ क्षेत्राचे प्रमाण हे ६०% पेक्षा अधिक असून सालेकसा, अर्जुनी मोरगाव व देवरी या तालुक्यात हे क्षेत्र ३०% पेक्षा कमी असल्याचे दिसते तर उर्वरित तालुक्यांमध्ये हे क्षेत्र ३०% ते ६०% च्या दरम्यान असल्याचे आढळते. तर २०११ या काळात लागवडीखालील निव्वळ क्षेत्राचे प्रमाण हे ६०% पेक्षा अधिक असलेले आमगाव, तिरोडा, गोंदिया हे तालुके असून गोरेगाव, सालेकसा, सडक अर्जुनी या दोनच तालुक्यात हे प्रमाण ३०% ते ६०% च्या दरम्यान आढळते. तर अर्जुनी मोरगाव व देवरी या ०२ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ३०% पेक्षा कमी असल्याचे दिसून येते. म्हणजेच लागवडीखालील निव्वळ क्षेत्राचे अधिक प्रमाण असलेल्या तालुक्यांच्या संख्येत वाढ होत आहे.

### ई. इतर व संरक्षित क्षेत्र

प्रस्तुत प्रदेशातील इतर व संरक्षित क्षेत्राचा तालुकानिहाय अभ्यास केला असता, २००१ मध्ये सालेकसा व अर्जुनी मोरगाव या ०२ तालुक्यांमध्ये इतर व संरक्षित क्षेत्राचे प्रमाण हे २०% पेक्षा अधिक तर केवळ गोरेगाव एकाचतालुक्यांमध्ये हे क्षेत्र १०% ते २०% च्या दरम्यान असल्याचे आढळते. परंतुअभ्यास प्रदेशाच्या उर्वरित तालुक्यात हे क्षेत्र १०% पेक्षा कमी असल्याचे दिसते. अभ्यास क्षेत्रात २०११ या काळात अर्जुनी मोरगाव व देवरी या तालुक्यात इतर व संरक्षित क्षेत्राचे प्रमाण हे २०% पेक्षा अधिक असून केवळ सालेकसा तालुक्यात हे प्रमाण १०% ते २०% च्या दरम्यान आढळते. तर उर्वरित सर्वच तालुक्यांमध्ये हे प्रमाण १०% पेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

## गोंदिया जिल्हा – भूमी उपयोजनातील घटकनिहाय व तालुकानिहाय बदल (२००१ ते २०११)

गोंदिया जिल्हयात २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये एकूण भूमी उपयोजनाच्या घटकाअंतर्गतच्या जंगलव्याप्त क्षेत्रात वाढझालेली असून लागवडीखालील निव्वळ क्षेत्रातही वाढझालेली आढळून येते तसेच इतर क्षेत्रातही वाढझालेली दिसते. परंतु शेतीला उपलब्ध नसलेल्या क्षेत्र, पडीत जमिनी व्यतीरिक्त लागवड न केलेल्या जमिनीच्या क्षेत्र व पडीत क्षेत्र कमी झालेले दिसून येते. म्हणजेच काळाच्या ओघात येथे जंगल क्षेत्राचा तसेच कृषी क्षेत्राचा विकास होत आहे. परंतु तालुकानिहाय भूमी उपयोजनाच्या अभिक्षेत्रिय वितरणात पुढील प्रमाणे तफावत आढळते. गोंदिया जिल्हयातील तिरोडा, गोरेगाव, सालेकसा, अर्जुनी मोरगाव व देवरी या तालुक्यात २००१ च्या तुलनेत २०११

मध्ये शेतीला उपलब्ध नसलेल्या क्षेत्रात वाढझालेली असून गोंदिया, आमगाव, सडक अर्जुनी या तालुक्यातील हे क्षेत्र काळाच्या ओघात कमी—कमी होतांना आढळून येते. तसेच अभ्यास प्रदेशाच्या तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, सालेकसा, अर्जुनी मोरगाव या तालुक्यात शेतीला उपलब्ध नसलेल्या क्षेत्रात वाढझालेली असून आमगाव, सडक अर्जुनी व देवरी या तालुक्यातील हे क्षेत्र काळाच्या ओघात कमी झालेले आढळून येते.

अभ्यास प्रदेशातीलगोरेगाव व अर्जुनी मोरगाव या ०२ तालुक्यात पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेल्या जमिनीच्या क्षेत्रात २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये वाढझालेली असून इतर तालुक्यातील हे क्षेत्र काळाच्या ओघात कमी—कमी होतांना आढळून येते.तसेच अभ्यास प्रदेशाच्या गोरेगाव, आमगाव, सालेकसा व देवरीया तालुक्यात पडीत क्षेत्रात वाढझालेली असून तिरोडा, गोंदिया, अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनीया तालुक्यातील हे क्षेत्र काळाच्या ओघात कमी झालेले दिसते.

अभ्यास प्रदेशातीलसडक अर्जुनी व देवरी हे दोन तालुके वगळता इतर तालुक्यात लागवडीखालील निव्वळ क्षेत्रात २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये वाढ झालेली आढळते. म्हणजेच तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, आमगाव, सालेकसा व अर्जुनी मोरगाव या तालुक्यात कृषीचा विकास होतांना आढळतो. गोंदिया जिल्हयातील गोंदिया, आमगाव,सडक अर्जुनी व देवरीया तालुक्यातील इतर व संरक्षित क्षेत्रात वाढझालेली असून तिरोडा, गोरेगाव,अर्जुनी मोरगाव आणि सालेकसाया तालुक्यातील हे क्षेत्र २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये कमी झालेले आढळून येते.

## निष्कर्ष:—

गोंदिया जिल्हयात २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये एकूण भूमी उपयोजनात जंगलव्याप्त क्षेत्र, लागवडीखालील क्षेत्र तसेच इतर उपयोगाखालील क्षेत्राचे प्रमाण वाढत असून संरक्षित क्षेत्रात देखिल वाढ करण्यात आलेली आढळते. परंतु इतर भूमी उपयोजनाच्या घटकांचे प्रमाण हे कमी कमी होत असल्याचे आढळून येते म्हणजेच आजही येथे वनावर आधारित व्यवसाय आजही मोठया प्रमाणात होत असले तरीही येथे कृषी व्यवसायाचाही विकास काळाच्या ओघात होतांना आढळतो. परंतु त्यामध्ये तालुकानिहाय विविधता असल्याचे दिसते.

गोदिंया जिल्हयातील ग्रामीण तालुक्यातील भूमी उपयोजनात लागवडीखालील क्षेत्राची वाढ होत आहे तर जंगल क्षेत्र अधिक असलेल्या तालुक्यांमधिल संरक्षित क्षेत्रात वाढ करण्यात आल्यामुळे २०११ मध्ये अधिकांश तालुक्यातील जंगलाखालील क्षेत्र वाढलेले आढळते. तर तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, सालेकसा व अर्जुनी मोरगाव या तालुक्यात नागरीकरणास वेग येत असल्याचे भूमी उपयोजनाच्या अभ्यासातून स्पष्ट होते.

## संदर्भ सूची:—

1. फुले डॉ. सुरेश (२०००), कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर
2. हुसेन माजिद (२०००), कृषी भूगोल, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस, जयपूर
3. गोंदिया जिल्हा — सामाजिक व आर्थिक समालोचन (२००१ व २०११)
4. गोंदिया जिल्हा — जनगणना अहवाल (२००१ व २०११)
5. https://gondia.gov.in
6. https://www.census2011.co.in/census/district/345-gondiya.html

❖❖❖

# संत तुकारामांचे सामाजिक प्रबोधन : एक अन्वयार्थ

प्रा. रेखा व्ही. इंगोले
मराठी विभाग प्रमुख
मा.सु.पा. कला, विज्ञान व कै.पां.ठा. वाणिज्य महाविद्यालय
मानोरा, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
Email: rekhaingole09@gmail.com भ्रमणध्वनी ९४०४५४७२७१

## प्रस्तावना :

मध्ययुगीन कालखंडात मूलभूत परिवर्तन घडविण्याचे कार्य ज्ञानदेवापासूनच्या वारकरी संतानी हाती घेतले. वारकरी संताचे विचार नंतरच्या पिढयातील वारकऱ्यांनी भजन, किर्तन, प्रवचन, भारुड, वारी या माध्यमातून घरोघरी पोहचविले. महाराष्ट्राच्या मध्ययुगीन कालखंडातील ही वारकरी चळवळ म्हणजे एक महत्वाची सांस्कृतिक घटना आहे. वारकरी सांप्रदायिकांनी केवळ बोलघेवडा उपदेश केला नाही तर आपले विचार कृतीव्दारे समाज मनावर बिंबविले संत मंडळीनी नामपर, भक्तिपर, उपदेशपर, आत्मानुभूतिवर, ज्ञानपर, संतपर अशा वेगवेगळया विषयावर अभंगातून भाष्य केले आहे. संताच्या उपदेशपर अंगभामूळे मंत्र, तंत्र, योग, अंधश्रध्दा, गुढविद्या ही सर्व टरफले गळून पडली. अन्यायी, अत्याचारी, शोषक, धर्मसत्तेला मोठा हादरा या सर्व संतानी दिला. संताच्या उपदेशाला केवळ सांस्कृतिक आशय नाही तर सामाजिक, वैज्ञानिक, मानसशास्त्रीय, ऐतिहासिक आणि तात्विक अधिष्ठान असल्याचे लक्षात येते.

## संत तुकारामांचे सामाजिक प्रबोधन :

संत तुकारामांच्या सामाजिक प्रबोधनाचा आजच्या वर्ममानाच्या संदर्भात विचार करतांना तुकारामांचे वेगळेपण निरनिराळया संदर्भात जाणवल्यावाचून राहत नाही. मध्ययुगीन कालखंडात समाजाला भक्तीपंथाची सोपी वाट तुकोबारायांनी दाखविले, 'बुडते हे जन न देखवे डोळा' ही प्रमुख तळमळ त्यामागे होती. आपल्या अवतारकार्याचे प्रयोजन स्पष्ट करतांना आडरानाने भरलेल्या जगाला सन्मार्ग दाखविण्यासाठी आम्ही संताचे मार्ग झाडू, असेही तुकोबा प्रतिपादन करतात. समाजाची विविध क्षेत्रे अराजकांनी भरलेली असल्याचे दृश्य त्यांना अस्वस्थ करीत होते. आर्थिक, धार्मिक, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये असलेल्या अनाचारांनी बळी पडणाऱ्या लोकांसाठी मग ते निश्चयपूर्वक एका प्रबोधनाच्या युध्दात उरतले, समाजव्यवस्थेतील कौरुप्याच्या विरोधात त्यांनी केलेल्या युध्दाचा इतिहासच त्यांच्या अभंग गाथेतून त्यांनी लिहिला.

'सत्य–असत्याशी मन केले ग्वाही ।
मनियले नाही बहुमता ।।'

वेदांच्या आधाराने, वर्णव्यस्थेच्या आधाराने, कर्मकांडाच्या आधाराने चाललेल्या अन्यायावर त्यांनी अभंगाचे शस्त्र उगारले 'आम्हा घरी धन, शब्दाचीच रत्ने, शब्दाचीच शस्त्रे यत्ने करु' असे त्यांनी म्हटले होते. शब्दशस्त्रांना पारखुनच ते या युध्दात उरतले होते.

''वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठावा ।
येरांनी वाहावा भार माथा ।।''

अशी गर्जना करीत तुकाराम वैदिक पंडितांसमोर उभे ठाकले.

भारतात पुरातनकाळापासून वैदिक विरुध्द अवैदिक संघर्ष आहे. यात तुकोबा अवैदिक अर्थात मूळनिवासी लोकांची बाजू घेऊन वैदिकांवर हल्ला चढवतांना म्हणतात –

''वर्णधर्म कोणी न धरी विटाळ ।
घालिती गोंधळ एके ठायी ।।
वेदांचे पाठक सेवितील मध ।
न देखती भेद विषयी भांड ।।
तुका म्हणे किती करावे फजित ।
ते चि छंदनित्य बहू होती ।।''

संघर्षाचे मूळ कारण दोन वेगवेगळया विचारधारा आणि संस्कृतीमधील फरक हे आहे. विचारांमधील फरक या संदर्भात बदलावा असे त्यांना अभिप्रेत आहे.

## लागोनिया पाया विनवितो तुम्हाला :

तुकोबांनी उपदेशाच्या भूमिकेतून लोकांमध्ये जनजागृती केली. समाजाला खरे काय खोटे काय याचे वस्तुनिष्ठ भान दिल्याचे डॉ. यशवंत पाठक म्हणतात. तुकोबांनी केवळ उपदेशकाच्याच भूमिकेतून लोक जागृती केली असे नाही तर कृतिशील विचारवंताच्या भूमिकेतून समाजापुढे वास्तववादी विचार मांडले. त्यांनी मेणाहून मऊ होऊन समाजाला मार्गदर्शन केले. प्रसंगी वज्राहून कठीण होणारे तुकोबाही आपल्याला अभंगातून दिसतात. 'लागोनिया पाया विनवितो तुम्हाला' असे म्हणणारे तुकोबा प्रसंगी 'किती सांगू तरी नायकती बटकीचे' म्हणून प्रहार करायलाही मागेपुढे पाहत नाहीत. वेळ आल्यावर लोकांच्या दुर्गणांवरही तुकारामांनी प्रखर हल्ला चढविला. मुळात तुकोबा क्रांतिदर्शी तत्वज्ञ होते. समाजातील दुर्गुणा दुर्जनत्वावर हल्ला करतांना ते म्हणतात —

''कावळयाच्या गळा मुक्तफळ माळा ।
तरी काय त्याला भूषण शोभे ।।१।।
गजालांगी केला कस्तुरीचा लेप ।
तिचे तो स्वरुप काय जो ।।२।।
बकापुढे सांगे भावार्थ वचन ।
वाऊगाचि सी होय त्यासी ।।३।।
तुका म्हणे तैसे अभाविक जन ।
त्यासी वाया सीण करु नये ।।४।।'' (तु.गा.२९८६)

## सकळासी येथे आहे अधिकार :

तुकोबांनी समाजाला स्वहितांच्या खुणा सांगितल्या ते शोषकाच्या विरोधात उभे ठाकले नव्हते तर त्याच बरोबर त्यांनी सामाजिक समतेचे युध्द ही पुकारले.

'भेदा भेद भ्रम अमंगळ' असे म्हणत त्यांनी थेट ईश्वराशीही वाद केला. जातीला वा कुळाला महत्व नसून माणसाच्या गुणांना अधिक मोल असल्याचे त्यांनी अनेक अभंगामधून ठामपणे सांगीतले आहे. 'वर्ण अभिमाने कोण झाले पावन' असे म्हणत त्यांनी वर्ण व्यवस्थेच्या विसर्जनातच समाजाचे हित असल्याची भूमिका मांडली आहे. समाजात जी उच्च—निचतेची दरी निर्माण झाली होती ती गाडण्याचे काम त्यांच्या विचारांनी केले आहे. 'अवघी भूते साम्या आली' हे त्यांचे समतेचे तत्व होते. जीवनमूल्याच्या अविष्कारासाठी त्यांनी आयुष्यभर आटापिटा केलेला होता. याचे अनेक पुरावे आपल्याला त्यांच्या अभंगातून मिळतात. या संदर्भात तुकारामांचा एक अभंग महत्वाचा ठरतो.

'बरे झाले देवा कुणबी केले । नाही तरी दंभेचि असतो मेले ।।
भले केले देवराया । नाचे तुका लागे पाया ।।
विद्या असती काही । तरी पडतो अपायी ।।
सेवा चुकतो संताची । नागवण हे फुकाची ।।
गर्व होता ताठा । जातो यमपंथे वाटा ।।

आपण श्रेष्ठ वर्णात जन्माला आलो असतो तर दंभाने, गर्वाने मेलो असतो असे ते म्हणतात. तत्कालीन समाजातील उच्चवर्णीयांचे दांभिकपणे आणि ताठयाने वागणे व त्या खाली बहुजन समाजाने दबून जाणे ही प्रक्रियाच त्यांच्या उव्देगांचे मूळ कारण असले पाहिजे. तुकोबांचे समाज निरीक्षण सर्वस्पर्शी होते. तसा त्यांचा उपदेशही सर्वस्पर्शी समाजनिष्ठ होता.

## शिक्षण म्हणजे अनुभवांचे प्रकटीकरण :

तुकोबांनी जे जे अनुभव शून्य आहे त्याचा त्याचा धिक्कार केला आहे. त्यांनी आपल्या अभंगामधून विचाराचे जे प्रकटीकरण केले आहे त्यात अधंश्रध्देला तीळमात्रही वाव नाही. त्यांच्या ज्या श्रध्दा आहेत त्या देखील नैतिक आणि डोळस आहेत. तुकारामांचे अभंग हे वेगवेगळयाा प्रकारच्या अनुभवांचे खडेबोल आहेत. त्यामुळे त्यातील अभिव्यक्तीमध्ये एक प्रकारचा रोखठोकपणा आहे. सरलत्व आहे. ज्ञान हे मूलस्वरुपी असले पाहिजे, ते वरवरचे असता कामा नये हे सांगताना ते म्हणतात.

''गुळे माखुनिया दगड ठेविला ।
वर दिसे मला लोकाचारी ।।

अंतरी विषयाचे लागले पै पिसे ।
बहिरल्या वेषे भुलवी लोका ।।'' (अभंग क्र.३१५१)

जर दगड वर गुळाने सारवला तर तो लोकांना वरवरुन गुळाचा खडा वाटेल, पण तो जर गुळाचा खडा म्हणून फोडायचा प्रयत्न केला तर त्याचे दगडपण ध्यानात येईल. त्यासाठी ज्ञान हे वरवरचे किंवा कोरडे असता कामा नये ते अनुभवपूर्ण आणि आत्मज्ञानाने युक्त असले पाहीजे.

अडाण्याच्या शहाणा होण्यासाठी प्रशिक्षण कसे महत्वाचे आहे हे सांगतांना ते म्हणतात,

'कुटल्याविण नव्हे मांडा । (कांडील्या कुटीला होतो मांडा ।
अळसे धोंडा पडतसे ।।)
राग धरु मनी । गांडमनी सांगतो
तरटापुढे बरे नाचे । सुतेकाचे मुसळ ।।
तुका म्हणे काठी सार । करी फार शहाणे ।। (अभंग क्र. ६०१)

शिक्षणामध्ये बोलघेवडेपणापेक्षा प्रशिक्षणाला किती महत्व आहे, याचे उत्तम उदाहरण त्यांनी हया अभंगातून दिले आहे. मांडा हा पदार्थ जर चांगला व्हायचा असेल तर त्यासाठी कणिक चांगली ठेचावी लागते. त्या विषयी जर आळस केला तर पदरी धोंडाच पडतो. स्वाराने हातामध्ये चाबुक घेतला की, त्याच्या हुकुमाप्रमाणे घोडे नाचतात याचाच अर्थ अनुभव धन्य ज्ञानच माणसाच्या बुध्दीचा पालट करु शकते.

## सात्विकतेसाठी तात्विकता :

तुकोबांना अभिप्रेत आहे ती अनुभवपूर्ण तात्विकता ही अनुभवपूर्ण तात्विकता त्यांनी सात्विकतेसाठी जागोजागी प्रतिपादित केली आहे. तुकोबांनी दांभिकतेचा खरपूस समाचार घेतला आहे. खोटे ज्ञान भक्ती, वैराग्य यांच्यावर टीका करतांना ते म्हणतात.

'वांझेने दाविले गऱ्हवार लक्षण ।
चिरगुटे बांधून वाथयाला ।। १ ।।
तेवी शब्द झणी करिती चावटी ।
ज्ञान पोटासाठी विकुनिया ।।२।।
बोलाचीच कढी बोलाचाच भात ।
जेउनिया तृप्त को झाला ।।३।।
कागदी लिहता नामाची साखर ।
चाटिता मधुर गोडी नेदी ।।४।।
तुका म्हणे जळो जळो ते महंती ।
नाही लाज चित्ती निसुगाला ।।५।। (तु.गा.३०१७)

भगवी वस्त्रे नेसून विषयाच्या मोहात अडकलेल्या संधिसाधूंवरही ते प्रहार करतात कुत्र्याचाही रंग कसा असतो कोल्हालाही दाढी असते, भूमी उरुन त्यात राहत असाल तर उंदीर काय कमी आहेत का, असाही सवाल त्यांनी केला आहे. एकूणच साधूंच्या वेशातील संधिसाधू, लबाडधूर्त, दांभिकांवर तुकोबांनी आपल्या तीक्ष्ण वाग्बाणांनी प्रहार केले आहेत. वारकरी सांप्रदायिकांनी कथेचा विचका करु नये म्हणून कडक नियमांच्या आधारे एक प्रकारची शिस्त लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. 'उभ्या बाजारात कथा । हे तो नावडे पंढरीनाथा । असे सांगून कथा–किर्तनाच्या मर्यादाही सांगितल्या आहेत.

## समारोप :

संत तुकारामांनी समाजोध्दारासाठी कळकळीने प्रयत्न केला. बुडते जन न देखविल्यामूळे प्रसंगी लोकांच्या हाता पाया पडून त्यांना सन्मार्गाला लावले. न ऐकणाऱ्यांना आपल्या वज्रासारख्या कठीण व तीक्ष्ण बानांनी खडसावले. त्यांनी दांभिकतेवर सडकून टीका केली. वास्तववादी क्रांतिकारक विचार असल्यामूळे त्यांच्या समाजप्रबोधनाला सर्व स्पर्शित्व होते. समाजातील बारीक सारीक बाबींची सुक्ष्म निरीक्षणे त्यांनी ठायी ठायी नोंदविली आहेत. 'अधिकार तैसा करु उपदेश' हा मानसशास्त्रीय दृष्टिकोन त्यांच्या विचारांच्या मुळाशी असल्यामूळे तुकोबांचे अभंग वाडमय बहुपेडी आहे. त्यांच्या ठायी असलेल्या समाजनिष्ठेमुळे व लोकोध्दाराच्या तळमळीमुळे ते आकाशाऐवढे आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) संत वाडमयाची सामाजिक फलश्रृती – गं.बा. सरदार
२) संत तुकाराम गाथा – ह.भ.प. बाबुराव महाराज देवडीकर
३) सार्थ तुकारामाची गाथा – संपा. विष्णुबुवाजोग महाराज
४) वारकरी आणि संत साहित्य – प्राचार्य शिवाजीराव भोसले
५) संत साहित्य आणि समाजप्रबोधन – प्राचार्य रा.तु. भगत
६) अक्षरगाथा – ऑक्टोबर २०१० संपा. डॉ.मा.मा. जाधव
७) अक्षरगाथा – ऑक्टोबर २०१२ संपा. डॉ.मा.मा. जाधव

❖❖❖

# गोंड–परधान जमातीची स्वरूप व माहिती

प्रा. अतुलकुमार वसंतराव सारडे
सहा. प्राध्यापक, कला वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email: atulkumar.sardey04@gmail.com भ्रमणध्वनी ९३७१४१२३७६

विदर्भामध्ये अनेक आदिवासी समुहांपैकी एक म्हणजे गोंडी–परधानी आदिवासी समूह. गोंडी परधानी आदिवासी समूहाच्या सांस्कृतिक, सामाजिक वारश्याने भारतीय परंपरेला समृद्ध केले आहे. परंतु, काही कारणांनी हा समूह अद्यापही मुख्य प्रवाहापासून वंचित आहे.

माझ्या शोधनिबंधात मी विदर्भातील गोंड–परधान या आदिम समूहाच्या सामाजिक व सांस्कृतिक बाबींचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. गोंडी–परधानी समुहातील काही अभ्यासक व इतर समुहातील बाह्य अभ्यासक–संशोधकांनी आपल्या लेखनातून मांडलेल्या निष्कर्षांद्वारे मी ही मांडणी करीत आहे. या लेखासाठी साहित्यसंकलनात्मक पद्धतीने माहिती गोळा केली आहे. तसेच, विविध मान्यवर अभ्यासक–संशोधकांचे ग्रंथ मी साधनस्रोत म्हणून वापरले आहे. अभ्यासकांच्या मतांचा आणि विचारांचा मला जो अर्थ ज्ञात झालेला आहे तोच मी येथे मांडला आहे.

## गोंडांची ओळख :–

भारतातील आदिवासी जमातीपैकी सर्वात मोठ्या संख्येने गोंड (कोयावंश) संवर्ग असल्याचे लक्षात येते. मध्यप्रदेश, ओरिसा, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, तेलंगणा, महारा– इत्यादी राज्यात गोंड समुदाय आहेत. विदर्भात पूर्व आणि दक्षिण मध्य विभागात गोंडाची दाट वस्ती आहेत. यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात गोंड समुदाय जादा संख्येत आहेत. मानववंशीय दृष्ट्या गोंड हे द्रविडवंशीय आहेत. ते पूर्वीचे 'अनार्य' असावेत, असेही अभ्यासकांचे मत आहेत. तर, 'कोयावंशीय' असल्याचे पुरोगामी लेखनातून सिद्ध होते. कर्नल हिस्लॉप, रसेल, हिरालाल, डॉ. गिर्यसन यांनी खोंड, गोंड साधर्म्य दाखवून त्यांचे मूळस्थान अदिलाबाद व गोदावरीचे खोरे सांगितले आहे. डॉ.एल्वीन, डॉ.मेहता यांच्यामते कालाहंडी, बस्तर हे त्यांचे मूळ स्थान आहेत. कोईतूर किंवा कोयावंशीयांना 'गोंड' असे शुद्ध शास्त्रीय नाव डॉ. हॉयसे यांनी दिले आहे.

## परधान जमातीची ओळख :–

साधारणपणे गोंड आणि परधान ह्यांचे समाज संघटन, गोत्र किंवा कुलगट (देवे) व्यवस्था, देवदेवता, सांस्कृतिक, धार्मिक रितीरिवाज, भाषा,नृत्य संगीत सर्वच बाबतीत साम्य आहेत. परधानांना रसेल व हिरालाल यांनी 'गोंडाचे भाट' म्हटले आहे. रावबहादूर हिवाळे यांनी गोंड–परधानांचा अभ्यास करून परधानांनीच गोंडाची संस्कृती टिकवून ठेवल्याचा निष्कर्ष काढला आहे. गोंडांच्या धार्मिक आणि विवाहादी प्रसंगी 'परधान' हे प्रधानासारखे कामे करतात. ते गाणी (ढेमसे) म्हणतात म्हणून त्यांना 'पाटाडी/पाठारी' असे म्हटल्या जाते. त्यांच्या निर्मितीच्या वेगवेगळ्या कथाही सांगितल्या जातात.त्यांना गोंडराजाने वंशावळीची माहिती ठेवणारे 'प्रधान' म्हणून नेमले होते. पनाल, पनालगोंड असेही संबोधतात. गोंड आणि परधानात श्रेष्ठ कनिष्ठतेचा भाव आजही आहे. आजही गोंड–परधानात रोटीबेटी व्यवहार नाही. गोंड हे स्वत:ला राजे समजतात. परधानांना दुय्यम समजतात. असे असले तरी त्यांच्यात धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिकदृष्ट्या कोणतेही वेगळेपण नाही. मात्र,गोंडाच्या शरीरयी पेक्षा परधान निश्चितच रोडके आहेत. बाकी इतर सर्व गोी गोंडाप्रमाणेच लागू आहेत. 'परधान' हे गोंडांचे संस्कृतीवहक आहेत. त्यामुळे नृत्य, गीते, विधी, मनोरंजन, कला, वाद्यवादन या क्षेत्रात गोंड अजिबातच नसतात. हे सर्व कार्य गोंडीसंस्कृतीत फक्त परधान करतात.

**गोंड–परधानांची शारीररचना :–** गोंड–परधान साधारणत: साडेचार फूट उंचीचे, गोलाकार रूंद चेहऱ्याचे, नाक पसरट, रूंद तोंड व जाडसर ओठाचे, सावळ्या काळ्या वर्णाचे असतात. स्त्रिया कमी उंचीच्या बांधेसूद व सौष्ठवपूर्ण तथा सावळ्या–गव्हाळी वर्णाच्या असतात. पुरूष केस लांब ठेवतात, दाढी ठेवत नाहीत. स्त्रिया केस उत्तम विंचरून चापून–चोपून ठेवतात.

**वेशभूषा :–** गोंड–परधानांच्या पुरूषांची वेशभूषा म्हणजे, लंगोटी किंवा कंबरेला कपडा गुंडाळणे, बाकी भाग उघडा. मात्र, आता धोतर, पायजामा घालू लागले. सोबत कुडते किंवा बांडीही वापरू लागले. डोक्याला दुपट्टा गुंडाळू लागले आहेत. स्त्रिया पूर्वी कंबरेभोवती कपडा गुंडाळत. परंतु, अलिकडे दिडकीचे लुगडे, चोळी, झांपर, साडी किंवा पद घालतात. आता नवीन पिढी नवीन पद्धतीने वस्त्र घालू लागली आहेत.

गोंदनकला :— गोंड—परधानांनामध्ये स्त्री व पुरूष दोघेही अंगावर गोंदून घेतात. त्यात कुलचिन्हे, निसर्ग चिन्हे गोंदतात.

दागदागिने :— गोंड—परधान जमात अलंकारप्रिय आहे. पुरूष गोंड कंबरेला चांदीचा करदोडा घालतात, कानात तांब्याची बाळी, हातात कडे घालतात. गोंड—परधान स्त्रिया खूप हौशी असतात. कानात कर्णफुले किंवा डूलं, नाकात बेसर, मुकरा, गळ्यात चांदीची सरी, हसली (कडे), हातात बांगड्यासोबत बाहुवट्या, पायात तोरड्या, जोडवे, कंबरेला कमरपट्टा घालतात. काही गोंडस्त्रिया गळ्यात पैश्याच्या माळा म्हणजे 'झुल्कडबी' घालतात. तरूण मुली डोक्यावर केसात फणी लावतात, फुले माळतात.

आहार :— गोंड—परधान जमात मांसाहारी आणि शाकाहारी आहे. देवेगटावर आधारित गोत्ररचना (फ्रॅटरी) असतात. सगोत्री म्हणजेच एकाच कुलगटात, देवेगटात लग्नविधी निषिद्ध मानला जातो. सर्व देवेगटांना ते 'सगे', 'सगा' मानतात. प्रत्येक कुलगटांना, देवेगटांना वंशीय कुलचिन्हे (टोटेम्स) असतात. प्रत्येक  कुलगटांना, देवेगटांना विशि देव—देवता असतात. उंदोर, चिंदोर,कंदोर हे कनिष्ठ देवे गट समजल्या जातात आणि चारदेवे (नालवेन), पाचदेवे (सायवेन), सहादेवे (साखेन), सातदेवे (येलवेन), बारादेवे (तोरे किंवा जंगवने) इत्यादी कुलगट किंवा देवेगट रचना आहेत. गोंडीभाषेत पेन किंवा वेन म्हणजे देव असे म्हणतात.

सांस्कृतिक ओळख :—

देव देवता :— गोंड—परधानांमध्ये पुढील प्रमाणे देव—देंवता आहेत.

१) पेरसापेन (फेरसा पेन) — ह्यालाच 'बडादेव' असे संबोधल्या जाते. प्राचीन काळी शंभूशेखमहादेव हे सुधारणावादी घडून गेले असावे, असा समाज आहे. (बेहरापेन, बुढालपेन, दुल्हादेव, महादेव, मोठादेव, शिव ही त्याची इतर नावे होय) याची पूजा वैशाखी पौर्णिमेला होते.

२) पारीकपारी लिंगो — कपार लिंगो हा पेरसापेनचा मसिहा, देवदूत आहे,असा समज आहे.

३) जंगो लिंगो, जंगो रायतार, जंगोदेवी— ही सुद्धा समाजसुधारक, क्रांतीकारक स्त्री म्हणून देवीपदास पोहचली.

४) भिमालपेन (कुंवारा भिवसेन) — गोंडाचे पराक्रमी पुरूष, धर्मप्रचारक म्हणून मान्यता. नागपूर जिल्ह्यात रामटेक तालुक्यातील नवेगाव—खैरी गावाजवळ 'पेंच' प्रकल्पाच्या काठावर आदिवासीचे प्रख्यात दैवत भिमालपेन यांचे प्रसिद्ध देवस्थान आहे. चैत्र पौर्णिमेला 'भिवसेन पूजा' करतात. तसेच हिरासुका, शितलामाता, ताडोबा, वाघोबा, मरीआई, चंडकाई, महाकाँली, नागोबा, दंतेश्वरी इत्यादी देवदेवता गोंडामध्ये पूजनीय आहे.

सण—उत्सव आणि विधी परंपरा :— माडिया गोंडात सणाला 'पंडुम' म्हणतात. दसरा—दिवाळी—होळी हे गोंडी संवर्गात आजही साजरे केले जातात पण ते वेगळ्या स्वरूपात. हिंदुच्या पारंपरिक रूपात हे सण साजरे केले जात नाहीत. गोंडी जमातीतील सर्व धर्मविधी भगत किंवा पुजारी करतात. पेरमा हा वैदू असतो. ही पदे वंशावळीने येतात. गोंडी समाजात पाचपावली (माघ पौर्णिमा), संभू नरका (महाशिवरात्री), शिमगवरा (शिमगा—होळी), गढपूजा (माघ पौर्णिमेनंतर किंवा शिमग्यानंतर तीन दिवसांनी), भिमालपेन पूजा (चैत्र पौर्णिमा) शितलामाता पूजा (चैत्र पंचमी),खटपूजा (आषाढ पौर्णिमा), भूजंगपूजा (नागपंचमी), हिरासुकाभूमकाल पूजा, कालीकंकाली पूजा (पौष अमावस्या) अशा पूजाविधी आहेत.

गोंडी—परधानी जमातीतील क्रांतीवीर/समाजसुधारक :— कथापुराणातील राजारावण, मेघनाथ, कुंभकर्ण, बिभीषण, शुर्पनखा हे गोंडवंशीय असल्याचे मानल्या जाते. तथा, बऱ्याच ठिकाणी ते दैवत म्हणून पुजल्या जातात. क्रांतीसूर्य बिरसा मुंडा, महाराणी दुर्गावती, बाबूराव शेडमाके असे अनेक क्रांतीवीर गोंडी जमातीत होवून गेले आहे.

गोंडी भाषा, अभ्यास व संशोधन — गोंडी परधानी संस्कृतीचा सामाजिक, मानव वंशशास्त्रीय दृीने भरपूर अभ्यास झाला आहे. हिस्लॉप, रसेल, हिरालाल, गिर्यसन, एल्वीन, मेहता, हॉयसे यांची नावे घ्यावी लागतात. या सोबतच त्यांच्या भाषेचाही अभ्यास करण्याचा प्रयत्न झाला आहे. डॉ.देवगावकर दाम्पत्य, डॉ.इरावती कर्वे, वि.वा.जोशी, डॉ. शशीधर मुरकुटे, डॉ.गोविंद गारे, डॉ.भाऊ मांडवकर यांचे योगदान त्यांच्या परीने महत्त्वाचे ठरते. तथापि, यवतमाळ मधील मधुकर उद्धवराव मडावी, महावीर नगर, हेही त्यांच्या जमातीसाठी सातत्यपूर्ण संशोधनात्मक दृीने सामाजिक, सांस्कृतिक अंगासोबत भाषिक—व्याकरणिक अंगाने लेखन करीत आहेत. त्यांची बरीच पुस्तके प्रकाशित आहेत. पण, ती दुर्लक्षीत आहेत, हे अगत्याने सांगावेसे वाटते.

गोंडी भाषा व लिपी :— गोंडी संवर्गातील भाषा गोंडी भाषा म्हणून ओळखली जाते. ती द्रविड भाषाकुळात मोडते. गोंड राज्यांच्या काळात ती राजभाषा होती. पुढे सत्ता ऱ्हासा नंतर ती केवळ मौखिक भाषा म्हणून राहिली. आता ती केवळ संवर्गापुरती बोली भाषा म्हणून राहिली आहे.  गोंडी भाषेतील लोकगीतांमुळे तिच्यात जिवंतपणा व

चैतन्यपूर्णता दिसून येते. गोंडी भाषेतील अनेक शब्द महत्वपूर्ण आहे. परंतु त्याचे चुकीचे अर्थ लावल्याने त्या भाषेला दुय्यम स्थान प्राप्त झाले. या बोलीचे प्रमाणभाषेत रूपांतर व्हावे व तिचे शिक्षणाकरिता लिपीकरण व्हावे म्हणून १९१८ पासून प्रयत्न सुरू झाले. भावसिंह मसराम वनकुटीर, बालाघाट, मनिरावण दुग्गा, विठ्ठलसिंह धुर्वे, व्यंकटेश आत्राम आर्वी, मधुकर मडावी यवतमाळ यांनी गोंडी लिपीसाठी पुस्तक लिहिली आहेत. तसेच साहित्याच्या क्षेत्रात गोंडी लेखक डॉ.विनायक तुमराम, बाबाराव मडावी, दशरथ मडावी, प्रभु राजगडकर, वामन शेडमाके, सुनिल कनाके, भुजंग मेश्राम, उषाकिरण आतराम ही मंडळी आता लेखन करीत आहे.

गोंडी परधानी गाण्यांचे प्रकार :— १) गोगो पाटा (देवगीत) २) पुनेभीपाटा ३) पणगू पाटा ४) नेलपाटा ५) मुक्त गीत

काही लोकगीतांचे प्रकार :— १) रेलाँ पाटा २) दोहरा पाटा ३) बिरवा पाटा ४) सेला पाटा ५) सेले पाटा ६) मन्सूर गीत ७) चिरचोंडा पाटा ८) शिमगा पाटा

गोंडी परधानी नृत्य आविष्कार :— ढेमसा

नृत्याचे प्रकार :— रेलाँ, पठार, दोहरा, बिर्वा, सयला, मंडराना, करसाठ, निनामामूर, करमा, जतरा, कोहकांग, गेडी, चिरकोजल, पन्नींग, कोलांग, डिरांग, हुलकी असे गोंडी संवर्गातील नृत्य प्रकार आहेत.

ढेमसा नृत्य :— लग्न समारंभ, काही विधी प्रसंगी आणि सणोत्सवाप्रसंगी, दंडार प्रसंगी, ढेमसा नृत्य करतात. हे नृत्य सोळा तालात असतो. लग्नविधी कोणती सुरू आहे, हे दुरूनच ढेमसाच्या तालावरून लक्षात येते.

ढेमसा दंडार :— कोलामांच्या दंडारीपेक्षा वेगळे स्वरूप असणारे नृत्य.

१) गोला साडीचे लहान दंडार ढेमसा २) घेऱ्याची म्हणजे मोठी दंडार ढेमसा ३) एका लाईनची म्हणजे चौताळीस ढेमसा दंडार, असेही प्रकार आहेत. 'लिंगाल' देवाला खुष करण्यासाठी ढेमसा दंडार नृत्य अस्तित्त्वात आले. ढेमस्यातील चाळ्यांना 'काड्या' म्हणतात किंवा 'कोला' म्हणतात. ते तालाचे प्रकार आहेत. असे एकूण एकेवीस प्रकारचे ताल, काड्या किंवा कोला आहेत. पण आता ते दुर्मिळ झाले आहेत.

१) भिमाल कोला २) चंडकई कोला (नृत्य) ३) ढेमसा ताल ४) साक्री कोला ५) वेलुंग कोला — ६) कुही कोला ७) उरूम कोला ८) झलका कोला ९) झोला कोला/ताल १०) मोहर्रम कोला ११) हुडे कोला १२) सुगरण कोला १३) मिरची कोला १४) चैक चंदन कोला १५) कुट्टी कोला असे ढेमसा दंडारीचे स्वरूप आहे.

गोंड—परधानांची वाद्ये :— आदिवासी धर्मगुरू पारी कुमार लिंगो हे अठरा वाद्य कलेत पारंगत होते. त्यांच्यापासून गोंडी परधानी संस्कृतीत नृत्यगाणे सादर करताना, विधी करताना खालील वाद्ये उपयोगात येतात.

अ) सुशीर वाद्य — १) फेपारी किंवा पुंगी२) थुर्रा

ब) तत किंवा तंतू वाद्य १) किकरी (बाना) २) ढुसिर (किंगरी) ३) किंदरी (सितार) ४) डुमीर

क) वित वाद्य — १) नगारा २) गोगा ३) तुडपुडी ४) ढोल ५) दरांग ६) मांदर

ड) घन वाद्य — लाकडाचे किंवा धातुचे साधारण वाद्य

१) पिकोटी २) टिंडोरी ३) घुंगरू ४) कट वाकींग किंवा पयडी ५) चिटकुला ६) झांज किंवा मंजिऱ्या

उपसंहार —

अनेकांगाने वैविध्यपूर्ण असलेल्या गोंड—परधानी आदिवासी समूहाची, त्याच्या अस्मितेची, पूर्वेतिहासाची, समाज संस्कृतीची, भाषा व साहित्याची जाणीव त्या समूहातील आजच्या पिढीला व्हावी तसेच इतरांना देखील व्हावी या हेतूने हा लेख लिहिला आहे.

संदर्भ —

१.आदिवासी—आदिजन, भाऊ मांडवकर, विजय प्रकाशन, अमरावती, प्र.आ.२०१०
२.गोंडी भाषा व त्यात दडलेली संस्कृती व साहित्य, मधुकर मडावी, यवतमाळ.
३.आदिवासींचे वाद्य व नृत्यगान, मधुकर मडावी, यवतमाळ.
४.गोंडीयन संवर्गातील जमातीची जीवनपद्धती, मधुकर मडावी, यवतमाळ.
५.गोंडीयन समाजाची गोंडी भाषा, मधुकर मडावी, यवतमाळ.
६.गोंड, परधान आणि कोलाम, शैलजा देवगांवकर, नागपूर.

❖❖❖

# राष्ट्रसंताचे स्त्री सबलीकरण व महिलोन्नती विषयक विचार

डॉ. गजानन भाऊराव घोंगटे
श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय
वनोजा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
Email: ghongategajananb@gmail.com भ्रमणध्वनी ९८२२४०६११५

## प्रस्तावना :—

भारतीय स्त्रीया आता केवळ पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत नाहीत तर त्या अनेक क्षेत्रामध्ये पुरुषांना मुसंडी मारुन पुढे गेल्या आहेत. त्या चंद्रापासून मंगळापर्यंत आकाश भरारी घ्यायला तयार झाल्या आहेत. स्त्रियांची ही प्रगती अगदी अलिकडच्या काळामध्ये झाली आहे. याचे प्रतिनिधिक स्वरुप म्हणजे कल्पना चावला ही अवकाशवीर आहे. तिने प्राणाची बाजी लावून ते आव्हान स्वीकारले होते. स्त्रीया आता सैन्यात, पोलीसांत, प्रशासनात, राजकारणात उच्च पदावर कार्यरत आहेत. वैदिककाळ मात्र स्त्रियांसाठी फारसा अनुकूल नव्हता. ''वर्तमान परिस्थितीची वैदिक काळाशी तुलना केल्यास त्याकाळी स्त्रियांना ज्ञान ग्रहण करण्याची बंदी, घराबाहेर पडण्यावर बंदी, विधवा पुनर्विवाहाला बंदी अशी परिस्थिती होती. मात्र आज अशी अवस्था नसतानाही ही परिस्थिती का, तर स्त्रीया कुणाच्यातरी हस्तक बनतात, स्वत:ला अबला समजून बसतात, कुठल्याही गोष्टीची चिकित्सा करीत नाहीत, ही वाईट मानसिकता स्त्रियांच्या सर्व दु:खाच्या मुळाशी आहे.मला स्वातंत्र्य नाही, सुख नाही, स्वत:चा अभिमान नाही, स्वत:ची ओळख नाही, माझं काही अस्तित्व नाही.'' वैदिक काळाच्या तुलनेमध्ये स्त्रियांसाठी वर्तमानकाळ हा अधिक उत्कर्षाचा आहे. वैयक्तिक स्वातंत्र्याची संकल्पना अधिक प्रभावी झाल्यामुळे स्त्री देखील एक व्यक्ती आहे व व्यक्ती म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे.'[१] तिने गुलामगिरीचे जोखड बाजूला सारले आहे. आता ती स्वयंसिध्दा म्हणून कर्तव्यपटावर सिध्द झाली आहे. आज खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रीया सशक्त, सक्षम, समर्थ व सबल झाल्या आहेत. महात्मा गांधीनी स्त्रियांच्या सबलीकरणावर विशेष भर दिला आहे. गांधीजी म्हणतात. '' अहिंसेसाठी लढा देताना व मोठी कामगिरी करायची वेळ येईल तेव्हा स्त्री ही पुरुषापेक्षा अधिक कार्यक्षम असल्याचे लक्षात येते''[२] महात्मा गांधीनी स्त्रियांची तुलना पुरुषांशी करतांना पुरुषांपेक्षा स्त्रीया अधीक सक्षम आहेत, कार्यक्षम आहे, असा निष्कर्ष काढला आहे. गांधीजी स्त्रियांना सबला मानत होते, हे शोभना रानडे यांच्या लेखातून अधिक स्पष्ट होते. ''गांधीजींना अबला हा शब्द अजिबात आवडत नसे. ते स्त्रियांसाठी (सामर्थ्यशाली ही छटा जाणवत असल्याने) सबला हाच शब्द वापरायचे. माझी पिढी नशीबवानच म्हणायची कारण गांधी आणि विनोबा असे दोन नेते आम्हाला निर्भयतेचे धडे देण्यासाठी होते. स्वत:पुरते जगण्याची सीमा ओलांडून उन्नती करुन घेण्याची प्रेरणा त्यांनीच आम्हाला दिली. गांधीजींनी जाहीरपणे सांगितले होते की, महिला आपल्याला अहिंसेचाच अवतार असल्यासारख्या जाणवतात. त्यांचे असेही मत होते की, आत्मविश्वास व आत्मबळाच्या जोरावर स्त्रिशक्ती ही राष्ट्रनिर्मितीसाठी विलक्षण ताकद ठरु शकते.''[३] महात्मा गांधींना 'अबला' या संज्ञेपेक्षा 'महिला' ही संकल्पना अधिक आवडायची. महिला आत्मनिर्भर व आत्मविश्वासू असतात. आत्मविश्वास व आत्मबळाच्या भांडवलावर स्त्रिशक्ती राष्ट्रनिर्मिती करु शकते, अशी त्यांची धारणा होती.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या 'ग्रामगीता' ग्रंथात विसाव्या अध्यायात महिलोन्नती विषयक आपले मत मांडले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजी प्रमाणेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना महिला हा शब्द जवळचा वाटायचा त्यामुळे त्यांनी महिला ही संज्ञा वापरली आहे. उत्तम महिलेचे व्यक्तिमत्व स्पष्ट करताना तुकडोजी महाराज म्हणतात.

''उत्तम महिला हेचि करी । आपुले घर ब्रीदासह सावरी ।
मूलबाळ आदर्श करी । वरी प्रेमळपण सर्वांशी ।।''[४]

राष्ट्रसंतांनी उत्तम महिलेचे गुण सांगताना आदर्श महिला तीच जी आपल्या घराला व मुलांबाळांना पुढे नेते. म्हणूनच

''जिच्या हाती पाळण्याची दोरी । तिच जगाते उद्धारी ।।''

असे राष्ट्रसंत म्हणतात. राष्ट्रसंतांनी केवळ चूल आणि मूल रांधा, वाढा, उष्टी काढा एवढेच स्त्रियांचे विश्व नसून ती आपल्या कर्तृत्वाने राष्ट्रउभारणी करू शकते, असा विश्वास व्यक्त केला.

''महिलांचे उच्चतम शिक्षण । शिक्षणात असावे जीवनाचे स्थान ।

जीवनात असावे स्वारस्यपूर्ण ं। शांती दयादि भावनांचे ।।''[५]

महिला उच्च शिक्षण संपादन करून स्वत:ला सिध्द करु शकतात. आपल्या जीवनात त्यांनी शिक्षणाला महत्व दिले तर आदर्श महिलावर्ग निर्माण व्हावयाला वेळ लागणार नाही, असे राष्ट्रसंतांना वाटत होते.

## महिला सबलीकरण :

महिला सबलीकरण म्हणजे काय? याचा अर्थ पाहणे संयुक्तिक ठरेल. सबलीकरणाची परिभाषा करताना असे म्हटले जाते की, ''सत्ता वंचित व संधिवंचित महिलांना कोणत्याही भेदाशिवाय प्रगती करण्याची संधी म्हणजे महिला सबलीकरण होय.''[६] महिला सबलीकरणाचे ध्येय म्हणजे महिलांना आत्मनिर्भर बनविणे होय. म्हणजेच महिलांना राजकीय, सामाजिक व शैक्षणिक संदर्भात आत्मनिर्भर बनविणे अपेक्षित आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना महिलांबद्दल नितांत आदर होता. त्यांनी महिलांना पुरुषांबरोबर राहून स्वत:चा विकास करून घ्यायचा आहे. दोघांनीही आपले ब्रीद ओळखून वागायचे आहे, असा सल्ला दिला.

''म्हणोनि सहशिक्षणही नाही वाउगे । जरि नैतिक भाव राहती जागे ।
शिक्षणी जागृत ठेवणे सर्वांगे । काम नेत्या वडिलांचे ।।''[७]

महिलांनी शिक्षण घेऊन आत्मनिर्भर व्हावे व पालकांनी मुलगा मुलगी असा भेद न करता मुलामुलींना सहजीवनाचा व सहशिक्षणाचा आनंदा घेऊ द्यावा, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मत होते. आधुनिक शिक्षणतज्ञांच्या मताशी हे मत अनुरुप वाटते.

''भारतीय संस्कृतीत शक्तीचे रुप म्हणून देवीचे पूजन केले जाते. देवी हे स्त्रीचे एक रुप आहे. तर मग तिला अबला का म्हणावे, असा प्रश्न तुकडोजींच्या मनात निर्माण झाला. स्त्रियांना आपल्या बळाचे भान यावे याकरिता त्यांनी महिला मंडळाची स्थापना केली. लघुउद्योगांच्या द्वारा महिलांना स्वावलंबी बनविण्याचे कार्य या मंडळाने केले.''[८] स्त्रियांना आत्मभान यावे यासाठी राष्ट्रसंतांनी जाणीवपूर्वक महिला मंडळाची स्थापना करून त्यांना उद्योगशील बनविण्याचा प्रयत्न केला. या महिला मंडळाने विधवा, घटस्फोटिता, परित्यक्ता, निराधार अशा महिलांना आधाराचा हात दिला. समाजातील प्रचलित कुप्रथा त्यात स्त्रियांची होणारी विटंबना या प्रथांनाच संस्कृती समजून त्यानुसार स्त्रियांना वागणुक देणे चुक आहे, हे त्यांच्या लक्षात आणुन दिले. या महिला मंडळांनी महिलांना नावलौकीक, प्रतिष्ठा व सन्मान प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला, हे महत्वाचे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या विसाव्या अध्यायात महिलोन्नती हा विशेष संदर्भ घेतला. यात महिलांचे कार्य, जीवन, आईचे महत्व तसेच स्त्रियांमध्ये असणाऱ्या विविध गुणांची नोंद या अध्यायामध्ये घेतली आहे. शिकलेली आई घरादारापुढे नेई. हे सूत्र तुकडोजी महाराजांनी मांडले. स्त्रियांचा विकास झाल्याशिवाय गावाचा पर्यायाने देशाचा विकास होणार नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी या अध्यायातून केला आहे. ग्रामोन्नती पायाच शिक्षणामध्ये आहे, हे राष्ट्रसंतांना पटले होते, म्हणून त्यांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये महिलेशिवाय आदर्शपण नाही हे सुध्दा मांडले आहे.

''याच गुणे 'मातृदेवो भव । वेदाने आरंभीच केला गौरव ।
नररत्नांची खाण अपूर्व । मातृजाति म्हणोनिया ।।''[९]

मातृदेवोभव या विचारातून महिलांचे श्रेष्ठत्व राष्ट्रसंतांनी अभिव्यक्त केले आहे. माता ही नररत्नांची खाण आहे, असेही त्यांना वाटत होते म्हणूनच त्यांनी मातेचा गौरव ग्रामगीतेमध्ये केला आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी तिच जगाचा उद्धार करु शकते, असे म्हणून त्यांनी मातेला उद्धारकर्ती संबोधले आहे.

गृहकार्य आटोपून महिलेने आपल्या कुटूंबाकडे, समाजाकडे आपले लक्ष वेधले पाहिजे म्हणजेच स्त्रीने आदर्श गृहिणी व अनौपचारिक, कौटुंबिक पालकत्व स्वीकारले पाहिजे. ''घरचा उत्तम कामधंदा । हे महिलेची लक्षण सदा । आलिया—गेलियासी आपदा । महिला असता न वाटे ।।''१०महिलेने आधी गृहिणी व्हावे, मग सुधारक व्हावे हे राष्ट्रसंतांना सूचवायचे आहे, म्हणजे ते मातृत्व, पालनपोषण या घटकांना महिलांच्या संदर्भात प्राधान्य देताना दिसतात. हे सांगताना ते हे सुध्दा नमुद करतात की,

''म्हणजे पुरुषांचे काहीच नाही । ऐसे म्हणने नोहे काही ।
सहज स्वभावाची रचनाचि ही । विशद करोनी सांगितली ।।''[११]

हे सांगताना राष्ट्रसंत पुरुषांना स्त्रियांच्या विकासाचा साथीदार समजतात. शेवटी असेही सांगतात की,

''माझा संसार विश्व आहे । सर्व स्त्री पुरुष बाप—माय ।
व्यवहार दृष्टीने समजून काय । पाहिजे ते ते बोललो ।।''[१२]

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना महिलांच्या विकासाबद्दल तळमळ आहे व महिलांचा विकास करताना संबंध विश्वाचा विचार ते करताऩा दिसतात. संसार हीच एक संस्काराची कार्यशाळा आहे. त्यात स्त्री पुरुषाची भूमिका ही माय—बापासारखी आहे. स्त्रियांना केवळ व्यथा द्याव्यात व पुरुषांनी सोयी घ्याव्यात असे नव्हे तर संसाररथाची ही दोन चाके आहेत. त्यातले कोणतेही दुबळे होऊन चालणार नाही. जे पुरुषाला मिळते ते स्त्रियांनाही लाभावे तरच संसाररथ यशस्वीपणे चालेल, असे त्यांना वाटत होते. स्त्रियाच्या उन्नती करिता त्यांचे मेळावे, समुदाय, मंडळे यांचा विकास होणे आवश्यक आहे. तुकडोजी महाराजांनी महिलांना केवळ सन्मानच दिला नाही तर समानता देखील पुरस्कृत केली आहे.

## निष्कर्ष :—

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना स्त्रियांनी आधी आदर्श गृहिणी व्हावे असे वाटत होते.
२) सर्व सुखसोयी पुरुषांसोबत महिलांनाही प्राप्त व्हाव्यात असे त्यांना वाटत होते.
३) स्त्री पुरुष समानतेचा त्यांनी पुरस्कार केल्याचे जाणवते.
४) महिलांच्या उन्नतीसाठी महिलांचे संघटन, मंडळ स्थापन करण्याचा सल्ला देताना ते दिसतात.
५) स्त्रियांनी पुरुषांचे स्फुर्तिस्थान व्हावे असेही त्यांना वाटत होते.
६) महिलांच्या उन्नतिबद्दल राष्ट्रसंतांना आत्मियता असल्याचे लक्षात येते.

## संदर्भ ग्रंथ :—

१) पवार, लिनता अजय : 'वाचकीय', दै. देशोन्नती, १२ जानेवारी, २०२०.
२) रानडे, शोभना : अखंड प्रेरणा गांधी विचारांची पृ.क्र. ३११.
३) तत्रैव : पृ. क्र. ३११.
४) तुकडोजी महाराज : 'ग्रामगीता', विसाव्या अध्याय, ओवी क्र. ७.
५) तत्रैव : पृ. क्र. ८४.
६) 'शिक्षण संक्रमण' :— महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. मार्च २०१२, पृ. ३५.
७) तुकडोजी महाराज : 'ग्रामगीता', विसावा अध्याय, ओवी क्र. ९९.
८) राणा, अशोक :'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन व कार्य', जिजाई प्रकाशन, पुणे. ११ एप्रिल २००८. पृ. ९
९) तुकडोजी महाराज : 'ग्रामगीता', अध्याय विसावा, ओवी क्र. ८
१०) तत्रैव : पृ. क्र. १८.
११) तत्रैव : पृ. क्र. ३४.
१२) तत्रैव : पृ. क्र. ३६.

❖❖❖

# मराठी ग्रामीण साहित्याची भाषा

डॉ. गजानन भाऊराव मुंधे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव)
ता. मानोरा, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
Email: mgajanan327@gmail.com भ्रमणध्वनी ९७४९९७२९५९२

## प्रस्तावना :

मानव हा समाजशील प्राणी असून भाषा ही मानवी समाजजीवनाचे वैशिष्टये आहे. समाजात राहणे, संपर्क साधने या मानवी गरजा आहे. या गरजेतूनच मानवी भाषा अस्तित्वात आल्यात. तथापि पृथ्वीवरील संपूर्ण मानवाची एकच एक भाषा नाही. भाषेची विविधता हे ही मानवी समाजजीवनाचे एक विशेष आहे. भारतात प्रांता–प्रांतात भाषेची विविधता आढळते. भारतदेश हा विविध भाषा आणि बोलिंनी समृध्द आहे. आपल्या महाराष्ट्राचेच उदाहरण घ्यायचे झाल्यास मराठी प्रमाण भाषे बरोबरच कोकणी, अहिराणी, डांगी, वऱ्हाडी, मराठवाडी या बोलि ही महत्वाच्या आहेत. एकूणच भाषा ही मानवी भावभावनांचा जसा अविष्कार करते, तसाच ती त्या संस्कृतीचाही आविष्कार करते. अशा या भाषेला स्वतःचे असे एक रूप असते, तिची स्वतःची अशी एक ठेवण असते.

मानवी मनास व्यक्त करण्याचे भाषा हे मुख्य साधन असल्याने भाषेशिवाय साहित्याचा आविष्कार शक्य नाही. म्हणूनच साहित्याचा विचार भाषेच्या अनुषंगाने करणे तितकेच महत्त्वाचे व आवश्यक आहे.

मराठीतील ग्रामीण साहित्याचा भाषेच्या अंगाने विचार करण्याचा प्रस्तुत शोध निबंधात प्रयत्न केला आहे. ग्रामीण साहित्याचा भाषेच्या अंगाने विचार करण्यासाठी दोन कारणे महत्त्वाची वाटतात एक म्हणजे ग्रामीण साहित्याची भाषा कोणती असावी व दुसरे म्हणजे ते साहित्य ग्रामीण असल्याने ग्रामीणांच्या बोलीत ते असावे का? या दोन प्रश्नांवर विचार या निबंधाचा हेतू आहे.

## भूमिका :

प्रस्तुत शोधन निबंधात ग्रामीण साहित्याची भाषा याचा शोध घेतांना प्रारंभिच्या ग्रामीण साहित्याची भाषा व त्याची कारणे. ग्रामीण साहित्याच्या भाषेत कालांतराने होत गेलेला बदल व त्याची कारणे व सद्यस्थितीत ग्रामीण साहित्याची भाषा कोणती असावी व का या कारणांचा शोध घेतांनाच ग्रामीण साहित्याच्या भाषेचा वाचकांच्या दृष्टीने केलेला विचार या मुद्दयांचा शोध घेण्याची भूमिका या निबंधा मागे आहे.

साहित्य हे समाजमनाचा आरसा आहे वा समाज व साहित्य हया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे असे साहित्या विषयी बोलले जाते. याचाच अर्थ समाजामध्ये जे–जे घडते, ते–ते साहित्यातून अभिव्यक्त होत असते असा होतो. लेखक आपल्या प्रतिभेच्या कुवतीनुसार समाजाचे झालेले आकलन शब्दाव्दारे आपल्या साहित्यकृतीतून मांडत असतो. यामुळेच साहित्य–समाज व संस्कृती हया परस्परपूरक वाटतात. लेखक आपल्या भावभावना, समाजातील प्रश्न, समाजवास्तव वा समाजोध्दाराच्या व मानवी कल्याणास हितकारक गोष्टी ज्या साहित्यातून व्यक्त करतो. ते व्यक्त करण्यासाठी भाषा ही अत्यंत महत्त्वाची बाब ठरते. याच पार्श्वभूमीवर मराठी ग्रामीण साहित्याच्या भाषेचा विचार मांडला आहे.

मराठी ग्रामीण साहित्याचा विचार करता ग्रामीण साहित्य ग्रामजीवनाशी व कृषीशी निगडीत जसे आहे तसे ते ग्रामीण निसर्ग व अलुते–बलुते यांच्याशी निगडीत आहे. ग्रामाशी निगडित असल्याने ग्रामजीवनातील व्यथा–वेदना भाव–भावना हया ग्रामीणांच्या भाषेत म्हणजे बोलीत व्यक्त व्हाव्यात असे अनेकांना वाटते यात वावगे काहीच नाही. मुळात ते त्यांच्या भाषेतच अधिक सशक्तपणे व्यक्त होऊ शकते. परंतू १९२० ते १९४५ हया प्रारंभीच्या ग्रामीण साहित्य हे नागर भाषेत लिहिले गेले. उदा. वरेरकर, ना.सी.फडके, म.भा.भोसले, द.रा.कवठेकर, मर्ढेकर, ठोकळ, पेंडसे, दिघे या साहित्यीकांचे ग्रामीण साहित्य हे नागर भाषेत लिहिलेले पाहावयास मिळते. या मागे काही कारणे दिसून येतात. एक म्हणजे १९२० मध्ये महत्मा गांधींचा भारतीय राजकारणात प्रवेश व त्यांची ‘खेडयाकडे चला’ ही हाक. याचा परिणाम साहित्यिकांवर झाला. आणि शहरातील साहित्यिक ग्रामजीवनावर लिहू लागले. अर्थातच भाषा नागरी पर्यायाने आलीच, दुसरे असे की ग्रामीण जीवन रेखाटले तरी त्याचा वाचक वर्ग हा

शहरी मध्यमवर्गीय असल्याने त्याच्या भाषेत लिहिले तर तो वाचेल कारण ग्रामीण भागात वाचक वर्गाची त्याकाळी वानवाच होती. नाही म्हणायला खेडयातून आलेली व नौकरी निमित्य शहरात स्थानिक झालेली काही मंडळी ग्रामीण बोलीत लिहित मात्र अपवादानेच, मुख्य कारण म्हणजे वाचक वर्गाला जी भाषा कळते त्या भाषेत ग्रामीण साहित्य लिहिणे ही त्या वेळची गरज असल्याने ग्रामीण साहित्याची भाषा ही नागर होती असे स्पष्ट म्हणता येते.

१९६० नंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य नावारूपास आले. कारण खेडया—पाडयातून झालेला शिक्षणाचा प्रसार व प्रत्यक्ष खेडयाशी नाळ जूळत असणारा लेखक लिहायला लागल्याने ग्रामीण जीवनाचे वास्तव साहित्यातून उमटू लागले. उदा. उध्दव शेळके, अण्णाभाऊ साठे, रां.रं.बोराडे, आनंद यादव, शंकर पाटील, माडगूळकर, द.मा.मिरासदार, विठ्ठल वाघ, हमीद दलवाई, बाजीराव पाटील, रणजीत देसाई, या सारखी लेखक मंडळी आपल्या कथा—कादंबरी—कवितांमधून ग्रामजीवनाला व्यक्त करू लागले, खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याची ही पहिली पिढी मानायला हरकत नाही. १९६० नंतरच्या लेखकांनी आपल्या ग्रामीण साहित्याची भाषा नागर व बोली अशा दोन्ही स्वरूपाची ठेवलेली दिसते तर काहींनी संपूर्ण बोलीतच आपले साहित्य लिहिलेले दिसून येते. या मागचे कारण पाहता, ही पिढी प्रत्यक्ष ग्रामजीवनातून राहत असलेली व ग्रामीण अनुभवांना प्रत्यक्ष पाहिलेली व जगलेली असल्याने त्यांच्या साहित्यातून येणारे ग्रामजीवन अस्सल व वास्तवाशी निगडीत आहे. या लेखकांनी आपल्या लेखनातून ग्रामीण बोलीला न्याय देतांनाच ग्रामजीवन ज्या शब्दात व्यक्त व्हायला हवे त्याच शब्दात ते केल्याने ग्रामीण जीवनातील अस्सलता जाणवते. उदा. धग मधली कौतीक नवऱ्याला म्हणते,'' नाई तहान लागल्यावर खांदजा अड' (पृ.२२) ''तुहया रिठावर दिवा लावाले मानूस नाई राओ'' (बाखाडयाच्या जावायास उद्देशून) विठ्ठल वाघ आपल्या कवितेत वऱ्हाडी बोलीचा वापर करतात.

' ढग आले गरजले, कोन्या सटवाईले बुजाळले
चलवाद्यावानाचे, आले तसेच पलटले'' (काया मातीत मातीत.पृ.४)

या सारख्या बोलीतील शब्दांमुळेच धग, पाचोळा, गोतावळा, टारफुला, भंडारवाडी 'काय मातीत मातीत' या साहित्यकृती ग्रामीणांशी एकरूप झाल्यात ते त्यातील ग्रामीण बोलींमुळे. एकूणच ग्रामीण साहित्याची भाषा ही नागर की बोली या प्रश्नांचे उत्तर वरील साहित्यिकांच्या साहित्यकृतीतून मिळते.

विशेषत: मराठी ग्रामीण साहित्यात वऱ्हाडी भाषेच्या वापराचाही विचार या निमित्ताने अपरिहार्य आहे. इतर प्रदेशाप्रमाणे वऱ्हाडी ही विदर्भाची बोली आहे. विदर्भातील साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून तिचा वापर केल्याचे दिसते. उदा. विठ्ठल वाघ, शंकर बढे, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, देविदास सोटे, भाऊ मांडवकर, प्रतिमा इंगोले, मिर्झा रफी बेग, या साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतीतून वऱ्हाडीला महत्त्व दिलेले आहे.

बाबाराव मुसळे चा न्यायबा म्हणतो, ''एऱ्ही हे नोकरशाहीवाले लयच माजल्यावानी करायले'' (पृ. २१) किंवा ''आंधळ उरावर घेऊन भवताल पाहयनं आलं'' या सारख्या खास वऱ्हाडी म्हणी. शंकर बढे, मिर्झारफी यांनी तर खास वऱ्हाडी बोलीतूनच आपली साहित्य निर्मिती केली आहे.

ग्रामीण साहित्यातून येणारी ही ग्रामीण बोली भाषा त्या साहित्यकृतीत जीवंतपणा आणते, ग्रामीणांच्या व्यथा—वेदना, भाव—भावना हया वास्तवात व्यक्त करण्यासाठी तरी त्यांच्या बोली शिवाय पर्याय नाही. त्या भावना त्याच शब्दात व्यक्त होऊ शकतात अन्यथा मग त्या अळणी वाटतात.

'नेला बाजारात माल
नाई हुंगलं तो कोनी
आला ताकाचाचं भाव
कोण ओरपलं लोनी '' (शंकर बढे)

या कवितेतील 'हुंगलं, 'ओरपलं' या दोन शब्दातून ग्रामीण शेतकऱ्याची जी व्यथा आहे ती व्यक्त होते प्रमाण भाषेतील शब्दातून ती होणे शक्य नाही. म्हणूनच ग्रामीण साहित्याची भाषा ही त्या—त्या प्रादेशिक प्रदेशातील बोली असावी यामुळे साहित्यीकाच्या साहित्याला जीवंतपणाचा सुगंध लाभतो. मात्र यात एक महत्त्वाची अडचण आहे की प्रादेशिक बोलीतील साहित्य हे मग त्या प्रदेशापुरते मर्यादित होऊन जाते. ही जोखीम पत्करणे काहींना शक्य होते तर काहींना नाही. एकूणच मराठी ग्रामीण साहित्याची भाषा कोणती असावी या विषयी प्रा.द.ता. भोसलेंनी मांडलेल्या मतांचा परामर्श घेणे महत्त्वाचे ठरते, ग्रामीण साहित्यात जी भाषा—बोली वापरली जाते त्या विषयी उपस्थित केलेल्या समीक्षकांच्या प्रश्नांना उत्तर देतांना ते म्हणतात, ''ग्रामीण साहित्यात बोलींचा वापर काही टूम म्हणून आलेला नसतो, साधन म्हणून आलेला नसतो, सजावटीसाठीही आलेला नसतो. ती बोली अपरिहार्य स्वरूपात त्या अनुभवाला रंग रूपासह प्रकट करण्यासाठी माध्यम म्हणून आलेली असते. अनुभवाची गरज मागणी

असेल तर एखादा लेखक संपूर्ण कथानक त्या बोलीतून व्यक्त करील आणि अनुभवाची मागणी नसेल तर नागर भाषेत निवेदन व संवादावेळी तो बोली भाषेचा वापर करील''[१]

मराठी ग्रामीण साहित्याच्या भाषे विषयी भोसल्यांचे हे मत अनेकार्थाने महत्त्वाचे आहे. ज्या साहित्यास आज आपण ग्रामीण साहित्य म्हणतो त्या साहित्याचा वाचक वर्ग मोठया प्रमाणात ग्रामीण भागातून शिकून व आजी ग्रामीण भागाशी नाळ जोडून असणारा आहे. तसा या साहित्याला शहरी वाचकवर्ग कमीच असल्याचे जाणवते. हे कारण जर पाहिले तर मग ग्रामीण साहित्याची भाषा ही ग्रामीणांची जी भाषा आहे ती असणे महत्त्वाचे ठरते. परंतु पुन्हा तिच अडचण साहित्यकृतीस प्रदेशाच्या मर्यादा येतात. यावर उपाय म्हणून ग्रामीण साहित्यीकांनी निवेदना करिता नागर व संवादाकरिता बोलीचा वापर करावा त्यामुळे साहित्यकृतीस व वाचकास मर्यादा पडणार नाही. याच बरोबर साहित्य कृतीचा जीवंतपणाही कायम राहिल. आज बोली मधले अनेक शब्द लुप्त झालेत व त्या जागी आधुनिकिकरणामुळे नवे शब्द आलेत. इंग्रजी, हिंदी भाषेच्या प्रभावामुळे ग्रामीण बोलीतही या शब्दांचा आता सहज वापर होतो. उदा. कल्टीवेटर, हार्वेस्टर, स्प्रिंकलर, रोटावेटर तेव्हा साहित्यकृतीतून या नव्या शब्दांना वाव देणेही गरजेचे आहे. कारण भाषा व बोली हया तेव्हाच समृध्द होतात जेव्हा नव–नवे शब्द त्यात समाविष्ट होतात. या न्यायाने ग्रामीण साहित्याने केवळ बोलीचाच आग्रह न धरता नागर व बोली असा तो करावा. संवादाची 'बोली' भाषा असली तरी त्या शब्दांचे अलिकडचे अर्थ दिल्यास वाचकांना ते सहज समजतील.

ग्रामीण साहित्याच्या भाषे विषयी डॉ.वासुदेव मुलाटे म्हणतात, ''भाषा म्हणजे कलाकृतीतील आशयाचा एक अपरिहार्य असा आविष्कार असतो. आशयाच्या अनुषंगाने भाषेची ठेवण, मांडणी आणि लय ठरत जाते तसेच समाजातील स्तराप्रमाणेही भाषेचे स्तर निर्माण होतात.''[२]

ग्रामीण साहित्याची भाषा ही मानवी स्तरानुसार व काळानुसार बदलायला हवी. परंतू त्याच बरोबर त्यातील जीवंतपणा कायम राहावा हा आग्रहही रास्तच वाटतो. ग्रामीण साहित्याच्या भाषेविषयी प्रा.नरहर कुरूंदकर म्हणतात, ''ग्रामीण कथेचा सगळा जीवंतपणाच तिच्या बोलीशी निगडीत असतो.''[३]

एकंदरीत ग्रामीण साहित्याच्या भाषेच्या बाबतीत नागर भाषा व बोली भाषा हया दोन्हीचे स्थान महत्त्वाचे आहे. केवळ नागर भाषेत ग्रामीण साहित्य लिहिल्या गेले तर त्यातला जीवंतपणा हरविण्याची भिती आहे आणि निव्वळ बोलींचा वापर केला तर साहित्यकृतीला मर्यादा येण्याची भिती आहे. म्हणून ग्रामीण साहित्याच्या उज्ज्वल भविष्या करिता भोसले म्हणतात त्या प्रमाणे मध्य मार्ग काढून नागर व बोलींचा वापर ग्रामीण साहित्यासाठी महत्त्वाचा ठरेल.

## निष्कर्ष :

१) ग्रामीण साहित्य हे ग्रामजीवनाशी निगडीत असल्याने त्या–त्या प्रदेशातील ग्रामजीवन अभिव्यक्त करतांना त्या–त्या प्रादेशिक बोली भाषेचा अंतर्भाव लेखनात असणे अपरिहार्य ठरते.

२) प्रमाण (नागर) आणि बोली या दोन्ही भाषेचा वापर ग्रामीण साहित्यातून झाल्यास ग्रामीण व शहरी वाचकांची अडचण होणार नाही.

३) बदलत्या ग्रामजीवनानुसार ग्रामीण साहित्याची भाषा असावी त्यामुळे वाचकांना ती कलाकृती सहज उमजेल.

४) ग्रामीण साहित्याने केवळ बोलीचाच आग्रह धरला तर वाचकास व साहित्यकृतीस मर्यादा येऊन कालांतराने त्या साहित्यकृतीचे महत्त्व उरत नाही.

५) ग्रामीण साहित्याची भाष निवेदनासाठी नागर व प्रसंगानुरूप व संवाद लेखनासाठी बोलीचा वापर केल्यास ग्रामीण साहित्यापुढील भाषेच्या अडचणीचा मुद्दा निकाली निघू शकतो.

## सारांश :

मराठी ग्रामीण साहित्याची भाषा या निबंधातून मांडलेली मते ही भाषेच्या अनुषंगाने मांडलेली आहे. साहित्याची भाषा ही वाचकानुवर्ती असणे महत्त्वाचे आहे. उगाच प्रादेशिकतेचा आग्रह वा बोलींचा आग्रह हा साहित्यकृतीसाठी हानीकारकही ठरू शकतो. साहित्य हे समाजाची ठेव असल्याने समाजमनाला समजेल या भाषेत ते लिहिले जाणे साहित्याच्या व साहित्यीकाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. एकूणच ग्रामीण साहित्याने भाषेच्या बाबतीत नागर व प्रसंगानुरूप बोली हा मध्य मार्ग स्विकारणे महत्त्वाचे आहे.

## आधारभूत ग्रंथ :

१) 'धग', उध्दव शेळके, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई.१९९८
२) 'हाल्या हाल्या दुधू दे' बाबाराव मुसळे, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.
३) काया मातीत मातीत, विठ्ठल वाघ, देशमुख आणि कंपनी पुणे, १९९१.

## संदर्भ ग्रंथ :

१) ग्रामीण मराठी वाङ्:मयाचा इतिहास, संपा.चंद्रकुमार नलगे, सुरेश एजन्सीज पुणे, प्र.आ.(१९९६), (पृ.१८८–१८९)
२) प्रादेशिक ग्रामीण साहित्य : समीक्षेची समीक्षा, डॉ. रेखा जगनाळे, विजय प्रकाशन नागपूर. प्र.आ.२००७. पृष्ठ–१३९.
३) प्रादेशिक ग्रामीण साहित्य : समीक्षेची समीक्षा, डॉ. रेखा जगनाळे, विजय प्रकाशन नागपूर. प्र.आ.२००७. पृष्ठ–१३९.


❖❖❖

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विवाहविषयक विचार

प्रा. विलास शालिग्रामजी गांजरे
मा.सु.पा. कनिष्ठ महाविद्यालय, मानोरा
ता. मानोरा, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
Email: vilasganjare@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३६११०४८

## प्रस्तावना :—

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून हया भूमीवर संत महात्म्यांनी प्रबोधनाच्या माध्यमातून समाजसुधारणेचे आणि राष्ट्रनिर्मीतीचे अनमोल योगदान दिले आहे. संतांनी आपल्या लेखनीच्या, किर्तनाच्या, प्रवचनाच्या, माध्यमातून किंवा आणखी कुठल्या अनेक मार्गांने समाजामध्ये वैचारिक, बौध्दीक क्रांती आणि समाजसुधारणा, राष्ट्रनिर्माण करण्याचे दैदिप्यमानं असे कार्य केले. त्यामुळे हया भूमीत नवविचार, पुरोगामी विचार व परिवर्तनवादी विचारांची मालिका रुजली आहे.

संतांच्या परंपरेतील अलिकडील अतिशय महत्वाचे संत म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार आणि त्यांचे साहित्य खऱ्या अर्थाने विश्वव्यापक आहे. समाजामध्ये आवश्यक असणाऱ्या परिवर्तनाचे, अनेक सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठीचे त्यांचे विचार नवदिशादर्शक, आधुनिक व तेवढेच सशक्त आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महाराष्ट्रच नव्हे तर देशभर हिंडून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले. समाजातील सर्व घटकांचा विकास व्हावा ही राष्ट्रसंतांची इच्छा होती. आपल्या उद्दिष्टांना सोबत घेऊन त्यांनी आपले महान कार्य केले. राष्ट्रसंतांचा प्रत्येक विचार तार्किक व विवेकवाद आधारित आहे. साहित्यामध्ये दिपस्तंभ ठरवा असा राष्ट्रसंतांचा ग्रामगीता ग्रंथ, अनुभव सागर, भजनावली, सेवास्वधर्म हयासारख्या साहित्यातुन दिलेला प्रत्येक विचार हा मानव प्राण्यासाठी, समाजासाठी आदर्श आणि अनुसरणीय आहे. विश्वाचा मूळ घटक 'गांव' असे माणून राष्ट्रसंतांनी व्यक्ती, कुटूंब, समाज, राष्ट्र, विश्वापर्यंत कल्याणकारी राज्याची परंपरा कशी निर्माण करता येईल. हयाचे सुंदर मार्गदर्शन ग्रामगीतेत केले आहे. आदर्श कुटूंब व्यवस्था ही सुदृढ समाज निर्मितीसाठी आवश्यक असते आणि आदर्श कुटूंबाचा आधार हा विवाह आहे. त्या दृष्टिकोनातून राष्ट्रसंतानी मांडलेले विवाह विषयक विचार फार मौलिक आहे.

## विषय विवेचन :—

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विवाह किंवा वैवाहिक जीवनाविषयी मांडलेला प्रत्येक विचार सुंदर समाज निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे. सृष्टीचक्र चालण्यासाठी स्त्री आणि पुरुष हे दोन घटक महत्वाचे असून हा जगाचा प्रवाह चालण्यासाठीच विवाहाचे प्रयोजन आहे असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विशद करतात.

चालावा जगाचा प्रवाह । व्हावा निसर्ग गुणांचा निर्वाह ।
यासाठीच योजिला विवाह । धर्मज्ञांनी तयांचा ।।

असे तुकडोजी महाराज विवाहाचे प्रयोजन सांगत असले तरी विवाहातील किंवा वैवाहिक जीवनातील अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा समस्या हयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रहार करुन सुधारणावादी विचार व्यक्त करतात.

पुरुषार्थासाठी वैवाहिक जीवन । विवाह समाज स्थैर्याचे साधन ।
परि वाढोनी अज्ञान, प्रलोभन । झाली धुळधाण समाजाची ।।

पुरुषार्थ आणि समाज स्थैर्यासाठी विवाह हा संस्कार महत्वाचा असला तरी हया विवाह संस्कारामध्ये अज्ञान आणि प्रलोभन वृत्ती आल्याने समाजामध्ये अनेक समस्या उद्भवत असल्याचे राष्ट्रसंत मत मांडतात. राष्ट्रसंताचा विवाह विषयक प्रत्येक विचार मोलाचा आणि फायद्याचा आहे.

जोडीदार निवडते वेळी दोघांच्याही मताचा विचार करुन विवाह ठरविला जावा असे राष्ट्रसंत मत मांडतात.

एरव्ही दोघांच्याही मते । लग्न जुळवूनि आणावे सु —मते ।
नांदोत दोघेहि एकसुते । संसार सुखी करावया ।।

राष्ट्रसंतांचे विचार हे आधुनिक व पुरोगामी होते. विवाह ठरवितांना दोन मनांचा विचार व्हावा जातीचा नाही असे ते मानत. एकात्मता निर्माणासाठी आंतरजातीय विवाहाचा राष्ट्रसंतांनी पुरस्कार केला आहे. ते म्हणतात —

दोघे प्राणी उपवर असती । भिन्न जाती लग्न करु म्हणती ।
विचार करिता त्यासी संमती । अवश्य द्यावी ।।

सामाजिक अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरांचा राष्ट्रसंतांनी सतत विरोधच केला आहे. बालविवाह पध्दती जी अत्यंत चुकीची समाजातील एक समस्या होऊन बसली होती. त्यावर राष्ट्रसंतांनी आपले विचार व्यक्त केले आहे.

ऐशा गोष्टीसं मात्र जपावे । बाळपणीही लग्न नसावे ।
समजुतदारीने करुनी द्यावे । लग्न प्रसंग ।।
ऐशा ज्या ज्या वाईट रीती । झुगारोनी द्याव्या हातोहाती
करावी पुन्हा नवीन निर्मिती । समाज नियमनांची ।।

समाजातील ज्वलंत असणारी एक समस्या म्हणजे हुंडा समस्या जी समस्या संपूर्ण समाज व्यवस्थेला भेडसावत आहे, ज्यामुळे अनेक कुटूंब, संसार उध्दस्त होत आहे. त्या हुंडा पध्दती समस्येवर राष्ट्रसंत कोरडे ओढतात.

काहींचे वडील लग्न करोनि देती । मनास वाटले तो हुंडा घेती जोड विजोड काही न पाहती । धनापायी ।।

समाजातील वास्तवता टिपून राष्ट्रसंतांनी ही हुंडा प्रथा, पंरपरा थांबली पाहिजे, त्यावर राष्ट्रसंत आपले मत मांडतात.

ज्याने मुला–मुलींचे पैसे घेतले । त्यासि समाजाने पाहिजे निषेधिले । तरीच ते दुराग्रह मोडले । जातील आता ।।

जे हूंडा म्हणून पैसे घेतात त्यांचा समाजाने निषेध करावा असा रोखठोक सल्ला राष्ट्रसंत देतात. काही जाती मध्ये अजुनही स्त्रियांना स्वातंत्र्य नाही त्यांच्यावर बंधने लादली जातात म्हणजे अजुनही काही समाजामध्ये पडदा पध्दती आहे हयावर राष्ट्रसंतांनी आपले स्पष्ट असे विचार मांडले आहे –

काही जातीत ठेविती पडदा । जणू कोंडवाडयाचाही धंदा ।
त्याने लग्न झालिया ही आपदा । येते केव्हा ।।

पडदा पध्दती समाज व्यवस्थेत जीवन जगणाऱ्या स्त्रियांची अवस्था मांडतांना राष्ट्रसंत त्या समस्येची गंभीरता दाखवतात.

पडदयाचिया प्रस्थामुळे । शहाणे ते हि होती खुळे ।
गर्दीत पति चुकता गोंधळे । पडे बापडी गुंडाहाती ।।

संपूर्ण पडदा पध्दती समस्येचा विचार करता हया प्रथा समाजातुन हद्पार झाल्या पाहिजेत असा विचार राष्ट्रसंत मांडतात.

ऐशा विचित्र काही प्रथा । मोडोनी टाकाव्या समाजी व्यथा ।
लावू नये दोष माथा । कोणा एकाच्याची ।।

समाजामध्ये विवाह जुळवण्या प्रसंगी ग्रह, पंचांग, हयाचा आधार घेऊन लग्न जुळविले जातात. परंतु हया साऱ्या निरर्थक गोष्टी असून दोघांचे स्वभावगुण हेच महत्वाचे असतात हे सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात –

आकाशातील पाहती ग्रह । इकडे स्वभावी वेगळे दुराग्रह ।
जीवनात वाढे ज्यांनी द्रोह । ऐसे त्यांना न दिसती ।।
वधूवरांचे उत्तम गुण । हेचि परस्परांचे महाभुषण ।
त्यावाचोनि विवाह केला वैभवपूर्ण । तरी तो सर्व अमंगळ ।।

अलिकडच्या काळामध्ये विवाहावर प्रचंड खर्च केला जातो, कर्ज काढुन वैगेरे लग्नावर खर्च करण्यात येतो, पैशाची उधळपट्टी करण्यात येते, पैशाचा दिखावा करण्यात येतो हया मानवी प्रवृत्तीवर हल्ला चढवतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात –

काही ठिकाणी विवाह करिती । वेडयासारखा पैसा उधळिती ।
उपयोग नाही ऐसा रिती । कासयास आचरावी ।।

अतिशय साध्या सोप्या पध्दतीने पैशाचा अपव्यय न करता लग्न व्हावेत अशी राष्ट्रसंतांची इच्छा होती.

लग्नाकरिता कर्ज करावे । जन्मभरी व्याज भरीत जावे ।
लग्नासाठी कफल्लक व्हावे । कोण्या देवे सांगितले ।।

आज मोठया प्रमाणात तिथी, ग्रह, पंचांग मुहूर्त हया गोष्टींना महत्व दिले जाते. तिथी पाहुनच लग्न ठरविले जातात हे खऱ्या अर्थाने चुकीचे आहे. असल्या वाईट प्रथांचे राष्ट्रसंतांनी खंडन केले आहे.
राष्ट्रसंत विचार व्यक्त करतात –

असोत अडीअडचणी किती । साधिलीच पाहिजे तिथी ।
ऐसी का ठेवावी प्रवृत्ती । रुढीबध्द ? ।।

पुढे मुहूर्तासंबंधी राष्ट्रसंतांनी व्यक्त केलेले विचार फार मोलाचे आहेत.

प्रसन्न हवा, पाणी, ऋतु । हाचि विवाहाचा मुहुर्तु ।।

खरा मुहुर्त हा पंचांगात नाही तर तो आपल्याला योग्य अशा वातावरणामध्ये पहावा असा विचार राष्ट्रसंत मांडतात.

दिवस पहावा सुंदर । हवा पाणी सोयीस्कर ।
सर्वांसी होईल सुखकर । म्हणोनिया ।।

आपण आज पाहतो लग्नामध्ये प्रचंड पैसा खर्च होतो, वेळेचा अपव्यय होतो, श्रमाचा अपव्यय होतो ही गोष्ट समाजाकरिता राष्ट्रकल्याणासाठी योग्य नाही, कारण पैसा, वेळ, श्रम हया तीनही गोष्टी मौल्यवान आहेत हयाचा आपण अपव्यय थांबवला पाहिजे म्हणून राष्ट्रसंत म्हणतात —

वेळ,पैसा आणि श्रम । वाचवावेत करोनि नेम ।
गुणास द्यावे महत्व परम । जाती—धन—भ्रम सोजेनी ।।

असे मत व्यक्त करतांना विवाहाचे ठिकाण साधे आणि बिनाखर्चिक असावे त्यासाठी मंडप वा भव्यदिव्य करायची गरजच नाही असे मत व्यक्त करतांना राष्ट्रसंत म्हणतात.

खर्च नको भव्य मंडपाचा । देखावा असावा निसर्गाचा ।
अथवा सभामंडप मंदिराचा । योजावा या कार्यासी ।।

लग्नप्रसंगी अहेर घेणे—देणे, नवीन कपडे परिधान करुन मिरवणे हा अनाठायी खर्च असुन विवाहातील कपडे कसे असावेत ? हयाकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपले विचार मांडतात —

कपडे असती ते घालावे । नसता धुवोनि स्वच्छ करावे ।
अहेरादी नको, लग्नप्रसंगी यावे । सर्वजने आदरे ।।

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडलेले विवाहासंबंधीचे अनेक विचार मौलिक व संस्कार करणारे आहेत.

## सारांश :—

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विवाहविषयक विचार हे खऱ्या अर्थाने सुंदर समाज निर्मितीसाठी समाजातील अनेक समस्यांचे निवारण करण्यासाठी उपयुक्त व प्रेरणा देणार आहे. खरा मानवसमाज राष्ट्रसंतांना अभिप्रेत असल्याने त्यांचे विचार आज अनुसरणीय आणि स्पृहणीय ठरणारे असेच आहेत. विवाह विषयक बाबींचा साकल्याने राष्ट्रसंतांनी विचार केला.

लग्नाचा प्रसंग । विचाराने करावा यथासांग ।
समजोनी परिस्थिती वेळप्रसंग । सर्व काही ।।

संपूर्ण परिस्थिती वेळ, प्रसंग हया बाबींचा विचार करुन आपण लग्नप्रसंग, विवाह सोहळे साजरे करण्याचे राष्ट्रसंत आपल्या विचारातून सुचवितात. सृष्टीचक्र चालण्यासाठी विवाहाची गरज असून समाजमंदिर उभारण्यासाठी विवाह संस्कार मोलाचा आहे असे राष्ट्रसंत सांगतात.

विवाहाचा जो संस्कार । त्याचे महत्व सर्वात थोर ।
त्या पायावरीच समाजमंदिर । म्हणोनी सुंदर करा यासी ।।

ग्रामगीतेतील २१ व्या अध्यायात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कुटूंब सौख्यासाठी, आदर्श समाज निर्माणासाठी आपले अनमोल विचार मांडले आहेत. त्यात विवाह विषयक सर्व पैलुंचा त्यांनी आढावा घेतला असून मानव समाजाला दिशा दिली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार प्रत्येक काळाला लागू पडेल असे आहे. राष्ट्रसंतांचे विवाह विषयक विचार आज २१ व्या शतकात वास्तवदर्शी असून मानव समाजाला स्फुर्तीदायक आहे. राष्ट्रसंतांनी दिलेल्या विचारांची ज्योत प्रत्येकाच्या मनात तेवत राहील. एवढी ताकद राष्ट्रसंतांच्या विचारात आहे.

## संदर्भ ग्रंथ :—

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — 'ग्रामगीता'
२) डॉ. भारती खापेकर, डॉ. रत्नाकर भेलकर, डॉ. रविंद्र शोभणे — 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य : समकालीन वास्तव,' नाथे पब्लिकेशन लिमिटेड, नागपूर
३) ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक — 'राष्ट्रसंतांची नवचेतना', नाथे पब्लिकेशन लिमिटेड, नागपूर

❖❖❖

# दलित कवितेतील सूर्य प्रतिमा

प्रा. डॉ. रवींद्र मुरमाडे
सहायक प्राध्यापक (मराठी विभाग)
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर, महाराष्ट्र (India)
Email: murmaderu06@gmail.com भ्रमणध्वनी ९०१११८४३७६

## सारांश :

विसाव्या शतकातील वाड;मयीन आणि सांस्कृतिक मूल्य जोपासण्याचे महत्तम कार्य दलित कवितेने केले ही वस्तुस्थिती आहे. समाज आणि संस्कृती यातूनच साहित्यनिर्मितीला प्रेरक शक्ती मिळत असते. उर्जा मिळत असते. दलित कवितेचा उदय स्वातंत्र्योत्तर काळात झालेला असला तरी दलित साहित्याची भक्कम पायाभरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी चळवळीतून, त्यांनी सुरु केलेल्या वृत्तपत्रांमधून झालेली पहावयास मिळते. दलित कविता ही खऱ्या अर्थाने धर्मांतरानंतरच्या दशकात अधिक गतिमान होताना दिसते. अर्थातच दलित कविता ही फुले आंबेडकरी विचारांतून साकार झालेली असल्याने कवितेत कवींनी सूर्य प्रतिमा प्रभावीपणे वापरली आहेत. सामाजिकता, समाजनिष्ठता हा दलित कवितेचा मुलभूत गुणधर्म आहे. च्या दशकात दलित कवितेने स्वत:ची ओळख समाजभिमुख कविता अशी निर्माण केली.

बीज संज्ञा: संघर्षाची मूलतत्वे, सामाजिक आत्मभान, प्रकाश पर्व, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मुक्तीसंग्राम

## प्रस्तावना :

कोणतीही कविता ही प्रतिमा आणि प्रतीकांची भाषा असते. कवितेत वापरलेल्या प्रतिमांमुळेच खरे तर कवितेचा अर्थ विस्तार होण्यास मदत होते. दलित कवितेत वापरलेल्या प्रतिमांना एक वेगळा आशय प्राप्त झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत नवसमाजरचना हा दलित कवितेचा प्रमुख धागा आहे. सामाजिकता, समाजनिष्ठता हे दलित कवितेचे मुलतत्व आहे. च्या दशकातील कवींनी ही तात्विक भूमिका पूर्णत: जोपासून समाजभिमुख कवी अशी स्वत:ची ओळख निर्माण केली.

## सामाजिक स्थितीचे वास्तव दर्शन :

दलित कवितेची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे.हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे जाणीव गर्भता हे दलित कवितेचे व्यवच्छेदक लक्षण असून सामाजिक भानातून ती प्रकटली आहे. सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन या कवितेने घडविले आहे. सामाजिक स्थितीचे वास्तवदर्शी चित्र घडविताना मूल्यात्मकतेच्या अंगाने ही कविता साकार झाली आहे. विचार आणि तत्वज्ञान या गोष्टींना ती विशेष प्राधान्यक्रम देते.

तथागत गौतमबुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,यांच्या प्रभावातून ही कविता आकारास आल्यामुळे दलित कवितेला संघर्षाची मूलतत्वे प्राप्त झाली आहेत. अनिष्ठ रूढी, प्रथा,परंपरा या विचारांना मूठमाती देऊन शोषित, वंचित, दलित पिडीतांना नवे आत्मभान प्राप्त करून दिले. तत्कालीन परिस्थितीवर भाष्य करतांना अर्जुन डांगळे लिहितात “बाबासाहेब येईपर्यंत ह्या समाजाची (दलित पीडीतांची) नाळ शिक्षणापासून, ज्ञानापासून तोडण्यात आली होती. पायाखाली जमीन आणि डोक्यावर छप्पर नव्हते. शहरात ते मोलमजुरी करून झोपडपट्ट्यांत किंवा अंधाऱ्या चाळीत राहत होते. तर खेड्यात ते सालकर किंवा येसकर म्हणून गावाबाहेर राहत होते. शिक्षणाचा अभाव, ज्ञानाचा अभाव, उत्पादन साधनाचा अभाव यापासून झालेले त्यांचे अभावपूर्ण जीवन लाचारीने वेढलेले होते. बाबासाहेब आले आणि त्यांनी हाक देऊन त्यांच्यातला माणूस जागा केला.”[१] आंबेडकर नावाचा सूर्योदय झाला आणि दलित जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरला, जाणीवेचा प्रकाश पसरला, शिक्षणाचा तेजोमय विचार पसरला. तो कृतीत आणल्या गेला. आणि सांस्कृतिक जीवनात साहित्याचे ‘सूर्यकूल’ निर्माण झाले. “साहित्याचे कुल म्हणजे साहित्य परंपरा! दलित साहित्य सूर्यकुलातले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा व त्यांनी केलेल्या मुक्तिसंग्रामाचा सूर्य उगवला नसता तर दलित साहित्याचा जन्मच झाला नसता.”[२] हे डॉ. भालचंद्र फडके यांचे विधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विवेकवादी विचार आणि त्यांनी केलेले सामाजिक उत्थानाचे लढे यासाठी ‘सूर्य’ ही आंबेडकर प्रतिमा रास्त ठरताना दिसते.

## सूर्य प्रतिमा :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख दलित कवितेत अनेकदा 'सूर्य' ही प्रतिमाउपयोजून केलेली आहे. दलित कवितेचे मानदंड ठरणारे विद्रोही कवी नामदेव ढसाळ लिहितात,

'सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला
आता अंधार यात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे
सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला
आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे'."[३]

कवी नामदेव ढसाळ यांनी 'सूर्य' प्रतिमा वापरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विद्वत प्रचुरता अधोरेखित केली आहे. अंधार यात्रिक होण्याचे म्हणजे सूर्याची सोबत करणे होय.येथे कवींनी स्वीकाराची प्रतिमा वापरून आपली निष्ठा दर्शवितात. कारण सुर्यरूपी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित, पिडीत, वंचित समाजाला जीवनात अर्थपूर्ण अस्तित्व प्राप्त करून दिला. ज्यामुळे मानवी जगण्याला बळ प्राप्त झाले. अंधार काळाच्या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांचा उदय होणे हे खरे 'सूर्योदय' झाल्यासारखे आहे. म्हणूनच च्या दशकातील पहिल्या पिढीतील दलित कवी वामनदादा कर्डक, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, ज. वि. पवार, यशवंत मनोहर, त्र्यंबक सपकाळे ,दया पवार, केशव मेश्राम, हिरा बनसोडे, अरुण काळे, इत्यादी कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी वापरलेली 'सूर्यप्रतिमा' अर्थपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे.

"सूर्यनेही स्वत:ला भीमराव म्हणवून घ्यावं
एवढं तुझं मोठेपण
ग्रहताऱ्यांनी उभारावीत समतेची सैनिक दलं
आणि पृथ्वीने रमाईचा पदर घेऊन ठेवावं तुझ्या उबेत मानवतेला."[४]

सूर्यालाही हेवा वाटावा असे हे व्यक्तिमत्व आहे. बाबासाहेबांच्या गौरवाबरोबरच त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी मातोश्री रमाईचे थोरपण प्रकट झाले आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे ग्रह,तारे एकत्र आले तरी आंबेडकरी व्यक्तिमत्वाची बरोबरी करू शकत नाही. हे उदगार केवळ स्तुती म्हणून नाही तर त्यामधून बाबासाहेबांचं कर्तृत्व सिद्ध झालं आहे.

"अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस राहायचे आम्ही
श्वास घुसमटत."[५]

येथे 'अंधार' ही मूक समाजासाठी वापरलेली प्रतिमा असून 'सूर्य' ही मूक समाजाला वाचा देणारी प्रतिमा आहे. असे प्रत्ययास येते. पारंपारिक अर्थाने अंधार हे अज्ञानाचे तर 'प्रकाश' हे ज्ञानाचे प्रतिक मानले आहे. जो समाज शतकानुशतके अंधारात खितपत पडला होता तो सर्व प्रकारच्या अधिकारांपासूनही वंचित होता. त्याला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नव्हते. मूकपणे अन्याय सहन करीत जीवन व्यतीत करणे हाच त्याच्या जगण्याचा अर्थ होता. आंबेडकर नावाचा 'सूर्य' उदयाला आला आणि मूक समाजाच्या जगण्याचे अर्थ बदलून गेले.

ढसाळांच्या कवितेतून अभिव्यक्त झालेली 'सूर्य' ही प्रतिमा आंबेडकरी विचार असा अर्थ सूचित करणारी आहे. खोपटाखोपटातून दिसणाऱ्या पूर्ण सूर्याचे स्वरूप 'अंधाराला' दिसणाऱ्या सूर्यासारखेच आहे. त्यामुळे 'सूर्य' आंबेडकर विचारदर्शनाची प्रतिमा आहे. असे म्हणावे लागेल. एकूणच सामाजिक आत्मभानाची प्रतिमा म्हणूनही विचार करणे अधिक उचित ठरेल.

"'सतत तू उगवतोस माझ्या अंतरिक्षात
आज तू केवळच महासूर्य, त्यांच्या उराउरात'"[६]

येथे डॉ. यशवंत मनोहरांनी स्व आणि स्वकीयांच्या जीवनातील बाबासाहेबांचे स्थान दर्शविणारी 'महासूर्य' ही प्रतिमा वापरलेली आहे. या सूर्याचे कवीच्या अंत:करणात उगमाचे स्थान आहे. तर सामाजिक जीवनाच्या 'उराउरात' म्हणजे अंतर्बाह्य असे स्थान या सूर्याला प्राप्त झाले आहे. या कवितेत कवीने आंबेडकरांना सूर्यापेक्षाही मोठे ठरविले आहे. सूर्यापेक्षाही महान अशी महानता आंबेडकरांची आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास आंबेडकरी व्यक्तिमत्वाची भव्यदिव्यता आणि दैदिप्यमानता सूचित करण्यासाठी सूर्यप्रतिमा उपयोजिली गेली आहे.

"प्रखर येजाने तळपणारा सूर्य केव्हाच अस्तास गेला आहे
ज्या काजव्याचा तुम्ही जयजयकार केलात

ते केव्हाच निस्तेज झाले आहेत
आता तुम्हीच प्रकाशाचे पुंजके व्हा अन क्रांतीचा जयजयकार करा."[७]

येथे 'प्रखर तेजाने तळपणारा सूर्य' ही आंबेडकर प्रतिमा आहे. सूर्याचे अस्तास जाणे ही घटना बाबासाहेबांचे निर्वाण दर्शविते. आंबेडकरांच्या निर्वाणानंतरच्या काळात बाबासाहेबांच्या उंचीचा नेता दलित समाजाला लाभू शकला नाही. त्यामुळे समाजजीवन सैरभैर झालेले दिसते. बाबासाहेबानंतर चळवळीला संघटनेला खिंडार पडले. त्याची परिणती गटागटात विभाजनाने झाले. स्वयंघोषित नेते उदयाला आले. अशा नेत्यांचा जयजयकार म्हणजे 'काजव्यांचा जयजयकार करण्यासारखे आहे. थोडक्यात काजव्यांचा प्रकाश सूर्याच्या कणाइतकाही प्रकाशमान नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे काजवे अंधार दूर करू शकत नाही. म्हणजेच तथाकथित पुढारी हे निस्तेज आहेत. म्हणून समूहाला केलेल्या, 'आता तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा अन क्रांतीचा जयजयकार करा.' या आवाहनातून आंबेडकर नावाच्या सूर्यापासून प्रेरणा घेऊन परिवर्तनाचा विचार स्वीकारावा असे सूचित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्तानंतर निर्माण झालेल्या आंबेडकरोत्तर काळाच्या पार्श्वभूमीवर 'सूर्य' आणि 'काजवा' या तफावतीच्या प्रतिमा आहेत.

पृथ्वीतलावर सूर्याची विविध रूपे कशी धारण करतात याविषयी बोलतांना म. सु. पाटील म्हणतात, "दरवर्षी नेमाने येणारा पावसाळा वा एकूणच पालटत जाणारे तुचक्र आपणास जसे नवेच वाटते तसा नवेपणा या प्रतिमा सृष्टीत सतत अवतरत राहते. एक सूर्यच घेतला तरी तो किती वेगवेगळया संबंधीत्वामुळे येतो आणि किती नवी नवी रूपे घेतो अशी कितीतरी नवी सूर्य दर्शने घेताना त्यात कोठे शिळेपणा येत नाही."[८] हे निरीक्षणही 'सूर्य' प्रतिमेच्या वैशिष्ट्यपूर्णतेला पुष्टी देणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तिमत्वासाठी 'सूर्य' या प्रतिमेचे विविध पातळ्यांवरील उपयोजन हे दलित कवितेचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे.

## समारोप :

एकूणच धर्मांतरानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून दलित कवितेचा प्रवाह अधिक जोमाने संचारताना दिसतो. पहिल्या पिढीतील प्रतिभा संपन्न कवींनी कवितेतून वापरलेल्या 'सूर्य' प्रतिमा पुढील पिढीसाठी वेगळी दिशा व नवे प्रकाशपर्व निर्माण करणारे ठरले आहे.

## निष्कर्ष :

१) दलित कवितेतील 'सूर्य' ही आंबेडकर प्रतिमाच आहे. दलित कवितेने एक अभिनव प्रतिमा घडविलेली आहे.
२) यातून आंबेडकर व्यक्तिमत्वाची भव्यदिव्यता, दैदीप्यमानता, तेजस्वी ज्ञानाची प्रखरता अशी 'आंबेडकर सूर्याची' प्रकाशमान गाथा चित्रित होते.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणनंतर दलित जीवनात निर्माण झालेली पोकळी, दु:ख, नैराश्य ह्यासाठी दलित कवितेने 'सूर्य' प्रतिमेचाच आधार घेतला आहे. 'अस्तास गेलेला सूर्य' अशा सूर्य प्रतिमा बाबासाहेबंसाठी सिद्ध झाल्या आहेत.
४) दलित कवितेचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे व्यक्तित्व प्रतिमित अभिव्यक्तीतून साकार झाले आहे.

## संदर्भ :


१) अर्जुन डांगळे : दलित साहित्य एक अभ्यास, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७८, पृ.३
२) भालचंद्र : दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्री विद्या प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९८९, पृ.२२५
३) नामदेव ढसाळ : गोलपिठा , नीलकंठ प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, १९७७, पृ.१२
४) अरुण काळे : रॉक गार्डन, प्रबोधन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९३, पृ.३३
५) नामदेव ढसाळ : गोलपिठा, उ. नि. पृ.
६) यशवंत मनोहर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर चिंतन काव्य, सुनिल प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९८२, पृ.३८
७) दया पवार : कोंडवाडा, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, प्रथमावृत्ती, १९७४, पृ ५, ६
८) म.सु. पाटील : दलित कविता, लोकवाड;मय संग्रह, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८१, पृ. ४०, ४१


❖❖❖

# श्री. गुलाबराव महाराजांची तुंबडी गीते :– एक चिकित्सा

डॉ. संजय नीळकंठ पाटील
सहयोगी प्राध्यापक,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम, महाराष्ट्र (India)
Email: snpatilwashim@gmail.com भ्रमणध्वनी ७८८७९६३११८

## सारांश

संत गुलाबराव महाराज म्हणजे विसाव्या शतकातील एक आश्चर्यच. अवघ्या चवतीस वर्षांच्या अल्प आयुष्यामध्ये त्यांनी बालांध असतांना वैविध्यपुर्ण अशा स्वरुपाची साहित्यनिर्मिती केली. त्यामध्ये सूत्र, भाष्य, शास्त्र, आकर, भक्ती, योग, सांख्य, संगीत, आर्यर्वेद, प्रकरण, गाथा, निबंध, संवाद, चरित्र, पत्रव्यवहार, लोकगीते, स्त्रोत्र, नाटक, भाषा, क्रिडाविषयक रचनांचा समावेश आहे. प्रस्तुत निबंधामध्ये त्यांच्या लोकसाहित्याच्या स्वरुपातील तुंबडीगीतांची वैशिष्टये जाणून घ्यायची आहेत.

**बीजशब्द** :– तुंबडीगीते, लोकसाहित्य, देव, भक्त, जाती अभिमान, पुराणातील, वैराग्याचे बळ, भंग, पूजा, लिंग इ.

## प्रस्तावना :–

श्री गुलाबराव महाराजांनी वर म्हटल्याप्रमाणे वैविध्यपूर्ण साहित्यरचना केली. यामध्ये स्त्रीगीते आणि तुंबडीगीते ही लोकसाहित्याच्या स्वरुपाची रचना त्यांनी केलेली आहे. ही गीते मोठी वैशिष्ट्यपूर्ण अशी दिसून येतात.

## श्री. गुलाबराव महाराजांचे लौकिक चरित्र

विदर्भामध्ये अमरावतीपासून दक्षिणेला 13 मैलांवर लोणी– टाकळी नावाचे सुमारे एक हजार वस्तीचे लहानसे खेडे, हेच श्री. गुलाबराव महाराजांचे पवित्र जन्मस्थान. येथे माधानच्या मोहोड कुळातील सौ. अलोकाबाई आणि श्री. गोंदुजी मोहोड यांचे कुटुंबात शके 1803 आषाढ शुध्द दशमीला महाराजांचा जन्म झाला. गोंदुजी मोहोड हे माधानचे पाटील. मोहोडांचे घराणे मूळचे मोढ वंशीय क्षत्रिय होते. (डॉ. अ. स. जोशी यांनी आपल्या मधुराव्दैताचार्य श्री. गुलाबराव महाराज अवतार व कार्य ह्या महाराजांच्या चरित्र ग्रंथामध्ये महाराजांच्या मौढवंशीय क्षत्रिय कुलाची वंश परंपरा दिलेली आहे.) पण अनेक पिढ्यात संस्कारलोप झाल्यामुळे महाराज स्वतःला कुणबीच म्हणत. महाराज पाच महिन्यांचे झाल्यावर सौ. अलोकबाई त्यांना घेऊन माधानला सासरी परत आल्या. त्यावेळी पाणीदार डोळे, सरळ नसिका, सावळा वर्ण, पूष्ट व गोंडस हातपाय अशी लोभसवाणी बाळसेदार बालमुर्ती होती. वयाच्या आठव्या नवव्या महिन्यात डोळे आल्याचे निमित्त झाले. कोणीतरी चुकून भलतेच औषध डोळ्यामध्ये घातले आणि कायमचे अंधत्व आले. बाह्यदृष्टी नाहीशी झाली असली तरी त्या बालमहात्म्याची चिन्मय दृष्टी सतेज व निर्मळ असल्याने त्यांची चित्तवृत्ती नेहमीच आनंदी असे. बोलणे येऊ लागल्यापासून मान हलविणे आणि हाताने टाळ्या वाजविणे यात ही बालमूर्ती रंगू लागली. पुढे पुढे हा अल्लडपणा वाढतच चालला. धावणे, चुटक्या वाजवीत चक्राकार फिरणे व मोठ्याने ओरडणे अशा खेळात त्यांना मौज वाटू लागली.

## प्रपंचातील प्रतिकूल परिस्थिती

महाराजांना पदोपदी प्रतिकूलतेला तोंड द्यावे लागले. वयाच्या चवथ्या वर्षीच मातृछत्र हरविले. त्याच्या आजोळच्या आजीने, सौ. सावित्री–नानीने मातृप्रेमाला वंचित झालेल्या या नातवाला आजोळी नेले खरे पण तेथील मामा व मामींचा तिरस्कारच त्यांच्या वाट्याला आला. वडिलांनी दुसरे लग्न केल्याने स्वगृही सावत्र मातेचा त्रास तर आजोळी मामा–मामींचा मनस्ताप अशी दोन्हीकडुन त्यांची अवहेलनाच झाली. पाटीलकी घरात असूनही आर्थिक स्थिती हळूहळू खालावत होती. त्यामुळे या ना त्या प्रसंगाने वडिलांची मारहाण त्यांना सहन करावी लागली. सावत्र आई तर या मुलास कसेही करुन दृष्टीआड

करावयास पाहत होती. एकदा तर रुपचंदजी ह्या गुजराथी ज्योतिषाकडून हा मुलगा मूळ नक्षत्रावर जन्मला आहे म्हणून याला मानभावांना देऊन टाका असे म्हणविण्याचा तिने व्यूह रचला होता. पण त्या भल्या माणसाने असे खोटेनाटे सांगण्याचे नाकारले, ही गोष्ट वेगळी.

विस्कळीत झालेली गृहस्थिती सुधारण्याची श्री. महाराजांची फार इच्छा होती पण सावत्र मातेचा मत्सर, वडिलांचा रोष व स्वतःचे लहान वय यामुळे ते शक्य झाले नाही. एकदा तर त्यांनी वडिलांनी घरी आणून ठेवलेला 40 तोळे सोमल (विष) भक्षण केला. मृतवत व निश्चेष्ट पडले. सर्वांना त्यांच्या सामर्थ्याची प्रचीती येताच ते पुर्ववत सावध झाले.

अशा प्रकारची घरगुती किटकिट, कटुतेचे प्रसंग वाढू लागल्यामुळे अखेर इ.स. 1900 च्या सुमारास श्री महाराजांनी आपले घर सोडले व त्यांच्यावर अपार श्रध्दा असलेल्या रामचंद्र बापूंकडे (मोहोड) राहू लागले. जवळपासचे नातेवाईक ज्वारी व अन्नधान्य देत. पत्नी सौ. मनकर्णिकाबाई इकडून तिकडून तेलमीठ आणून कसाबसा स्वयंपाक करीत व दोघे कशीबशी आपली भूक भागवत. डोक्याला तेल नाही. नेसायला धड लुगडे नाही की नहाणे. माखणे नाही. पण अशा करुण विपन्नावस्थतेही या पतिव्रतेच्या पतिसेवेत कधी अंतर पडले नाही. की कधी त्यांनी त्याविरुध्द अवाक्षरही काढले नाही. महाराजांचे मोठेपण व्यक्त करताना बाबा मोहोड म्हणतात, ही सर्व साधना करताना श्री महाराजांचा आणखी एक विशेष प्रकट झाला. वास्तविक अपंग, निराधार अशी त्यांची अवस्था, पण या अवस्थेचा कधीही त्यांनी, इतरांनी दया करावी म्हणून उपयोग केला नाही, उलट अशी वाटचाल केली2. तर लोकनायक मा. श्री अणे यांनी म्हटलेले आहे की, त्याच्या अंधत्वामुळे प्रख्यात आग्ल कवी मिल्टन याने आपल्या अंधत्वासंबंधी काढलेल्या उद्‌गारांचे स्मरण होते. मिल्टनच्या म्हणण्याचा आशय असा आहे की, माझे चर्मवक्षू नष्ट झाले व बाह्य दृष्टी निमाली हे जरी खरे आहे. तरी त्याबरोबर माझे प्रज्ञावक्षू अधिक सतेज झाले आहे असे मला वाटते. पॅराडाइज लॉस्ट हे वीर काव्य लिहिणाऱ्या या प्रतिभासंपन्न कवीचे हे उद्‌गार यथार्थ नाहीत असे कोण म्हणेल? श्री गुलाबराव महाराज यांची प्रगल्भ बुध्दिमत्ता व विविध प्रकारच्या गंभीर विषयांवर त्यांनी निर्माण केलेली गद्य पद्यात्मक विस्तृत ग्रंथ संपत्ती पाहिली. म्हणजे शैशवावस्थेतच उत्पन्न झालेल्या प्रज्ञाचक्षुंच्या सतत व अलौकिक दीप्तीमुळे चर्मचक्षू कायमचे दिपून त्यांची बाह्यदृष्टी नष्ट झाली व त्यांची वृत्तीही अंतर्मुख होऊन सत्यसिध्दांत शोधण्यास समर्थ बनली, असे म्हणावयास हरकत नाही.[3]

## तुंबडीगीते

अमरावतीला येण्यापूर्वी महाराजांचा जन्मापासूनचा काळ ग्रामीण भागामध्ये गेला. त्यामुळे त्याना व—हाडच्या जीवनाचा चांगलाच अनुभव आला. वऱ्हाडी लोकाच्या समजुती, लोकजीवन, धार्मिक रीतीरिवाज, तीर्थयात्रा व व्रतवैकल्याची नीट ओळख महाराजांना होती. त्यावेळी त्यांचे वास्तव्य प्रामुख्याने माधान, लोणीटाकळी व देऊरवाडा भागात असे. हा सर्वच परिसर पुराणप्रसिध्द आहे. देऊरवाड्यास पयोष्णी आहे. जवळच विंध्य पर्वताची ओळ व भैरवाचा पहाड असून सोमतीर्थ सिध्दोर व नृसिंहाची प्रसिध्द स्थाने आहेत. त्याठिकाणी रात्री महाराज जात व पूर्णा नदीवर योगक्रिया करीत. कधी सुस्वर कंठाने भजन करीत. तर कधी स्तुतीस्तोत्र म्हणत. केव्हा केव्हा त्यांच्याबरोबर इतर सवंगडी असत अशावेळी त्यांच्या बरोबर फुगड्या किंवा पिंगा खेळीत व खेळाबरोबर पिंग्याची गाणी म्हणत तर कधी लक्ष्मण भटजींना नवीन लावण्या ऐकवत. याच सुमारास वऱ्हाडी भाषेत महाराजांनी कवित्व केले होते. काही दिवसांनतर ते अमरावतीला आले. एके दिवशी दोन तासात कुणबी भाषेत रुक्मिणी स्वयंवर गाईले. त्याची चाल दडंगी लावणीची आहे. ही लावणी वैशिष्ट्यपूर्ण असून ती वऱ्हाडामध्येच आढळते.

लावणीप्रमाणे तुंबडीही महाराजांनी रचली. त्यांच्या समग्र ग्रंथावलीत तुंबडीपर दोन रचना आढळतात. सुमदगंध छंदातील सहा प्रकारणात्मक तुंबडी व चार प्रकरणात्मक तुंबडी अशा दोन रचना महाराजांनी लिहिल्या. मात्र दोहोंचा आशय एकच आहे. त्यांची तुंबडी उपदेशप्रधान असून पारमार्थिक धर्तीची आहे. त्यामध्ये ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरुचे महात्म्य, ब्रह्मविवर्त व जगदाभास, वेदपुराणांचे स्थान, अपवाद व अध्यारोप, वेदांताचे प्रामाण्य, महावाक्याचे रहस्य व श्रीकृष्णाचे अनन्य साधारणत्व महाराजांनी सोप्या भाषेत उकलून दाखविले आहे.

तुंबडी हे एक वऱ्हाडी लोकगीत आहे. त्याचे गायन चोंडक वाद्यासह होत असते. तुंबडीत कथन व वर्णनाला महत्वपूर्ण स्थान असते. पोवाड्यात जसे चौक असतात. तसे तुंबडीत धृपद असते. तुंबडी म्हणणारा अनेकांपैकी एक असतो व इतर त्याला साथ देत असतात. त्यामुळे तुंबडी लावणी पोवाड्याप्रमाणेच समुह गीत ठरते. या विशेष लोकगीताला तुंबडी का म्हणतात हा एक संशोधन

क्षेत्रातील न सुटलेला प्रश्न आहे बहुधा वाद्यावरुन तुंबडी नाव आले असावे. ते कसेही असो. मुळात तुंबडी हे लोकगीत आहे व इतर लोकरचनेप्रमाणेच तुंबडीचा पूर्वतिहास परंपरेत लपलेला आहे. तुंबडीचा उपयोग आजवर अनेकांनी करुन घेतला. विशेषतः पारंपारिक आख्यायिका पौराणिक कथा व क्वचित प्रसंगी एतेहासिक घटना तुंबडीव्दारा सांगितलेल्या आहेत.

पूर्वी नमुद केल्या प्रमाणे तुंबडी हा अस्सल वऱ्हाडी लोकगीतांचा प्रकार असून दंडारिप्रमाणेच तुंबडीदेखील विदर्भाचे खास वैशिष्टयपूर्ण लोकसाहित्य आहे. वऱ्हाडात ही गीते मौखिक परंपरेने जोपासली जातात. यात्रा वा अन्य प्रसगोत्सव निमित्ताने तुंबडीचे गायन लोकसमुहासमोर होते. महाराजांनी मात्र तुंबडीचे सामर्थ्य ओळखून त्याचा पौराणिक कथा व वेदातविचार सांगण्यासाठी उपयोग केला

तुंबडी नावाच्या गावठी वाद्यावर खेडवळ लोक निरनिराळ्या प्रसंगी पोवाडे, गाणी, वगैरे लोकगीते गाऊन मनोरंजन करीत असतात. या वाद्याचे सूरच असे असतात की, भावना एकदम उत्तेजित होऊन स्वतःचा विसर पडतो.

एकदा शुक्लोर वाठोडा (विदर्भ) येथेे पयोष्णीतरी काही मंडळी भांड्यात खडे भरुन तुंबडीवाल्याची नक्कल करु लागली तेव्हा महाराजांनी तुंबडीवाल्याच्या भाषेत वेदांताची तत्वे गोवून ही रचना केली.[4]

श्री गुलाबराव महाराजांच्या पदांच्या गाथेमध्ये अशा प्रकारच्या चार रचना आलेल्या आहेत. पहिलया गीतामध्ये महाराजांनी सृष्टीनिर्मितीचा सिध्दांत सांगून नकळत ते सगुणोपासनेकडे वळलेले आहेत. ह्या सगुणोपासनेला भक्ती व भजनाची गरज आहे. कारण संसारामध्ये वासनादेह पाशबध्द असतो. मोह , स्वार्थ व आसक्तीने व्याप्त असतो त्यातुन सुटण्यासाठी ज्ञानाची व भक्तीची गरज आहे. संत श्रेष्ठांच्या सहवासात अविद्येचा नाश होतो. यासाठी ते भजन मन व बृध्दीच्या माध्यमातुन करण्याचे सूचवितात. ज्ञान प्राप्त करुन अविद्येचा नाश करा व हे सर्व ज्यांच्या मुळे होणार आहे त्या ज्ञानोर महाराजांच्या पायाजवळ नम्र होऊन रहा असा भाव अभिव्यक्त करतात. बायको, मुले , संपत्ती, माया इ. चा पाश तोडून सत्संग जोडण्याचे आवाहन महाराजांनी केलेले आहे. पायामध्ये क्षमा आणि शांतीचा तोडा बांधून हळूहळू इद्रियांच्या सर्व खोडी–दोष नाहीसे करा. ध्यानबलाने मनाच्या वासना तोडून टाका असा उपदेश महाराजांनी ह्या पहिल्या गीतामधून केलेला आहे.

दुसऱ्या गीतामध्ये ज्ञानोर माऊलीला नमस्कार करुन महाराजांनी महाभारतातील एक गोष्ट सांगितलेली आहे. या गोष्टीचे सूत्र म्हणजे देव भक्ताच्या मदतीसाठी धावून जातो व भक्तासाठी श्रम घेत असतो. पांडवांनी एक यज्ञ केला होता. अनेक राजे आणि ब्राम्हण तसेच तेथे व्दारकेचा राजा कृष्ण हे सर्व आले होते. श्रीकृष्ण येऊन उष्टया पत्रावळी काढत होते. तेव्हा हे श्रेष्ठजनहो तुम्ही लक्षात घ्या की अंतःकरणांमध्ये भक्ती असली की, या विाचा अधिपती देव, प्रत्यक्ष आपल्या घरी येऊ शकतो. त्या जेवनावळीच्या गर्दीमध्ये द्रौपदी दही, दूध, तूप वाढीत होती. त्यावेळी तिच्या चोळीची गाठ सुटली. लज्जेनी ती तोंड खाली करुन उभी राहिली. द्रौपदीची स्थिती लक्षात येताच सज्जनांनी माना खाली घातल्या. परंतु तेथे जे दृष्टलोक होते त्यांना मात्र अत्यानंद झाला भगवताने तिच्या लज्जेचे रक्षण केले. असा हा ज्ञानोरांचा देव श्रीकृष्ण माझा पती आहे. सहकारी आहे. तेव्हा हे भक्तजनहो संसारामध्ये असणाऱ्यांना भीती कशाची आहे?

तिस–या गीतामध्ये जाती अभिमान, मान–अपमान काहीही ठेऊ नये व त्यादृष्टीने पुराणातील कथा सांगितलेली आहे. महाराज म्हणतात की, वेद, पुराणे, भाषाकथा व दान वगैरे उपाय असले तरीही पण या सर्वांनाच हरीकथा हेच प्रमाण आहे. या कथामध्ये सर्व जात–जमातीचा मान आहे. आदर आहे. सज्जन लोकांच्या समोर आपण आदरयुक्त असावे. सज्जनांच्या समोर आपल्या जातींचा अभिमान वगैरे कहीही ठेऊ नये. तसेच मनात असणारी मानापमानाची भावना सोडून द्यावयास हवी. विद्येबद्दलचा जो अभिमान त्याचाही त्याग करावा. तपाचरणाने शरीराचे ठिकाणी नम्रत्व आणावे व यासाठी गुरुवचनांवर विाास ठेऊन साधना करावी. श्रीराम, श्रीकृष्ण किंवा इमाम यापैकी कोणाचेही नाव घ्या व स्वतःचे ठिकाणी वैराग्याचे बळ निर्माण करा. या सर्व कथा मोक्षाच्या दृष्टीने आहेत. तेव्हा आपण तुंबडीच्या तालावर कीर्तन करुन ज्ञानोरांना वंदन करु.

चवथ्या गीतामध्ये एका कथेच्या माध्यमातून देव भक्तांचा मान वाढवत असतो व देवाला श्रेष्ठ जात वा कनिष्ठ जात अशा प्रकारचा भेदभाव नसतो, तशी आवश्यकताही नसते. याविषयींची स्कंधपुराणात आलेली एक कथा त्यांनी घेतली आहे कोणी एक बाम्हण होता. त्याचा मान अत्यंत मोठा होता तो दररोज सकाळी रुदाची पूजा करी. बेलफुल, नैवेद्य वगैरे पूजाविधी व्यवस्थित करी. तिथेच एक

व्याध (पारधी) पूजेला येत असे. त्याला उच्च जातीचा आधार नव्हता त्याला शास्त्र माहित नव्हते. तो महादेवाची पूजा करताना पिंडीवर थुंकायचा व मग बेलाचे पान वाहायचा आणि असे करुनही देव मात्र पारध्याची पूजा स्वीकारीत असे. त्याने वाहिलेले बेलाचे पान डोक्यावर धारण करीत असे. याप्रकारे स्वतःच्या पुजेची अवहेलना होत असलेली बघून ब्राम्हणाला राग आला व तो म्हणाला, हे वाईट कृत्य करणारा कोण आहे ते आपण इथे राहून बघू व त्या व्यक्तीला यमधामाला पाठवू ब्राम्हण रात्रभर जागत राहिला . पहाटे त्याला एक पारधी तेथे आलेला दिसला. देवावर थुंकून तो बेलाचे पान वाहता झाला ते बघुन ब्राम्हण माहादेवावर खूपच रागावला व म्हणाला की, पारध्याने केलेला प्रकार तुला आवडतो, हे कसे? त्यावर देव म्हणाला की, याची प्रचिती मी तुला दाखवितो; तू दररोजप्रमाणे सकाळी पूजेचे सामान घेऊन ये.

नेहमीप्रमाणे दुसरे दिवशी ब्राम्हण व व्याध पुजेच्या सामानासहित आले. बघतात तो काय शिवलिंग भंग पावलेले होते. व्याध खिन्न झाला. ब्राम्हणाने मंत्र म्हणून शांती केली. लोकांना जेवण दिले व तुपाची धार धरली. भंग झालेले लिंग बघून व्याध मात्र छाती पिटू लागला व प्राणार्पण करण्यास तयार झाला. स्वतःचा कंठ तोडू लागला तेव्हा देवाने ब्राम्हणास बोलाविले व व्याधाचा भाव लक्षात आणून दिला व म्हणाला – मला स्वतःला नाव, रुप, स्थळ, काहीच नसते. मी भक्तासाठी नाव धारण करतो, साकार होतो. जेथे माझा भक्त असतो तेथे मी नित्य त्याच्या सहवासात असतो.

## निष्कर्ष :–

1) ह्या गीतांमधुन परमोरांचे खरे स्वरुप, महाराजांनी स्पष्ट केलेले आहे. 2) त्याचे भजन करण्याच्या पध्दतीचे स्वरुप सांगितलेले आहे. 3) भक्तीच्या क्षेत्रामध्ये जाती, धर्म श्रेष्ठ–कनिष्ठतवाची भावना महत्वाची नसते तर 4) केवळ भक्ताच्या मनातील भाव महत्वाचा असतो. इ. गोष्टी प्रतिपादन केलेल्या आहेत.

## संदर्भ :–


1. डॉ. अ.स. जोशी, मधुराव्दैताचार्य श्री गुलाबराव महाराज अवतार व कार्य
2. बाबा मोहोड, गुलाबराव महाराज व्यक्ती आणि कार्य, वंदन प्रकाशन, अमरावती
3. डॉ. शरद कोपर्डेकर, श्री गुलाबराव महाराज जीवन आणि तत्त्वज्ञान, इंद्रायणी साहित्य प्रकाशन
4. डॉ. कृ. मा. घटाटे, श्री गुलाबराव महाराजांची विचारसंपदा, मधुर प्रकाशन, नागपुर


❖❖❖

# माध्यमांच्या जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम

डॉ. दिलीप काकडे
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया, महाराष्ट्र (India) ४४१७०१
भ्रमणध्वनी ९४२३३८३८८७

माध्यमांच्या सामाजिक परिणामांची चिकित्सा केली तर त्याचे बाजारीकरण सामाजिक हिताला घातक आहे असेच चित्र दिसते. दहशत ही आज जागतिक समस्या झाली आहे. परंतु दहशतीचे चित्रण करून अव्याहतपणे विकत राहणाऱ्या माध्यमांचा तो व्यवसाय आहे. दहशत नावाची वस्तू ऐकण्याची, वाचण्याची वाचक प्रेक्षकांना चटक लावत असतात. त्या दहशतीचे 'ब्रँड' त्यातून लोप्रिय करण्यास ते मदत करतात.

"सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा प्रश्नांवरील कार्यक्रम फारसे लोकप्रिय नसतात आणि या कार्यक्रमाचे समाजावर जे हितकारक परिणाम होतात ते हिशेबात घेण्याची या वाहिन्यांच्या मालकांची इच्छा नसते. उलट हिंसा आणि लैंगिक दृष्ये यांना मागणी असेल तर अशा कार्यक्रमांचे परिणाम समाजाला घातक असूनही स्पर्धाप्रधान व्यवस्थेत ते दाखविले जातात"[१] माध्यमांची ताकद ही लोकांची विचारक्षमताच नाहिशी करण्याच्या पध्दतीने वापरली जाते. लोकांच्या जीवनाचे अग्रक्रम आज लोक ठरवत नसून ते ठरवण्याचे काम लोकांच्या वतीने माध्यमांनी हाती घेतले आहे. अगदी प्रत्यक्षात घडणारे जे काय लाईव्ह म्हणून दाखविले जाते ते देखील काय दाखवायचे याची निवड करूनच दाखवले गेले असते. उदा. एखाद्या बोरच्या खड्ड्यात पडलेले मुल किंवा एस.पी. सारख्या हुद्द्यावर असणाऱ्या व्यक्तीने राधेचा घतलेला वेश तासन्तास दाखविले जाते. त्यामुळे समाजातील महत्त्वाचे प्रश्न व त्याबद्दलचे सामाजिक भान यापासून जनतेला दूर नेले जाते.

एकूणच लोकांच्या मनात एखाद्या गोष्टीबद्दल भय निर्माण करणे, लोकांना भयग्रस्त करून सोडणे मग त्यावरच्या उपाययोजना असणाऱ्या सामुग्रीची वस्तुंची त्यातूनच गरज निर्माण करणे त्या भयापासून, असुरक्षिततेपासून मुक्ती कशी शक्य आहे. हे लोकमाणसांवर बिंवणे त्या वस्तू विकत घेण्यासाठी प्रोत्साहीत करणे व अशा वस्तुंचे प्रचंड उत्पादन होत राहील हे बघणे माध्यमांचे बरेच उदाहरणाने लक्षात येते. पुरणकथा, भयकथा, भूत, प्रेत, नरक कल्पना यातूनही ही भिती कृत्रिमरित्याच निर्मिली गेलेली असते. 'हर्बट शिल्लर' या माध्यम अभ्यासकाने म्हटल्याप्रमाणे माध्यम सम्राट हे जागतिक भांडवली व्यवस्थेची खरी उर्जा असून ही नफेखेर बाजाराच्या हित व हेतूंची इमारत माहिती व संवाद माध्यमांच्या तंत्रावर उभी आहे. साऱ्याच यंत्रणा या माध्यम सम्राटांच्या दहशतीमुळे त्यांच्याच बाजूने कार्यरत असतात. माध्यम सम्राटांच्या बाजूने असणाऱ्या ह्या माध्यम दहशतवादाचे वैचारिक उद्दिष्ट हे शेवटी निर्धन, दरिद्री, श्रमिक–कष्टकरी यांच्या विरोधातले भांडवलदारांच्या तेवढ्या बाजूने जग निर्माण करणे टिकवून धरणे हे असते. जागतिकीकरणाच्या रूपाने प्रस्थापित होत असलेल्या नव भांडवलशाहीला खतपाणी घालण्याचे कार्य माध्यमक्रांती चोखपणे पार पाडत असल्याचे स्पष्ट होते.

## इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे बोकाळलेला चंगळवाद

या गतिमान युगामध्ये लोप पावत चाललेल्या सांस्कृतिक मूल्यांच्या ऱ्हासाची चर्चा केल्यास त्यातून निष्कर्ष निघतो. अत्यंत झपाट्याने बदलत चाललेल्या या काळात समाजमनावर चांगल्याबरोबर विघातक परिणाम करणारे माध्यमे फार मोठी जबाबदार आहेत. समाजाची पूर्वीची सुरक्षित चौकट बदलून चंगळवादाकडे झुकणारी मानवी प्रवृत्ती या प्रवाहाबरोबर वाहवत असल्याचे दिसते. बाजारपेठेच्या विस्तारामुळे एक नवा श्रीमंत वर्ग उदयाला आला. गरीब श्रीमंत वर्गामधली दरी वाढतच चालली. चैनीच्या वस्तुचे उत्पादन वाढले, या वस्तुंकडे ग्राहक आकर्षित व्हावा यासाठी नव्या नव्या युक्त्या वापरल्या जाऊ लागल्या आणि त्यातून चंगळवाद निर्माण झाला. वस्तुची आपल्याला गरज आहे की नाही याचा विचार न करता आकर्षक आहे म्हणून अनेकांना हवीशी वाटते. अभिनेते–अभिनेत्री आणि खेळाडू यांनी एका विशिष्ट मालाची शिफारस केली की त्या वस्तच्या गुणवैशिष्ट्यांचा आणि आपल्या गरजांचा मेळ घालण्याच्या भानगडीत न पडता लोक वेड्यासारखे वस्तू खरेदी करू लागले. खोट्या, कृतक स्पर्धा आयोजित करून त्यातील महाअंतिम फेरीचे प्रमाणाबाहेर फुगवून प्रक्षेपण करणे, विजेत्यांना लाखो रूपयांची बेहिशेबी बक्षीसे देणे त्यामुळे कला, बुध्दिमत्ता याविषयी चुकीचे निकष, जुगारी मनोवृत्ती आणि स्वप्नाळू जगात रमल्यामुळे खऱ्या सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांकडे दुर्लक्ष होताना दिसते.

यासंदर्भात डॉ. प्रभा गणोरकर यांचे म्हणने लक्षात घेण्यासारखे आहे."जागतिकीकरणा बरोबर आलेले नवे तंत्रज्ञान ते हाताशी धारणाऱ्या कंपन्यांनी निर्माण केलेली नवी आर्थिक विषमता आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या चंगळवादानेही विचारवंतांना अस्वस्थ केले. हजारो रूपयाचा मोबाईल फोन, होम थिएटर्स आणि कारचे नवनवीन मॉडेल्स खरेदी करण्याची व त्यात संतुष्टता मानण्याची व त्याच्या प्रदर्शनाची नवी स्पर्धा उच्चभ्रु वर्गामध्ये सुरू झाली. दुरदर्शन सिनेमासारख्या माध्यमातून श्रीमंतीचे जग गरीबांना दिसते. त्यांच्यात व आपल्यात असणारी दरी जाणवून हा वंचितांचा वर्ग कडवट नैराश्याने उद्विग्न होऊन जगत राहतो. एकीकडे फास्टफुड, कोकाकोला, चैनीच्या, उपभोगाच्या ब्रँडेड वस्तू आणि दुसरीकडे प्यायला पाणी नाही, खायला अन्न नाही, वीज नाही अशी हलाखी हे अभूतपूर्व दृश्य अंगावर काटा आणणारे आहे."[२]

अर्थात हे जग भ्रम आणि स्वप्ने निर्माण करणारे आहे. त्याच बरोबर ते आवाक्यात नसणाऱ्यांच्या मनात त्याविषयी निराशा व दुसरीकडे आसक्ती व हाव निर्माण करणारे आहे. प्रत्यक्षात भोवती असणारी बेकारी, गरिबी, अनारोग्य, दैनंदिन जगण्यातल्या साध्या गोष्टींचा अभाव यापासून दूर क्षणभर स्वप्नांच्या जगात फिरवून आणले जाते. यासंदर्भात प्रकाश पावडे म्हणतात "गेल्या दोन दशकात झालेल्या माध्यमक्रांतीचे स्वरूप फसवे आहे. जेजे विकाऊ आहे त्याच्या मार्केटिंग व्यवस्थेत मीडीयाची भूमिका महत्त्वाची बनली आहे. उपभोगवादी, चंगळवादी संस्कृती वुध्दींगत करण्याचे कार्य माध्यमे करीत आहेत. मानवी मनाचे होणारे व्यापारीकरण त्यामुळे एकमेकांच्या पुढे जाण्याची आंधळी शर्यत पुढे जाण्यासाठी काहीही करायला प्रत्येक जण तयार आहे. 'पॅरानाईड' जमात आज उदयास आलेली आहे त्यासाठी माध्यमेच जबाबदार आहेत."[३]

एकूणच आत्महत्येचे देखील लाईव्हचित्रिकरण करून टी.आर.पी. वाढवून घेण्याइतपत माध्यमांची मजल गेली आहे. बालपिढीच्या संदर्भात हे चित्र फारच घातक आहे. मुलांकरिता दाखविले जाणारे कार्यक्रम त्यात हिंसेवर असणारा भर येणाऱ्या पिढीला कोणते वळण लावेल हा चिंतेचा प्रश्न आहे. दै. लोकमत पुणे आवृत्तीचे माजी संपादक चंदन मित्र यांनी माध्यमांवर केलेले भाष्य अत्यंत विदारक आहे.

"व्हेलेंटाईन डे १५—२० वर्षापूर्वी या दिवासाचे नावही अस्तित्वात नव्हते. तशीही आपल्या देशात सण—समारंभ, उत्सवाची कमी नाही. परकीयांकडून एखादा उत्सव घेण्याची आपल्याला गरज नाही. मात्र विशेषत: इंग्रजी माध्यमांनी व्हेलेंटाईन डे चा पुरस्कार करण्यास सुरूवात केली. हेतू अर्थात जाहिरात, भेटवस्तूच्या विक्रीला चालना आपोआपच त्या उत्पादनाच्या  जाहिराती मिळतील. निव्वळ व्यापारी हेतूने हा 'डे' आणि त्यातून येणारी परकीय संस्कृती रूजविण्याचा उपद्‌व्याप माध्यमांनी केला. त्याचप्रमाणे मालीकांचा सुळसुळाट धनदांडग्यांचे अनैतिक धंदे, कटकारस्थाने, नीतीमुल्यांची टवाळी, विवाहबाह्य संबंधांचा पुरस्कार यासारख्या अनेक अनिष्ट बाबी या मालीकांमधून प्रसारीत केल्या जातात. कौटुंबिक चौकटीत पती—पत्नीची भांडणे, घटस्फोट सारख्या विषयाची लफ्तरे जाहिरपणे लटकवली जात आहेत. हा धिंगाणा समाजहिताला, देशहिताला आणि समाजातल्या सांस्कृतिक वातावरणाला तीव्र हानी पोहचविणार आहे."[४]

प्रस्तुत वर्णणावरून लक्षात येईल, दर्शकांना आवडतील ते कार्यक्रम सादर करायचे व त्यात जाहिराती पेरायच्या. अशी कृप्ती बाजारू शक्ती करतात. अनेक रहस्यकथा, गुन्हेगारीचा छडा, शारीरिक प्रेमाची कथानके याचा उद्देश एकच ग्राहक आपल्याकडे खेचने. त्यामुळे महत्त्वाच्या कोणत्याही विषयाच्या खोलात न जाता वरवरचे चटपटीत चित्रण यातून आढळते. समाजातील खरे प्रश्न हाताळलेच तर ठोकळेबाज पध्दतीने मांडले जातात. यासंदर्भात श्रीमती निलम गोऱ्हे यांनी कथन केलेला अनुभव लक्षात घेण्यासारखा आहे.

"प्रसारमाध्यमातून स्त्री देहाचा मुक्त व्यापार होताना दिसतो. पत्रकारितेचे नीतीनियम पायदळी तुडवून स्त्री देहाचे ओंगळवाणे प्रदर्शन केले जाते. विविध उत्पादनांच्या जाहिरातीमध्ये स्त्रीयांचा अनावश्यक वापर होताना आपण बघतोय. उदा. 'लॅक्मे फॅशन वीक' मध्ये रॅम्पवर चालणाऱ्या एका मॉडेलच्या खांद्यावरून तिचे अंतर्वस्त्र घसरल्याच्या बातमीला सर्व वाहिन्या व वृत्तपत्रांनी चांगलीच प्रसिध्दी दिली."[५] यावरून प्रसारमाध्यमांचा नको त्या बातमीला प्रसिध्दी देऊन आपला हेतू साध्य करणे एवढाच हेतू लक्षात येतो. आपल्या देशातील किती स्त्रीया साक्षर आहेत, शाळांमधून किती जणी बाहेर फेकल्या जातात, कुपोषणाला किती बळी पडतात, आपल्या स्त्रीत्वाचा बाजार मांडणे किती तरूणींना भाग पडते असे अनेक प्रश्न अस्तित्त्वात असताना या विषयावर मोठ्या प्रमाणात प्रसारमाध्यमांवर चर्चा होताना दिसत नाही. सध्या संपूर्ण जग आणि विश्व आपल्या लावण्यवतीच्या सौंदर्याला भरभरून दाद देत आहे. स्पर्धेत टिकाव लागतो तो केवळ शारीरिक मोजमापांमुळे नव्हे तर अशा बुध्दिचातुर्यामुळे असे आवर्जून सांगितले जाते. परंतु विश्वसुंदरी होण्यासाठी नीट तयारी करून घेण्यात फिगररक्षक, फिटनेस ट्रेनर्स, शरीर योग्य प्रकारे आवृत्त किंवा अनावृत्त ठेवण्यासाठी कॉस्ट्यूम डिझायनर्स, जसे लागतात तसे इंग्रजी उच्चार सुधारणे, शिष्टाचार शिकवणारेही

लागतात. स्पर्धेतील यश हे सर्वांचे असते. त्यापेक्षाही ते त्याच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या सौंदर्य प्रसाधनाच्या निर्मात्यांचे, जाहिरातदारांचे व विक्रेत्यांचे असते. भोगवादाचा तो विजय असतो. यासंदर्भात मंगला सामंत यांचे सौंदर्यस्पर्धा विषयीचे मतप्रतिपादन लक्षात घेण्यासारखे आहे.

"सौंदर्य स्पर्धांचे मुळ भोगवादी रोगात असून ज्या समाजात लैंगिक कल्पना ताणलेल्या, कोंडलेल्या, जबरदस्तीच्या असतात तिथे या रोगाचा प्रसार झपाट्याने होत असतो. असा लेखिकेचा निष्कर्ष आहे. सर्वांगीण कोंडीत सापडलेला स्त्रीवर्ग त्यातून सुटण्यासाठी शरीर प्रदर्शनाच्या मार्गाने जेव्हा जातो तेव्हा ते पुरूषसत्ताक भोगवादाच्या पथ्यावर पडते. रस्तोरस्ती उभी राहिलेली ब्युटी पार्लर आणि हेल्थ क्लब स्त्रियांच्या सौंदर्याची आणि आरोग्याची जी व्याख्या करतात ती भोगवादी तत्त्वज्ञानाला धरूनच असते. सौंदर्य स्पर्धेचे पेव यातून फुटते. स्त्री आरोग्यापेक्षा स्त्री–शरीराची मापे दिसावी हा या स्पर्धेचा मुळ उद्देश असल्यामुळे कल्पनाशक्ती आणि बौध्दिकता या स्पर्धेत गाडली जाते."[६]

अर्थात एका बाजूला शतकानुशतके पुरूषी धारणेला आव्हाण देऊन जगातली स्त्री नुकतीच मुक्त होऊ लागली होती. परंतु पाश्चात्यीकरणामुळे व प्रसारमाध्यमांमुळे फॅशन–शो, चित्रमालीका याद्वारे स्त्रीदेह ही पुन्हा विक्रीमुल्य असलेली बाजारू वस्तू ठरू लागली. एकूणच ग्राहक वर्गाला प्रसारमाध्यमातील जाहिरातींनी वस्तुच्या पातळीवर आणून ठेवले. त्यांची बुध्दिमत्ता, निर्णयक्षमता, विवेकशिलता ह्या सगळ्या गोष्टी निरर्थक ठरवून आपल्या इच्छेप्रमाणे आणि आखाड्याप्रमाणे त्यांची अभिरूची तयार करणे, त्यांना स्वप्न दाखवणे, भुलवणे, पर्यायाने स्वतंत्र अस्तित्त्व आणि व्यक्तित्त्व बोथड करून टाकणे ही किमया जागतिकीकरणाने घडवून आणली. चंगळवाद, बाजारीकरण व वस्तूकरण या तिन्ही प्रक्रियांचा अटळ सामायिक परिपाक म्हणजे मूल्यांचा ऱ्हास, पैसा कमावणे आणि बेगुमानपणे उधळणे हे एकमेव सर्वश्रेष्ठ जीवनमूल्य बनू लागले. सध्याच्या मीडिया व्यवहाराचे हे वास्तवरूपबनले आहे. अलीकडच्या काळापर्यंत माध्यमे आपली कर्तव्ये चोखपणे बजावत होती, राष्ट्रभावनेला सर्वाधिक प्राधान्य, जनआंदोलनाचे समर्थन, लोकशिक्षण आणि लोकमत परिष्कृत करीत समाजमन योग्य मुद्द्यांभोवती संघटित करण्याच्या कामी माध्यमे महत्त्वाची व विधायक भूमिका पार पाडत आली होती, आज मात्र हे दृश्य आमुलाग्र बदलले आहे.

खरं म्हणजे प्रसारमाध्यमांचे दबावतंत्र समाजातील अपप्रवृत्तींना घालवण्यासाठी एखाद्या दुर्लक्षित घटकाला न्याय देण्यासाठी किंवा एखाद्या घटनेतील जळजळीत वास्तव समाजासमोर मांडण्यासाठी अत्यंत परिणामकारक आहे. काही घटनांमध्ये याचा योग्य परिणाम दिसतो देखिल परंतु उपरोक्त संदर्भातील घटनांचे बाजारीकरण व फक्त जाहिरातीवर लक्ष केंद्रित न करता लोकशाहीचा चवथा स्तंभ म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका प्रामाणिक असली तर समाजातील दुर्लक्षित घटकांना न्याय देण्याचे फार मोठे योगदान आजच्या गतिमान युगात माध्यमांचे असेल.

## निष्कर्ष :–

१) काही वस्तूंची गरज नसताना, कृत्रिम गरज निर्माण केली जाते.
२) प्रसारमाध्यमांची ताकद लोकांची विचारक्षमता नाहिशी करण्याच्या पध्दतीने वापरली जाते.
३) माध्यमांद्वारे क्षुल्लक घटनाही वारंवार लोकांच्या मनावर बिंबवल्याने महत्त्वाच्या प्रश्नांपासून समाजमन दूर जाते.
४) उपभोगवादी, चंगळवादी संस्कृती वृध्दिंगत करण्याचे कार्य माध्यमांमधून केले जाते.
५) माध्यमांमधील जाहिरातीतून माणसांचे ग्राहकात रूपांतर केले जाते.
६) अलीकडे मुक्त होऊ लागलेली स्त्री प्रसारमाध्यमातील स्त्रीदेहाचे प्रदर्शन करून ती पुन्हा विक्रीमुल्य असलेली बाजारू वस्तू ठरू लागली आहे काय? असा प्रश्न निर्माण होतो.

## तळटिपा :–

१) 'जागतिकीकरण आणि भारत', नलिनी पंडित, प्रकाशक लोकवाङ्मयगृह प्रकाशन मुंबई दु.आ.२००४ पृष्ठ क्र.८७
२) आमची श्रीवाणी, मु.ब. शहा (संपा.) प्रकाशन, – का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, पृष्ठ क्र.३५
३) तत्रैव, पृष्ठ क्र.४९, ५०
४) 'विमर्श प्रसारमाध्यमे सध्य:स्थिती आणि आव्हाने' चंदन मित्र जाने, फेब्रु, मार्च, २०१०/पुणे पृष्ठ क्र.१४
५) प्रसारमाध्यमे आणि स्त्रीप्रतिमांचा वापर, निलम गोऱ्हे
६) 'साक्षेप' लक्ष्मण भाष्कर भोळे, बजाज पब्लिकेशन, अमरावती, जून २००८, पृष्ठ क्र.२०४

❖❖❖

# ग्रामीण कादंबरीतील सावकार आणि शेतकरी यांच्यातील संघर्षाचे चित्रण

डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शि.प्र.म. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय
चिखली, जि. बुलडाणा, महाराष्ट्र (India) ४४३२०१
Email: gawhanesubhash121@gmail.com भ्रमणध्वनी ९८५०३१४८८५

## प्रस्ताविक:—

भारत हा कृषीप्रधान देश आहे. सार्वत्रिक सिंचनाच्या सोयी नसल्यामुळे भारतातील शेतीला 'मान्सूनचा जुगार'मजल्या जाते. कारण ती नैसर्गिक पावसावरच अवलंबून असल्यामुळे शेतीतील उत्पन्नामध्ये शाश्वतता हा भाग नसतो. दर दोन तीन वर्षांमध्ये मान्सूनच्या लहरीपणामुळे शेतक—यांना नापिकीला तोंड द्यावे लागते. शेती उत्पादनातील अशा अनिश्चिततेमुळे शेतकरी हा सतत कर्जात बुडालेला असतो. म.फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये त्याच्या कर्जबाजारीपणाचा उल्लेख येतो. म्हणजे दीडशे वर्षांपूर्वीही शेतकरी कर्जबाजारीच होता. म्हणूनच भारतीय शेतकऱ्यांबद्दल असे नेहमीच म्हटले जाते की, 'भारतीय शेतकरी कर्जातच जन्म घेतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो'.पूर्वी आजच्या सारख्या बँका पतसंस्था यांचा विस्तार झालेला नव्हता. तेव्हा कृषिक्षेत्राला कर्ज पुरवठा करणारा ग्रामीण भागातील महत्त्वाचा घटक म्हणजे सावकार होय. ग्रामीण भागातील हे सावकार शेतकऱ्यांना शेतीसाठी, लग्नासाठी,धार्मिक विधीसाठी सहज आणि अगदी सोपेपणाने शेत गहाण ठेवून कर्ज देत होते. मात्र सावकाराच्या कर्जाचे व्याजदर अव्वाच्या—सव्वा असल्यामुळे एकदा शेतकरी सावकाराच्या कचाटयात अडकला की त्याची सुटका होणे कठीण होत होते. सावकाराचे व्याज भरता भरता शेतकऱ्याची जमीन घर—दार सावकार हडप करून घेत होते आणि त्या शेतकऱ्यांवर देशोधडीला लागण्याची वेळ येत असे.एकविसाव्या शतकामध्ये कर्ज पुरवठा करणाऱ्या हजारो संस्था ग्रामीण भागामध्ये असतांनासुद्धा काही प्रमाणात आजही सावकारकीचा हा व्यवसाय चालतोच. सावकारकीने कृषिव्यवस्थेचे प्रचंड नुकसान आजवर केलेले आहे. अनेक शेतकरी कुटुंबे या सावकारकीची बळी ठरलेली आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांवर सावकारांमार्फत होणाऱ्या अन्याय अत्याचाराची वेदना हा साहित्याचा विषय बनलेला दिसतो. कथा, कविता, कादंबरी इत्यादी साहित्यप्रकारांमध्ये शेतकरी आणि सावकार यांचे संबंध चित्रित झालेले आहेत. ग्रामीण कादंबरीमध्ये कुठला तरी सावकार हे पात्र हमखास असते. सावकारांच्या शेतकऱ्यांवरील अन्याय अत्याचाराचे चित्रण अनेक कादंबरीकारांनी केलेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात शेतकरी आणि सावकार यांच्यातील ताणतणाव आणि त्यांच्यातील संघर्ष ग्रामीण कादंबरीत कितपत चित्रित झाला यावर प्रकाश टाकला आहे.

महात्मा फुले यांच्या साहित्यातून विशेषत: 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथामधून शेतकरांच्या एकंदर आर्थिक परिस्थितीचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीला जबाबदार कोण? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. या प्रभावातूनच मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी लिहिल्या गेली ती 'बळीबा पाटील'. या कादंबरीमध्येही शेतकऱ्यांच्या समस्यांचे वर्णन करतांना दीपचंद मारवाडी या सावकाराचा उल्लेख येऊन जातो. शेतकरी त्याच्याकडून लग्नविधी साठी वगैरे कर्जाऊ रकमा घेतात.धनुर्धारी लिखित दुसरी ग्रामीण कादंबरी 'पिराजी पाटील'मध्येही दुष्काळी परिस्थितीत सावकार व्यापारी हे शेतकऱ्यांना कसे लुटतात याचे चित्रण आलेले आहे. याबाबत वासुदेव मुलाटे म्हणतात, '.... सावकार गावकामगार यांची दडपशाही, खेडूत माणसाला लुबाडण्याची वृत्ती याचेही प्रभावशाली दर्शन या कादंबरीत घडते.

ना.वि. कुळकर्णी, वि.वा.हडप यांनीही सावकार,वतनदार, खोत यांच्या अन्यायाचे प्रसंग आपल्या कादंबऱ्यांमध्ये रंगविलेले आहेत. र.वा.दिघे यांच्या 'पानकळा'मध्ये राजमल मारवाडी शेतकऱ्यांचे शोषण करून त्यांना सतत दारिद्रयात ठेवण्याचा प्रयत्न करतो. सातारा जिल्ह्यात सावकार आणि शेतकरी यांच्यात झालेल्या संघर्षाचे चित्र म.भा. भोसले यांच्या 'उघडया जगात' (१९४१) या कादंबरीत उमटते. श्री.ना.पेंडसे यांच्या 'हद्पार' कादंबरीतील सावकार सोन्याबापू हा ३५% दराने शेतकऱ्यांना कर्जवाटप करतो. नायक राजे मास्तर सुद्धा त्याच्या कडून कर्ज घेतात. अशा प्रकारे प्रत्यक्ष समाजात अव्वाच्या सव्वा व्याज आकारून सावकारकडून होणाऱ्या लुटीची उदाहरणे आहेत. 'पूर्णामायची लेकरं' मधील बयराम आपल्या भावाला भूत लागले म्हणून ते उतरविण्यासाठी कुण्यातरी नंगे बाबाने सांगितले म्हणून दुल्हभचंद सावकाराकडून 'ठोकपीटी' नावाचे शेत गहाण ठेवून शंभर रुपये कर्ज घेतो.

नापिकीमुळे पुढे ते शेत सावकाराच्या घशात जाते. साठपूर्वकाळात बँका पतसंस्था यांचे जाळे नव्हते.त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणारा ग्रामीण भागातील त्या काळातील महत्त्वाचा घटक म्हणजे सावकार. मात्र त्याचे व्याजाचे दर प्रचंड असल्यामुळे सर्वसामान्य शेतकरी त्याच्या आर्थिक कचाट्यातून सुटू शकत नसत. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाचे हे दु:ख, ह्या यातना बघून या साठपूर्व काळातील कादंबरीकारांनी त्यांच्या कादंबरीतून शेतकरी आणि सावकार यांच्यातील संघर्ष चित्रित केला आहे.

स्वातंर्त्योत्तर काळात सावकारी पद्धतीवर निर्बंध घालण्यात आलेय परंतु तरीही अवैध मार्गाने हा सावकारी व्यवसाय ग्रामीण भागात साठोत्तर काळातही तेजीत होता.त्यामुळेच अण्णाभाऊ साठेंच्या 'वारणेचा वाघ' मधून शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या सावकाराविरुद्ध सत्तू हा नायक लढताना दिसतो. सर्वसामान्य शेतकऱ्याला आपल्या मुलीचे लग्न म्हणजे जीवनातील फार मोठी लढाई वाटत असते. त्यामुळे लग्न समारंभ चांगला व्हावा, मुलगी चांगल्या घरात द्यावी. यासाठी प्रसंगी कर्ज काढून,आर्थिक अडचणी सहन करून तो हे कार्य पार पाडीत असतो. 'हाल्या हाल्या दुधू द' या कादंबरीतील नायक न्यानबा याच अपेक्षेपोटी मुलीच्या लग्नासाठी यशवंता सावकाराकडे शेत गहाण ठेवून पाच हजार रुपये कर्ज घेतो व मुलीचे लग्न करतो. तिथपासून हा सावकारी शनी न्यानबाच्या घरात शिरतो आणि शेवटी तो न्यानबाला कायमचाच घरातून बाहेर काढतो. शेतकऱ्यांच्या जीवनातील सावकारकीच्या या जाचाबद्दल कादंबरीचे लेखक बाबाराव मुसळे म्हणतात, 'शोषक—शोषित हे जेथे दोन माणसं एकत्र येतात य तिथलं वास्तव असते एकानं दुसऱ्याच्या श्रमाचं,घामाचं, कष्टाचं,अस्तित्वाचं शोषण करावे. ही पूर्वापार चालत आलेली रीत आहे.जेथे सगळे व्यवहार कोरड्या,भावनाशून्य आनितीतून केले जातात तेथे माणुसकीला,नात्यागोत्याला, सद्भाव—सद्विचाराला, सहकार्याला,संवेदनेला,कुठलंच मोल नसते.यशवंत सावकार आणि न्यानबा यांच्यामधील परस्पर संबंध हा या पद्धतीचा काळाकुट्ट, किळसवाणा पडदा आहे'. सावकारकीच्या जाचापाई न्यानबासारखी उद्धवस्त होणारी अनेक कुटुंबे समाजात होती. 'विषवृक्षाच्या मुळया'मधील लिंगाप्पा सावकार, 'चारापाणी' मधील बाबाराव शेळके सारखे सावकार दुष्काळी परिस्थितीत मुद्दामच पैशांचा आग्रह करून शेतकऱ्यांची शेते गहाण ठेवून घेतात आणि कर्ज थकले म्हणून शेतकऱ्यांची शेतं फस्त करतात. हे तत्कालीन  सावकार अत्यंत स्वार्थी वृत्तीचे, केवळ स्वत:चे हित बघणारे, कुठलीही दया—माया नसणारे असे होते.

नव्वदोत्तर काळात बँका, पतसंस्था यांचा विस्तार सर्वत्र मोठ्या प्रमाणात झाला. मात्र तरीही ही सावकारकी नामशेष झाली नाही. सर्वसामान्य शेतकऱ्याला शेतीसाठी कर्जपुरवठा करताना लागणारी कागदपत्रे,कर्ज मंजूर करण्याच्या जाचक अटी, प्रशासकीय अधिकाऱ्यांना द्यावी लागणारी लाच इत्यादींमुळे या पतसंस्थांकडून शेतीसाठी सहज कर्ज उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे छोटा—मोठा शेतकरी जास्त व्याज देऊन का होईना परंतु सहज उपलब्ध होणाऱ्या सावकाराच्या कर्जाकडे वळत होता. 'पांगिरा' या कादंबरीतील सावकार शेतकऱ्याच्या एकत्र कुटुंबात भांडणे लावून एका भावाला वेगळे काढतो आणि त्याला कर्जाऊ रक्कम देऊन शेवटी त्याचे शेत फस्त करून टाकतो. तानाजी राऊ पाटील यांच्या 'आभाळ' या कादंबरीत भीमाबा आणि बापू कडवळ हे दोघे श्रीमंत शेतकरी ते सावकारकी सुद्धा करतात, गावात त्यांचे दारूचे दुकानही आहे. या धनदांडग्यांची संपूर्ण गावावर प्रचंड दहशत आहे. मोलमजुरी करणाऱ्या बायकांवरही त्यांची वाईट नजर जाते. त्या त्यांच्या वासनेच्या शिकार होतात. भीमाबा हा सावकार नायक गोपाळाला व्यवहारात फसवून उभ्या पिकाचे शेत शेवटी ताब्यात घेतो व भूमिहीन बनवतो. रवींद्र ठाकूर या कादंबरीबद्दल म्हणतात,'अशीही कर्जात जन्मणाऱ्या,कर्जात जगणार्या आणि कर्जातच मरणाऱ्या भारतीय अल्पभूधारक शेतकऱ्यांची प्रातिनिधिक कथा आहे'. अशाप्रकारे सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकऱ्यांचे संसार उद्धवस्त करणारे सावकार ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबर्यांमध्ये चित्रित करून या व्यवस्थेत पिळल्या गेलेल्या शेतकऱ्यांचे दु:ख वास्तव रूपात जगासमोर मांडले आहे.

एकविसाव्या शतकामध्ये जागतिकीकरणाच्या झळा कृषिव्यवस्थेसाठी अधिक बाधक ठरू लागल्या. या काळात बँका,पतसंस्था यांचे  ग्रामीण भागात प्रचंड जाळे पसरले. त्यामुळे सावकारांची दहशत काही प्रमाणात कमी झाली. मात्र एकविसाव्या शतकातील शेतकरी या वाढलेल्या बँका, पतसंस्थांकडून कर्ज काढून शेती विकासासाठी खर्च करू लागले. अवैधरित्या सावकारी करणाऱ्या सावकारांचा पाश जाऊन बँका,पतसंस्था या शासनमान्य संस्थांचा पाश शेतकऱ्याभोवती पडू लागला. गावागावात बँका झाल्यामुळे कर्ज घेण्याचे आणि कर्जबाजारी होण्याचेही प्रमाण वाढले. एक प्रकारे या संस्थांनी सावकाराचीच भूमिका पुढील काळात पार पाडली आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या घरादारांचा लिलावही केला. या काळात,बँका,पतसंस्था, व्यापारी, दलाल,सरकारी भ्रष्ट यंत्रणा सोबतच सावकार आणि नैसर्गिक दुष्टचक्र असा समस्यांचा गराडा शेतकऱ्यांभोवती पडला. या संपूर्ण शोषणसाखळीचे चित्र भीमराव वाघचौरे यांच्या 'गराडा' या कादंबरीत वास्तवरित्या रेखाटले आहे.

सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीमध्ये दगडू महाकाळ सारखा सावकार परत दिसतो. बँका किंवा पतसंस्था यामधून कर्ज काढल्यानंतर शेतीतून उत्पन्न मिळत नसल्यामुळे शेतकरी ते कर्ज फेडू शकत नाही. निसर्गाच्या दुष्टचक्रामुळे बऱ्याच वेळेस दुबार पेरणीचे संकट उभे राहते. अशा वेळेला शेतकऱ्यांना सावकाराचा उंबरठा ओलांडावाच लागतो. 'बारोमास' मध्ये बळीमामाचे दहा एकर शेत घेणारा वरली मटक्याचा धंदा चालवणारा चोपडा शेठ, भडगावचा बाळू शेठ, सांजोळ मधला दगडू महाकाळ असे सावकार अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना गिळंकृत करण्यासाठी टपूनच बसलेले असतात. दुबार पेरणीसाठी बाळू शेठकडून रावसाहेबांनी कर्ज काढले होते.तेव्हा शेत खरेदी करून देण्यासाठी सुभानरावचे जावई रावसाहेबांवर सावकाराने प्रचंड दबाव टाकला आणि रावसाहेबांना हे सावकाराचे वागणे सहन न झाल्यामुळे त्यांनी गळफास लावून शेवटी आत्महत्या केली. स्वत: सुभानरावही मुलगा मधुच्या नोकरीसाठी त्यांचा जीव की प्राण असलेला कल्याणीचा मळा दगडू महाकाळ या सावकाराकडे गहाण टाकतात.एक रकमी परतफेड करू शकत नसल्यामुळे व ज्या काळ्या आईवर जीवापाड प्रेम केले त्या काळ्या आईवर नानू बुढयाच्या समाधीजवळ सावकार दारूच्या पार्ट्या करतो. हे बघून सुभानरावांना आत्यंतिक वेदना होतात. या मनाच्या होणाऱ्या प्रचंड घुसमटीमुळे सुभानराव आत्महत्या करून आपली जीवन यात्रा संपवितात.'पैसा हाच परमेश्वर हे सूत्र ठरल्याने कोठूनही पैसा मिळविण्याची अनेकांची धडपड चालू आहे. याचाच प्रत्यय भडगावचा बाळू शेठ सावकार व दगडू महाकाळ यांच्या वर्तनातून येतो. शेतकऱ्याला केवळ व्याजाने पैसे देऊनच न थांबता त्यांची शेती लुबाडलण्यावर यांची नजर आहे.एकूणच रावसाहेब व सुभानराव यांच्या विमनस्क स्थितीस सावकारी फासच कारणीभूत आहे. शासकीय नोकरदारांचे बेजबाबदार वर्तन व खाजगी सावकारांचा अतिरेक अशा विचित्र मन:स्थितीत शेतकऱ्यांना जगणेही असह्य होते. हे भीषण समाजवास्तव कादंबरीतून प्रत्ययास येते'. ('साखरफेरा' २००६) या मोहन मोहन पाटील यांच्या कादंबरीतील नायक किशा साखर कारखान्यामार्फत चालवल्या जाणाऱ्या पतसंस्थेचे कर्ज ऊस लागवडीसाठी घेतो. ही पतसंस्था बँकेच्या व्याजदरापेक्षा दोन ते तीन टक्के जादा दराने कर्ज देते. ऊस परिपक्व झाल्यानंतर कारखान्यात नेल्यावर उसाच्या येणाऱ्या रकमेतून ते कर्ज फेडले जाणार असते. परंतु अशाश्वत शेतीमुळे किश्याचा ऊस हातचा जातो व त्याचे कर्ज तसेच राहते. सन २००९ मधील रवींद्र शोभणे यांच्या 'पांढर'या कादंबरीमध्येही सावकारकीचा उल्लेख येतो. साहेबराव पाटील हे तसे मोठे कास्तकार आहेत. नरखेडचा एक व्यापारी सावकार साहेबराव पाटलांना वाडी नावाच्या शेतात बोअर घेण्यासाठी दोन लाख रुपये कर्ज देतो. साहेबराव पाटील पिढीजात साठ एकराचे मालक परंतु ते आजपर्यंतच्या या शेती व्यवसायात दोन लाख रुपयांचीही कमाई करू शकले नाहीत. पाणी टंचाई निर्माण झाली म्हणून बोअर घ्यायचा तर कर्ज घेऊनच करावा लागतो. पुढे ते कर्ज फेडले जाऊ शकत नाही. शेवटी कर्जाच्या ताणतणावामुळे हृदयघाताने त्यांचा मृत्यू होतो. आजवर सावकार आणि शेतकरी यांच्या या पिढीजात व्यवहारात, त्यातून होणाऱ्या संघर्षात हजारो शेतकऱ्यांचे बळी गेलेले आहेत. साहित्यकारांच्या संवेदनशील मनाने विशेषत: ग्रामीण कादंबरीकारांनी शेतकरी जीवनातील हे भयानक दु:ख त्यांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्त केले आहे.

## निष्कर्ष :—

सावकारी पद्धतीने या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत केली आहे. मात्र एकदा कर्ज घेतल्यानंतर शेतीच्या दुष्ट चक्रामुळे व सावकाराच्या प्रचंड व्याजदरामुळे शेतकरी ते कर्ज फेडू शकलेला नाही आणि त्यामुळे सावकाराच्या तो कचाट्यात अडकला व आत्मनाश करून बसलेला आहे. अलीकडील काळात सावकारकीचे प्रस्थ जरी कमी झालेले असले तरी वेगवेगळया बँका,पतसंस्था यांच्याकडून कर्ज घेऊन शेतकरी अधिक प्रमाणात कर्जबाजारी झाले आहेत. कर्ज फेडू न शकल्यामुळे त्यांच्या जमिनींचे लिलावही झालेले आहेत. 'हाल्या हाल्या दुधू दे' मधील न्यानबा, 'बारोमास' मधील सुभानराव,रावसाहेब तसेच 'पांढर' मधील साहेबराव पाटील, पंढरी आगे, गजानन पिकले हे सर्व तसेच इतरही कादंबऱ्यांमधील नायक सावकारकीचेच बळी आहेत. समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचे साक्षीदार असलेल्या या संवेदनशील मनाच्या लेखकांनी विशेषत: साठोत्तर,नव्वदोत्तर व एकविसाव्या शतकात अलीकडील काळातील ग्रामीण कादंबरीकारांनी शेतकरी आणि सावकार यांच्यातील संघर्षामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोकांतिका वास्तव रुपात मोठ्या पोटतिडकीने चित्रित केल्या आहेत.

## संदर्भ ग्रंथ:—

१) मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा', स्वरूप प्रकाशन, डिसें.२००५, पृष्ठ क्र. ९९.
२) मुसळे बाबाराव, 'तृतीय रत्न—हाल्या दुधू दे: एक अन्वयार्थ' बजाज पब्लिकेशन अमरावती,२०१० भाग २, पृ.३.
३) ठाकूर रवींद्र,'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृष्ठ क्र. १७९
४) येळवंडे लक्ष्मीकांत, 'सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या: एक आकलन', स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर, पृ. ५९—६०

❖❖❖

# संत ज्ञानेश्वर यांच्या तत्त्वज्ञानातून समानतेचे बीज

डॉ. प्रेमा लेकुरवाळे
मराठी विभागप्रमुख
रेणुका कॉलेज
बेसा, नागपूर, महाराष्ट्र (India)
Email: premalekurwale@gmail.com भ्रमणध्वनी ९८५०३६२२८६

## सारांश –

मध्ययुगीन ज्ञानेश्वर काळातील हिंदू समाज, हिंदू धर्म सर्व प्रकारे सर्व बाजूंनी संकटात सापडलेला होता. समाजाची उच्च–नीच जातीभेदाने पोखरलेल्या समाजाची एकता व संलग्नता, अभंगत्व टिकवायचे असल्यामुळे धर्माला आलेली ग्लानी ,धर्माला आलेली अवकळा त्या समाजाला वाचविण्याकरिता संत ज्ञानेश्वरांनी त्यांच्या समाज अवलोकनातून उच्च ध्येयाने ,उदात्त हेतूने समाजव्यवस्थेच्या पुनर्बांधणीसाठी समाजाची नव्याने रचना करण्यासाठी त्यांनी क्रांतिकारी पाऊल उचलले आणि त्यांनी भक्तीमार्गाच्या माध्यमातून नवी वाट खुली करून दिली. ज्ञानदेवांच्या तत्वज्ञानातील मुख्य सिध्दांत अद्वैताचाच आहे.सर्वत्र एकच आत्मतत्व भरून राहिले आहे.महाराष्ट्रात तेराव्या शतकाच्या अखेरीस चंद्रभागेच्या तीरी एक नवे क्षितिज उदयाला आले. ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथसाहित्यातून सामान्य लोकांना समजेल अशाप्रकारचे उदाहरणे देवून तत्वज्ञानात्मक विचार समाजाला दिले.त्यांचे तत्वज्ञान आजही चिरंतन आहे. हे सांगण्याचा हेतू या शोधनिबंधातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

## प्रस्तावना –

तेराव्या शतकापासून म्हणजे सुमारे सातशे वर्षापासून ज्ञानदेवांची अमृतवाणी मराठी मनाला रिजवत आली आहे.आजही विचाराने तेवढीच प्रगल्भ आहे. अमृतवाणीचा झरा निरंतर वाहतच आहे.आजही पितृपक्षात वारक–यांच्या घरोघरी ज्ञानेश्वरीचे पठन होतात. ज्ञानदेवांचा 'ज्ञानेश्वर माऊली' असा जयघोषही सतत ऐकू येतो.जन्मोजन्मी कृतज्ञ राहण्याइतके अमोल विचारधन आणि भावधनज्ञानदेवांनी समाजाला दिले.

महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी म्हणून ओळखली जाते.भारतीय संस्कृतीचे आणि उदात्त जीवनमूल्यांचे अधिष्ठान बहुवर्षीय भारतीय साहित्याला लाभले असले तरी भारतातील इतर प्रदेशांपेक्षा महाराष्ट्राची प्रकृती मूलत: भिन्न आहे. विरत आणि वैराग्य यांच्या परंपरा येथे एकत्र नांदल्या .लावणी बरोबर अभंग देखील याच मातीत जन्माला आला रंगेलपणाबरोबर येथील रंगेलपणा ही अविस्मरणीय ठरला. मराठीतील साहित्य गंगा प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या काठाने वाहिली. विविध भावना आणि विचारांचे प्रवाह साहित्यात एकवटल्या गेले.मराठी साहित्य काठावरील लोकजीवन तिने समृद्ध केले असले तरी मराठी साहित्यातील संत साहित्य प्रवाह हा विशेष उल्लेखनीय ठरला आहे.इतक्या वर्षानंतरही संत साहित्याची गोडी आणि लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट कालौघात ती वाढत असल्याचा प्रत्यय येतो .संत साहित्याचे लोकप्रियतेमागे संत साहित्यातून व्यक्त झालेला विचार जितका मोलाचा आहे तितकेच मोलाचे त्यांचे तत्त्वज्ञान आहे हे विसरून चालणार नाही.

## भागवत धर्माची पूर्वपीठिका –

वैदिक धर्माचे उज्वल तत्वज्ञान अगदी खालच्या थरापर्यंत येऊन पोहोचविण्यासाठी ज्ञानेश्वरांनी लोकांच्या मातृभाषेत आपल्या अमृत मधुर वाणीने भगवत गीतेचा भावार्थ सांगितला आणि महाराष्ट्रात भागवत धर्माचे मंदिर उभारले. आपल्या अलौकिक व्यक्तिमत्वाने व साधारण वाक्चातुर्यामुळे त्यांनी हजारो लोकांची मने अल्पावकाशात भारून टाकली व जीर्ण होत चाललेल्या भोळया भाबडया भाविकांच्या जुनाट वारकरी संप्रदायात नवचैतन्य निर्माण केले.

जन्मसिद्ध उच्च नीच भावाला या पंथास जागा नव्हती.'अवघिया पुरते ओसंडले पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथ ।। अशा उदार व्यापक तत्त्वावरच त्याची उभारणी झाली होती.त्यामुळे दिवसभर राबराब काबाडकष्ट करूनही अज्ञानाने व अगतिकतेने पशूतुल्य जीवन जगणा–या शूद्रातिशूद्रांना उच्चतर जीवनाचा, आध्यात्मिक उन्नतीचा सर्वांकरिता मार्ग खुला झाला.ब्राह्मण मराठा–कुणबी, कुंभार ,माळी, महार वगैरे सर्व जातीचे लोक या पंथात

नि:संकोचपणे सामील झाले. चोखामेळा, चंगा वटेश्वर, गोरा कुंभार, नरहर सोनार, बंका महार या सर्व संत मंडळींनी अवघा महाराष्ट्र विठ्ठलाच्या नामघोषाने दुमदुमून टाकला.शेकडो वर्षाच्या दडपणामुळे खरडून गेलेल्या बहुसंख्य लोकांच्या सुप्त आकांक्षा या भक्ती पंथामुळे प्रथम जागृत झाल्या. ज्ञानेश्वरांनी भक्तिमार्ग हा सर्वांसाठी आहे,साधना मार्ग म्हणून भक्ती पंथ सर्वश्रेष्ठ आहे .त्याचे प्रवेशद्वार सर्वांसाठी खुले आहे .भक्तिसंप्रदाय राजापासून रंकापर्यंत, ब्राह्मणांपासून रावापर्यंत सर्वांकरिता खुला आहे. इथे कुठल्याही पूर्वतयारीची व साधन सामुग्रीची आवश्यकता नाही. आत्मशुद्धीची खरी आच असली पाहिजे .सर्वसामान्य माणसाला झेपेलअसा हा धोपट मार्ग आहे. परमेश्वर हा भक्तांचा पाठीराखा मार्गदर्शक आहे. त्यामुळे भक्ताला एकाकी वाटचाल करावी लागत नाही.

ज्ञानेश्वरांचे सामाजिक तत्त्वज्ञान—धर्माच्या सामाजिक अंगाची ज्ञानेश्वरांनी अनुमात्र उपेक्षा केली नाही. शाश्वत नितीमुल्याप्रमाणे स्वधर्मनिष्ठा लोकसंग्रहाची आवश्यकता त्याने अनेकवार प्रतिपादिली आहे. व्यक्तीच्या पारमार्थिक सिद्धीसाठी सामाजिक व्यवस्थेत बिघाड होणे योग्य नाही असे त्यांना वाटत होते. कोणती धर्म साधना सर्वसामान्य लोकांच्या पचनी पडणार नाही याची त्यांना कल्पना होती म्हणून प्रापंचिक जीवनातील सगळया गोष्टी निर्वेधपणे चालू ठेवण्याची त्यांनी आपल्या अनुयायांना मोकळीक दिली.

'जिद्दी लोकांचे आधारे । लौकिकेची व्यापारे ।
सांडिलेनिदसुरे । लौकिक हे ।।

लौकिक व्यापार न सोडता, लौकिक जीवनाचा आधारच अज्ञान नाहीसे करणाऱ्या स्थितप्रज्ञ कर्मयोगाचा आदर्श त्यांनी लोकांपुढे ठेवला.

'जगातजे काही सुंदर, उच्च, मधुर, पवित्र, मंगल ,अलौकिक आणि हृदयंगम असेल त्याचे सर्वस्व म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र होय असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. कारण या अवतारी पुरुषांनी वयाच्या सोळाव्या वर्षी 'ज्ञानेश्वरी' ग्रंथरूपाने महाराष्ट्र वाङ्मयाचा पाया घातला आणि वारकरी संप्रदायाचा ध्वज उभारला' असे मत श्री जगन्नाथ रघुनाथ आजगावकर यांनी ज्ञानेश्वरांना ज्ञानेश्वरीविषयी म्हटलेले आहे .

शं. गो. तुळपुळे ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानालाबद्दल म्हणतात —'भक्ती ही जातीभेदातीत असून भाव हा तिचा गाभा आहे. नामकीर्तन व संतसंग हे तिचे आविष्कार आणि आत्मानुभव ही तिची परिणती आहे. 'भक्ती हे ईश प्राप्तीचे एकमेव साधन होय' असा ज्ञानेश्वरांचा महासिद्धांत आहे.

प्राचीन काळी यज्ञ हाच धर्म होता कालांतराने येथे यज्ञाची कल्पना पुष्कळदा व्यापक झाली. ज्ञानेश्वरांनी'स्वधर्मु जो बापा।तो नित्ययज्ञुजाण पा ।।स्वधर्म हाच नित्ययज्ञ आहे असे मानले आहे. शास्त्रवचन आणि त्याची परंपरा यानुसार जे प्राप्त कर्म तो स्वधर्म पालनासाठी निष्काम बुद्धीने केलेले कर्म हे तीर्थासारखे पवित्र आहे म्हणून धर्माचे पवित्र हे त्यांच्या लहान मोठेपणावर अवलंबून नाही स्वधर्म हा ईश्वर प्रणित आहे. त्याविषयी ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

अगा जेयाजे विहित ।
ते ईश्वराचे मनोगत ।

असा त्यांनी निर्वाळा दिला आहे.

आपला स्वधर्म अखेर आपणच आपल्या विवेक बुद्धीच्या सहाय्याने निश्चित केला पाहिजे. कोणाचीही विवेकबुद्धी म्हटली तरी ती एकच आहे म्हणून विवेकबुद्धीला आपले कार्य व्यवस्थितपणे पार पाडावयाची तर गुरु व संत यांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. नेहमीप्रमाणे येथील ज्ञानेश्वरांनी शास्त्र, ग्रंथ, विवेकबुद्धी गुरुपदेश वसंत संप्रदाय यांचा समन्वय साधला आहे.

ज्ञानेश्वरांचे अद्वैतवादी तत्त्वज्ञान—ज्ञानदेवांच्या तत्वज्ञानातील मुख्य सिध्दांत अद्वैताचाच आहे.सर्वत्र एकच आत्मतत्व भरून राहिले आहे.'अहं बम्हास्मि'अशा वृत्तीने अज्ञान नाहिसे केल्यावर ते ज्ञान आत्मसाक्षात्कार देऊन आपण नाहीसे होतो आणि तेथे 'मीच ब्रम्ह' या वृत्तीशिवाय जे निखळ ज्ञान ,ते फक्त उरते.त्यात कुठलेही द्वैत उरत नाही.आत्माच सर्वत्र भरलेला आहे.आत्मतत्वाव्यतिरिक्त वेगळे असे जगत आणि जीव काही निर्माणच झाले नाही असे त्यांनी सांगितले.सत्य काय आहे ते एक ब्रम्हचआहे.दृश्य जगत हे मिथ्याहोय.असा विचार शंकराचार्य यांनी 'ब्रम्ह सत्यं जगन्मिथ्या' या उक्तीद्वारे मांडला.हाचमायावाद होय. शंकराचार्य जगहे भासरूप म्हणजे मिथ्या मानतात पण ज्ञानदेव मात्र तसे मानत नाही.

ज्ञानेश्वरांनी जगास शंकराचार्याप्रमाणे मिथ्या मानले नाही.जग ही सदृवस्तूची प्रभा, तरंग, रत्न आणि आत्म्याचे स्फुरण चैतन्याचा विलास आहे अशा रूपाने मानतात.जगातील नानात्वम्हणजे या चिद्वस्तूची क्रीडाच होय म्हणजे जगतही परमात्मस्वरूपच होय अशी त्यांची धारणा आहे.

माणसाचे मोठेपण सामाजिक प्रतिष्ठेवर किंवा जातीवर अवलंबून नसून त्याच्या व्यक्तिगत चारि्त्र्यावर,मनाच्या शुध्दतेवर अवलंबून असते. याविषयी ज्ञानदेव म्हणतात–

'म्हणोनि कुळ उत्तम नोहावे ।
जाती अंत्याहि व्हावे ।
वरि देहाचेनि नांवे ।
पशूचेंही लाभो ।

ज्यांच्या वाचेवर माझे आलाप आहेत आणि ज्यांची दृष्टी माझेच रूप भेगीत आहे ,त्यांच्यावर मी कृपा करतो.असा दिलासा भगवंताच्या मुखातून दिला आहे. ज्ञानदेवाच्या या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे समालोचन करतांना ह.श्री.शेणोलीकर म्हणतात– 'सत्य अहिंसा,दया,सर्वभूती समभाव,अमानित्व,अदंभत्व,अक्रोधत्वइत्यादी गुणांचे स्वरूप स्पष्ट करतांना वैयक्तिक आणिसमाजिक दोन्ही अंगानी विचार करीत आहे.असे स्पष्ट दिसून येते.त्याचप्रमाणे संन्यास,तप,यज्ञ,त्याग ,वैराग्य इत्यादीचे अर्थज्याप्रकारे ज्ञानेश्वरांनी केले आहे त्यावरून केवळ आध्यात्मिक भूमिकेवरून ज्ञानेश्वर बोलत नसूनआपल्या सभोवतालच्यासमाजाची नीतीमत्ता कशी उंचावेलआणिलोकांचे सांसारिक जीवनही निकोप नि निरामय कसे हाईलया कळकळीने ते बोलतआहेत.अशी खात्री पटते........ज्ञानेशांची भूमिका आध्यात्मिकअसली तरी कार्य सामाजिक – नैतिक आहे,हे विसरता येत नाही.'

ज्ञानेश्वरी ही गीतेवरील मराठीतील पहिले ओवीबद्ध टीका, आहे. निवृत्तीनाथांच्या कृपादृष्टीखाली श्रोत्यांसमोर ज्ञानेश्वरांनी केलेले हे काव्यमय प्रवचन आहे. तो एक सुसंवाद आहे..ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय पैकी ९ अध्याय ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांशी प्रकट संवाद साधलेला आहे. तो संवाद असा आहे की ज्ञानेश्वरी वाचताना ज्ञानेश्वर आपल्या अगदी निकट येऊन आपल्याशी बोलत आहेत असे आपल्याला वाटते पण असे असूनही ज्ञानेश्वरी कधी बहिर्मुख होत नाही तिची अंतर्मुखता ती सोडत नाही.

ज्ञानेश्वरांनी तत्वज्ञान व साक्षात्कार यांचे अतिशय सुंदर व प्रभावी वर्णन केले आहे ज्ञानेश्वरांचे सृष्टी निरीक्षण किती सखोल व शुष्क होते हे त्यातून दिसून येते. सर्व विश्वाचे अधिकरण त्याचा कर्ताआणि नियामक ईश्वर मानला पाहिजे. ज्ञानेश्वरांच्या ठायी तत्वज्ञान, काव्य आणि आत्मानुभूती ह्यांचा झालेला त्रिवेणी संगम हेच त्यांच्या गीतेवरील भाषाचे महान वैशिष्ट्य होय. यास श्रोतृ संवादाचे काही वैशिष्ट्ये पाहिले तर असे दिसते की त्यांचा सुसंवाद हा खऱ्या अर्थाने सुसंवाद आहे. त्या समाजाचे एक महत्त्वाचे आणि अनन्यसाधारण वैशिष्ट्य म्हणजे श्रोता हा निर्मिती प्रक्रियेत सहभागी आहे. याची स्पष्ट जाणीव त्यांना आहे तसेच हे संवाद सविस्तर आणि मनापासूनचे आहे त्यातून त्यांच्या अलौकिक आंतरिक जाणीवेचे दर्शन घडते.त्यातूनच व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार झालेला दिसून येतो. त्यामुळे ते भावकाव्याच्या पातळीवर सहजपणे जातानादिसून येते.

## संत ज्ञानेश्वर यांचे आत्मसुखाविषयी तत्त्वज्ञान –

गीता–ज्ञानेश्वरीतील अध्यात्मवाद आणि आधुनिक अंधःश्रद्धा निर्मूलन चळवळमागील बुद्धीवाद हे दोन मानवी जीवनाकडे पाहण्याची तत्वतः भिन्न आणि कदाचित परस्पर विरोधी दृष्टिकोन आहे. आधुनिक बुद्धिवाद यानुसार अधिकाधिक भौतिक सुख मिळणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे प्रत्येक जण आपले जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न करीत असताना स्पर्धा आवश्यक आहे या स्पर्धेला कायद्याचे व नीतीचे बंधन असायला हवे नाहीतर समाजव्यवस्था ढासळेल म्हणून मानवी जीवनाचे सार्थक कायदा व नीती त्यांच्या मर्यादेत अधिकाधिक भौतिक सुखप्राप्ती करण्यात आले आहे. गीता ज्ञानेश्वरीचा अध्यात्मवाद अनुसार आत्मकल्याण, मोक्ष हा सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ आहे आणि जीवनाचे अधिष्ठान धर्म आहे.अर्थ आणि काम यांना महत्त्वाचे स्थान आहे ते केवळ साधन स्वरूप नसून अंतिम साध्यस्वरूप आहे परंतु नीतीच्या मर्यादेत भौतिक समृद्धी असूनही त्यांना तुच्छ मानून संन्यास घेणारा भगवान बुद्ध, महावीर किंवा संन्यास न घेता स्थितप्रज्ञ वृत्तीने राहणारा जनक, एकनाथ यांचे अंत्यत्यागी ,बहिःसंगी हे जीवन सर्वश्रेष्ठ आहे असे अध्यात्मवादी दृष्टीकोन मानतो. या जीवनपद्धतीत त्याग, विवेक, वैराग्य,तप, चित्ताची समता हे अध्यात्मिक सद्‌गुण आहेत. .विवेक म्हणजे अर्थ कामपूर्ती , हे जीवनाचे इप्सित नाही.भौतिक ऐंद्रियक सुख हे खरे सुख नसून 'आत्मसुख' हे सर्वोच्च सुख आहे ही धारणा. या आत्मसुखाचे वर्णन ज्ञानेश्वरीत जागोजागी दुथडी भरून वाहत आहे.

जया आपणपे सांडूनि कही । इंद्रिय ग्रामावरी येणे नाही ।।
तो विषय न सेवी हे काई । विचित्र येथ ।।
सहजे स्व–सुखाचेनि अपारे । सुखाडे अंतरे।

रूचिला म्हणवूनी बाहिरे । पाउल न घाली ।।
तैसे आत्मसुख उपाहले । जयासि आपणपांचि फावले ।।
तया विषय सहज सांडवले ।। सांगो काई ।।

विषयसुख किंवा भोगसुखासाठी कष्ट करावे लागतात.भोगतांना शक्तिक्षय होतो आणि भोगल्यावरवीट येतो आणिते फार काळ टिकत नाही. याउलट आत्मसुखासाठी कष्ट,प्रयत्न करावेलागत नाहीत.'चित्त स्वस्थ,स्थिर,निर्मल' झाल्याबरोबरच सुखाने पूर्ण भरून जाते.असे हे आत्मसुख सुलभ,सोपे आणि श्रेष्ठतम आहे.

ज्ञानदेवांचे पसायदानातील तत्वज्ञान—संत ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात एकूण नऊ ओव्यांमध्ये विश्वात्मक देवाकडे मागितलेले दान म्हणजे 'पसायदान'होय.मला पसायदान द्यावे—अशी प्रार्थना ज्ञानेश्वरांनी केलेली आहे. ह्या पसायदानात विश्वात्मक दे, श्रीविश्वेश्वराव ह्या शब्दांनी ज्ञानेश्वरांनी त्यांचे गुरू निवृत्तिनाथ ह्यांचा निर्देश केला आहे असे दिसते— ह्या पसायदानात ज्ञानेश्वरांनी व्यक्तिश: स्वत:साठी म्हणून काहीच मागितलेले नाही, त्यांची प्रार्थना प्राणिजातांसाठी आहे, जे खलप्रवृत्तीचे असतील त्यांना सत्कर्मात रस निर्माण व्हावा सर्वांमध्ये जीवाभावाची मैत्री निर्माण व्हावी म्हणून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचे।।

दुष्टपणाचा संहार व्हावा,माणसाच्या वाईट प्रवृती जाऊन सत्कर्मे करण्याची प्रवृत्ती वाढीला लागो,सत्कर्माचाच छंद त्यांच्या जीवाला लागू दे, भूतमात्रामध्ये जीवाभावाचे मैत्र जडू दे., आपपसात प्रेम वृध्दींगत होऊ दे असं मागणं सर्वांकरिता मागतात.

दुरितांचे तिमीर जावो। विश्व स्वधर्मसूर्य पाहो ।।
जो जे वांछील ते ते लाहो । प्राणिजात ।।

पापी व अज्ञानी माणसाच्या अंत:करणातील अंध:कार नाहीसा व्हावा,या विश्वातील सर्वांनीच ज्ञानाचा सूर्योदय पाहावा.प्रत्येकाला जे हवे आहे ते मिळावे त्यापासून कुणीही प्राणीजात वंचित राहू नये ,विश्व सात्विकतेने उजळून निघावे असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. माझ्यासाठी नव्हे तर सर्व प्राणिमात्रांकरिता त्यांच्यामनोकामना पूर्ण कर.

जे चंद्रासारखे आहेत— पण ज्यांच्यावर चंद्रावर असतो तसा कलंक नाही जे सूर्य आहेत, पण ज्यांचा ताप जगाला होत नाही, त्यांच्याशीसर्वांचे नाते जडावे, अशी विनवणी त्यांनी केली आहे. विश्वकल्याणासाठी केलेली ही प्रार्थना विश्वेश्वरावाने मान्य केल्याचे म्हटल्यामुळे 'ज्ञानदेवो सुखिया झाला' असे त्यांनी म्हटले आहे.

ज्ञानेश्वरांचे हे पसायदान म्हणजे मराठी भाषेचा आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. ज्ञानेश्वरांनी अक्षय आनंदाचा ठेवा सर्वांना दिला.

## निष्कर्ष —

ज्ञानेश्वरीसारखा सर्वांगपरिपूर्ण ग्रंथ,अमृतानुभवासारखे अध्यात्माची उंची गाठणारे तत्वविवेचन,चांगदेव पासष्टीसारखे एका हठयोग्याला एका ज्ञानयोग्याने पाठविलेले अध्यात्मप्रवणपत्र आणिसर्वसामान्य आर्तजनांनाा तोषविणारी आणि ज्ञानसंपन्न करणारी 'अभंग'रचना.या रचनेच्या विविधतेमागे ज्ञानदेवांच्या प्रज्ञावंत ,प्रसन्न,प्रेमळ आणि ऋजु व्यक्तिमत्त्वाचा मूलस्त्रोत आहे.आपला तत्वचिार सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी अक्षरश: 'साहित्यसोनियाचिया खाणी 'उघडल्या.

ज्ञानदेवांच्या चिद्‌विलासाने तर महाराष्ट्रात फार मोठी वैचारिक क्रांती घडविली.व्यक्तिमत्वाच्या अस्तित्वाला आणिविविधतेने नटलेल्या या पार्थिव विश्वाला त्यांनी नवा अर्थ प्राप्त करून दिला.

त्यांनी सर्व समाजाला एकत्र आणले. स्वार्थ निरपेक्षता शिकविणारे तत्वज्ञान लोकांपुढे मांडले.'इये मराठीचिये नगरीत ब्रम्हविद्येचा सुकाळ व्हावा आणि प्रत्येकाला 'अवघाचि संसार सुखाचा' करता यावा यासाठी भक्तीची सोपी वाट दाखविली.त्यामुळे सामान्य माणसाला आत्मविश्वासाचा मार्ग सापडला.ज्ञानदेवांचे पसायदान जसे त्यांच्या व्यापक मानवतावादाचे प्रतिक आहे तसे तेउद्याच्या आदर्श समाजजीवनाचे ज्ञानदेवांनी पाहिलेले सुंदर स्वप्नही आहे.यथार्थापेक्षा भावार्थाकडे त्यांचे लक्ष अधिक होते.त्यांनी वारकरी संप्रदायाची तत्वे समाजमनात रूजविली. ज्ञानदेवांच्या या तत्वज्ञानात काही वेगळे सामर्थ्य होते. संस्कृतीची बंधने झुगारून आणि मराठी लोकभाषेचा स्वीकारव पुरस्कार करून त्यांनी वेदांतविचार सांगितला.लोकोध्दारासाठी झटणे ही सुध्दा भक्तीच आहे असेप्रतिपादन केले. ज्ञानदेवांच्या या शिकवणीमुळे वैदिक धर्माचा आणि सामाजिक जीवन धर्माचा पाया बळकट झाला. ज्ञानदेवांनी भक्तीला तत्त्वज्ञानाची

बैठक मिळवून दिली.जनसामान्यांच्या मनात एक जीवननिष्ठा दिली. त्यांच्या ग्रंथसंपदेतून इतके अमूल्य तत्वज्ञान समाजाला दिले म्हणून त्यांचे विचार चिरंतन राहतील.ज्ञानेश्वरीतील विचार समुद्रातील अमृतकणाप्रमाणे सर्वांना अमृताचा झरा हा अखंड वाहतच राहील.यात शंकाच नाही.येणा–यापिढीनाही त्या विचारांचा नक्कीच फायदा होईल.

## संदर्भ ग्रंथ –

1) संताची सामाजिक दृष्टी – शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, प्रथमावृत्ती २००५, पृ. ७८
2) त्त्रैव पृ.७९
3) त्त्रैव पृ. ७६–७७
4) संताचे तत्वज्ञान आणि धर्मविचार –शि.स.अंतरकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, प्रथमावृत्ती, २०१० पृ.८१–८२
5) संत साहित्याची सामाजिक फलश्रुती– गं.बा. सरदार, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती, १९८२पृ.८० ८१
6) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास–ल.रा. नसिराबादकर,फडके प्रकाशन, कोल्हापूर, सातवी आवृती, मे २००२ पृ. ५१
7) संताची सामाजिक दृष्टी – शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर,पुणे,प्रथमावृत्ती, २००५पृ.८८
8) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास–ल.रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सातवी आवृती, मे २००२ पृ.६२,६३

❖❖❖

# नियतकालिकांचे कार्य : एक दृष्टिक्षेप

प्रा.डॉ. विनोद यू. भालेराव
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय
मोहपा, त. कळमेश्वर, जि. नागपूर, महाराष्ट्र (India)
Email: profvinodbhalerao@gmail.com भ्रमणध्वनी ९७६७६५७६६०

## प्रस्तावना :—

शिक्षणाचा प्रसार व प्रचार समाजाच्या सर्व स्तरांवर व्हावा या उदात्त हेतूनेच नियतकालिकांचे होताना दिसून येते. कारण नियतकालिके हे शिक्षण आणि ग्रंथनिर्मिती यांच्या इतकेच एक समर्थ साधन म्हणून नियतकालिकांकडे पाहिले जाते.

इ.स. १८४८ पर्यंत साधारणत: सरकारचे धोरण उदारमतवादी होते. शिक्षणात एतद्देशीय भाषांना प्राधान्य होते. खरे तर एतद्देशीय भाषे द्वारा ग्रंथ निर्मिती करण्यास अनुकूल परिस्थिती होती. परंतु ज्यांनी ग्रंथलेखन करायचे ते परप्रेरितकृती धारण करून होते. म्हणून शालेय अभ्यासक्रमाच्या गरजेतून आणि सरकारी धोरणाच्या आवश्यकतेनुसार ग्रंथनिर्मिती झाली. त्यानंतर शिक्षणविषयक धोरण बदल गेले. त्याविषयीचा वाद तत्पूर्वीच बळावला होता. त्यामुळे धोरण बदलू लागले. तेव्हापासून एतद्देशीय भाषांतून ग्रंथनिर्मितीला प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली. पण त्या प्रतिकूल परिस्थितीतच प्रबोधनाची जी प्रक्रिया सुरू झाली. त्यातून स्वयंप्रेरणेने वाङ्मय निर्माण होऊ लागले. शिक्षणापेक्षा नियतकालिकांनी या घटनेस विशेष चालना दिली. नव्या उदारमतवादी शिक्षणामुळे महाराष्ट्रात वैचारिक जागृती होऊ लागली. जातिभेदाच्या कल्पना शिथिल होत गेल्या. धर्मभोळेपणा कमी होऊ लागला. मेकॉले, गिबन, स्पेन्सर, मिल, ॲडम—स्मिथ कॉर्लाइल इत्यादींची छाप महाराष्ट्रीयन विचारवंतावर पडत होती. या सर्व पाश्चात्य विचारवंतांचा परिचय महाराष्ट्राला एकाचवेळी झाला असे नाही. शिक्षणविषयक धोरणामुळे अभ्यासक्रमाचे स्वरूप जसजसे बदलले. तसतसे हे पाश्चात्य प्रकांडपंडित महाराष्ट्रीय सुशिक्षितांना परिचित होत गेले. परंतु त्यांचा प्रारंभापासूनच एक परिणाम झाला तो म्हणजे एतद्देशीय विचारवंतांना लोकशिक्षणाचे महत्त्व पटले. लोकशिक्षणाचे समर्थ माध्यम म्हणून नियतकालिके निघू लागली. त्याद्वारे महाराष्ट्रात लोकशिक्षणाचे भरीव कार्य झाले. बाळशास्त्री जांभेकरांनी इ. स. १८३२ मध्ये 'दर्पण' हे साप्ताहिक आणि इ. स. १८३७ मध्ये 'दिग्दर्शन' हे मासिक सुरू केले. इ. स. १८४० मध्ये गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' हे वृत्तपत्र सुरू केले. याच वृत्तपत्रात गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी इ.स. १८४८ ते १८५० या काळात शतपत्रे लिहिली.

नियतकालिकांची अशी प्रथा एतद्देशीयांनी इंग्रजांपासूनच उचलली. या प्रथेला आवश्यक अशी परिस्थिती यापूर्वी निर्माण झालीच नव्हती. प्रशिक्षणाचा प्रसार, वाचन—लेखनाची आवड, रेल्वे तारायंत्र इत्यादी दळणवळणाच्या साधनांमुळे प्रवासाची व बातम्या मिळण्याची सोय, छापखाने, अल्पमोलाने व श्रमाने लेखनप्रसाराचे साधन ह्या सर्वांमुळे नियतकालिकांच्या उदयाला व प्रसाराला उत्तेजन मिळाले. तत्कालीन नियतकालिकांची नावेही अन्वर्थक होती. लोकशिक्षण देणे, ज्ञानप्रसार करणे, भौतिक शास्त्रांचा जनसामान्यांना परिचय करून देणे हेच, केवळ मनोरंजनापेक्षाही उद्बोधनाचे उद्दिष्ट या नियतकालिकाच्या मागे होते. उदा. 'दिग्दर्शन' या मासिकात बातमीचे सार व भूगोल, इतिहास, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि साधारण विद्या याविषयी थोडा — थोडा मजकूर दुसऱ्या ग्रंथातून घेतलेला किंवा नवा लिहिलेला छापला जाई. लोकांची समजूत पटावी म्हणून प्रसगोपान चित्रही देण्यात येत. हिंदुस्थानचा इतिहास, ग्रीसदेशाचा इतिहास, ग्रेटब्रिटन देशाची राज्यनिती, पदार्थविज्ञान, ज्योति:शास्त्रे, सामान्यवीति इत्यादी महत्त्वपूर्ण विषयांवर या मासिकात लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यावरून नियतकालिकांच्या कार्याचे स्वरूप लक्षात येते. भाऊ महाजन यांनी इ. स. १८५४ मध्ये 'ज्ञानदर्शन' हे त्रैमासिक सुरू केले. पहिल्याच अंकात उद्देश स्पष्ट करताना ते म्हणतात 'मराठी भाषेत विद्यांच्या विषयांवर व त्यात विशेष करून पश्चिम देशातील विद्यांच्या विषयांवर फारच थोडे ग्रंथ आहेत व कित्येक विषयांवर आजतागायत मुळीच लिहिले गेलेले नाही. तेव्हा अशा विषयांची लोकांना माहिती जाणण्यासाठी साधन उपस्थित केले तर त्यामुळे उपयोग होईल असे मनात येवून ह्या त्रैमासिक पुस्तक काढण्याची उपाययोजना अंमलात आणली आहे.

प्रत्येक नियतकालिकांचा उदय होण्यामागे काही ना काही उद्दिष्ट असते असे नियतकालिकांच्या एकंदरीत इतिहासावरून लक्षात येईल. लोकशिक्षणासाठी निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन नियतकालिके निघत होती आणि त्यातून होणाऱ्या विचार जागृतीमुळे प्रबोधन प्रक्रियेला गती मिळत होती ही वस्तुस्थिती महत्त्वाची आहे. या संदर्भात

आणखी एक उदाहरण देता येईल. इ. स. १८४२ मध्ये ख्रिस्ती मिशन यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरिता 'ज्ञानोदय' हे वर्तमान पत्र काढले. स्वाभाविकच त्यातून वारंवार हिंदूधर्मावरील मतप्रचार चालविलेला होता. त्याचे खंडन करण्याकरिता म्हणून मोरभट दांडेकर यांनी इ. स. १८४४ मध्ये 'उपदेशचंद्रिका' या नावाचे मासिक सुरू केले. हिंदू लोकांना आपल्या पवित्र धर्माचे यथार्थज्ञान व्हावे आणि त्यांनी मिशनरी लोकांच्या जाळ्यात सापडू नये त्यासाठी मोरभटांनी हा उपक्रम राबविला. तो अर्थातच स्वयंप्रेरणेने विविध नियतकालिकांची उद्दिष्टे अभ्यासली तर महाराष्ट्राची आध्यात्मिक संस्कृती कशी घडत होती याविषयी चांगले दिग्दर्शन होईल. इ. स. १८७१ साली सुरू झालेल्या 'दंभहारक' या मासिकामध्ये पुढील निवेदन आहे. दर महिन्यात आम्ही सर्वांच्या भेटीस येणार आहोत. येतेवेळी सर्वांना विश्रांती देण्यास्तव आमच्या सामर्थ्यानुसार नानाविध विषय आणत जाऊ. धर्म, नीति, व्यवहार याविषयी निबंध मनोरंजक असून सन्मार्गदर्शक अशी कविता, गोष्टी, रूपके, इत्यादी अनेक विषय ज्यांच्यायोगे श्रीमंत, गरीब, विद्वान, अविद्वान, पुरुष – स्त्रिया यांना त्याद्वारे कोणीही आमच्या सहवासाची इच्छा व्हावी परंतु दुर्व्यसन व दुराचरण निषेधार्थ एखादे वेळेस निस्पृह भाषणाचा प्रसंग आल्यास सज्जन विद्वानांनी क्षमा करावी.

थोडक्यात सांगायचे तर एतद्देशीय लोकांना शहाणे करून सोडण्याचा व त्यांचे नीतिमान उंचावण्याचा जो संकल्प ब्रिटिश राज्यकर्त्यांनी प्रारंभीच केला होता. त्यातील आंतर : लक्षात घेऊन एतद्देशीय नियतकालिकांनीच हा संकल्प सिद्धीस नेण्याचा प्रयत्न स्वयंप्रेरणेने केला आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टीने हेच महत्त्वाचे होते. कालमानानुसार आणि सामाजिक परिवर्तनाच्या गरजांनुसार विविध विषयांना वाहिलेली नियतकालिके या काळात निघाली असे दिसून येते. पाश्चात्य शिक्षणाच्या संस्कारामुळे सुधारकांचा पक्ष उदयाला येत होता. त्याचप्रमाणे एतद्देशीय संस्कृतीच्या पुनरुज्जीवनामुळे परंपराभिन्यांचा, पुराणमतवाल्यांचा अर्थात सनातन्यांचाही पक्ष उदयाला येत होता. ख्रिस्ती मिशनरी विरुद्ध एतद्देशीय सुधारक अथवा नवविचार प्रवर्तक असा संघर्ष उद्भवला आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हिंदुधर्माविरोधी मतप्रचाराचे खंडन करण्याकरिता नियतकालिके निघाली. उदा. भाऊ महाजनांचे 'प्रभाकर' (१८४०) हे निव्वळ मराठी नियतकालिक होते. (निव्वळ या अर्थाने की एतद्देशीय विचार पाश्चात्यांनाही समजावेत म्हणून प्रारंभी अनेक मराठी नियतकालिकांत इंग्रजी मजकूर ही असे.) भाऊ महाजन हे स्वत: सुधारक मतांचे होते. (परमहंस मंडळीच्या पंथमताचे) याच वर्तमानपत्रात लोकहितवादींनी ब्राह्मणांवर, ब्राह्मणी वर्चस्वावर, जातिभेदाच्या कल्पनांवर, धार्मिक अंध:श्रद्धांवर घातक चालीरीतीवर आणि निरुपयोगी पुराण ग्रंथांवर अत्यंत परखड विवरण केले आणि सामाजिक व आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेला चालना दिली. विष्णु भिकाजी गोखले उर्फ विष्णुबुवा ब्रह्मचारी (इ. स. १८२५ ते १८७१) हे त्या काळात सनातन धर्माचा पुरस्कार करणारे आणि हिंदुधर्मावरील हल्ले परतवून लावण्याचा हिरीरीने प्रयत्न करण्यात अग्रगण्य होते. सप्तशृंगीच्या डोंगरावर त्यांनी तपश्चर्या केली होती. तेव्हा 'पाखंड मताचे खंडन करून वैदिक धर्माची पुन:स्थापना करण्याचा आदेश त्यांना मिळाला' अशी हकीकत आहे. त्यांच्यावर आणि त्यांच्या अनुयायांवर पुष्कळच खरमरीत टीका 'प्रभाकर' मध्ये येत असे. त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी प्रतिपक्षांनी इ. स. १८५४ मध्ये वर्तमानपत्रिका हे नियतकालिक सुरू केले. त्यांचे संपादक भवानी विश्वनाथ कानविंदे होते. या दोन्ही नियतकालिकांतून प्रतिपक्षांच्या म्हणजे सुधारक आणि सनातनी यांच्या चकमकी झडत त्यामुळे अशी नियतकालिके वाचण्याची चटक वाचकांना लागली.

धार्मिक कारणासाठी नियतकालिके निघाली होती. वर्तमानदीपिका हे पुराणमताभिमानी पण धर्मसुधारक मताची होती. 'ज्ञानप्रकाश' (१८४९), 'इंद्रप्रकाश' (१८६२) ही पत्रे राजकीय व सामाजिक विषयांची चर्चा करीत. लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादी मंडळी 'ज्ञानप्रकाश'च्या आद्यप्रवर्तकात होती. विष्णू परशराम रानडे, बाबा गोखले इत्यादी तत्कालीन सुधारणावादी विचारवंतांचे लेख त्यात येत असत. ('अरण्यपंडित' या विचित्र नावाचे एक पाक्षिक इ. स. १८८१ मध्ये म्हणजे मालोत्तर काळात निघत होते. त्यात लौकिक व धार्मिक विषयांवर निर्भिड निबंध येत.)

'सत्यशोधक सातारा' (१८७१), माळवा अखबार 'खानदेश वैभव' (१८६८) अशी प्रादेशिक नियतकालिकेही काही काळ निघत होती. 'पुणे वैभव' हे जुन्या कर्मठपंथाचे मुखपत्र होते. (गोपाळराव जोशींनी चहाप्रकरणाची यादी यातच प्रसिद्ध केली होती आणि हरिभाऊ आपटे यांची 'मधली स्थिती' ही कादंबरी पुढे याच पत्रातून प्रसिद्ध झाली. 'मराठी ज्ञानप्रसारक' (१८५०), 'सृष्टिदान' (१८५५), 'विद्याकल्पतरू' (१८६८),'विद्यामाला' (१८७८) इत्यादी ज्ञानविज्ञानाला वाहिलेली मासिके नाना विद्या, कला, कौशल्य, युक्ती व कारखाने, दुकाने, औषधी व त्यांची क्रिया हुन्नर इत्यादीं अनुभवसिद्ध निरूपण व उपयुक्त माहिती यात असे.

'विचारलहरी' (१८७४) हे नियतकालिक कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी सुरू केलेले, सन्दर्भदीपिका (१८७७) हेही असे एक नियतकालिक, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला 'जशास तसे' या नावाचे मासिक काशिनाथ महादेव थत्ते यांनी जमीनदार, कारागीर, इंजिनियर आणि ज्ञानसंग्रह लोक यांच्यासाठी सुरू केले.

## सारांश :–

नियतकालिकांनी लोकशिक्षणाचे भरीव कार्य कसे केले हे लक्षात येईल. प्रारंभीच्या काळात शालेय अभ्यासक्रमासाठी ग्रंथनिर्मिती झाली तेव्हाच मराठी गद्य वाङ्मयाचा पाया घातला गेला. 'नियतकालिकांनी' मराठी गद्य लेखनाची शैली घडवली. लोकशिक्षणाबरोबर समाजामध्ये वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे, राष्ट्रामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे आणि पुढे वाङ्मयात नवीन युग निर्माण करण्याचे महान कार्य नियतकालिकांनी केले. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय प्रबोधनातून पुढे ज्या चळवळी निर्माण झाल्या त्या चळवळीस वाहिलेली नियतकालिके निघाली. ज्या संस्था निघाल्या त्याचीही मुखपत्रे म्हणून नियतकालिके निघाली कारण नियतकालिके हे शिक्षण आणि ग्रंथनिर्मिती यांच्या इतकेच एक समर्थ साधन आहे. म्हणून वाङ्मयाच्या अभिवृद्धिचा , विचारांच्या विकासाचा, परिस्थितीच्या परिवर्तनाचा आणि ह्या सर्वांच्या परस्परांवरील परिणामांचा विचार करताना म्हणजेच समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचा परामर्श घेतांना नियतकालिकांच्या भरीव कार्याचे स्वरूप थोडक्यात असे की, त्यांनी आपल्या परीने प्रबोधनाचे कार्य केले. सुशिक्षित समाजात चिकित्सक बुद्धी वाढविली; समाजाला विचारप्रवृत्त करून विचार स्वातंत्र्य असण्याची भावना त्यासाठी नवे लेखन आणि नवे लेखक उदयाला आणले.

एतद्देशीय लोकांना शहाणे करून सोडण्याचा व त्यांचे नीतिमान उंचावण्याचा जो संकल्प ब्रिटिश राज्यकर्त्यांनी प्रारंभीच केला होता. त्यातील 'आंतर : कोऽपि हेतु :' लक्षात घेऊन एतद्देशीय नियतकालिकांनीच हा संकल्प सिद्धीस नेण्याचा प्रयत्न स्वयंप्रेरणेने केला आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टीने हेच महत्त्वाचे होते. कालमानानुसार आणि सामाजिक परिवर्तनाच्या गरजांनुसार विविध विषयांना वाहिलेले नियतकालिके या काळात निघाली असे दिसून येते.

लोकशिक्षणासाठी निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन नियतकालिके निघत होती ही वस्तुस्थिती महत्त्वाची आहे.

## संदर्भग्रंथ सूची :–


| संदर्भ ग्रंथ | | संपादक |
|---|---|---|
| १) अक्षरगाथा | – | मा. म. जाधव |
| २) युगवाणी | – | प्रफुल्ल शिलेदार |
| ३) अस्मितादर्श | – | गंगाधर पानतावणे |
| ४) कवितारती | – | म.सु. पाटील |
| ५) आकांक्षा | – | अरूणा सबाने |

६) महाराष्ट्र साहित्य पत्रिका
७) अक्षरयात्रा
८) समक्ष समीक्षा
९) पुरोगामी साहित्य


❖❖❖

# श्रीचक्रधर स्वामींचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे तत्त्वज्ञान व दृष्टांतपाठाची पार्श्वभूमी

प्रा.डॉ. अविनाश मेश्राम
सहयोगी प्राध्यापक
कला महाविद्यालय, बुलडाणा, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९९२३२१९३९४

## सारांश :–

महानुभाव संप्रदायाचे आद्यप्रवर्तक श्री चक्रधरस्वामी आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व 'लीळाचरित्र' आणि 'दृष्टांतपाठ' या मौलिक ग्रंथामधून दिसून येते. त्यांचे महाराष्ट्रावर प्रेम होते. तसेच ते विलक्षण स्वातंत्र्यवादी होते. स्वातंत्र्याप्रमाणेच सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य ही चक्रधरांची आवडती तत्त्वे होती. ब्रम्हचर्य व संयम पाळण्याबाबत त्यांचा कटाक्ष असे. चक्रधर स्वामींचे विदर्भ हे कार्यक्षेत्र होते. आपल्या पंथाचे लिखाण मराठीमध्येच असावे असे त्यांचे म्हणणे असे.

केसोबासांनी लीळाचरित्रातील काही दृष्टांत कथा वेगळया केल्या, त्यांना चक्रधरोक्त सूत्रे आणि अखेरीस दार्ष्ट्रान्तिक जोडून वेगळा ग्रंथ निर्माण केला. तो म्हणजे दृष्टांतपाठ होय. प्रत्येक दृष्टांतावर दार्ष्ट्रान्तिक असे दृष्टांतपाठाचे स्वरूप आहे. महानुभावांची प्रकाशित प्रमुख ग्रंथसंपदा भरपूर आहे. तसेच दृष्टांतपाठाचे महत्त्व मराठी साहित्यात खूप मोठ्या प्रमाणात आहे.

## प्रस्तावना :–

महानुभाव संप्रदायाचे आद्यप्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी आहेत. चक्रधर स्वामींच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचे दर्शन लीळाचरित्रामधून घडते व त्यांच्या उदात्त विचारांचाही परिचय आपणास होतो. 'लीळाचरित्र' हा मराठी भाषेतील आद्य गद्यग्रंथ. 'श्री सार्थ ज्ञानेश्वरी' (इ.स. १२९०) च्या आधी लीळाचरित्राचे लेखन झाले. महानुभाव साहित्य संपदेतील 'लीळाचरित्र' आणि 'दृष्टांतपाठ' हे ग्रंथ अतिशय मौलिक स्वरूपाचे मानले जातात. कारण सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या जीवन चरित्राशी हे ग्रंथ निगडीत आहेत.

तेराव्या शतकामध्ये म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या काही वर्षे आधी गुजरातमध्ये भरवच (सध्याचे भडोच) या भागावर त्रिमल्लदेव नावाचा एक राजा राज्य करीत होता. त्याचा विशालदेव नावाचा एक प्रधान होता. त्याला प्रथम संतान नव्हते. पुढे नवस केल्याने त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव हरिपाळदेव असे ठेवण्यात आले. याने पुढे पंथ स्थापन केला त्याचे नाव 'महात्मा पंथ' असे होते. आई–बापांनी लहानपणीच हरीपाळाचे लग्न करून दिले. माहात्म्याच्या पत्नीचे नाव होते कमळाईसा. या माहात्म्याचे आत्मचरित्र उपलब्ध नसले तरी त्यांचे विद्वान शिष्य म्हाइंभट यांनी या माहात्म्याच्या ज्या आठवणी लिहून ठेवल्या त्या 'लीळाचरित्र' या नावाने प्रसिध्द आहेत. हा मराठी भाषेतील 'आद्यचरित्रग्रंथ' आहे. याची निर्मिती शके १२०८ पूर्वी म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच्या अगोदर झालेली आहे.

एकदा घरगुती कारणाने हरिपाळदेव अत्यंत उदास झाले व त्यांनी रामटेकच्या यात्रेला जाण्याचे ठरविले. तेव्हा आई–वडिलांनी त्यांना प्रथम समजाऊन सांगितले. परंतु हरिपाळाने हट्ट न सोडल्याने आई–बापानी मोठया कष्टाने त्यांना परवानगी दिली. अशाप्रकारे काही नोकरांसोबत हरिपाळदेव निघाले, पण वाटे त्यांची व त्यांच्यात लोकांची चुकामुक झाली तसेच काही लोकांना त्यांनी घरी पाठवून ते रामटेकची वाट सोडून ऋध्दिपुराकडे वळले. या पुण्यभूमीत त्यांची गाठ श्री गोविंदप्रभू नावाच्या सर्वसंगपरित्यागी विद्वानाशी झाली व त्यांनी गोविंदप्रभुंना आपले गुरू केले आणि तिथेच त्यांनी चक्रधरांना दीक्षा दिली. श्री गोविंद्रप्रभुंनी हरिपाळदेवाला मंत्रोपदेश दिला व चक्रधर या नव्या नावाने ते प्रसिध्द झाले. अशाप्रकारे चक्रधरांना महाराष्ट्रात गोविंदप्रभुसारखा गुरू लाभला. त्यांनी आपले वास्तव्य महाराष्ट्रात केले. महाराष्ट्र त्यांना फार पसंत होता. चक्रधरोक्त या सूत्रपाठ ग्रंथामध्ये ते आपल्या शिष्यांना उपदेश देताना म्हणतात, ''आपणे– या तें कव्हणी नेणे आपण कव्हणातें नेणिजे ऐसां स्थानी असावे. कानडदेशा तेलगदेशा व वचावे. ते विषयबहळ देश: तेथ अवधूत मान्य: महाराष्ट्री असावे'' अशाप्रकारे महाराष्ट्रावर त्यांचे प्रेम होते. तसेच त्यांची स्वातंत्र्यभावना जोरकस अशी होते. त्यावेळी देवगिरीच्या रामदेव यादवांची सत्ता महाराष्ट्रावर होती. देशांवर

कुणाचेही परकीय आक्रमण नव्हते. म्हणून स्वातंत्र्यासाठी त्यांना लढा द्यावा किंवा प्रयत्न करावे नाही. तरीपण ते विलक्षण स्वातंत्र्यवादी होते. 'श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ' या ग्रंथात 'आचारमालिका' या प्रकरणात पहिलेच वाक्य 'स्वातंत्र्य हा मोक्ष पारतंत्र्य हा बंध' आढळते. तसेच ''आपण कव्हणा आधीन होआवे नाही: आपण्या अधीन कव्हणातें करावे नाही'' असे श्रीचक्रधरांचे सांगणे असे. यावरून ते स्वातंत्र्याचे कट्टर समर्थक होते याची साक्ष पटते.

सातंत्र्याप्रमाणेच सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य ही चक्रधरांची आवडती तत्तवे होती. म्हणूनच चक्रधरांना त्यांचे शिष्य 'महात्मा' या शब्दाने संबोधन करीत असत. कारण महात्त्मा हा शब्द मुमुक्षु किंवा साधू यांना उद्देशून लावण्यात येत असे तसेच त्यांच्या तोंडी शिष्यांनाही संबोधताना महात्मा हाच शब्द असे. चक्रधरस्वामी आपल्या शिष्यांना सत्यार्जनासंदर्भात सांगतात कि, ''महात्मेनि प्रियवक्तेया होवावें: महात्मेनि सत्यार्जवा होआवें: हांसतांहि लटिकें न बोलिजे: आपणे आपासि ज्ञातां विरक्तांचा संगू कीजे: तुम्ही महात्मे की: तुम्हीं चतुर्विध भूतग्रामां अभयो देआवे कीं: राग, क्रोध, मद, मस्तरू याचा त्यागु याचिं नांव संन्यासु: कीं: अहंतेचे मूळ सकंदी उपडावे नाई का? येरव्ही अंकुरू निगेती: मग शांतीची रोपे लावावी''.

सत्याप्रमाणेच अहिंसेवर त्यांचे फार प्रेम होते. ''चंद्रयुगी हिंसा अधर्मु: तुमचेनि मुंगी राड न होवावी'' असे श्रीचक्रधर स्वामी म्हणतात. त्याचप्रमाणे चक्रधर म्हणतात, ''एथौनि तुम्ही ऐसेया होआवें कीं हा जनु तुमतें डोईयें मारील परि तुम्ही डोईचि ओडवावी की: तुम्हां मारीता पूजिता समानुचि होआवा'' हे एक अहिंसेचे त्यांचे श्रेष्ठ उदाहरण म्हणावे लागेल. तसेच ते अहिंसेचे किती पुरस्कर्ते होते याचे प्रत्यंतर येते. एकदा तर चक्रधरांच्या भ्रमंतीमध्ये चक्रधर आपल्या शिष्यमंडळीसह एका देवळापाशी आले. शिष्य उन्हाने तापून निघाले होते आणि त्यांना तहान लागल्यामुळे पाण्याची आवश्यकता होती. त्यामुळे काहीशा पेटून निघालेल्या अवस्थेत चक्रधराच्या एका शिष्याने गुरवाला देवळाच्या पुजाऱ्याला मोठया कडक शब्दात पाणी मागितले, तेव्हा चक्रधर त्या शिष्याला म्हणाले होते, ''महात्मेनि प्रियवक्तेया होआवे: तुम्ही महात्मे की: तुम्ही चतुर्विद्या भूतगामी अभयो दे यावे की: राग, क्रोध, मदमत्सरू यांचा त्यागू याचि नाव संन्यासु की: अहंतेचे मूळ सकंद उपडावे नाईका: येरव्ही अंकुस निगेति. मग शांतोची रोपे लावावी:'' असे सत्य व अहिंसा यांचा पुरस्कार करताना चक्रधर म्हणतात.

ब्रम्हचर्य व संयम यांचे माहात्म्य चक्रधरस्वामींनी नेहमी कथन केले आहे. संयमासंदर्भात चक्रधरस्वामी म्हणतात, ''विषयो न सेवी तरी जीव काइ गा मरतु असे?: निरोधु साहिलेया अधिका योग्यता होए: दक्षता होए: विषय अनुतापासी आश्रयो नरकासि हेतु: पुरूष जेतुल जेतुली विषयसेवा करी तेतुल तेतुली धर्मी निवळ जाए:'' श्री चक्रधराचे एक शिष्य नागदेव विवाहित असूनही असेच ब्रम्हचर्य पाळणारे होते पण त्यापेक्षाही त्यांचे शिष्य केशिराज बास हे तरूण व विवाहित असूनही वैराग्यामार्गात इतके दृढ होते की त्यांना आम्हानी पत्नीसह एका खोलीत कोंडले तरी ते आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत. तेव्हा उलट त्यांचे असे दृढ वैराग्य पाहून त्यांच्या पत्नीनेच उलट आप्तांना सांगितले की, ''आता हे योगिये जाले यांना जाऊ देयावे: याचे पाप मज लागतु असे'' म्हटले आहे. हा प्रसंग ऐकून नागदेवाचार्यांना समाधान झाले व माझा केशबु शुक योगींद्र की गा'असे प्रशंसेचे उद्गार त्यांनी काढले (स्मृ. १३) यावरून चक्रधरांच्याा शिष्यामध्ये ब्रम्हचर्य किती काटेकोरपणे पाळले जात होते याचे प्रत्यंतर येते.

केशीराजबासावर आलेला आणखी एक प्रसंग. त्याही प्रसंगाला केशिराजांनी कसे तोंड दिले याची माहिती 'स्मृतिस्थळा' च्या शब्दातच पाहा— ''एक वेळ केसीबास अटना एकलेचि गेले होते: तव अवकाळ पाणि लागले: एका गावी भीक्ष गेले: तवे एका घरी वेल्हारे याची कन्या (व्यापाऱ्याची लेक) तिया देखीले: केसोबास रूपें सुंदर होते: देहयुक्त होते: तिया मनी अभिळासीले: आपणची भीक्षा घातली: आणि पुसले: 'कोठे असणे?' तिही यैसा माथेयाचा अनुकाल केला: आणि उदासीनताचि चालिले'' व्यापाऱ्याची कन्या केशिराजांच्या सुंदर रूपावर भाळली. 'तिया मनी अभिलासीले' आणि तिने विचारले, 'कोठे असणे?' त्यांनी तिचे मन ओळखले आणि मानेनेच नकार देउन आपल्यास उदासीन दशेत पुढे चालू लागले.

पण वाणिक्कन्या एवढयावरच कुठली थांबायला? तिचे त्यांच्यावर पाळत ठेवली. ''तवं वीळचा प्रजन्य आला. गावातु वेसेसि लिंगाचे देऊळ होते. तेथ वीळचां निद्रास्थाना आले. सरीसा इडला वैसा फुटा होता: ती पुडां ठेउनि एकी कोणी बैसले.... तवं केतुलेया एका काळा ते बाई कांवळे याची बुंथि घालूनि देवळातु आली ऐसे पाहीले. तवं केसोबासाते देखीले आणि जानुवरि बैसली:'' प्रत्यक्ष स्वत:च्या मांडीवर येऊन बसलेल्या त्या स्त्रीला पाहून केशिराज प्रथम मनाशी दचकले. पण त्याही स्थितीत त्यांनी मार्ग काढलाच. ते म्हणाले ''उठा: तुम्ही म्हणाल ते आईकां, म्हणौनि खालि बैसवीलि आणि तिथे बाईयेते म्हणितले, मी उवायां जातो, तुम्ही येथ यैसी बैसा, म्हणौनिक फुटा, काही परिग्रहो होता तो तसाची ठेवला, तिथेसि विश्वासु वाटला. तैसे देऊळबाहीरी निगाले आणि तैसेचि श्रीचक्रधर म्हणौनि चालिले, तिचा बाइया यैसीं नावेक वाट पाहिली: तैथे तीथे मान जाले, भियाली, आपुलेया घरी गेली.....''

केशिराज तेथून निघाले ते तडक नागदेवापाशी आले. अवघा वृतांत सांगितला. तेव्हा संतुष्ट होऊन नागदेवांनी उद्‌गार काढले. ''एकें अनिष्ट आलेयां आपणयातें राखीले: एकें एकातें राखीले: केशवदेनि मार्गातें राखीलें की गा: (स्मृ. १०६) स्मृतीस्थळकार य प्रसंगाच्या शेवटी लिहितात, ''ऐसे भटोवासी (नागदेव) प्रसंगीलें:'' (स्मृ. १०५)

आपली पत्नी किंवा परकी स्त्री यांच्याबद्‌दल एवढया कटाक्षाने वागणारे केशिराज ब्रम्हचर्यव्रताच्या पालनात कसलीच कसूर ठेवीत नसत. त्यांची कामाइसे या नावाची एक बहीण नेहमी त्यांच्याजवळ येऊन बसे. केशिराजांना तिचे हे जवळकीचे वर्तन, उठणे–बसणे पसंत नसे. त्यावर कामाइसा हसून म्हणे, 'आपण भाऊ बहीण आहोत, हे इथली सारीजणं जाणतात,' त्यावर तिचा निषेध करीत 'भावांडे ऐसे गुरूकूल जाणे, परि लोकु नेणे की' (अ.स्मृ. ४३) असे सांगून तिला जवळ न येण्याबद्‌दल बजावले. तसेच अस्पृश्यतासुध्दा चक्रधरांना अमान्य होती. ते तर अस्पृश्यता पाळत नव्हते. कुणाच्याही घरी जेवण घेत होते. असे त्यांच्या चरित्रावरून प्रत्ययास येते. त्यांनी आपल्या पंथामध्ये स्पृश्य–अस्पश्य असा कोणताही भेद न करता शिष्यशिष्यिणीमध्ये समानता ठेवली.

चक्रधरस्वामींचे विदर्भ हे कार्यक्षेत्र होते. त्यांचे गुरू जसे महाराष्ट्रीन होते तसेच शिष्यशिष्यिणीसुध्दा महाराष्ट्रीय होते. आपल्या पंथाचे लिखाण मराठीमध्येच असावे असे त्यांचे म्हणणे असे. एकदा केशवराजसूरी हा शिष्य चक्रधराचा 'सेक्रेटरी' नागदेव यांच्याकडे येऊन म्हणाला की, ''मी उध्दरण संसरण ही प्रकरणे संस्कृतात पद्यरूपाने लिहू का?'' तेव्हा नागदेवाने उत्तर दिले, ''नको गा केशवदेया: येणें माझिये स्वामीचा सामान्यु परिवारू नागवेल की: म्हणोनिची चक्रधर महाराष्ट्रीये निरोपिले गा:'' असे या महात्मेचे मराठीवर प्रेम होते. त्यांनी आपल्या शिष्यांना मराठीमधून काव्येचरित्रे लिहिण्यास नेहमी प्रवृत्त केले. त्याचप्रमाणे शिष्यांनी सुध्दा मराठीमध्ये लेखन केले. आजही लीळाचरित्रासारखे ग्रंथ त्याचे बोलके उदाहरण आहे. त्यांनी महाराष्ट्रावर प्रेम केले व शिष्यांनाही करायला लावले. सारा प्रांत आपल्या वास्तव्याने पुनीत केला ही महाराष्ट्राच्या दृष्टीने फार मोठी व अभिमानास्पद गोष्ट ठरली.

केसोंबासांनी लीळाचरित्रातील काही दृष्टांत कथा वेगळया केल्या. त्यांना चक्रधरोक्त सूत्रे आणि अखेरीत दाष्ट्रांतिक जोडून वेगळा ग्रंथ निर्माण केला. तो म्हणजे 'दृष्टांतपाठ' होय. सूत्र,चक्रधरांनी तत्वस्पष्टीकरणार्थ वेळोवेळी सांगितलेले दृष्टांत आणि प्रत्येक दृष्टांतावर दार्ष्टान्तिक असे दृष्टांतपाठाचे स्वरूप त्यांनी तयार केले. या ग्रंथात ११४ दृष्टांताचा समावेश असून इ.स. १२८० च्या सुमारास हा ग्रंथ तयार झाला असे मराठी वाड.मयेतिहासकारांचे मत आहे. केशीराजबासावर आलेला आणखी एक प्रसंग त्याही प्रसंगाला केशिराजांनी कसे तोंड दिले याची माहिती 'स्मृतिस्थळा' च्या शब्दातच पाहा–''एक वेळ केसीबास अटना एकलेचि गेले होते: तव अवकाळ पाणि लागले: एका गावी भीक्ष गेले: तवे एका घरी वेल्हारे याची कन्या (व्यापाऱ्याची लेक) तिया देखीले: केसोबास रूपें सुंदर होते. देहयुक्त होते: तिया मनी अभिळासीले: आपणची भीक्षा घातली: आणि पुसले: 'कोठे असणे?' तिही यैसा माथेयाचा अनुकाल केला: आणि उदासीनताचि चालिले''. व्यापाऱ्याची कन्या केशिराजांच्या सुंदर रूपावर भाळली. 'तिया मनी अभिलासीले' आणि तिने विचारले कोठे असणे? त्यांनी तिचे मन ओळखले आणि मानेनेच नकार देऊन आपल्यास दशेत उदासीन पुढे चालू लागले.

पण वाणिक्कन्या एवढयावरच कुठली थांबायला? तिचे त्यांच्यावर पाळत ठेवली. ''तवं वीळचा प्रजन्य आला. गावातु वेसेसि लिंगाचे देऊळ होते. तेथ वीळचां निद्रास्थाना आले. सरीसा इडला वैसा फुटा होता: ती पुडां ठेउनि एकी कोणी बैसले.... तवं केतुलेया एका काळा ते बाई कांवळे यायची बुंथि घालूनि देवळातु आली ऐसे पाहीले. तवं केसोबासाते देखीले आणि जानुवरि बैसली:'' प्रत्यक्ष स्वत:च्या मांडीवर येऊन बसलेल्या त्या स्त्रीला पाहून केशिराज प्रथम मनाशी देचकले. पण त्याही स्थितीत त्यांनी मार्ग काढलाच. ते म्हणाले ''उठा: तुम्ही म्हणाल ते आईकां, म्हणौनि खाली बैसवीलि आणि तिथे बाई येते म्हणितले, मी उवायां जातो, तुम्ही येथ यैसी बैसा, म्हणौनि फुटा, काही परिग्रहो होता तो तसाची ठेवीला, तिथेसि विश्वासु वाटला. तैसे देऊळबाहीरी निगाले आणि तैसेचि श्री चक्रधर म्हणौनि चालिले, तिचा बाइया यैसीं नावेक वाट पाहिली: तैथे तीये मान जाले, भियाली, आपुलेया घरी गेली.....''

केशिराज तेथून निघाले ते तडक नागदेवापाशी आले. अवघा वृतांत सांगितला. तेव्हा संतुष्ट होऊन नागदेवांनी उद्‌गार काढले. ''एकें अनष्टिं आलेयां आपणयातें राखीलें: एकें एकातें राखीले: केशवदेनि मार्गातें राखीले की गा:'' (स्मृ. १०६) स्मृतीस्थळकार या प्रसंगाच्या शेवटी लिहितात, 'ऐसे भटोबासी (नागदेव) प्रसंगीले:' (स्मृ. १०५)

आपली पत्नी किंवा परकी स्त्री यांच्याबद्‌दल एवढया कटाक्षाने वागणारे केशिराज ब्रम्हचर्यव्रताच्या पालनात कसलीच कसून ठेवीत नसत. त्यांची कामाइसे या नावाची एक बहीण नेहमी त्यांच्याजवळ येऊन बसे केशिराजांना तिचे हे जवळकीचे वर्तन, उठणे–बसणे पसंत नसे. त्यावर कामाइसा हसून म्हणे, आपण भाऊ–बहीण आहोत, हे इथली सारीजणं जाणतात, त्यावर तिचा निषेध करीत 'भावांडे ऐसे गुरूकुल जाणे, परि लोकु नेणे की, (अ. स्मृ ४३)

असे सांगून तिला जवळ न येण्याबद्दल बजावले. यावरून त्यांच्या पंथात ब्रम्हचर्य व संयम किती काटेकोरणपणे पाळले जात असे याचा प्रत्यय येतो.

## महानुभाव पथांचे तत्त्वज्ञान :—

'सूत्रपाठ' या ग्रंथात पंथाचे तत्त्वज्ञान विशद झालेले आहे. ते स्पष्ट करताना श्रीचक्रधर स्वामींनी पुढील चार मूळ पदार्थ मानलेले आहे. १) जीव, २) देवता, ३) प्रपंच, ४) परमेश्वर यापैकी १) जीव — बध्दमुक्त, २) देवता —नित्यबध्द, ३) परमेश्वर— नित्यमुक्त ४) प्रपंच—जड, नाशवंत आहे.त्यांच्या मते हे चार पदार्थ वेगवेगळे असून त्यापैकी कोणत्याही दोहोंत ऐक्य होणे कधीच शक्य नाही. म्हणून महानुभाव तत्वज्ञानाला 'द्वैत तत्वज्ञान' असे म्हणतात.

## महानुभावांची प्रकाशित प्रमुख ग्रंथसंपदा :—

तेरावे शतक हा मराठी वाङमय निर्मिताचा प्रारंभिक काळ आहे. याच काळात महाराष्ट्रात चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाची स्थापना केली. आपल्या पंथाचे तत्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मराठीतच बोलण्याची व लिहिण्याची सक्ती त्यांनी आपल्या शिष्यांना केली. त्यामुळे महानुभाव पंडितांनी मराठी भाषेत ग्रंथ लेखन करून मराठीचे गद्य व पद्य ही दोन्हीही अंगे तिच्या प्रारंभीच्या काळातच विकसित केली. या महानुभावांची साहित्यसंपदा खालीलप्रमाणे आहे.

### अ) महानुभावांचे गद्य वाङ्मय

| | |
|---|---|
| १) चरित्रात्मक ग्रंथ — | १) लीळाचरित्र — म्हाईभट |
| | २) ऋध्दीपूर लीळा — म्हाईभट |
| | ३) स्मृतिस्थळ — नरेंद्र परसरामबास |
| | ४) पूजावसर — वाईदेवव्यास |
| २) तत्वज्ञानपर ग्रंथ — | १) सिध्दांतसूत्रपाठ — संकलक केशिराजबास |
| | २) दृष्टान्तपाठ — संकलक केशिराजबास |

### ब) महानुभावांचे पद्य वाङ्मय

| | |
|---|---|
| अ) साती काव्य ग्रंथ — | १) रूक्मिणी स्वयंवर — नरेंद्र |
| | २) शिशुपाल वध — भास्करभट्ट बोरीकर |
| | ३) उद्धवगीता — भास्करभट्ट बोरीकर |
| | ४) वछाहरण — दामोदर पंडित |
| | ५) ज्ञानप्रबोध — विश्वनाथ बाळापूरकर |
| | ६) सहयाद्रिवर्णन — खळोव्यास |
| | ७) ऋध्दिपूरवर्णन — नारायणव्यास बहाळिये |
| ब) इतर पद्य ग्रंथ — | १) महदंबेचे धवळे पूर्वार्ध ८३ धवळे |
| | महदंबेचे धवळे उत्तरार्ध ६३धवळे |
| | २) मातृकी रूक्मिणी स्वयंवर |
| | ३) मुर्तिप्रकाश — केशिराजव्यास |

## दृष्टांतपाठाचे महत्त्व व पार्श्वभूमी :—

केसोबासांनी लीळाचरित्रातील काही दृष्टांतकथा वेगळया केल्या. त्यांना चक्रधोक्त सूत्रे आणि अखेरीस द्राष्टांतिक जोडून वेगळा ग्रंथ निर्माण केला, तो म्हणजे 'दृष्टांतपाठ' होय. सूत्र,चक्रधरांनी तत्वस्पष्टीकरणार्थ वेळोवेळी सांगितलेले दृष्टांत आणि प्रत्येक दृष्टांतावर दार्ष्टन्तिक असे दृष्टांतपाठाचे स्वरूप त्यांनी तयार केले. या ग्रंथात ११४ दृष्टांताचा समावेश असून इ.स. १२८०च्या सुमारास हा ग्रंथ तयार झाला असे मराठी वाङमयेतिहासकारांचे मत आहे.

म्हाइंभटाच्या लीळाचरित्रातील स्वामींच्या तोंडची तत्वज्ञानपर वचने एकत्र करून व त्याचे नीट व्यवस्थापन करून म्हणजे त्यांचे वर्गीकरण, परस्परांशी संबंध लावून चक्रधरांचा सूत्रपाठ केशिराजांनी तयार केला. यासंबंधी नागदेवाचार्य चरित्रातील 'शास्त्रप्रकरणान्वयनुज्ञा' या स्मृतीत असे असे लिहिले आहे, ''मग मागीते केसोबासी भटोबासाते पुसिले: भटो, तरि शास्त्रप्रकरणान्वयोलावू?' ते भटोबासी मानिले: मग म्हणितले: 'तरि जे जेथचे ते तेथीलच माझेनि विचारे लावावे गा:' मग केसोबासी भटोवासाते पुसपुसो अनुक्रमे 'प्रकरणान्वयो लाविला: जे जयाचे नाम ते तया (प्रकरणा) ठेविले.''

लीळाचरित्रात इतस्तत: विखुरलेल्या स्वामींच्या वचनांची ज्यांना ओळख असेल अशी एकमेव व्यक्ती म्हणजे नागदेवाचार्य होते. पण त्यांच्या अनुज्ञेने व स्वत:च्या धारणाशक्तीने केशिराजांनी हे कार्य मन लावून केले. केशिराजांनी ते ज्या प्रकारे केले त्यावर प्रसन्न होऊन नागदेवांच्या तोंडून उद्‌गार आले, 'केशवद्या, मग मागा शास्त्र जाये ना ऐसे तुवा केले' (स्मृ. २२४) आचार्याचा त्यांच्या धारणाशक्तीवरील विश्वास आणि स्वामींच्या परशास्त्रसिध्दांतावरील त्यांची अचूक पकड या दोन गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे नागदेवांच्या या अभिप्रायामधिल धन्यता केशिराजबासांना आशिर्वादच ठरली आणि त्याचबरोबर मराठी वाङमयाच्या इतिहासांतही ही रचना महत्वाची आणि मैलाचा दगड ठरली.

'सूत्रपाठ' म्हणजे चक्रधर स्वामींची वाङमयीन मूर्ती मानली जाते. महानुभाव पंथीयांच्या मते, तो 'शास्त्रवचनरूप परमेश्वर' आहे. असे असले तरी सूत्रपाठाचे कर्तृत्व खुद्द नागदेवांनी केशिराजबासांनाच दिले आहे. सूत्रांची निवड करणे, त्यांची योग्य ठिकाणी स्थापना करणे, प्रत्येक सूत्राचा एकमेकांशी संबंध लावणे हे शास्त्रीय पध्दतीचे कार्यही कमी प्रतीचे नाही, किंबहुना ते स्वतंत्र ग्रंथरचनेइतकेच महत्वाचे आहे असे यासंबंधी नागदेवांचे मत आहे. विशेषत: चक्रधरांच्या वचनांची व्यवस्था आपल्या डोळयादेखत लावणे ही नागदेवचार्याच्या दृष्टीने फार मोठी गरज होती. लीळाचरित्रासारख्या निरनिराळया प्रसंगातून चक्रधरंच्या मुखांनी वचने फक्त नागदेवांनाच माहीत होती. तो विवेक पुढच्या काळातील पंथीयांना असणे अशक्य होते. म्हाइंभटांनी जेव्हा 'लीळाचरित्रासाठी निरनिराळया लोकांच्याकडून लीळा गोळा केल्या. तेव्हा आधी त्या नागदेवांना दाखवून त्यांचे मत घेणे त्यांनाही अनिवार्य वाटले. नागदेवांनाही काही लीळा ऐकताना 'हे श्रीमुखीचे शब्द न होती' असा अभिप्राय दिलेला दिसतो. नागदेवांचा हा अधिकार आणि हा विवेक त्यांच्या शिष्यांनी आपल्या अंगी बाणवून हा ग्रंथ रचला. तेव्हा 'मजा मागा शास्त्र जायेना ऐसे तुवा केले? असा शेरा नागदेवचार्यांनी देऊन केशीराजांचे कौतुक केले. केशीराज हे एक कुशल संकलक, प्रतिभावान कवी व विद्वान ग्रंथकार होते. त्यांनी महानुभाव पंथ व मराठी भाषा यांची जन्मभर एकनिष्ठतेने सेवा केली. व शके १२३८ (सांप्रदायिक कालगणनेप्रमाणे शके १२२८) मध्ये वयाच्या साठीच्या जवळपास देहत्याग केला. 'लीळाचरित्र' व 'सूत्रपाठ' हे दोन्ही ग्रंथ संकलनात्मक असले तरी महानुभाव पंथाचे तत्वज्ञान समजण्यासाठी यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## निष्कर्ष :—

१) श्री चक्रधरस्वामींचे महाराष्ट्रावर प्रेम होते.
२) श्री चक्रधरस्वामी स्वातंत्र्यवादी होते.
३) श्री चक्रधरांची सत्य, अहिंसा व ब्रम्हचर्य ही आवडती तत्वे होती.
४) श्री चक्रधरांचा ब्रम्हचर्य व संयम यांच्यावर कटाक्ष होता.
५) श्री चक्रधरांना अस्पृश्यता अमान्य होती.
६) श्री चक्रधरांचे कार्यक्षेत्र विदर्भ होते.
७) आपल्या पंथाचे लिखाण मराठीमध्ये असावे याबद्‌दल ते आग्रही होते.
८) श्री चक्रधर स्वामींनी जीव, देवता, प्रपंच, परमेश्वर ही चार मूळ पदार्थ मानलेले असून हे चार पदार्थ वेगवेगळे असून त्यापैकी कोणत्याही दोहोंत ऐक्य होऊ शकत नाहीत असे तत्त्वज्ञान मांडले म्हणून त्यांच्या तत्वज्ञानास 'द्वैत' तत्त्वज्ञान असे म्हणतात.
९) महानुभाव प्रकाशित ग्रंथांमध्ये गद्य वाङमय, तत्त्वज्ञानपर ग्रंथ, महानुभावांचे पद्य वाङमय, साती काव्य ग्रंथ, इतर पद्य ग्रंथ यांचा अंर्तभाव होतो.
१०) म्हाइंभटाचे लीळाचरित्र व केशिराजबासांचे दृष्टांतपाठ यांना महानुभाव पंथीयाचे तत्त्वज्ञान समजण्यासाठी महत्त्वपूर्ण ग्रंथ मानले जातात.

## आधारभूत संदर्भ :—

१) शं. गो. तुळपुळे, महानुभाव पंथ आणि त्याचे वाङमय, आवृत्ती पहिली, पुणे, १९७६
२) गोदादीप (स्मरणिका) श्री चक्रधर जयंती उत्सव, डोंगरे वसतिगृह, नाशिक, सप्टें. ११९३
३) पठाण यू. म. महानुभाव साहित्य संशोधन : खंड १, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९७३
४) संपा. शं. गो. तुळपुळे, दृष्टान्त पाठ, व्हीनस प्रकाशन, पुणे
५) व. दि. कुलकर्णी, लीळाचरित्र (एक अभ्यास), व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७८
६) संपादक यू. म. पठाण, दृष्टान्तपाठ, समर्थ प्रकाशन, औरंगाबाद

❖❖❖

# ग्रामीण भागातील खेळाडूंची दिशा व दुर्दशा

पै. बाळासाहेब हरिश्चंद्र शेंदुरकर
जि. प. प्रा. शाळा, कराळेवस्ती
मु.पो. धानोरा, ता.आष्टी, जि. बीड, महाराष्ट्र (India) ४१४२०२
Email: bhshendurakar@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३७१४०४०

## प्रस्तावना –

विश्वाच्या निर्मितीपासून सजीव प्राणी जगण्यासाठी धडपड करत आहे. सजीवांची तीन टप्प्यांत विभागणी झाली. जमिनीवर राहणारे, पाण्यात राहणारे, हावेत पंखांनी उडणारे सजीव, परंतु सर्व सजीव प्राणी– पक्षी कीटक –जंतू असतील यांच्यामध्ये सर्वात जास्त 'बुद्धीमान प्राणी म्हणजे 'मानव' आहे.मानवाला इतर प्राण्यांच्या पेक्षा देवाने जास्त बुद्धी दिली. 'म्हणून मानवाने बुद्धीच्या जोरावर विश्वातील सर्व इतर सजीव प्राण्यांवर राज्य करत आला आहे. मानवाला विचार प्रक्रिया असल्यामुळे त्याने अनेक क्षेत्रात प्रचंड प्रगती केली. मग उद्योग, शेती, शिक्षण, संशोधन, आणि क्रीडा अदि .म्हणून आज आपण क्रीडा क्षेत्रांत जी चढाओढ प्रगती पाहत आहोत. आणि ग्रामीण भागातील काही लोकांच्या मध्ये खेळाबद्दल असणारी दिशा आणि दुर्दशा यावर आलेला अनुभव उदाहरणंसह आपल्याससमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रामीण भागातील खेळाडू कशा पद्धतीने मागे राहतात.आणि काही खेळाडू प्रतिकुल परिस्थिती वर मात करित जर त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर ते कशा पद्धतीने यश मिळवतात. याबद्दल आपणास "ग्रामीण भागातील खेळाडूंची दिशा व दुर्दशा" या विषयावर 'शोधनिबंध' म्हणून सादर करत आहे.

## आवश्यकता कशासाठी? –

खेळामधून दर्जेदार माणसे निर्माण होतात हे सुत्र आहे. राष्ट्रीय एकात्मता बंधुभावाप्रमाणे मुले वागतात. व्यसना पासून दुर राहतात. तंदुरुस्त राहतात. खेळातुन जगाला ताकदवान माणसे मिळतात . आज आपण पाहतो जगाच्या पाठीवर कुठेही गेला तर अगोदर प्रत्येक देश आपल्या सैनिकांना प्राधान्य देतो. म्हणून भारताचेही संरक्षण तसेच पोलीस खाते असेल सैनिक, खेळाडू देशाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. देशात कुठेही सीमेवर जर हल्ला झाला तर अगोदर आपले पराक्रमी सैनिक त्यांच्या वर तुटुन पडतात. आपले रक्षण करतात. मग देशांतर्गत कुठलाही वादविवाद – प्रसंग, नदीला पूर आला. कोरोना संसर्गजन्य आजारपण सारखी एखादी घटना घडली असेल किंवा अपघाताच्या बाबतीत घटना रस्त्यावर झाली असेल तर आगोदर आपले जवान मदत करतात. संदर्भ म्हणून पोलीस, सेनादलात या खात्यांमध्ये सेवा करण्यासाठी आपणास शारीरिक तंदुरुस्ती (फिजिकल फिटनेस) फार महत्वाची आहे. त्यामुळे या खात्यांमध्ये सेवा करण्यासाठी बालपणापासून खेळातील कौशल्य विकसित झाली पाहिजेत. त्यामध्ये उंची वाढवली पाहिजे. लांब–उंच उड्या मारल्या पाहिजेत. पोहणे, निशाणा, लगोरी, कॅरम तिरंदाजी, सुरपारंब्या, कुस्ती हे खेळ खेळने व पुस्तके वाचन महत्त्वाचे आहे .भारतासाठी ' ऑलिम्पिक ' पदक मिळवण्यासाठी व देशातील संरक्षक, सैनिक म्हणून आपल्याला जे मदत करतात ते जवान , खेळाडू घडवायचे असतील तर या सर्वांचे यश आपणास मोठ्या प्रमाणात पाहायचे असेल तर शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील ३ ते १६ वयोगटातील मुलांकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. आपल्या भारत देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी आपणास संदेश दिला.'' जय जवान जय किसान '' असे ताकद वान देशाचे नाव उंचवणारी मुले खेळातुनच तयार होतात .



## समस्या –

आपण जर खेळाडूंच्या अडचणी पाहील्या तर प्रथम आर्थिक बाब समोर येते. आहार व व्यायाम मार्गदर्शन मिळत नाही, ग्रामीण भागात स्पर्धा मोठ्या प्रमाणात होत नाहीत. मैदाने– व्यायामशाळा नाहीत. पालकांचा उत्साह कमी असतो. खेळाचा प्रचार आणि प्रसार कमी असतो. त्याच बरोबर मार्गदर्शक नाहीत. टीव्ही वर तसेच पेपर बातमी नाही. इलेक्ट्रॉनिक मीडिया वर प्रसिद्धी भेटत नाही.

आपल्या देशापेक्षा कमी लोकसंख्या असणारे देश जपान, केनिया, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी हे देश, भारतापेक्षा जास्त ऑलिम्पिक मध्ये पदके मिळतात. म्हणून विद्यार्थ्यांना क्रीडा विषयाबद्दल आवड लहानपणापासून

निर्माण केली जावी. फुलांनी फलावं, मुलांनी खेळावं, जीवन कसं मजेत जगावं असे कवी कुसुमाग्रज म्हणतात. सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. खेळाचे साहित्य पालकांनी व शिक्षकांनी उपलब्धता करावी. शिक्षकांची मार्गदर्शन भूमिका आसावी. त्यासाठी तीन ते सोळा वयोगट फार महत्त्वाचा आहे. जुनी म्हण आहे. ''मुलाचे पाय पाळण्यात दिसतात'', आणि म्हणून बालपणी वळन पडले की ते शेवटपर्यंत त्याच पद्धतीने मुलांनी सराव करावा. मना मध्ये मुलांची दुविधा होऊ नये. म्हणून काळजी घ्यावी लागते. विद्यार्थी ज्या खेळामध्ये प्रगती करत असतील किंवा खेळ आवडत असेल ते शिक्षकांनी शोधून तज्ञांची माहिती घेऊन त्याला आधार दिला जावा आर्थिक मदत करावी. त्या मुलांच्या मागे उद्योजक , दानशूर व्यक्ती उभा करावेत, आणि कच्चे दुवे शोधून सुधारणा करणे गरजेचे आहे.चुकेल तेथे मार्ग दर्शन त्याला करावे .विविध महान खेळाडूंचे पुस्तके .व्हिडीओ क्लीप दाखवून मार्गदर्शन केले तर यशस्वी खेळाडू होण्यास पाऊले उचलली जातात.

## उद्देश —

भारताला दर्जेदार खेळाडू मिळावेत. जगात भारताची मान उंचावली पाहिजे. ऑलिम्पिक मध्ये तिरंगा फडकला पाहिजे. नवीन तरुण पिढी व्यसनापासून दूर राहावी. स्वच्छता अंगी असावी. राष्ट्रीय एकात्मता बंधु—भाव मनामध्ये वाढ होणे, कुटुंबामध्ये वातावरण आनंदी राहावे. देशाचे संरक्षण व्हावे यासाठी ताकदवान सैनिक मिळतात.

## परिकल्पना —

राहुल आणि संजय हे दोघे मित्र होते. आणि ते दोघे लहानपणापासून अंगणवाडी, बालवाडी पासून एकत्र शिक्षण घेत होते. दोघांचे वय सारखे होते. घरातील आई—वडिलांचे दोघेही लाडके मुले होती. पुढे मुले शिक्षण घेऊन नौकरीला लागले पाहीजेत हाच उद्देश दोन्हीही पालकांचा होता. संजयच्या आई वडिलांना वाटले मुलगा शिकला पाहिजे स्वत:च्या पायावर उभा राहिला पाहिजे. तसेच दोन्ही पालकांची इच्छा मुले मोठी होऊन नोकरीला लागले पाहिजेत हे ध्येय समोर ठेवून राहुलच्या आई वडिलांनी लक्ष ठेवण्याचा संकल्पच केला. राहुलच्या वडिलांनी त्याच्या आवडीप्रमाणे त्याला साहित्य,पुस्तके, खेळाचे साहीत्य उपलब्ध केले. राहुलने मनाप्रमाणे आवडीनुसार स्वत: खेळ कुस्ती निवडला. व त्याने त्या खेळातील कौशल्य आत्मसात .करण्यास सुरुवात केली. कुस्ती खेळाता खेळता अभ्यासही जोरदार करु लागला. व त्याचा प्रगतीचा आलेख वाढू लागला. त्या उलट संजयचे आई—वडिलांचा त्याचा स्वत: चा उद्देश होता की संजयने शिक्षण घ्यावे, व मोठे झाल्यानंतर संजयने नोकरी मिळवावी आणि जनतेची सेवा करावी. परंतु त्याला आवश्यक असणारे साहित्य पुस्तके, खेळ निवडताना झालेली दुविधा चल—बिचल झाल्यामुळे त्याच्या पुढील वाटचालीस प्रगतीला आडथळा निर्माण झाला. आभ्सासातही संजय कमी पडत होता. शिक्षकांच्या पेक्षा ही आईवडिलांची जबाबदारी मोठी असते.

## सांख्यिकीय विश्लेषण —

जास्त सुविधा मिळत नसल्यामुळे संजयच्या प्रगतीचा आलेख राहुल पेक्षा कमी होत गेला. गुरुजींच्या सूचनेकडे संजय दुर्लक्ष करताना दिसत होता. शिकणे , मोठे होणे ,नोकरी करणे एवढाच उद्देश संजयच्या समोर दिसत होता. त्याचा प्रगतीचा आलेख कमी कमी होत जाताना त्याला व आईवडिलानाही सरांनी कल्पना दिली होती. त्या ठिकाणी संजय कडे त्यांनी दुर्लक्ष केले. उलट राहुल आडचणीवर मात करत प्रगती करत राहीला . राहुल त्या ठिकाणी त्याच्या शिक्षकांनी सांगितले व वडिलांनी सांगितलेली सर्व कामे वेळेवर करत होता. आणि वेळेवर तो अभ्यास करत होता. राहुलच्या प्रगतीचा आलेख पुढे जाताना दिसत होता. कारण तो वडिलांची शिक्षकांची आज्ञा पाळत होता.

पुस्तके वाचणे, मार्गदर्शकांची सल्ले ,आर्थिक मदत, या सर्व गोष्टी राहुला मिळत गेल्या काही कमी पडू दिले नाही, त्यांला अडचणी आल्या त्याच्याकडून चुका पण होत होत्या.






## तर्क —

परंतु आपल्या वडिलांकडून आणि मार्गदर्शक काडुन चुका राहुलने दुरुस्थ केल्या.राहुल प्रगती करतच होता. म्हणून राहुल सुरुवातीला गावकडील जत्रा , यात्रा, जयंती निमित्ताने आयोजित कुस्तीच्या दंगल मध्ये भाग घेत असे व बक्षिसे मिळवत असे नंतर त्याने शालेय स्पर्धेत भाग घेतला मग कुस्तीमध्ये तालुका,जिल्हा, राज्य, राष्ट्रीय—आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला.आंतरराष्ट्रीय स्पर्धेत राहुलने ऑस्ट्रेलिया येथे राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक व कजाकीस्थान येथे जागतिक कुस्ती स्पर्धेत कास्यपदक भारतासाठी पदक पटकावलं. परदेशात भारताचा तिरंगा फडकवला भारताची मान उंचावली. यश मिळत असताना पूर्वी खेळाडूंला नोकरीमध्ये आरक्षण नव्हते. परंतु दि. ३० एप्रिल २००५ खेळाडूंच्या नोकरीमध्ये आरक्षणाचा निर्णय शासन निर्णय झाला.खेळाडुंना शासकीय सेवेत ५% आरक्षण मिळाले. आणि राहुल पोलीस दलात पोलीस उपधिक्षक ( डी.वाय.एस.पी.) झाला.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२**

**राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण**




राहुल यशस्वी झाला. उलट संजय ने फक्त मोठे होणे व नौकरी करणे एवढाच उद्दिष्ट ठेवल परंतु ते पुर्ण करण्यासाठी प्रचंड कष्ट घेतले नाहीत. त्यामुळे प्रगतीच्या बाबतीत संजय मागे राहीला. राहुल यशस्वी झाला.

## सारांश —

राहुलने पहिल्यापासून त्याचे आई—वडील व मार्गदर्शक त्यांची आज्ञा—सुचनापालन केले. त्यांला सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्यावर राहुलने प्रचंड मेहनत घेतली .आडचणी सांगितल्या .पदक मिळवली त्याने भारत देशाचे नाव उंचावले, तिरंगा परदेशात फडकवला, आई—वडिलांचे आशीर्वाद घेतले. ग्रामीण भागातून त्याला दिशा मिळाली.गावा गावातुन कुस्ती खेळण्यास सुरुवात करून त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी यश संपादन केले. आणि पोलीस खात्यामध्ये शासकीय सेवेत 'अ' वर्ग अधिकारी झाला. त्याचा सर्वांना अभिमान वाटला.

## निष्कर्ष —

यश हे प्रयत्नाला चिकटलेले असते. ''प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे'' असे समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे. 'भारतरत्न' सचिन तेंडुलकर म्हणतात — खेळाडुंनी स्वप्न पाहावे. त्याचा पाठलाग करावा. त्यासाठी प्रचंड कष्ट करा. थांबू नका. तुम्ही यशस्वी व्हाल! राहुलला आवडीचा खेळ, मार्गदर्शन, सुविधा, पालकांची आर्थिक मदत झाली.त्याने जिद्द ठेवली.सर्व गोष्टी उपलब्ध झाल्याने त्यांनी प्रचंड परिश्रम घेतले. अधिकारी झाला. प्रत्यकाने अभ्यासाबरोबरच खेळाकडे लक्ष दिले पाहीजे. शासकीय सेवेत अधिकारी व्होईल अशी जिद्द, सातत्य मनामध्ये प्रत्येकाने ठेवले तरच मुले यशस्वी होतात. 'अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.' म्हणून ग्रामीण भागातील खेळाडूंनी खेळ खेळत असताना अपयशाला घाबरू नये,''हार के बाद जीत होती है'',. भविष्यात सातत्याने कष्ट करत राहीला तर निश्चितच यशाची प्रचंड इमारत उभी राहते. आणि कुटुंबाच्या समाधानाचा वटवृक्ष तयार होतो.

❖❖❖



लेखक परिचय — बाळासाहेब हरिश्चंद्र शेंदुरकर
राष्ट्रीय ॲथलेटिक्स खेळाडू, कार्यरत सेवा अनुभव — २५ वर्ष
प्रकाशित केलेली पुस्तके → महाराष्ट्र केसरी उड्डाण
'कन्याकुमारी अप्रतिम निसर्ग', 'आहार आणि व्यायाम जीवन संजीवनी', 'कौशल्य विकास आणि मनोरंजक खेळ', प्रात्यक्षिकातून प्रबोधन, सुविचार गाथा तसेच क्रीडा संग्राम व क्रीडा विशेषांक तेजवार्ता प्रकाशन. बालपणापासून खेळाची प्रचंड आवड शालेय क्रीडा स्पर्धेत सहभाग तालुका जिल्हा राज्य तसेच राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग भोपाळ जयपुर, दिल्ली, कोट्टायम. 'महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट क्रीडा संघटक बीड पुरस्कार 'शिवशंभो क्रीडा रत्न पुरस्कार' अहमदनगर

❖❖❖

# कवी बी यांची प्रेमकविता

डॉ. शरद जे. मेश्राम
सहायक प्राध्यापक
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया, महाराष्ट्र (India) ४४१७०१
Email: sweetsharad123@gmail.com भ्रमणध्वनी ९४०४२७९७९९

कवी बी यांच्या प्रेम कवितांवर एक नजर फिरवली तरी तिच्या अंतरंगातील विविधता आपल्या नजरेत भरल्याशिवाय राहत नाही. 'चाफा', 'बुलबुल', 'बकुल', 'प्रणयप्राण', 'तू देशी न तुझे', 'बंडवाला', 'प्रणपत्रिका', 'प्रमिला', 'मार्गप्रतिक्षा', 'प्रीती', 'रूपमुग्धा' 'कमळा' या आणि अशा विविध प्रतिकात्मक, भाषांतरित, अशी निखळ प्रेमकाव्य कवी बी यांनी साकारलेली आहेत. त्यांची प्रेमकाव्ये ही साधारणपणे नायिकाप्रधान असलेल्या दिसतात. या नायिका आपल्या प्रियकराच्या सहवासाला काही काळ मुकलेल्या आहेत. त्यांच्या प्रेमगीतांमध्ये वैयक्तिक भावना, आत्माविष्कार फार जास्त भरलेला आहे असे जाणवत नाही. समकालीन कवींच्या आत्मविष्कारात्मक प्रेमकवितेच्या पार्श्वभूमीवर कवी बी यांचे हे वेगळेपण लक्षात येण्यासारखे आहे.

प्रेमाच्या अनुभवाच्या वर्णनातील नाट्यात्मकतेने आणि वस्तुनिष्ठेने कवी बी यांची प्रेमकविता अधिक नटलेली आहे. प्रेमभावनेचे जीवनातील महत्त्व, दुसऱ्याचे मन समजून घेण्याचे कौशल्य, अंतर्मुचा आणि गंभीर जीवनदृष्टी, आदर्शवादी संस्कारांनी संस्कारित झालेले कवीचे व्यक्तित्व या विविध कारणांमुळे कवी बी यांच्या प्रेमकवितेचे स्वरूप आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने इतर कवींच्या प्रेमकवितेच्या तुलनेत निश्चितच वेगळेपणा प्राप्त करणारे आहे. समकालीन कवींच्या प्रेमकवितेतील आशय आणि अभिव्यक्ती यांच्याशी कोणतेही नाते न सांगणारी, आपल्याच रंग आणि रूपात रंगलेली अशी ही प्रेमकविता कवी बी यांनी लिहून आधुनिक मराठी कवितेत मोठी भरच टाकलेली आहे.

कविता ही सृजनशक्तीचा आविष्कार असते. या सृजनशक्तीचा प्रत्यय प्रतीकांमधून येत असतो. प्रतीकांचा हेतू व्यक्तामधून अव्यक्त सुचविणे हा असतो. प्रतीकात्मक काव्यांमध्ये व्यक्ताचा साधन म्हणून वापर केलेला असला तरी अव्यक्त हे त्याहून अधिक उन्नत आहे अशी जाणीव असते. 'चाफा', 'बकुळ','बुलबुल', ही बींची प्रतीकात्मक काव्याची उत्तम उदाहरणे आहेत.

## कवी बी यांच्याविषयी थोडेसे....

कवी बी यांचे पूर्ण नाव नारायण मुरलीधर गुप्ते असे आहे. त्यांचे घराणे मूळचे कुलाबा जिल्ह्यातील वाशी या गावचे. तिथल्या सहा सात गावचे कुलकर्णीपण त्यांच्याकडे होते. पण पुढे आर्थिक परिस्थिती खालावली आणि मुरलीधरपंत हे इ.स. १८५१ मध्ये कुलाबा सोडून वऱ्हाडात आले.

कवी बी यांचा जन्म दि. १ जून १८७२ मध्ये मलकापूर जि. –बुलढाणा येथे झाला.त्यांचे शिक्षण यवतमाळ व पुढे अमरावती येथे झाले. दरम्यानच्या काळात वडिलांच्या अकस्मात मृत्यूमुळे त्यांना मॅट्रीकही होता आले नाही व त्यांना सरकारी कारकुनाची नोकरी पत्करावी लागली.कवी बी यांची एक बाळूमावशी बालपणीच विधवा झाल्याने यांच्याकडेच राहत होत्या. कर्मठ नसलेल्या व सुधारकी बाण्याच्या असलेल्या मावशीच्या विचारांचा बी वर फार मोठा प्रभाव पडलेला जाणवतो.

बी वयाच्या १९ व्या वर्षापासूनच काव्यलेखन करू लागले. ते अतिशय चारित्र्यवान होते. त्यांना प्रसिद्धीचा हव्यास नव्हता. संस्कृत, इंग्रजी, व प्राचीन मराठी काव्य वाङ्मयाचा त्यांचा व्यासंग होता. त्यांची पहिली कविता 'प्रणयपत्रिका' हरिभाऊंच्या 'करमणूक'मध्ये दि. ३ ऑक्टोबर १८९१ ला प्रसिद्ध झाली. इ.स. १८९१ ते १९११ या काळात त्यांनी विविध टोपण नावाने गद्यलेखनही केले असल्याचे समजते. त्यांची 'वेडगाणे' ही कविता जुलै १९११ मध्ये 'मनोरंजन' मध्ये प्रकाशित झाली आणि तेव्हापासून त्यांच्याकडे रसिकांचे लक्ष वेधल्या गेले. ही कविता 'बी' याच टोपणनावाने प्रसिद्ध झाली. ते आधी 'भुंगा' हे टोपण नाव ठेवणार होते. पण त्यांचे यवतमाळचे मित्र शंकर विठ्ठल दीक्षित यांनी त्यांना 'बी' हे नाव सुचविले व कोणत्याही नावाशी वाकडे नसल्यामुळे त्यांनी त्याचा स्वीकार केला. दि. १० जुलै १९३४ रोजी श्री.गो. देषपांडे यांनी त्यांच्या कविता 'फुलांची ओंजळ' हे शिर्षक देऊन

काव्यसंग्रह प्रकाशित केला.पत्नीच्या निधनानंतर १४ वर्षे ते जावई खंडेराव प्रधान यांच्याकडे राहत असत. एकाएकी हृदयक्रिया बंद पडून दि. ३० ऑगस्ट १९४७ ला वयाच्या ७६ च्या वर्षी छिंदवाडा येथे त्यांचा मृत्यू झाला.

## कवी बी यांची प्रेमकविता

निसर्ग आणि मानव यांचा दृढ संबंध आहे. निसर्गामध्ये जी विविधता पाहायला मिळते तशीच विविधता आणि सृजनसामर्थ्य मानवामध्येही आहे. निसर्गाच्या सर्व छटा मानवातही आहेत. मनुष्य त्या छटांचा जास्त कौशल्याने उपयोग करू शकतो. निसर्गाच्या शक्तीचा, त्यातील सौंदर्याचा मानवाने मनाच्या आणि जीवनाच्या विकासासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. हे जाणूनच कवी आपल्या काव्यात भाव अभिव्यक्तीसाठी निसर्गाचा उपयोग करून घेत असतो. हा उपयोग कधी वर्णनाच्या पातळीवर, कधी संवेदनांच्या पातळीवर तर कधी प्रतीकांच्या पातळीवर केला जातो.

निसर्गाचे नाते जसे सौंदयाशी आणि सृजनाशी असते तसेच ते प्रेमभावनेशीही असते. कारण प्रेमभावना ही सुद्धा नैसर्गिक भावनाच आहे. निसर्गातील फूल, वृक्ष, रंग, पक्षी, आकाश, प्रकाश इत्यादी अनेक घटकांचा वापर बींनी आपल्या विविध कवितांमधून केला आहे. प्रेमकाव्यात निसर्ग हा पुष्कळदा वातावरण निर्मितीचा अपरिहार्य घटक म्हणून येतो, तसाच प्रतीकात्मक रूप धारण करून मुख्य काव्याच्या आशयाला अनेक परिमाणे मिळवून देण्याचे कार्य तो निसर्ग करीत असतो. बरेचदा एक महत्त्वाचे पात्र म्हणूनही निसर्ग वावरत असतो. प्रेम आणि निसर्ग या दोन जीवनप्रेरणांना जोडणारा महत्त्वाचा घटक म्हणजे निसर्ग होय.

कवी बी यांची 'चाफा' ही कविता निश्चितच गूढगुंजनपर अशी कविता आहे. या कवितेतील तत्वज्ञान क्षणभर सोडून येथील रूपकाचाच वेध घेतला तरी या कवितेतील मंत्रमुग्ध करणारा श्रुंगार, नाट्य आणि लोकगीताची लयबद्धता विलक्षण वेड लावणारी अशी आहे. प्रेयसीची मीलनातुर वृत्ती आणि प्रियकर चाफ्याचे सावधपण यातून सुरूवातीलाच एक विरोधी भाव कवीने निर्माण केला आहे. प्रेम मिलनास अत्यंत आतुर असलेली एक निष्कपट व निर्व्याज भावनेची मैत्रीण गंभीर वृत्ती धारण करून मुखस्तंभाप्रमाणे बसलेल्या आपल्या जीवलग मित्राला 'चाफा' असे कल्पून हे गाणे म्हणत आहे. ही भूमिका लक्षात घेतली म्हणजे या कवितेतील सर्व कल्पना आपोआप उलगडत जातात. प्रत्यक्ष निसर्गातील नागांचे आणि पशूंच्या मीलनाचे दाखले देऊन शारीरिक वृत्ती प्रज्वलित केल्यावर कडा आणि नदी, मेघ आणि वीज, वायू आणि कळी यांच्या प्रतिमांच्या साहाय्याने या वृत्ती मंदपणे प्रवाहित करण्यात कवीने यश मिळविले आहे. यातून शुद्ध रसपानाकडे जाणारा प्रवास कवीला चित्रित करायचा होता आणि कवी बी यांनी अतिशय उत्तमरित्या ता प्रवास पूर्ण केला असेच म्हणावे लागेल.

''जन विषयाचे किडे,
याची धाव बाह्याकडे
आपण करू शुद्ध रसपान.''

कवी बी यांच्या स्त्री विषयक कल्पनांचे उदात्त, विशुद्ध आणि ओजस्वी स्वरूप या गीतात प्रकट झालेले आहे. या कवितेची रचना प्रतीकात्मक असल्याने पुष्कळांना ती कळत नाही आणि त्यामुळे ती गूढ आहे असे वाटते. ''निसर्गसिद्ध शुद्ध प्रेमभावनेचे निघालेले नि:शंक आतुर उद्‌गार 'चाफा' या कवितेत आहेत. प्रेमीभूत ध्येयविषयाची गाठ पडली असता आणि प्राप्ती झाली असता सबंध देह स्वभाव पालटून निखळ प्रेम हाच एक सहजस्वभाव बनून जातो'' असे कवी बी यांनी या कवितेच्या संदर्भात म्हटले आहे.

''चाफा फुली आला फुलून
तेजी दिशा गेल्या आटून
कोण मी? – चाफा ? कोठे दोघेजण?''

या शेवटच्या कडव्याने कवी बी यांनी या कवितेची उंची एकदम वाढवली आहे. या ओळींनी ही कविता गगनाएवढी होते. शुद्ध रसपानाच्या कल्पनेने चाफा विरघळला, दृष्टीला दृष्टी मिळाली आणि त्यांच्या अंगावर रोमांच उभे झाले. आणि मग दोघेही देहभान विसरून एकमकांस कडकडून भेटली.........एवढी की चाफा कोण आणि मी कोण हे सुद्धा समजत नव्हते अशी कल्पना कवी करतात.

'बकुल'या कवितेमध्ये एका स्त्रीच्या मन:स्थितीचे वर्णन कवीने केले आहे. या कवितेची भूमिका स्पष्ट करताना कवी बी यांनी वा.ना हूड यांना १९४४ मध्ये पाठविलेल्या पत्रात आपले मत व्यक्त केले आहे. ''एखाद्या फुलातील सौरभाने मोहून जाऊन अनेक भ्रमरांनी त्याच्या भोवती गुजारव करीत असावे तसे एका रूपवती तरूणीच्या भोवती तिचा अनुनय करणाऱ्या भक्तांचे कडे पडलेले असे. त्यांच्या अनुनयामुळे अनुनय करून घेणे आपला हक्क आहे असे तिला वाटायला लागले. त्यामुळे तिचे मन चंचल होऊन आज हा तर उद्या तो अशा रीताने ज्याच्यावर

मर्जी सुप्रसन्न असेल त्याच्या अनुनयाचा स्वीकार करून इतरांना ती झिडकारू लागली. उन्मादाच्या भरात तिच्याकडून चाऱ्या प्रेमाची अवहेलना झाली. तिचा तो प्रियकर मानी असल्यामुळे त्यानेही तिचा पुन्हा अनुनय करण्याचा प्रयत्न केला नाही. खऱ्या प्रेमाची ओळख पटल्यानंतर कालांतराने तिला पश्चाताप झाला. तिचा तो अनुतापच या कवितेत साकार झाला आहे.''

'सूर्याच्या प्रखर प्रभेत न मुळी नक्षत्र नेत्रा दिसे
जणे चित्त परंतु नित्य गगनी अस्तित्व याचे असे
चेतोगर्भनभांत निद्र तळणे नक्षत्र माझे तसे,
ते माते अथवा तयांस मी – हे घडावे कसे?'

या कवितेत व्यक्त झालेले प्रीतीचे स्वरूप अतिशय गूढ आणि तरल आहे. हे प्रेम मनाला प्रत्यक्ष दिसत नाही, पण सतत जाणवत राहते अशा स्वरूपाचे आहे. ही अतिशय सुक्ष्म अनुभूती साकार करण्यात बींची प्रतिभा पूर्णपणे यशस्वी झाली आहे.

जीवनाच्या वेलीवर फुललेले पहिलेच प्रेमाचे फूल बकुलाने तिला दिले, पण त्याचा स्वीकार करणे आपला सहजाधिकार आहे असे तिला तिच्या रूपाच्या उन्मादामुळे वाटले. या कवितेमधून व्यक्त झालेले प्रेम उत्कट असले तरी कवी बी यांच्या प्रवृत्तीनुसार भोगातीत वा काहीसे दिव्य असे आहे. एका निर्मळ मनाला दुसऱ्या मनाबद्दल वाटणारे आकर्षण या कवितेत अभिप्रेत आहे. या प्रतीकात्मक कवितेचा शेवट अगदी साधा, पण अतिशय भावनोत्कट असा आहे. यात कवीच्या व्यक्तित्वातील तत्त्वचिंतक नाहीसा होऊन संवेदनक्षम कवी जागृत झालेला दिसतो. कवितेतील नायिकेच्या मनातील अनुताप, उत्कंठा आणि अशरणता शेवटच्या कडवयात शिगेला पोचली आहे याची जाणीव वाचकांना झाल्याशिवाय राहात नाही.

'पाहू वाट किती?'क्षमस्व' म्हणते! लाचार माझाी स्थिती!
नेत्री प्राण उरे, कसूनि बघणे आता परीक्षा किती?
नारीधर्मरहस्यभाग नव्हता झाऊक माते जसा
नारीचा हृदयस्थभाव कळला नाही तुलाही तसा !'

सृष्टीतील, जीवनातील कणन् कण चैतन्यमय करण्याचे सामर्थ्य प्रेमात असते. फूल सुकले तरी त्याचा सुगंध दरवळत राहतो, बकुलासारखा. त्याचा प्रेमसुगंधाचा दरवळ प्रेयसीला व्याकुळ करतो आणि कारूण्यभाव अधोरेखित करतो. कवितेचा हा भावनोत्कट शेवट कवितेतील समर्पक प्रतीकांच्या मंदिरावर सुवर्ण कलश सारखा शोभून दिसतो.

'बुलबुल'हे कवी बी यांचे आणखी एक सुंदर प्रेम काव्य. इराणी काव्यातील कविसंकेतांचा केवळ नाममात्र आश्रय करून कवी बी यांनी या कवितेत 'जातिलता' आणि 'बुलबुल' यांच्या मरणोत्तर पुनर्मिलनाची करूणमधूर कहाणी गायिली आहे. पूर्व जन्मातील एक प्रियकर आणि त्याची प्रेयसी ही प्रेमाची पुर्तता न होता मरण पावलेली आहेत. पुढील जन्मी तो तरूण बुलबुल होऊन जन्माला येतो. व ती तरूणी एका स्मशानात जातिलतेचा जन्म घेते. पूर्वजन्मातील प्रेमाची स्मृती त्यांच्या मनामध्ये तशीच जागृत राहिल्याने फिरून त्या जन्मी देखील त्या प्रमी जीवांची जोडी जमते. रोज रात्री तो प्रेमविव्हळ बुलबुल त्या जाईच्या वेलीखाली येई व व्याकुळ कंठाने शोकगीते आळवित बसे. बुलबुलाच्या सान्निध्यात मागील प्रेमस्मृतीच्या अखंड अमृतसिंचनाने ती जाईची कृश वेल सम्शानात असूनही नित्य टवटवीत आणि फुलापानांनी बहरलेली दिसे. ते दृश्य पाहून तिथे येणाऱ्या स्त्रियांना अत्यंत आश्चर्य वाटे. त्या म्हणत,

'वसंत न करि चैत्रशिंपणे
डोलत रविकर न करि येणे
झुरे न अनंति तरिही तेणे,
अगाईगं नवल! ही जाइ न या महिवरिल'

सोबतच...

'साहुनि राहे कडक उन्हाळा
कुजांचा आधार न हिजला
तरी भोगकल्लोळ सोहळा –
फुलांचा भोगी ही 'जाई' नवलजोगी'

त्या मसणवटीला लागून असलेल्या गावातील लोक बुलबुलाच्या मधूर स्वरांनी स्मशानाकडे खेचले जात होते. व तेथे पसरलेल्या नादब्रम्हात ते इतके विलीन होत आणि त्या प्रेमविलापाशी त्यांचे इतके तादात्म्य होई की, क्षणभर ती जातिलता व तो बुलबुल यांना ते विसरत आणि त्यांच्या दृष्टीपुढे असा आभास उत्पन्न होई की आपल्याच विफल झालेल्या प्रितीचे बोल आपल्याच अंत:करणातून बाहेर पडत आहेत. बुलबुलाचे हृदय फोडून उत्कटतेने उमटणाऱ्या त्या शोकगीताच्या स्वरात कोणातरी स्त्रीच्या नावाचा स्पष्ट उच्चार होत असावा असे त्या लोकांना वाटे. प्रेम ही एक दिव्य शक्ती आहे. तिचे आकर्षण पार्थिव देहाच्या विनाशाने नष्ट न होता ते सातत्याने जन्मजन्मांतरी देखील कायम राहते हे तत्त्व कवीने अत्यंत हृदयंगम कल्पनेमध्ये व्यक्त केले आहे. विशेषत: कवीने या कवितेत अद्‌भूततेचा जो अंश मिसळलेला आहे त्यामुळे या कवितेतील भावना अधिकच हृदयस्पर्शी झालेली आहे.

करूण आणि अद्‌भूत या दोन रंगाचे इतके सुरेख मिश्रण कवीने या कवितेत साकारले आहे. स्त्रीच्या हृदयस्थ भावनांचे अविस्मरणीय पाझर अधोरेखित करणारा 'बकुल' आणि प्रितीच्या नश्वरतेचे गायन जातिलतेच्या कानात करून तिला फुलविणारा 'बुलबुल' या बींच्या कविता प्रेमकवितेचे वैभव वाढविणाऱ्या आहेत.

कवी बी यांच्या सर्व कविता चाळिशीमध्ये पदार्पण केल्यानंतरच्या असल्याने त्या काव्यात सहज न आढळणारी विचारांची परिपक्वता दिसून येते. प्राचीन मराठी साहित्य आणि संस्कृत साहित्याप्रमाणेच इंग्रजी साहित्यचाही बींचा उत्तम व्यासंग होता. त्याचप्रमाणे स्वत:ला आवडलेली एखादी इंग्रजी कविता इकडच्या वातावरणाशी त्याची नाळ जोडून ती कविता भाषांतरित करण्याची समकालीन कवींप्रमाणे बींना ही आवड होती. या प्रथेला अनुसरून त्यांनी 'प्रणयप्रयाण', 'मनोहारिणी', 'तू देशी न तुझे', 'बंडवाला' अशा काही कविता भाषांतरित केल्या आहेत.

'मनोहारिणी' हे काव्य बायरनच्या 'She walks in Beauty' चे भाषांतर आहे. पकरपूर्ण आणि अतिशय सुंदर भाषांतराचा हा उत्तम नमुना आहे. बायरनच्या या कवितेत मिसेस बिलमॉट च्या रूपाचे, तिच्या निरागस भावाचे वर्णन केले आहे. बी यांनी बायरनची कमतरता कुठेही पडू दिली नाही. त्याच्या प्रत्येक शब्दाला योग्य न्याय दिला असेच वाटते.

'पदन्यास लावण्याप्रांती ही करिते रमणी,
तारामंडित निरभ्रांबरि जशी रम्य रजनी !'

मूळ अठरा ओळींचे अठराच ओळीत केलेले हे भाषांतर एकप्रकारे समचरणी भाषांतर होय. बायरनच्या प्रत्येक शब्दाला, प्रत्येक भावनेला कवी बी यांनी जसेच्या तसे उतरवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला असल्याचे दिसते. यासोबतच आणखी एक उत्तम भाषांतरित कविता म्हणजे 'तू देशी न तुझे' ही होय. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात पहिल्या चार्ल्सच्या काळात होऊन गेलेल्या जॉन सकलिंगच्या गीताचे हे भाषांतर होय. त्याची खूशमसकरी वृत्ती त्यांच्या या कवितेतून व्यक्त झाली आहे.

'छे ! ते ठेव तसेच, नाहक नको तो शीण कां की हरे
माझे चोरूनि चित्त नेतिल पुन्हा डोळे तुझे चोरटे'

या कवितेतील 'छे' आणि 'चोरटे डोळे' या शब्दांमुळे अस्सल मराठमोळा ठसकेबाज पणा या कवितेमध्ये निर्माण करण्यात कवीला यश मिळाले आहे. यामुळे ही कविता भाषांतरित असावी असेही वाटत नाही. एका तरूणाचे ज्या एका सुंदर तरूणीवर प्रेम जडले आहे त्या मुलीच्या मनाचा थांगपत्ता या तरूणाला लागत नाही त्यामुळे तो सैरवैर झालेला आहे. त्याच्या मनाची द्विधा अवस्था झाली आहे. तिचे वर्णन हा या कवितेचा विषय आहे. त्या तरूणीचे आपल्यावर प्रेम नाही असे वाटून तो आपल्या भावना पुढील शब्दात व्यक्त करतो.

'तू देशी न तुझे, मग कशास मग मी द्यावे तुला आपले
दे माझे परतोनि चित्त मज जे ठायी तुझ्या गुंतले'

पण लगेच विचार बदलून आपल्या प्रेयसीचे डोळे ते चित्त आपल्याकडे घेऊन जाणारच हे लक्षात येताच ' ते तसेच ठेव' असे तो तिला सांगतो. सोबतच 'एका संकुचित हृदयात दोन हृदये दाटीवाटीने कशाला असवतेस असाही प्रश्न तो तिला करतो. त्याला वाटते की तिचे चित्त आपल्याशी एकरूप व्हावे. तिचे मन आपल्यावर आहे, ते आज ना उद्या व्यक्त होईल याचा विश्वास ठेऊन आपण तिची वाट पाहावी असा तो विचार करतो. कविता भाषांतरित असली तरी तिला मराठी बाज देण्यात कवी यशस्वी झाले हे मात्र नक्की.

'प्रणयपत्रिका' ही कविता सुद्धा कवी बी यांची एक सुंदर प्रेमकविता म्हणून परिचित आहे. ही कविता बी यांनी तारूण्यात लिहिली असली तरी त्यामधून व्यक्त होणारी प्रेमयाचना प्रौढ आणि गंभीर स्वरूपाची आहे. ही कविता नाट्यात्म आहे. विवाहानंतरचा काही काळ सुखासमाधानाने एकत्र घालविल्यांनतर आपल्या पतीपासून काही

दिवसांकरिता दूर गेलेल्या एका स्त्रीने लिहिलेली ही पत्रिका आहे. विविध कारणे काढून आपल्या पत्नीच्या आजूबाजूला घोटाळणारा आपला पती आता आपल्यापासून दूर गेलेला आहे ही जाणीव तिच्या मनामध्ये आहे आणि म्हणून तिचे चित्त जाग्यावर नाही. तुझ्या शिवाय करमत नाही असे सांगणारा आपला पती आपल्याशिवाय कसा राहत असेल ही चिंता तिच्या मनात आहे. झोपेतून दचकून उइणे, पतनीचा सारखा ध्यास घेणे या सर्वांनी आपला पाती ग्रासला असेल असे तिला वाटते. पण असे असते तर त्याच्याकडून एखादे पत्र आले असते. पण पत्र तर आपणच लिहीत आहोत. तिच्या मनात विचार येतो—

'तरल मन नराचे राहते ऐकते मी
विसर बघुनि पावे अन्य पात्रास नामी
कमलिनी भ्रमराला नित्य कोशात ठेवी
अविरत म्हणुनी तो पंकजी प्रेम दावी.'

आपल्याला दुरावून तो आणखी कोणाला जवळ करेल काय असा प्रश्न तिच्या मनात येतो आणि मन बेचैन होते. पण लगेच तिचा विश्वास जागा होतो. आपण आपल्या पतीवर प्रेम करतो नक्कीच त्याचेही आपल्यावरच प्रेम असेल आणि तो इतर कोणचाही विचार करणार नाही याचा तिला विश्वास वाटतो.

'सदय, पण, सख्याक्ष्या मानसा पूर्ण जाणे
तिळभर असली ही कल्पना व्यर्थ घेणे'

असा विचार करणेही चुकीचे आहे याची तिला जाणीव होते.

पतीवर प्रेम करणाऱ्या व पतीचेही आपल्यावर आपल्याइतकेच निस्सिम प्रेमक आहे अशी खात्री असणाऱ्या एका प्रणयिनीचे हे एक प्रेमपत्र आहे. यात स्त्रीच्या मनाचा कोमलपणा, निष्पापपणा, भोळेपणा, शंकेखोरपणा, सहृदयता, हळवेपणा या सर्व भावना स्त्रीसुलभ पद्धतीने कवी बी यांनी चितारले आहेत.

कवी बी यांच्या प्रेमकवितेमध्ये एक विशिष्ट प्रकारचे पावित्र्य असल्याची जाणीव होते. कुठेही शारीरिक ओढ किंवा प्रेमाआडून लैंगिकतेचे आकर्षण हा भाव त्यांच्या कोणत्याही काव्यातून जाणवत नाही. अस्सल, निरागस प्रेमाची, त्यागाची भावना त्यांच्या काव्यातून दिसून येते.

## संदर्भ :—

१. फुलांची ओंजळ — प्रस्तावना प्र.के. अत्रे
२. कवी बी — आकलन व आस्वाद — डॉ. शा. वा. श्वान
३. आधुनिक मराठी कविता — भ. श्री. पंडित

❖❖❖

# विलक्षण वास्तवाचा वेध : फेसाटी

डॉ. लहू दिगंबर वाघमारे
मराठी विभाग
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर, जि. लातूर, महाराष्ट्र (India) ४४१७०१
Email: waghmareld@gmail.com भ्रमणध्वनी ९८२३८२७४३८

## प्रस्तावना :—

मराठी साहित्यात कादंबरी वाङ्मय प्रकाराची परंपरा समृद्ध आहे. 'यमुना पर्यटन' ही १८५७ साली बाबा पद्मनजी यांनी लिहिलेली कादंबरी मराठीतील पहिली कादंबरी आहे.यानंतर मराठीमध्ये अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. नंतर उदयाला आलेल्या ग्रामीण साहित्य प्रवाहातही कादंबरी हा वाङ्मय प्रकार विपुलतेने लिहिला गेला आहे. १८८८ मध्ये कृष्णराव भालेकर यांनी लिहिलेली 'बळीबा पाटील' ही कादंबरी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी मानली जाते. तर धनुर्धारी यांनी १९०३ साली लिहिलेली 'पिराजी पाटील' ही कादंबरी पहिली कादंबरी मानली जावी असे डॉ. आनंद यादव यांनी म्हटले आहे. त्यानंतर मराठी ग्रामीण साहित्यात कादंबरी वाङ्मय प्रकारात कादंबरीकारांच्या तीन पिढया निर्माण झाल्या. प्र.ह. खाडीलकर, भा.वी. वरेरकर, रा.शा. पाटील, ग. रा. वाळिंबे,रामतनय, वि.वा.हडप, र.वा. दिघे, मधु मंगेश कर्णिक, श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, गो. नी. दांडेकर, शंकर पाटील, हमीद दलवाई, ना.धों. महानोर, रा.रं. बोराडे, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, राजन गवस, आनंद यादव, आनंद पाटील, बाबाराव मुसळे, सरदार जाधव आणि सदानंद देशमुख ही ग्रामीण कादंबरी लेखकांची नामावली पाहिली तर या ग्रामीण कादंबरीच्या समृद्ध परंपरेचा विस्तृत पट अधोरेखित होतो. या तिन्ही पिढयांतील सर्व कादंबरीकारांच्या कादंबरी लेखनाचा विस्तृत अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, मराठीतील ग्रामीण कादंबरी ही प्रत्येक कालखंडागणिक व पिढीगणिक आशय आणि अभिव्यक्तीच्या अनुषंगाने सतत विकसित होत गेली. मराठी ग्रामीण कादंबरीने परिस्थितीनिहाय बदल स्वीकारले. ग्रामीण भागात वेळोवेळी होणाऱ्या बदलांप्रमाणे कादंबरीही बदलत गेली. १८८८ मधील 'बळीबा पाटील' या प्रारंभीच्या ग्रामीण कादंबरीमध्ये आणि आताच्या ग्रामीण कादंबरीमध्ये जमीन—अस्मानाचे अंतर दिसेल. या प्रदीर्घ कालखंडामध्ये ग्रामीण कादंबरीकारांनी अनेक बदल स्वीकारून अनेक प्रयोग केले आहेत. अशीच एका वेगळया धाटणीची आणि वर्तमानकालीन अल्पभूधारक शेतकऱ्याचे व ग्रामीण जीवनाचे वास्तव आणि अत्यंत दाहक चित्रण करणारी 'फेसाटी' ही नवनाथ गोरे यांची कादंबरी २०१८ च्या 'युवा साहित्य' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आली आहे. या कादंबरीच्या निर्मितीप्रक्रियेचा, सामाजिक आशयाचा, तिच्यातील दाहक वास्तवाचा याशिवाय तिच्यातून व्यक्त झालेल्या विविध कंगोऱ्यांचा शोध प्रस्तुत शोधनिबंधातून घेण्यात येणार आहे.

या कादंबरीचे लेखक नवनाथ गोरे हे वर्तमान काळातील युवा पिढीचे आघाडीचे नवोदित लेखक म्हणून नावारूपाला आले आहेत. आपल्या दाहक अनुभवाचे आविष्कारण त्यांनी प्रथम कथा वाङ्मयातून केले. 'मुराळी'या नियतकालिकातून त्यांची 'काळ' नावाची पहिली कथा प्रकाशित झाली. त्यानंतर विविध नियतकालिकांतून व दिवाळी अंकांतून त्यांच्या चपाटा, इपरीत, वाचा या विविध कथा प्रसिद्ध झाल्या. तसेच 'दक्षिण महाराष्ट्र साहित्यपत्रिका', 'समाजप्रबोधन', 'प्रकाशज्योत' या नियतकालिकांतून तमाशा आणि अन्य सामाजिक विषयांवर त्यांनी लेखन केले. काही आदिवासींची लोकगीतेही त्यांनी लिहिली. आपण भोगलेल्या व्यथा—वेदना प्रकट करण्यासाठी त्यांना कथा हा वाङ्मयप्रकार तोकडा वाटू लागला. त्यामुळे ते कादंबरी लेखनाकडे वळले. त्यातूनच त्यांची 'फेसाटी' ही कादंबरी आकाराला आली. शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदान योजनेतून या कादंबरीला अनुदान प्राप्त झाले. या अनुदानातून पुण्याच्या पटवर्धन प्रकाशनाने दिनांक २५ ऑगस्ट २०१७ रोजी या कादंबरीची पहिली आवृत्ती प्रसिद्ध केली. तर २६ जून २०१८ साली तिची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली. त्यानंतर तिसरी आवृत्तीही काढण्यात आली. सर्व आवृत्या संपल्यामुळे आता चौथी आवृत्ती लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

साहित्याची व शिक्षणाची कोणतीही परंपरा नसताना एका लहानशा खेड्यात दारिद्रयाचे व हालअपेष्टाचे जीवन जगणाऱ्या लेखकांने कोल्हापूर येथे शिक्षणासाठी आल्यावर विष्णू पावले या आपल्या लेखक मित्राच्या सहाय्याने ही लेखन कला आपल्यात विकसित केली आणि हा कादंबरी लेखनाचा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. एकूण बावीस भागांत लिहिलेल्या प्रस्तुत कादंबरीतून लेखकाने भूक, गरिबी, अन्याय, दुष्काळ, अंधश्रद्धा, भ्रष्ट

नोकरशाही, अवैद्य सावकारी, बेरोजगारी, यातून होत असलेली होरपळ आणि त्याविरुद्ध मेंढपाळ समुदायातील अल्पभूधारक बेरोजगार तरुणाचा आणि त्याच्या कुटुंबाचा चाललेला संसार संघर्ष या कादंबरीतून अत्यंत करुणपणे व्यक्त झाला आहे. या कादंबरीचा अभ्यास पुढील काही घटकांच्या आधारे करता येईल.

१) ग्रामीणता :—

प्रस्तुत कादंबरी आशय अभिव्यक्तीच्या अनुषंगाने आणि रचना बंधाच्या अनुषंगाने ग्रामीण आहे. या कादंबरीतील परिसर व गावे हे ग्रामीण आहेत. महाराष्ट्रातील कर्नाटकाच्या सीमारेषेवरील 'निगडी' हे लेखकांचे मूळ गाव असून या गावाजवळच असलेल्या 'उमदी' या दोन गावांत लेखकांचे बालपण गेले.आपल्या खेड्यातील गावाचे अत्यंत वास्तव असे वर्णन लेखकाने केले आहे.गावात असणारी एकच शाळा, बाळू गुरवाचे एकुलते एक हॉटेल, मल्लापाचे पहिले दुकान 'बाबू किराणा स्टोअर्स' दवाखाण्यासाठी तालुक्याला चालत जाणे. हे सर्व तीस वर्षांपूर्वीच्या खेड्याचे साक्षात दर्शन लेखकांनी या कादंबरीतून घडविले केले आहे. याबरोबरच चडचण, वळसंग मार्चंड, कुंभारी, माडग्याळ, लवंगी,मारुळी, रामपूर,कोंकण,तलवंगी या विविध खेडयांशीही लेखकांचा शिक्षणाच्या व व्यवहाराच्या निमित्ताने संबंध आला. या परिसरातील ग्रामीण संस्कृती, कृषी संस्कृती, या गावातील माणूस त्याचे खेडूतपण, त्याचे अज्ञान, त्याच्या रुढी—परंपरांसह त्यांनी प्रकट केले आहे. या परिसरातील शेती व्यवसाय, तेथील दुष्काळ, तेथील निसर्ग, शेतीतील पिकांचे व कामांचे वर्णन लेखकाने केले आहे. ग्रामीण भागातील माणूस तेथील त्यांच्या बोलीभाषेसह चित्रित केल्यामुळे या कादंबरीला अस्सल ग्रामीणत्व प्राप्त झाले आहे.

प्रस्तुत कादंबरीचे निवेदक आणि लेखक 'नाथा' यांच्या कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्यामुळे खेड्यातील ऊसतोडणे, शेण काढणे, कापूस वेचणे, पिकांवरील पाखरे हाणणे, रास करणे अशी व यांशिवाय इतरही शेतीची अनेक कामे त्यांना करावी लागली. एवढेच नाहीतर सालगडी म्हणून तर कधी मजूर म्हणूनही इतर शेतकऱ्यांच्या शेतात त्यांना कामे करावी लागली. बालपणीच्या शाळेतील अनुभवांचेचित्रण कादंबरीत आल्यामुळे ग्रामीण भागातील शैक्षणिक परिस्थितीही या कादंबरीतुन व्यक्त झाली आहे. खेड्यातील गरिबी, खेड्यातील जनतेचे होणारे शोषण तसेच खेड्यातील सण—उत्सव, यात्रा—जत्रा यांसह ग्रामसंस्कृती या कादंबरीतून जिवंतपणे साकार झाली आहे. ग्रामीण भागातील मेंढपाळ व्यवसाय आणि धनगर समूहाचे जगणे हेही या कादंबरीतून प्रकट झाले आहे. ग्रामीण साहित्याचा घाटच ग्रामसंस्कृतीने परिपुष्ट होत असतो. या कादंबरीतून ग्रामीण जीवन व त्या जीवनातील सर्व घटक लेखकाने हुबेहूब चित्रित केल्यामुळे ग्रामीण साहित्य प्रवाहात या कादंबरीची नोंद झाली आहे.

२) शीर्षकाची अर्थपूर्णता :—

मराठी ग्रामीण कादंबरीला समृद्ध व अर्थपूर्ण शीर्षकाची परंपरा आहे. यापूर्वीच्या तिनही पिढयांतील ग्रामीण कादंबरीकारांनी दिलेली शीर्षके अशी अत्यंत अर्थपूर्ण आणि कादंबरीतील आशय अभिव्यक्त करणारी आहे. प्रस्तुत 'फेसाटी' कादंबरीचे शीर्षक लेखकाने अत्यंत अर्थपूर्ण योजिले आहे. कादंबरीतील वास्तव जीवनाची उकल वाचकांच्या मनात निर्माण करणारे अत्यंत काव्यात्म, लालित्यपूर्ण व अनेक अर्थ व्यक्त करणारे हे शीर्षक कादंबरीच्या आशयसौंदर्यात व यशात भर घालणारे आहे. 'फेसाटी' हा शब्द ग्रामीण जीवनाशी संबंधित आहे. या कादंबरीचे लेखक नवनाथ गोरे ज्या धनगर समाजातून आले. त्या धनगर समाजाचा मेंढपाळ हा व्यवसाय आहे. त्याचेही वर्णन या कादंबरीत आले आहे. धनगर आपल्या मेंढरांना बाभळीच्या फांद्या तोडून टाकतो. त्याच्या शेंगा त्यांना घालतो. त्यांच्या शिल्लक राहिलेल्या झाडाच्या फांद्या असतात त्या तो एकावर एक रचून ठेवतो. त्यालाही 'फेसाटी' असे म्हणतात. हा व्यवसायाशी संबंधित असलेला एक अर्थ 'फेसाटी' या शब्दाला आहे. तसेच या कादंबरीतील आशयाशी एकजीव झालेला दुसरा एक अर्थ या शीर्षकाला आहे. प्रस्तुत कादंबरीतील कुटुंबाला काकू, काका, स्वत: लेखक, त्यांचा पांगळा भाऊ म्हणजे दादा आणि सर्व बहिणी यांना सतत संघर्ष करावा लागतो. संकटांची मालिकाच त्यांच्यासमोर उभी असते. उपासमार, कष्ट,कर्ज, नापिकी, नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित अडथळयामुळे जगण्यासाठी त्यांना करावी लागणारी यातायात, त्यामुळे या सर्व कुटुंबाची होणारी सत्यहोलपट या शीर्षकातून प्रकट होते. जीवन जगताना येणाऱ्या या अडचणींवर मात करण्यासाठी तोंडाला फेस येईपर्यंत त्यांना कष्ट उपसावे लागतात, भुकेची वेदना सोसावी लागते. या कादंबरीतील निवेदकाच्या कुटुंबाचे, प्रत्येक व्यक्तीच्या काबाडकष्टाचे व त्यांच्या हालअपेष्टांचे तसेच त्यांच्यावर एकामागून एक अशा येणाऱ्या विविध खडतर संकटांचे सूचनही या शीर्षकातून होते. या सुचकतेमुळेच कादंबरीचे हे शीर्षक कादंबरीच्या आशय सौंदर्यात भर घालणारे ठरले आहे.

३) कथानक :—

कादंबरीचा सर्व डोलारा हा कथानकावरच अवलंबून असतो. म्हणून कादंबरीत कथानकालाच खूप महत्त्व असते.'फेसाटी' या कादंबरीला म्हणावे असे कथानकच नाही. त्याला शेवट नाही. लेखकाच्या जीवनाचा प्रवास सुरूच

आहे. म्हणून हे कथानक संपत नाही. आपण जगलेले खडतर जीवनच लेखकानी जिवंतपणे चित्रित केले आहे. जशा घटना घडत गेल्या, तसे चित्रण त्यांनी केले आहे. म्हणून ही वास्तव कादंबरी आहे दृकपोलकल्पित, रंजनप्रधान असे कथानक व काल्पनिक कथा शोधण्यासाठी लेखकाला इतरत्र जावे लागले नाही. तर स्वत:च्या जीवनातून ही कादंबरी उदयाला आली आहे. चटकदार व शृंगारिक वर्णनात लेखक रमत नाहीत. त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे जीवन म्हणजेच या कादंबरीचे कथानक आहे. अल्पभूधारक, पशुपालक शेतकरी कुटुंबाच्या संघर्षाची ही कथा आहे. घरामध्ये सहा भावंडे आहेत. त्यात चार मुली म्हणजेच नाथाच्या बहिणी, एक अपंग मुलगा ईश्वर म्हणजेच लेखकाचा मोठा भाऊ (दादा ), कादंबरीचा निवेदक नायक नाथा आणि त्याची आई (काकू) म्हणजे सुभा, वडील (काका) म्हणजेच सोपान या सर्वांची एक कथा आहे. घरामध्ये खाण्यापिण्याचे हाल होतात. डोक्यावर भरमसाठ कर्ज आहे. मुलींच्या लग्नाची चिंता व हुंड्याचा प्रश्न आहे.घरात अठराविश्व दारिद्रय आहे.चार एकर शेती असूनसुद्धा दुष्काळामुळे व कर्जामुळे शेती करता येत नाही. म्हणून दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून आपल्या मुलांनी शिकावे व एखादी नोकरी करावी. म्हणून त्याला शिकविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे कष्ट उपसण्याची त्यांची तयारी आहे. आपल्या मुलाला शिकविण्याचा अट्टहास आहे. असे साधे आणि सरळ या कादंबरीचे कथानक आहे.याशिवाय कादंबरीचा नायक नाथा गोरे यांचा इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतल्यापासून ते पदवी शिक्षणापर्यंतचा हा संघर्ष, या कुटुंबावर वारंवार येणाऱ्या अनेक अडचणी, त्यावर त्यांनी सामर्थ्याने केलेली मात याही घटना कथानकात गोवलेल्या आहेत.याला कथानक म्हणता येईल की नाही ही गोष्ट महत्त्वाची नाही. कारण जे कादंबरीत लेखकाने मांडले आहे. ते सर्व त्यांनी स्वत: भोगलेले, अनुभवलेले आहे .त्याच्या संघर्षाची ही कथा आहे. आजही महाराष्ट्रातील अनेक प्रदेशांतील दुष्काळी भागांमध्ये असे कितीतरी शेतकरी कुटुंब आहेत. ते सर्व नाथा गोरे यांच्या प्रातिनिधिक चित्रणातून या कादंबरीत व्यक्त झाले आहेत.

४) पात्रचित्रण :—

प्रस्तुत कादंबरीला ग्रामीण वातावरण व पार्श्वभूमी लाभली असून ग्रामीण भागातील काही व्यक्ती व परिसर येथे अविष्कृत झाले आहेत. या कादंबरीचे मुख्य पात्र म्हणजे कादंबरीचा निवेदक असलेला नाथा आहे. तर त्याचे वडील (काका) म्हणजे सोपान आणि आई (काकू) म्हणजे सुभा ही मुख्य पात्रेही नाथाबरोबर आहेत. तसेच त्यांचा मोठा पांगळा भाऊ म्हणजे दादा, बहीण हिराक्का, नंदाक्का, सुमाताई आणि इंदुताई हे सर्व कुटुंबच या कादंबरीतील नायकाच्या ठिकाणी आहे. या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला भाकरीसाठी यातायात करावी लागते. उपासमार सहन करावी लागते. हे कुटुंबच या कादंबरीच्या नायकस्थानी आहे. कादंबरीतील आशयाला पूरक ठरणारी इतरही काही पात्रे या कादंबरीत आली आहेत. लेखकाच्या कठीण परिस्थितीत त्याला सांगली येथे नेऊन कामाला लावणारा गावातील विजय हा तरुण, कर्जाचे काही व्याज माफ करणारे शांताप्पा पाटील, लेखकाला शर्टाचे कापड घेऊन देणारे व त्याला मदत करणारे काटे सर, त्याला काळजीने जेवण देऊन त्याची सहानुभूतीने विचारपूस करणारे त्याचे मित्र बापू ,संतोष आणि राजू, त्यांच्या कुटुंबाचीअस्तेवाईकपणे चौकशी करून त्यांना वारंवार मदत करणारे अंदामामा, नाथावर आजारपणात विनामूल्य उपचार करणारे तारळेकर डॉक्टर आणि दुष्काळातही दारात पाण्याचा हौद कायम भरून लोकांना पाणी देणारे शिवा गोळग्येणे तसेच काकुला कामावर बोलावून काम व भाकरी देणाऱ्या विष्णु शिंदे यांच्या घरातील अनेक स्त्रिया. अशी काही सृष्ट प्रवृत्तींची पात्रेही या कादंबरीतून व्यक्त झाली आहेत. याबरोबरच निवेदकाच्या कुटुंबाला त्रास देणारी काही खलनायकी पात्रेही या कादंबरीत व्यक्त झाली आहेत. निवेदकाला कावीळ झाली असता त्याला दुष्टपणाने वागवणारा त्याचा तुकाराम मामा. त्यांची जमीन कपट कारस्थानाने बळकावणारा त्यांचा दुसरा नामदेव मामा. पाच सहा फूट रानात नांगर घालून त्याची जमीन बळकावू पाहणारे निवेदकाचे चुलते आणि त्यांची मुले,सावकार कोंड्या पारधी ही काही दुष्ट प्रवृत्तीची पात्रेही लेखकानी हुबेहुब चित्रित केली आहेत. यातून सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तींचा संघर्षही त्यांना दाखवायचा आहे. याशिवाय निवेदकाचा दगड्या मित्र, त्याची मैना, अंग हलवत चालणारी व लेखकाला ' ए काळया चल की' म्हणणारी सखू अशी इतरही काही पात्रे या कादंबरीतून व्यक्त झाली आहेत. ग्रामीण भागातील या काही पात्रांशिवाय निवेदकांच्या गावाचा परिसरही या कादंबरीतून नायक बनून येतो. या कादंबरीत जत तालुक्यातील दुष्काळी भागाचे आणि तिथल्या शेतकऱ्यांच्या दुर्दैवी जगण्याचे चित्रण आले आहे.लेखक हे त्या भागात वाढलेले व लहानाचे मोठे झालेले असल्यामुळे त्या भागाची त्यांना खडानखडा माहिती असल्यामुळे एकूण सगळा परिसर कादंबरीच्या पानापानातून जिवंत होऊन येतो. अशा या जिवंत नायकांच्या किंवा व्यक्तिरेखांच्या आणि परिसराच्या चित्रणातून ही कादंबरी साकारत गेली आहे.

५) दुष्काळ :—

वर्तमानकालीन ग्रामीण कादंबऱ्यामध्ये दुष्काळाची चित्रणे अलिकडे मोठया प्रमाणात येत आहेत. 'हाल्या हाल्या दुधू दे' आणि 'कोयता' यांसारख्या वर्तमान काळातील इतरही अनेक कादंबऱ्यांतून दुष्काळाचे चित्रण आले आहे. विविध कारणांमुळे खेडयांची शेती अगोदरच धोक्यात आली आहे .त्यातच अलीकडे वारंवार येणाऱ्या दुष्काळामुळे शेतकरी आणि शेती व्यवसाय अडचणीत आला आहे.त्यामुळे खेडी उद्ध्वस्त होत आहेत. प्रस्तुत 'फेसाटी' या कादंबरीतूनही ग्रामीण भागातील दुष्काळाची दाहकता व त्याची ग्रामीण भागातील कुटुंबांना बसलेली झळ लेखकाने तेवढ्याच दाहकपणे चित्रित केली आहे. लेखकाचा परिसर हा कर्नाटकाच्या सीमा भागातील सांगली जिल्ह्यातील जत तालुका हा आहे. या तालुक्यात वारंवार दुष्काळ पडतो व तेथील गावे अक्षरश: होरपळून निघतात. निवेदक नाथाच्या कुटुंबाकडे एकूण चार एकर शेती असूनही वारंवार येणाऱ्या दुष्काळामुळे शेती नापिक झाल्यामुळे त्यांना इतर ठिकाणी मजुरीची कामे करावी लागतात. तर कामाचा शोध घेत वणवण भटकत फिरावे लागते. मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतात निवेदकाला तर सालगडी म्हणून काम करावे लागते. निवेदकाप्रमाणे त्यांच्या आई—वडिलांनाही इतरांच्या शेतात कष्ट करून कसेतरी जीवन जगावे लागते. दुष्काळामुळे होरपळलेल्या 'निगडी' या गावातील अनेक वर्णने या कादंबरीतून आलेली आहेत. निवेदकांच्याच भाषेत केलेले दुष्काळाचे पुढील वर्णन वाचकांचे मन हेलावून टाकणारे आहे. "त्यावर्षी पावसाचा टिपुकसुद्धा पडला नव्हता. नुसती व्हावटळ,उनाचा चटका आग वकत हुता. झळानं त्वांड शिकून निघत हुतं. सगळया हिरी आठल्या हुत्या. आमची तर हिर नव्हती. पाण्याला लांब जायला लागत हुतं." या विवेचनावरून या गावातील हा दुष्काळ लेखकाचे कुटुंब उद्ध्वस्त करणारा ठरल्याचा प्रत्यय वाचकांना येतो. या दुष्काळामुळे त्यांना कोठे कामही मिळत नाही. त्याचेही वर्णन लेखकाने केले आहे.

''काका दररोज येकाच्या मळयात काम इचारायला जायचा. कुठे काम मिळत नव्हतं .त्या येळला काकू विष्णू शिंदयाच्या मळयात दिवसभर वीस रुपयात राबत हुती. कोरड्या दुष्काळामुळे निवेदकाच्या आई—वडिलांना कामासाठी करावी लागणारी भटकंती व त्यांचे होणारे हाल लेखकाने जिवंतपणे चित्रित केले आहेत. कधी अनावृष्टी तर कधी अतिवृष्टी यांमुळे शेतकरी व शेतमजूर उद्ध्वस्त होत आहेत.या अनावृष्टीचे व अतिवृष्टीचे वर्णन लेखकाने या कादंबरीत केले आहे. ''बारा महिनं दुष्काळानं आन् आता ह्या पावसानं ऊगदीश आणून ठिवला हुता. घरात खायला कायच नव्हतं. काकू उठलीन पोत्याचं ख्वॉळ डोक्यावर घेटलं. आंदामामाच्या घराला गेली. शरभर पिट आणलं.चूल पेटवावं म्हणटलं तर चूल भरून पाणी. काड्यापिटी पण गारव्यानं वली. काय केल्यानं पेटना."अशी कोरड्या व ओल्या दुष्काळामुळे निवेदकाच्या कुटुंबाला आलेली अवकळा व उपासमार या कादंबरीत जागोजागी व्यक्त झाली आहे. या दुष्काळामुळे उद्ध्वस्त झालेले गाव आणि कुटुंब हा या कादंबरीचा महत्त्वाचा विषय आहे.

६) अवैध सावकारशाही :—

खेड्यांमध्ये अस्मानी संकटाने थैमान घातले आहे. त्याचबरोबर येथील सरकार, सावकार आणि येथील समाजव्यवस्था शेतकऱ्यांच्या मुळावरच घाव घालत आहे. त्यातही सावकारशाहीने तर शेतकरी व शेतमजुरांना नेस्तनाबूत केले आहे. सरकारने सावकारांसाठी काही व्याजदर व कर्ज वितरणाची नियमावली ठरवून दिली असली तरी ग्रामीण भागातील अनेक सावकार हे सर्व नियम धाब्यावर बसवून अवैध सावकारशाही करीत आहेत. भरमसाठ व्याज आकारत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत आहे. प्रस्तुत कादंबरीतील शांताप्पा पाटील हा निवेदकाची जमीन लिहून घेतो आणि अगदी पस्तीस हजार रुपयाचे तीन टक्के व्याजाने तीन वर्षात १ लाख ७० हजार रुपये एवढी रक्कम करतो. हे शांताप्पाचे पैसे फेडण्यासाठी निवेदकाच्या मामाकडूनच म्हणजे नामदेवकडून १ लाख ७० हजार रुपये घेतले जातात. नामदेवांनीही या पैशाच्या मोबदल्यात दोन एकर शेती आपल्या नावावर तर दोन एकर मुलाच्या नावावर करून घेतली व ती जमीन पंड्याला विकून टाकली. या कादंबरीतील कोंड्या पारधी हा निवेदकाच्या काकांना गाय घेण्यासाठी सहा हजार रुपये व्याजाने देतो. त्याचे ३६ हजार रुपये वसूल करतो. शिवाय प्रत्येकवेळी पैसे मागण्यासाठी आल्यावर कोंबडी आणि त्याच्या येण्याजाण्यासाठीच्या तेलाचे पैसे त्याला वेगळे द्यावे लागत होते. अशा या सावकाराचे कर्ज फेडण्यातच निवेदकाच्या कुटुंबाची सर्व आयात खर्च होते. कष्ट केलेले सर्व पैसे हे व्याज फेडण्यातच जातात. म्हणून त्यांना उपासमारीला वारंवार सामोरे जावे लागते. अशा या सावकारशाहीच्या अवैध व भरमसाठ व्याजामुळे व कर्जातच जमिनी बुडाल्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे प्रातिनिधिक चित्रण प्रस्तुत कादंबरीतून आले आहे. ७)दारिद्रयाचे चित्रण:—

खेड्यात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे तेथे पैसा फारसा पहायला मिळत नाही आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांची तर खूपच आबाळ होते. वारंवार येणारा दुष्काळ, त्यामुळे अडचणीत आलेली शेती व शेतकरी, भरमसाठ व्याजाचे कर्ज त्यातच मजुरीचा व कामाचा अभाव यांमुळे खेड्यात प्रचंड दारिद्रय असते. याचा प्रत्यय

वर्तमानकाळातील अनेक ग्रामीण कादंबऱ्यांत येतो. 'फेसाटी' कादंबरीच्या पानापानात नाथाच्या कुटुंबात असलेले दारिद्रय प्रत्ययास येते.पैशाअभावी कुटुंबाची अतोनात झालेली हेळसांड लेखकाने प्रत्यकारीतेने मांडली आहे. हे दारिद्रय एवढे की,ते जगणे असह्य करते. या दारीद्रयामुळे अन्न, वस्त्र, निवाऱ्यासारख्या समस्या त्यांच्या जीवनात आ वासून उभी आहे. त्यांना पक्क्या स्वरूपाचे घर मिळत नाही. ओढ्यातील पानशारांनी शेकारलेल्या घरात त्यांना राहावे लागते. हे घर पक्क्या स्वरूपाचे नसल्यामुळे ते पावसाळयात घर गळते. चुलीत पाणी जाते, जळण ओले होते आणि सर्व संसार धूवून जातो. दारिद्रयामुळे कुटुंबाचे झालेले हाल व्यक्त करताना लेखक लिहितात ''कामाला गेलेलं प्वॉट पाणी भागत नव्हतं. काकूचं लुगडं पाक फाटलं हुतं. सतरा ठिगळं जोडली हुती. काकाची धोतरं तळसून गेली हुती. गाठी मारून मारून नेसत हुता. अंगातल्या छाटीला सगळी लुगड्यची फाटकी ठिगळे लावून घालत हुता. आल्यालं रोजगाराचं च्यार पैसं याजावरी जात हुतं. कुणाला कापडं, कुणाला धडुतं मिळतया, सगळं हालचं झालं" अशा हालअपेष्टांचे जगणे लेखकाच्या कुटुंबाला जगावे लागले. निवेदकालाही चांगली कापडे मिळायची नाहीत. कधीतरी नवीन कापडे मिळाली तर लेखकाला खूप आनंद व्हायचा. दारिद्रयामुळेच निवेदकाच्या बहिणीला हिराक्काला हुंड्यासाठी आणि सोन्यासाठी विहिरीत ढकलून देऊन मारण्यात आले. त्यांच्या बहिणींनांही वस्त्रासाठी हाल सोसावे लागतात. फाटलेली कपडे पुन:पुन्हा शिवून घालावे लागतात. कितीही काबाडकष्ट केले तर अन्न वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा त्यांच्या भागात नव्हत्या. आलेले सर्व पैसे व्याज भरण्यात जात होते आणि लेखकाच्या कुटुंबातील अठराविश्व दारिद्रय मात्र तसेच राहत होते.या दारिद्रयामुळेच लेखकाला बालपणापासून सतत कष्टाची कामे करावी लागली. एवढेच नाही तर सांगलीला एका बिअर बारमध्ये वेटर म्हणून काम करावे लागले. अलीकडेसुध्दा कोल्हापूर येथे विद्यापीठात एम.ए.चे शिक्षण घेण्यासाठी जेव्हा ते आले .त्यावेळी त्यांना एटीएममध्ये वाचमॅन म्हणून काम करावे लागले. बांधकामावर पाणी मारावे लागले आणि स्वत:चे शिक्षण घ्यावे लागले तसेच कुटुंबालाही मदत करावी लागली. दारिद्रयाचे असे अनेक हृदयद्रावक प्रसंग लेखकांनी या कादंबरीतून जिवंतपणे मांडले आहेत.

८) भुकेचा प्रश्न :—

'फेसाटी' कादंबरीत कादंबरीचे लेखक व निवेदक नवनाथ गोरे यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या अत्यंत दाहक व जीवघेण्या भुकेचे व ती भूक भागविण्यासाठी त्यांना कराव्या लागणाऱ्या यातायातीचे जिवंत चित्रण लेखकाने केले आहे. ही भूक या देशातील विषम व्यवस्थेतून आलेली आहे. शहर आणि खेडे या दोन गटात भारतीय समाजाची विभागणी झाली आहे. त्यातील ग्रामीण भागात आलुतेदार, बलुतेदार अशी रचना करण्यात आली. त्यामुळे जे उच्चवर्णीय आहेत तेच भांडवलदार व मोठे जमीनदार ठरले. म्हणून ते श्रीमंत झाले, तर जे कनिष्ठजातीय बलुतेदार आहेत त्यांच्या वाट्याला मात्र उपेक्षेचे जीवन आले. ते अल्पभूधारक ठरले. त्यातही येथील सावकार, सरकार आणि बँका यांनीही त्यांचे शोषण केले. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी दुर्बल झाले. पर्यायी त्यांना भूक भागविणे कठीण झाले. या भुकेचा प्रश्न लेखकाने या कादंबरीतून अत्यंत करूणपणे मांडला आहे. कादंबरीचा नायक नाथाला माहीत नसते, की दुसऱ्या दिवशी आपल्याला खायला मिळेल की नाही. त्यामुळे जे समोर येते ते शिळेपाके अन्न ते खात होते. आपल्या पोटाची खळगी भरणे हाच उद्देश त्याच्यासमोर असतो. निवेदकाला बालपणी खेळून भूक लागायची;पण घरात खायला काहीच नसायचे तेव्हा ते ताईला घेऊन वड्याला जाऊन बोरे खाऊन भूक भागवायचे निवेदक आपल्या काकुसोबत म्हणजेच ''आईसोबत मजुरीच्या कामाला जातो. तेव्हा जेवणाच्या सुट्टीत इतर बायकांपासून वेगळे बसल्यावर लेखक विचारायचा काकू आपण बाजूला का बसतुया" त्यांना काकू म्हणायची, ''बाळा आपण गरीब हाय. आपल्या भाकरीवर कालवण नसतया म्हणून." हे निवेदकाच्या आईचे संवाद मन पिळवटून टाकणारेआहेत. लेखकाचे काका आजारी पडतात आणि त्यांचे सोलापूरच्या दवाखाण्यामध्ये ऑपरेशन होते. तेव्हा तेथे दवाखान्याला पेशंट घेऊन आलेल्या चडचण येथील स्त्रियांनी त्यांच्या पेशंटला सुट्टी झाल्यामुळे जाताना काकुला चार दिवसाच्या उरलेल्या भाकरी दिल्या होत्या. त्या भाकरी काकूने फडक्याने पुसून पाण्यात भिजून टोपडं काढून चटणीबरोबर खाल्ल्या होत्या. निवेदक आपल्या इंदुताईसोबत शाळेला गेल्यावर लेखकाने कुत्र्याला भाकरी टाकली होती. पण त्यांच्या बहिणीला इंदुताईला भूक लागल्यामुळे तिने कुत्र्यासमोरची भाकर पूसून खाली होती. भुकेसाठी आपल्या कुटुंबाला करावी लागणारी वणवण लेखकाने अत्यंत संवेदनशीलतेने मांडली आहे. सणादिवशी तर कधीही त्यांच्या कुटुंबाला पोळया मिळाल्या नाहीत. शिमग्याच्या एका सणाला शेजारची मुले पोळया खात होती आणि लेखक नुसते तोंड पाहत होते. त्याबद्दल लेखक आपल्या काकुला म्हणजे आईला पोळयाबद्दल विचारतो तेव्हा ती लेखकाला म्हणते. "आपल्या आयुष्याचा शिमगा चालू हाय न् सण कुठला बाळा? हे उदगार हृदयस्पर्शी आहेत. या देशातील विषम व्यवस्थेचा व त्याचा बळी ठरलेल्या निवेदकाच्या कुटुंबातील भुकेचा प्रश्न मांडणारे आहेत. आपल्या आईचीही दुर्बलता पाहून लेखक म्हणतो, ''काकू मला पोळया नकू. मी कवा तुला पोळया मागणार नाय". गरिबीत

पचवाव्या लागलेल्या भुकेमुळे लेखकाला आलेले हे अनुभवाचे शहाणपण येथे प्रत्ययाला येते. भूक भागविण्यासाठी लेखकाला अनेक ठिकाणी वणवण फिरावे लागते. कधी पातरची भाजी खाऊन, तर कधी सांगलीच्या बसस्थानकावर दुसऱ्याने खाऊन टाकलेल्या केळीची सालपटे खाऊन त्यांना भूक भागवावी लागली होती. या कादंबरीतील असे कितीतरी प्रसंग लेखकाने सांगितले आहेत की ते वाचकांचे अंत:करण हेलावून टाकणारे आहेत. या कादंबरीचा मुख्य विषय भूक असल्याचेही निदर्शनास येते.

९) नोकरशाहीचे चित्रण :—

भारतात भ्रष्टाचाराला ऊत आला असून ग्रामीण भागात तर तेथील लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे प्रचंड शोषण केले जाते. 'फेसाटी' या कादंबरीतूनही सरकारी अधिकाऱ्यांच्या बेधुंदपणाचे व लाचखाऊपणाचे थक्क करणारे प्रसंग लेखकाने मांडले आहेत. निवेदकाचा चुलता जमीन वाटून देत नाही . त्यातच एके दिवशी तो शेतात ट्रॅक्टर लावतो. लेखकाच्या बांधाच्या पोटात ट्रॅक्टर लावून शिवेवरचे दगड उपुसून टाकतो. पाच–सहा फूट बांध त्यांच्याच रानात ढकलला होता. तेव्हा लेखकाचे वडिल आणि लेखक जाऊन ट्रॅक्टर अडवितात. तेव्हा त्यांची मुले काट्या,कुऱ्हाडी घेऊन अंगावर येऊन भांडणं करतात. त्यांना शिव्या देतात. म्हणून लेखक आणि काका पोलीस स्टेशनमध्ये त्यांची तक्रार दाखल करायला जातात. तेव्हा पोलीस लेखकाला व त्यांच्या वडिलांनाच शिव्या देतात. त्याची चूक नसूनही त्यांनाच दोष देतात. हवालदारानेही त्याच्याकडून पैसे खाल्ले होते. एक पोलीस लेखकाच्या वडिलांना पैसे मागताना म्हणतो " ये म्हाताऱ्या दोन हजार रुपये दी. तुझी केस मिटवतो. त्यांना आत टाकतो. नाहीतर जा घरला गप्पगुमान. कशाला केशीच्या नादाला लागलायचं. ती पैश्याने माजल्याती तुझ्याकडे फुटकी कवडीबी नाय. ह्या पुलिस खात्यात पैशाशिवाय काय चालत नाय. हिथं वलंबी जळतया अन् वाळबी जळतया. पैसा हाय तर सगळं हाय. पोलिसाचे हे संवाद या देशातील भ्रष्ट नोकरशाहीचे व किडलेल्या समाजव्यवस्थेचे दर्शन घडविते. पोलीस म्हणजे खरे तर या देशातील सर्वसामान्य उपेक्षित, पिडीत लोकांचे रक्षकच आहेत; परंतुतेच पोलीस आज सामान्यांचे भक्षक बनल्याचे चित्र दिसून येत आहे. गुंडशाहीला अमाप ऊत आला आहे आणि त्यांना येथील श्रीमंत धनदांडगे पैसे देऊन सामान्य लोकांची लूट करत आहेत. त्यांना पाठीशी घालणारे हे पोलीससुद्धा आता गुंडच बनल्याचा प्रत्यय येत आहे .या देशातील नोकरशाहीतील भ्रष्टाचाराचा दुसरा एक प्रसंग लेखकाने सांगितला आहे. मामा नामदेव यांनी व्याजाने पैसे देऊन लेखकाची शेती आपल्या नावे करून घेतात, आणि करारावर स्वत:च्या नावे केलेली ही शेती तो दुसऱ्यालाविकतो. एकेदिवशी पंड्या नावाची व्यक्ती शेतात औत लावते . याबद्दल त्याला विचारणा केली असता आपण लेखकाच्या नामदेव या मामाकडून शेती विकत घेतल्याचे सांगतो. याची चौकशी करण्यासाठी लेखक व त्यांचे वडील तलाठ्याकडे जातात. तेव्हा शेती त्याच्या नावावर केली होती. नोंद घालण्याअगोदर तहसीलदारांनी नोटीस पाठवली होती; पण पोस्टमनला पैसे देऊन ती त्यानेच सोडवून घेतली होती. पोस्टमॅन हेही पैसे खाऊन पत्र वाटपामध्ये अफरातफर करतो. पोस्टमन हा खरेतर खूप महत्त्वाचा नोकरदार आहे. त्याच्या पत्र वाटपावर अनेकांचे भवितव्य अवलंबून असते. पण तोच पोस्टमन जर पैसे खाऊन खोटेनाटे व्यवहार करत असेल तर या समाजव्यवस्थेचे काय होणार? असा प्रश्न या दोन्ही प्रसंगांतून लेखकाने उपस्थित केलेला आहे. नोकरशाहीतील भ्रष्टाचाराचा तिसरा एक प्रकार लेखकाने येथे मांडला आहे. लेखकाचे भाऊ दादा यांच्या अपंगत्वाचे एक प्रकरण खूप दिवसापासून प्रलंबित होते. कारण हे प्रकरण निकाली काढण्यासाठी तेथील अधिकारी सात हजार रुपयांची मागणी करतो. ते सात हजार रुपये या कुटुंबाकडे नसल्यामुळे हे प्रकरण लांबणीवर जात होते. या कादंबरीत व्यक्त झालेले नोकरशाहीच्या भ्रष्टाचाराचे प्रश्न या देशातील प्रत्येक नागरिकाला अंतर्मुख करणारे आहेत. प्रातिनिधिक रूपात येथील पोलीस, पोस्टमॅन आणि प्रकरण मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जनतेच्या कल्याणासाठी व विकासासाठी नेमलेला नोकरवर्ग जनतेला लुबाडण्याचे क्रूर कर्म कसे करीत आहे. याचे दर्शन लेखकाने येथे घडविले आहे.

१०) नातेवाइकांकडून झालेली अवहेलना :—

रक्ताच्या नात्यातील व्यक्तीकडून लुबाडणूक केली जाते आणि इतर लोक मात्र संकटातून सुटका करू शकतात. हेच आजच्या समाजव्यवस्थेतील जगण्याचे सूत्र आहे. रक्ताच्या नात्यातील माणसांकडून ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात येत असल्याचे चित्र आज दिसून येत आहे. त्याचे प्रतिबिंबया कादंबरीतून उमटले आहे. त्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत भाऊबंदांनी व नातेवाईकांनी नाथांच्या कुटुंबीयांची केलेली फसवणूक व त्यांना दिलेला त्रास या कादंबरीतील करूणपणे व्यक्त झाला आहे. रक्ताच्या नात्यातील असलेला चुलता रानातील वाटणी देत नाही. उलट ट्रॅक्टर लावून त्याच्या कुटुंबाची पाच सहा फूट जमीन बळकावण्याचा प्रयत्न तो करतो. आपल्या मुलांबरोबर तो नाथाला व त्याच्या वडिलांना शिव्या देतो.काठयासह अंगावर मारायला येतो आणि पोलिसांना

पैसे देऊन हा अन्याय चिरडून टाकतो. नाथाचा थोरला मामा नामदेव हाही आईच्या रक्ताच्या नात्यातील असूनही आपल्या मुलाला डोळापाला नाथाची बहीण ही रक्कम दिलेली असते परंतु सख्खा मामा असूनही तिचा हुंड्यासाठी छळ करण्यात येतो व तिला विहिरीत ढकलून तिचा जीव घेतला जातो. नाथाच्या मधवा मामा तुकाराम आहे. आईचा रक्ताच्या नात्यातील असूनही तोही नाथाच्या आईला भांडतो. भांडणे झाल्यामुळे तो बोलत नसतो.तो कावीळ झालेल्या व्यक्तिला डागत असतो. नाथाला कावीळ झाल्यामुळे त्यांची आई त्यांना घेऊन आपल्या भावाकडे जाते तेव्हा भाऊ तिला म्हणतो.''ये सूभे, माझ्या दारातून पहिली हो चालती'' अशा शब्दात तो तिची अवहेलना करतो शेवटी लेखकाला डागतच नाही.सुमाताई ही तर लेखकाची बहीणच आहे. तिला मामाच्या मुलाला दिलेले असते. तिची शांता ही मुलगी आहे. तिच्या बालपणी सुमाताई काकुला म्हणते ''काकू माझी शांतता नवऱ्याला देती बघ मोठेपणी काकू या सोयरीकची विचारणा करण्यासाठी सुमाताईकडे जाते. सुमाताई शांताला नाथाला देण्यास नकार देते. नाथा काही कामाचा नाही तो नापास झाला तंबाखू खातो भिडे आवडतो दगडयासोबत बाया—पोरी फिरतो अशा अनेक दोष दाखवून ती शांताचे चे लग्न दुसरीकडे लावून देते. या सर्व रक्ताच्या नात्यातील व्यक्तीकडूनच नाथाच्या कुटुंबाचा वेळी अपमान करण्यात येतो. त्यांना त्रास देण्यात येतो. त्यांची अवहेलना करण्यात येतो एवढेच नाही तर चुलता आणि मामाकडून घोर फसवणूक आणि अन्याय अत्याचार करण्यात येते. मानवाच्या स्वार्थीपणामुळे त्यांनी धारण केलेल्या अमानवी व पाशवी रूपाचे दर्शन या विविध प्रसंगातून लेखकांने घडविले आहे. संकटांची मालिका च या कादंबरीतुन व्यक्त होते म्हणूनच ही कादंबरी एका कुटुंबाची समस्या मांडणारी कादंबरी असून ती समस्याप्रधान कादंबरी ठरली आहे. या कुटुंबाची ही समस्या असली तरीही त्यांना त्याच्या ग्रामीण भागगाती प्रत्येक कुटूंबाची व्यथा या कादंबरीतुन प्रातिनिधीक रूपात व्यक्त झाली आहे. त्यांच्या कुटुंबास समोर एकापाठोपाठ एक संकट दत्त म्हणून उभा असते. या संकटांशी झुंज देत हे कुटुंब मोडून पडते घरात अठरा विश्व दारिद्रय असल्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी त्यांना रोजच संघर्ष करावा लागते. सतत कष्ट करावे लागते. आलेल्या मजुरीतून कर्जाचे व्याज फडावे लागते. त्यामुळे त्यांच्या समस्यां कायम असतात या प्रमुख व कायम असलेल्या समस्यां बरोबरच नाथाच्या बालपणीच त्यांची बहीण नकोसा ही आजारी पडते त्यातच तिचा मृत्यू होतो. काकाबरोबर बाजारला गेलेली सुमाताई पावसामुळे ओढ्याला आलेल्या गळया एवढया पाण्यातुन येताना मोठे संकट निर्माण होते. सुदैवाने काका व सुमाताई दोघेही त्यातून सुखरूप बाहेर निघतात. नंतर सुमाताई आजारी पडते. हिराक्काचे लग्न झाल्यावर चार ते पाच दिवसातच हिराक्काच्या पोटाचे दुखणे सुरू होते. त्यासाठी या कुटुंबाला खूप मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागते. मोठ्या भावाने म्हणजे दादांनी दुकान टाकले होते तर त्याचीही चोरी होते. त्याचे सरकारी प्रकरण मंजूर होण्यासाठीही सतत अडचणी येतात. अनंत अडचणीतून मंजूर झालेल्या त्याच्या प्रकरणाचे चाळीस हजार रुपये घरातील पेटीत ठेवल्यावर त्या घराला आग लागते. घरातील सर्व संसार जळून राहत होतो. त्यातच ४००००रू. जळून जातात. शेतात खूप मोठ्या अपेक्षेने कापूस लावला जातो. त्यासाठी अहोरात्रकष्ट केले जातात आणि कापसाला फुलोरा आल्यावर आग लागते व ती विजवता विजवता जीव जायची वेळ येते. त्यात काही कापूस जळून जातो. या सर्व संकटांबरोबरच सावकारी कर्जाचा डोंगर, नाथाच्या मामाकडून त्यांची झालेली लुबाडणूक या सर्व संकटांनी नाथांची कुटुंब मोडकळीस शेती उद्ध्वस्त होते. एक संकट संपण्याअगोदर दुसरे संकट दत्त म्हणून उभे राहते. या कादंबरीचा प्रत्येक पानात संकटांची मालिकाच गोवली आहे. ही संकटे वाचून वाचकांचे मन सुन्न होते. प्रस्तुत कादंबरीचा बहुतांश भाग या संकटाने व्यापल्याचा दिसून येतो. शिक्षण व्यवस्थेवर चिंतन करण्यासाठी या कादंबरीत विविध विषय लेखकाने मांडले आहेत. या विविध विषयांबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल असलेली अनास्था व रोजगाराभिमुख नसलेले शिक्षण यांवरही लेखकाने आपले चिंतन मांडले आहे. लेखकाला मुळातच शाळेबद्दल व अभ्यासाबद्दल अनास्था आहे. म्हणून तर अनेक वेळा शिक्षकांनी मारले की ते शाळा सोडण्याचा निर्णय घेतात. पण आई—वडिलांच्या, भावाच्या, बहिणीच्या आग्रहावरून पुन्हा त्यांना शाळेत जावे लागते. शिक्षकाच्या माराची त्यांना भीती वाटते. त्यांना शिक्षकपण खुप मारायचे म्हणून शाळा व शिक्षक यांच्याबद्दल त्यांना भीती वाटायची. इंग्रजी आणि गणित हे दोन विषय तर त्यांना खूपच अवघड वाटायचे. ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांच्या मनामध्ये या दोन विषयांबद्दलची भीती असतेच. त्यांना कधीच स्वत:हून शाळेत जावे असे वाटले नाही आणि पुढे त्यांच्या शिक्षणाचा फार उपयोगही झाला नसल्याचा अनुभव त्यांना आला. नाथाने आपल्या प्रातिनिधिक चित्रणातुन आजच्या शिक्षणाची झालेली अनास्था व शिक्षणानंतरही असलेली बेरोजगारी यांचा प्रश्न गंभीरपणे मांडला आहे. आजचे महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देऊ शकत नाही. तर ते त्यांच्या बेकारीत भरच घालणारी आहे. ग्रामीण भागातील ही मुले मूळात कष्ट करीत शेती करीत शिक्षण घेत असतात. त्यांच्या कुटुंबाचे पोट हातावर असते त्यांच्या रोजगाराचा प्रश्न असतो हे

पारंपरिक शिक्षण आज भेटू शकत नाही म्हणून अशा मुलांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविणाऱ्या व्यवसायिक शिक्षणाची गरज लेखक अधोरेखित करताना दिसतात. त्यामुळे अशा मुलांच्या पोटाचा प्रश्न सुटू शकेल तसेच त्यांच्या कुटुंबालाही हातभार लागेल ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतील शिवाय अशा ग्रामीण भागातील मुलांना कोणतेही शिक्षण मारून मुटकून देता येत नाही. ही मुले न्यूनगंडाने ग्रासलेली असतात. अशा मुलांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्यावर उपाययोजना करण्याची गरज असते. हेही लेखकाला या कादंबरीतून सुचवायचे आहे. या कादंबरीत अशा मुलांच्या शिक्षणाचे चक्र आहे.जी शेतकरी कुटुंबातील मुले आहेत ती मुले त्यात भरडली जातात.याचेही चित्रण येथे आले आहे.

११) श्रद्धा—अंधश्रद्धा :—

फेसाटी ही ग्रामीण कादंबरी असून या कादंबरीत ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असल्यामुळे ग्राम संस्कृतीचा खूप मोठा भाग असलेल्या श्रद्धा म्हणजेच अध्यात्मिक भाव व अंधश्रद्धा यांचेही चित्रण या कादंबरीत मोठ्या प्रमाणात आले आहे. या कादंबरीची सुरुवातच लेखकाने सुंबरान शाखेने केली आहे. त्यात आपला व आपल्या गावाचा परिचय करून देत सिद्धनाथाबद्दलचीत्यांनी श्रद्धेची भावनाही व्यक्त केली आहे. स्वतःच्या धनगर जातीच्या संस्कृतीचाही उल्लेख त्यांनी आवर्जून केला आहे आणि कादंबरीच्या अंतरंग भागातही धनगर समाजाची ओवी लिहून त्यात चांगुनाची ओवी गोवली आहे. त्यामुळे कादंबरीतील वातावरणही अध्यात्मिक होण्यास नक्कीच त्याचा उपयोग झाला आहे. या देवतांबरोबरच विविध सणाला विविध देवतांची पूजा केली जाते. त्याचेही वर्णन आले आहे.बेंदराचा सण, मारुतीची पूजा, बैलांची पूजा तसेच पाडव्यासारख्या सणाचेही वर्णन आले आहे. या दैवतां बरोबरच धनगर समाजातील अहिल्यादेवी होळकर, बापू बिरू वाटेगावकर या समाजसुधारकाबद्दलही नितांत श्रद्धा व आदरभाव लेखकांनी व्यक्त केला आहे. उपरोक्त काही श्रद्धां बरोबरच ग्रामीण भागातील प्रचलित असलेल्या काही अंधश्रद्धा,रूढी, परंपरा, करणी,भानामती आणि खोट्या समजुती अशा सारख्या अनेक अनिष्ट प्रथाही लेखकानी या कादंबरीतून सांगितल्या आहेत. लेखक एकदा आजारी पडले असताना त्यांना पाहण्यासाठी गावातील मायाक्का स्त्रीच्या अंगात देवी येते. या आजाराने लेखक बेशुद्ध होतात सगळेजण रडत बसले तेव्हा मायाक्काकडे त्यांना देण्यात येते. मायाक्का लेखकाच्या डोक्यात लिंबू पिळुनएक उजवीकडे व दुसरी डावीकडे फेकते. कपाळाला भंडारा लावला मग लेखक शुद्धीवर येतात. करणी, भुतबाधा याबरोबरच खेड्यात प्रचलित असलेल्या विविध प्रथांचेही चित्रण लेखकाने केले आहे. लेखकाच्या घरामागच्या पट्टीत लिंबाचे झाड असते तिथे तीन दगड ठेवलेलेअसतात त्याला हक्काचे पट्टे ओढले जातात. त्याबद्दल लेखक विचारतात तेव्हा आई म्हणते आई दगडात बाबा दगडाला देव मानून त्याची पूजा करण्याची ग्रामीण माणसाची अंधश्रद्धा येथे प्रकट होते.''काकूंची अनेक देवावर श्रध्दाअसते. हे सांगताना लेखक म्हणतात काकूची देवावर अपार श्रद्धा होती. काकूच्या अंगात मरगुबाई यायची. कुठल्याही देवाला नवस करायची'' अशी श्रद्धाळू आणि परंपरावादी ग्रामीण स्त्री या कादंबरीत व्यक्तझाली आहे. मरगुबाईच्या श्रद्धेचे अनेक प्रसंग जागोजागी प्रकट झाले आहेत. एकेदिवशी लेखक जेवण करत असताना एकदम लालभडक पाणी त्यांच्या अंगावर पडते ते पाणी कूंकाचे असते आणि घराच्या मागे जाऊन पाहिले तर पाच लिंबू ५—२५ सुया दोन कणकीच्या बाहुल्या, बाहुलीच्या डोक्यात, पोटात आणि गळयात सुया टोचल्या होत्या.ते पाहून काकूला वाटते की ही करणी आहे. म्हणूनच घराच्या मागेसंकटे लागली आहेत असे वाटून आई करणीकरणाऱ्याला शिव्याशाप देते. लेखकाला ताप येत असतो तेव्हा अनेक लोक अनेक देवांची व मसोबा ची माहिती देतात म्हणून लखकाची आई प्रत्येक देवाला मागून घेतले नवस करते.या अंधश्रद्धाच आहे.या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात प्रचलित असल्याचे दिसते. हा कार्यक्रम लेखकाचीआई मोठ्या श्रद्धेने साजरा करते. यात डोळयातून दुधाची वाफ आपोआप चालू होते, दूध उतू जाणे, आवाज येतो काकांनी पाच गावांची मागणी मायाकाबरोबरच कृष्णा—कोयना यांनाही नवस बोलला जातो. यातूनच ग्रामीण भागात अंधश्रद्धा चे अनेक उत्सव श्रद्धेच्या नावाखाली कसे साजरे केले जातात. याचाही प्रत्यय येतो. देवदेवता नवस—सायास करणी—धरणी याबरोबरच काही शकुन—अपशकुनही खेड्यात प्रचलित असतात. या कादंबरीत अमावस्येच्या रात्री मांजर ओरडणे, पापणी उडणे या सर्व बाबी अपशकुन मानल्या गेल्याचे चित्र आले आहे.

१२) आशावाद :—

ग्रामीण भागात अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्जबाजारीपणा, दुष्काळ या अनेकविधसमस्यांबरोबरच ग्रामीण माणसांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये आशावादही असतो. हे लेखकाने स्पष्ट केले आहे. किती जरी अडचणी आल्या तरी त्यावर मात करीत, संघर्ष करीत सुख निर्माण करण्याची जिज्ञासा या माणसांमध्ये असते. त्यासाठी कादंबरीतील लेखक, लेखकाची काकू म्हणजे आई, वडील आणि बहिणी तसेच भाऊ खंगुन जातात पण ते संपत

नाहीत. कारण ते आशावादी आहेत. निसर्गाची वारंवार होणारी अवकृपा,दारिद्रय, सावकारशाही यांनी लेखकांच्या कुटुंबाची माती होते. हेही दिवस जातील असा आशावाद घेऊन हे कुटुंब आलेल्या परिस्थितीला झुंज देत असते. सावकाराच्या घशात असलेली शेती आपण सोडवून घेऊ अशी खात्री या कुटुंबाला असते. आपण एक ना एक दिवस कर्जमुक्त होऊ असेही त्यांना वाटते. म्हणून ते काबाडकष्ट करत राहतात.झुंजत राहतात. लेखकाचा भाऊ म्हणजे दादा आपले अपंगाचे प्रकरण होणारच या आशेवर जगत असतो. त्यासाठी तो प्रयत्न करत असतो. तर लेखकही आपण शिक्षण घेऊन पोलिस होऊ असा आशावाद घेऊन जगत असतात. लेखकाच्या बहिणीही याच आशावादाने प्रेरित होऊन कष्टत राहतात,झुंजत राहतात लेखकांची काकू म्हणजे आई व काका म्हणजे वडील आणि दादा म्हणजे भाऊ नाथा म्हणजे लेखक शिकून मोठा व्हावा आणि आपले हाल संपावेत यासाठी सततनाथाला शिक्षणासाठी प्रेरित करीत असतात. या सर्व कुटुंबाच्या मनगटात असलेले बळ हीच त्यांना संघर्षांची प्रेरणा देत असते. कितीही संकटे आली तरी निराश न होता आशावादी दृष्टिकोन घेऊन झगडणारी ही पात्रे या कादंबरीत लेखकाने अक्षर केली आहेत.

१३) भाषाशैली :—

'फेसाटी' कादंबरीच्या यशाचे गमक हे या कादंबरीच्या भाषेत दडले आहे. स्वत:च्या गावातील दैनंदिन जीवनातील रोजच्या व्यवहारातील साधी—सोपी बोलीभाषा हे या भाषेचे वैशिष्ट्य आहे. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील हवीहवीशी असलेली बोलीभाषा वाचनीय बनली आहे. कर्नाटकाच्या सीमारेषेवरील हा भाग असल्यामुळे कर्नाटकी बोलीभाषेची लकब काही ठिकाणी या भाषेत दिसून येते. घेतलं, म्हटलं ही क्रियापदाची रूपे कानडी भाषेची सामने साधणारी आहेत. या परिसरातील बोलीभाषेतील जीवन, पिल्लू, जातो,झोपलो, उठलो, दाखवला,यासारखी क्रियापदाची रूपे या भाषेत आलेले आहेत.. या परिसरातील भूल, अंक, गई ,काम, राहिला, बांगला, पुष्पा, ती, डोळे,काकाचा पंखाचा फाळ पळपुटा पोळीपाठ पाणी तापवायचे भांडी, केरळी सबल, हागायचं करंट, जोंधळे अशी या बोली भाषेतील वैशिष्ट्यपूर्ण असलेले शब्दकळा या भाषेला सौंदर्य प्राप्त करून देते. तर या परिसरातील भाषेत रूढ असलेल्या विशिष्ट म्हणींचांही वापर लेखकाने केला आहे. पोट पाठीला चिकणी, गरिबांची गायन कोणाला काय, पावसाने पाठ फिरवली, आई मरो बहिण जगो, नाक टेकायला लागली, माना मुरगाळणे, आगीतून बाहेर पडणे अत्यंत अर्थपूर्ण अशा ग्रामीण भागातील म्हणी वाक्प्रचार याबरोबरच गांडीला मानधन येणे म्हणायला लागली असे अश्लील संदर्भात असणाऱ्या पण अर्थपूर्ण व लालित्यपूर्ण असलेल्या म्हणी यांचाही वापर लेखकांनी आशय प्रकटीकरणासाठी औचित्यपूर्ण केलेला आहे. निवेदन आणि संवाद हे दोन्ही बोलीभाषेत असल्यामुळे संपूर्ण कादंबरीच अत्यंत वाचनीय, लालित्यपूर्ण बनली आहे. फक्त काही विविध निकषांवरच काही आपल्या भाबड्या स्वभावामुळे आपल्या आयुष्यात ओढवलेल्या काही कठीण प्रसंगाचे चित्रणही लेखकांनी विनोदाच्या शैलीमध्ये केले आहे. सांगलीला असताना कापडाच्या लास्टिक पुतळे पाहताना खऱ्याखुऱ्याबाईनीही त्यांना खडसावले. पिक्चर पाहण्यासाठी निघाली असता एका बोळातील एका बाईने त्यांना बोलावणे आणि त्यात भाबडेपणाने गुंतून पडणे व कशीबशी सुटका करून घेणे. गावातील सकुनी म्हणून तर उडविणे व ज्याच्या प्रेमात पडल्यामुळे बुचकळून जाणे अशा काही प्रसंगाचे चित्रण लेखकांनी जिवंतपणे केले आहे .शिक्षणाची व लेखनाची कोणतीही परंपरा नसलेल्या घरात जन्मलेल्या एका तरुण लेखकाने आपल्या अनुभूतीच्या जोरावर जिवंत चित्रण करून ही कादंबरी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात अजरामर कलाकृती बनविली आहे. या कादंबरीतील आशय अभिव्यक्तीचा अभिनत्वातून लालित्यपूर्ण व सौंदर्यपूर्ण भाषा, जिवंत प्रसंग याबरोबरच जिवंत व्यक्तिरेखा आणि ग्रामीण जीवनात अत्यंत वास्तव चित्रित करण्यासाठी या परिसरातील वापरलेली जिवंत बोलीभाषा यामुळे ही कादंबरी ग्रामीण कादंबरीचे इतिहासातील एक मैलाचा दगड ठरली आहे. या कादंबरीत काही दोषही निश्चितच आहेत. काही ठिकाणी खूप बटबटीतपणा आलेला आहे. याचे चित्रण अतिप्रमाणात करण्यात आलेले आहे. काही ठिकाणी बोलीभाषांचा वापर करताना अश्लील शब्दांचा वापर झालेला आहे. हे असे काही दोष मान्य करून सुद्धा ही कादंबरी ग्रामीण मराठी कादंबरीच्या प्रवाहात मोलाची भर घालणारी कादंबरी ठरली आहे. एवढे मात्र नक्की.

## संदर्भसूची :—


१. नवनाथ गोरे, फेसाटी, अक्षर वाड्मय प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २६ जून २०१८
२. चंद्रकुमार नलगे, ग्रामीण वाड्मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर २९ ऑगस्ट २०१३
३. द. ता. भोसले,ग्रामीण साहित्य एक चिंतन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८८
४. आनंद यादव,ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुनर्मुद्रण ऑगस्ट २०१६


❖❖❖

# ग्रामीण साहित्य: कृषिवल संस्कृतीचा समर्थ आविष्कार

प्रा. साजिद के. शाह
सहायक प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख
डॉ. आर. जी. राठोड कला विज्ञान महाविद्यालय
मूर्तिजापूर, जिल्हा अकोला, महाराष्ट्र (India)
Email: shahsajid7047@gmail.com भ्रमणध्वनी ९८५०३९४५७१

## सारांश :—

ग्रामीण जीवनात बदलत्या काळानुसार विविध परिवर्तने घडून आली. स्वातंत्रोत्तर काळात बलुतेदारी व्यवस्था मागे पडली. लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार, शिक्षणाचा प्रचार प्रसार, यंत्रयुगाचे आगमन झाले. यंत्रयुग व औद्योगिकीकरण यामुळे ग्रामपातळीवरील व्यावसायिक, बलुतेदारांचे धंदे डबघाईला आले. बेरोजगारी वाढली. दुष्काळामुळे शेतीत पिकेनासे झाले. दारिद्र, कर्जबाजारीपण वाढले. खेड्यातून शहरांकडे स्थलांतर होऊ लागले. पुढे जागतिकीकरणानंतर या दु:स्थितीला अधिक गती मिळाली. तर दुसरीकडे शेतकरी व शेती अधिकच डबघाईला गेली. या ग्रामीण जीवनाचे, परिवर्तनाचे, संघर्षाचे चित्रण ज्या साहित्यातून घडते ते ग्रामीण साहित्य होय. खेड्यात राहणाऱ्या माणसाच्या जीवनानुभवाचे, जाणिवांचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडविण्याचे कार्य झाले आहे.

बीज शब्द:— ग्रामीण साहित्य, शेती, खेडे, शोषण, परिवर्तन, चळवळ

उद्दिष्टे:— ग्रामीण साहित्याचा प्रवास, त्याचे अंतरंग समजून घेणे.

गृहितके:— ग्रामीण साहित्यातून 'कृषीवल संस्कृती' चा वास्तविक आविष्कार घडतो.
ग्रामीण जीवनाच्या अडीअडचणी, समस्या व्यक्त झाल्या.

संशोधन आराखडा:— प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण पद्धती वापरण्यात आली.

साहित्याचे पुनर्विलोकन:— प्रस्तुत शोधनिबंधासाठी ग्रंथ, पुस्तके, दैनिक वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादींचे पुनर्विलोकन करण्यात आले.

## प्रस्तावना:—

१९६० नंतर मराठी साहित्यात जे अनेक प्रवाह निर्माण झाले. त्यात ग्रामीण साहित्य हा एक महत्त्वाचा प्रवाह मानला जातो. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या अतिशय मोलाची भर घातलेली आहे. एक नवा आशय, जीवनाचे नवे क्षेत्र मराठी वाचकांसाठी ग्रामीण साहित्याने खुले करून दिले. या अर्थाने मराठी साहित्याला समृद्ध करण्याचे कार्य ग्रामीण साहित्याने केले आहे. ग्रामीण साहित्यातून ग्रामीण भागातील, खेड्यातील जीवनाला साहित्यात अभिव्यक्त करण्यात आले आहे. या साहित्यातून ग्रामीण संस्कृतीचा परिचय नागर समाजाला व्हायला मदत होते. खेड्यापाड्यातील रूढी, परंपरा, चालीरीती, संस्कृती, बोलीभाषा, त्यांच्या समस्या, ग्रामीण जीवनाचे विविध पैलू ग्रामीण साहित्यातून प्रकट होत आले. एकूणच ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण दर्शन ग्रामीण साहित्यातून व्यक्त व्हायला मोलाची मदत झाली आहे. ग्रामीण साहित्याची पाळेमुळे प्राचीन—मध्ययुगीन साहित्यामध्ये सुद्धा आढळून येतात.

## ग्रामीण जीवन—साहित्य :—

खेडी आणि शहरे भारतीय समाजाचे दोन महत्त्वपूर्ण घटक राहिले आहेत. औद्योगिकरणाच्या काळाचा परिणाम म्हणून उत्तरोत्तर खेडी शहराकडे धाव घेऊ लागली. पण खेड्या शिवाय भारताचे अस्तित्व नाही, याची जाणीव महात्मा गांधींनी 'चला खेड्याकडे' या नाऱ्यातून देशाला करून दिली. परिणामी देशाचे लक्ष खेड्यांकडे वेधले गेले. ग्रामीण भागाच्या समस्या, त्यांच्या अडचणी त्यांचे एकूणच जगणे इत्यादी विषयांना घेऊन ग्रामीण साहित्य निर्माण होऊ लागले.

डॉ. प्रल्हाद लुलेकर म्हणतात,''ग्राम हे एकंदर भारतीय आधीपीठ आहे. त्या संस्कृतीच्या व्यक्तिमत्वाचे अनन्यसाधारण सर्वसमावेशी रूप आहे. हे लोकसमूहातून निर्माण झालेल्या संकेतांवर रूढी, परंपरांनी बद्ध झालेले आहे. तेथील रिती, संस्कृती यामुळे जे जीवन घडले त्याबरोबरच नव्या जाणिवांना उन्मेष फुटेल.''[१]

आधुनिकीकरणामुळे अलीकडे ग्रामीण जीवनात अनेक परिवर्तने घडून आलेली आहेत. त्याआधी गाव हे गावगाड्यावर आधारलेले होते. या गावगाड्यात शेतकरी, अलुतेदार, बलुतेदार, दलित, फिरस्ते इत्यादींचा समावेश होता. हे सर्व घटक गावपातळीवर एकमेकांशी निगडित व परस्परांवर अवलंबून होते. 'शेती' हा खेड्यातील मुख्य व्यवसाय, उत्पन्नाचे मुख्य साधन राहिले आहे. शेतकरी शेती करून उत्पन्न काढून गावकऱ्यांच्या अन्नाची सोय लावून देत आलेला आहे. त्याला शेती व गृहोपयोगी वस्तू व औजारे करून देणारे सुतार, लोहार, चांभार, कुंभार, तेली, सोनार इ. जाती किंवा व्यावसायिक, सेवा पुरवणारे न्हावी, रामोशी, धोबी, कोळी, ग्रामपातळीवर मनोरंजनाचे काम करणारे जोशी, पिंगळा इत्यादी जाती. या सर्वांना ग्रामजीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान होते. शेतकऱ्याकडे शेतीतून उत्पन्न आल्यावर तो त्यातून विशिष्ट हिस्सा किंवा वाटा या सर्व घटकांना द्यायचा, त्याला 'बलुते' असे म्हणायचे. ते त्यांच्या कामाचा व श्रमाचा मोबदला म्हणून दिले जायचे. नगदी पैशांऐवजी खेड्यातील किंवा गावातील सर्व व्यवहार या बलुतेदारी पद्धतीवर चालायचे. एक दुसऱ्यांच्या गरजा भागविणे हा ग्रामीण जीवनाचा 'धर्म' होता. या बलुत्यावर या जाती–व्यावसायिकांचा उदरनिर्वाह चालायचा. तेव्हा शेती ही केंद्रस्थानी होती व इतर घटक त्याभोवती अशी ग्रामरचना परिवर्तनपूर्व काळात अस्तित्वात होती. भारतासारख्या कृषिप्रधान देशातील शेतीचे केंद्रस्थानी असणारे महत्त्व हळूहळू कमी होत गेले. आधुनिकीकरणाच्या नावाखाली शेती व शेतकरी हा उपेक्षित घटक म्हणून आज गणल्या जात आहे.

'वाङ्.मयीन संज्ञा व संकल्पना कोशा' त ग्रामीण साहित्यासंबंधी म्हटले आहे, ''ग्रामीण वास्तव, ग्रामीण संस्कृती व ग्रामीण बोली यांचा वापर करणारे साहित्य, शेती व त्यांचा परिसर व त्यात वावरणारी माणसे यांचे जीवन हे ग्रामीण साहित्याचे प्रथम केंद्र असते. खेड्यातील माणसांच्या जीवनातील श्रद्धाविश्व, शेती व निसर्ग यांच्याशी असणारे भावबंध, ग्रामव्यवस्थेतील बलुतेदारी, सामाजिक–आर्थिक संबंधाची पारंपारिक व्यवस्था, आधुनिक काळात आलेली पंचायत राज–व्यवस्था, सहकार तत्त्वावर चालणाऱ्या विविध संस्था, यंत्र संस्कृतीचे ग्रामीण जीवनावर झालेले आक्रमण व त्याचे परिणाम, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलत चाललेले ग्रामीण जीवन, तेथील व्यक्ती व समूह यातील ही ग्रामीण साहित्याची आशय सूत्रे असतात.''[२]

मधु मंगेश कुलकर्णी म्हणतात, ''ग्रामीण जीवनातील सुखदु:खे, चढ–उतार, स्थितीगती त्यांचा आविष्कार करणाऱ्या साहित्याला ग्रामीण साहित्य असे म्हटले जाते. ग्रामीण व प्रादेशिक या दोन्ही संज्ञा तशा समानार्थी आहेत, फरक म्हणायचं झाला तर प्रादेशिक ही या ग्रामीण या सज्ञेपेक्षा जास्त व्यापक आहे.''[३]

प्रभाकर बागले म्हणतात, ''ज्या साहित्यात ग्रामीण संवेदना आविष्कृत झाली असेल आणि शहरी संवेदनेचा अभाव असेल तर ग्रामीण साहित्य.''[४]

प्रमोद मुनघाटे म्हणतात, ''ग्रामीण साहित्याचे केंद्र ग्रामव्यवस्था आहे आणि ग्रामीण व्यवस्थेचा केंद्रबिंदू शेतकरी आहे. खेड्यातील इतर आलुतेदार–बलुतेदार हे या केंद्राच्या परिसरात येतात असे मानले तर ग्रामीण साहित्य हे शेतकरी साहित्य ठरते.''[५]

वरील व्याख्यांवरुन स्पष्ट होते की, ग्रामीण साहित्यामध्ये खेडे व खेडूत यांचे सर्वांगीण जीवनदर्शन व्यक्त होत असते. ग्रामीण साहित्याने ग्रामीण जीवनाचे सर्वांगीन चित्रण करण्याचे धाडस केले आहे. खरे तर जीवनाचे जे दाहक अनुभव घेतले, तेच शब्दात मांडण्याचे कार्य ग्रामीण लेखकांना करावे लागत आहे.

## ग्रामीण साहित्याची पार्श्वभूमी :

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''साधारणत: मराठीमध्ये जाणीवपूर्वक ग्रामीण मराठी साहित्याच्या निर्मितीला १९२० नंतर प्रारंभ झाला.''[६] मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याचा सलग प्रवाह १९२० नंतर आणि ग्रामीण साहित्याची चळवळ १९७५नंतर निर्माण झालेली असली तरी, प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील साहित्यामध्ये ग्रामीण साहित्याचे प्रतिबिंब उमटलेले आहे. महानुभावीय साहित्य, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ या संतांचे साहित्य तसेच शाहिरी वाङ्.मयामधूनही ग्रामीण जीवनाच्या अनेक छटा दिसून येतात. तसेच म. फुले यांच्यापासून कसदार असे ग्रामीण जीवनातील समस्या मांडणारे साहित्य लिहिले जात आहे. त्यांचे 'शेतकऱ्यांचा असुड', 'गुलामगिरी' इ..दमदार साहित्य याची साक्ष देते! ''ग्रामीण जीवना संबंधीचे पहिले भाष्यकार म्हणून आपण महात्मा फुले यांना ओळखतो. महात्मा फुले यांच्यानंतर एक सलग अशी विचारांची परंपरा

महाराष्ट्रात विकसित होत गेलेली दिसते. महात्मा फुले यांच्या पाठोपाठ आलेल्या कृष्णाराव भालेकर यांनी कृषी जीवनाचे विविध कारणांनी होणारे शोषण तर प्रगट केलेच आहे, पण ग्रामीणांनी दैववाद सोडून द्यावा यासाठी विपुल लेखन केले आहे. आपण दैव दैव करीत बसलो तर दैव आपल्या उरावर बसेल अशी भीती ते व्यक्त करतात.''[७]

ग्रामीण साहित्याचे १९२० च्या आधीचा कालखंड, १९२० ते १९७५ या दरम्यानचा कालखंड, १९७५ ते १९९० हा कालखंड, १९९० नंतरचा म्हणजे जागतिकीकरण सुरू झाल्यानंतरचा कालखंड असे ग्रामीण साहित्याचे स्थूलमानाने टप्पे पाडले जातात. कारण या सर्व टप्प्यांमध्ये ग्रामीण साहित्यात जाणवण्याएवढे बदल घडून आलेले आहेत. ग्रामीणजीवन आपल्या साहित्यातून प्रभावीपणे मांडणारे पहिले लेखक म्हणून महात्मा फुले यांचा उल्लेख करणे अनिवार्य आहे. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांचे जीवन, त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न मांडलेले दिसून येतात. महात्मा फुले यांनी केलेले लेखन, चार भिंतीत बसून केलेले नव्हते, तर प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन त्यांनी हा अनुभव चित्रित केलेला आहे. ''ग्रामीण जीवनाच्या चित्रणाचा स्पर्श मराठी साहित्याला फुलेंनी घडविला. भारतात फुले काही रुढ अर्थाने ग्रामीण लेखक नव्हते. ते समाजजीवनाचे भाष्यकार आणि सुधारक होते. एका समाजसुधारकाने समाजातील उपेक्षित ग्रामीणांबद्दल, दलितांबद्दल लिहिणे अगदी स्वाभाविक आहे. इतिहासाचा आढावा घ्यायचा झाला तर शेतकऱ्यांसंबंधी इतके विस्तृत लिखाण यापूर्वी कुणीही केलेले नव्हते.''[८] असे मत नागनाथ कोतापल्ले यांनी व्यक्त केले आहे. ग्रामीण भागातील लोकांचे धर्माच्या आधारे होणारे आर्थिक–सामाजिक शोषण, दारिद्र्य व दुष्काळामुळे होणारे त्यांचे हाल याचे अतिशय प्रत्ययकारी व परिणामकारक चित्रण महात्मा फुले यांनी आपल्या साहित्यामधून केलेले दिसून येते. म्हणूनच नागनाथ कोतापल्ले यांनी ''महात्मा फुले यांचे लेखन म्हणजे ग्रामीण साहित्याचा पहिला–वहिला परंतु सशक्त आविष्कार होय.'' असे म्हटलेले आहे. त्यांनी 'तृतीय रत्न' या नाटकातून तसेच 'अखंडांदी' मधून शिक्षणाच्या अभावी ग्रामीण भागातील होणाऱ्या लोकांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण केलेले आहे. शेतीच्या विकासासाठी काय करता येईल याचे उपाय त्यांनी सांगितलेले आहेत. महात्मा फुले यांच्यानंतरचे महत्त्वाचे लेखक म्हणजे कृष्णराव भालेकर. त्यांनी म. फुल्यांपासून प्रेरणा घेऊन कादंबरी व काव्यलेखन केलेले आहे. त्यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी १८७७ मध्ये 'दीनबंधू' या नियतकालिकामधून प्रकाशित झाली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही कादंबरी चर्चात्मक स्वरुपाची आहे. याशिवाय कृष्णराव भालेकर यांनी 'शेतकऱ्याचे मधुर गायन', 'रघु गाडीवानाचा पोवाडा' यासारख्या कवितांमधून ग्रामीणांच्या दु:खाला वाचा फोडलेली आहे.

रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही ग्रामीण कादंबरी १९०२ साली प्रकाशित झाली. 'पिराजी पाटील' हा या कादंबरीचा नायक आहे. दुष्काळामुळे उद्ध्वस्त झालेल्या गावाची दु:स्थिती, शेतकरी व शेतकऱ्यांच्या झालेल्या वाताहतीची हकीकत तो सांगतो, असे वर्णन या कादंबरीत आहे. यानंतर मुकुंदराव पाटील यांनी आपल्या 'दीनमित्र' या नियतकालिकातून ग्रामीण समस्यांना मुखर करण्याचे काम केले. विठ्ठल रामजी शिंदे १९२० च्या आधीच्या कालखंडातील महत्त्वाचे लेखक. त्यांनी आपल्या वैचारिक स्वरुपाच्या लेखनातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी महात्मा फुले यांच्यानंतर अतिशय मूलगामी अशी मांडणी केली. शेतीमालाला योग्य भाव, शेती करणे फायद्याचे ठरत नाही व कारखान्यातील कामगारांप्रमाणे संपही करता येत नाही. कारण शेतकरी हा संपूर्ण भारतभर विखुरलेला असून संप कुणाविरुद्ध करायचा, अशी त्याची झालेली कोंडी यासारख्या अतिशय महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी लेखन केलेले आहे. ही कोंडी आजच्या आधुनिक काळातही शेतकरी अनुभवतो, याला विठ्ठल रामजी शिंदे यांनी तेव्हा वाचा फोडली होती.वर्तमान परिस्थितीत शेतकऱ्यांच्या काही संघटना तसेच राजकीय पक्ष त्याची बाजू मांडताना दिसतात. परंतु शेतकरी समस्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत आहे. हरिभाऊ आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' ही १८९८ साली लिहिलेली कथा आहे. ही कथा दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेले असून उपासमार सहन करुनही शेतकरी आपल्या गुराढोरांवर प्रेम करतो. हरिभाऊंच्या या कथेने ग्रामीण कथा वाङ्मयाला सुरुवात झाली, असे म्हणता येते.

''ग्रामीण जीवन हाच भारतीय संस्कृतीचा आणि अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे अशी भूमिका महात्मा गांधी यांनी घेतली.''[९] महात्मा गांधींच्या 'चला खेड्याकडे' या भूमिकेचा ग्रामीण साहित्यावर सकारात्मक परिणाम झाला. १९२० च्या आधीचे ग्रामीण साहित्य व त्यानंतरचे ग्रामीण साहित्य यात खूप मोठे अंतर आहे. आधीच्या ग्रामीण साहित्यातून ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर यांची, त्यांच्या वास्तव जीवनाची अत्यंत तळमळीने मांडणी केलेली दिसून येते. १९२० नंतर कथा, कविता, कादंबरी या वाङ्मय प्रकारांमधून विपुल प्रमाणात ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. मात्र ते निव्वळ स्वप्नरंजन स्वरुपाचे असून त्याचा वास्तवाशी फारसा संबंध दिसून येत नाही. त्यानंतरच्या साहित्यात मनोरंजनाचा हेतू प्रभावी ठरलेला दिसतो. श्री. म. माटे यांच्या कथा मात्र इतर सर्व कथाकारांपेक्षा अधिक वास्तवदर्शी आहेत. त्यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' (१९४१) या कथासंग्रहातून गाव व

गावकुसाबाहेरील लोकांचे जगणे, त्यांचे दु:ख याचे दर्शन त्यांनी घडविले आहे. 'माणुसकीचा गहिवर' (१९४९), 'भावकथा' (१९५७) या कथासंग्रहांमधूनही ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले दिसून येते.

## ग्रामीण कादंबरी लेखन:

ग्रामीण कादंबरीला श्री. के. क्षीरसागर, कुसुमावती देशपांडे यांनी वास्तववादी कादंबरी म्हणून गौरविले आहे. ग्रामीण जीवनाच्या समस्या कादंबरीत प्रभावीपणे मांडलेल्या आहेत. ग. त्र्य.माडखोलकर —चंदनवाडी, र. वा. दिघे हे यशस्वी प्रादेशिक कादंबरीकार म्हणून गणले जातात. यांच्या 'सराई, पाणकळा इत्यादी विशेष प्रसिद्ध आहेत. वि. द. चिंदरकर —महापूर, ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड' ही महत्त्वाची कादंबरी आहे. ही कादंबरी स्वातंत्र्य आंदोलनावर अवलंबून आहे. त्यातच संघर्ष, प्रेम आधी विषय हाताळलेले आहेत. रामतनय — मोहित्यांची मंजुळा, साखरगोष्टी, प्रमिलाबेन इ. वि. वा. हडप —गोदाराणी, अन्नदाता उपाशी', ह्या काही महत्वाच्या कादंबरी व कादंबरीकार आहेत.

## १९४५ नंतरचे बदलते ग्रामीण साहित्य:—

द्वितीय महायुद्धाचे परिणाम जगभरातील तत्कालीन सर्वच घटकांवर पडले. महाराष्ट्रातील समाज जीवनावर व साहित्यावरही त्याचे दूरगामी परिणाम दिसून आले. द्वितीय महायुद्धानंतर जे नवसाहित्य निर्माण झाले. त्याचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यातही उमटलेले होते. १९४५ नंतरच्या नवसाहित्याचा प्रभाव ग्रामीण साहित्यावर पडला. नवसाहित्यातील प्रयोगशीलता, मनोविश्लेषण ग्रामीण कथेबरोबरच कादंबऱ्यांमध्ये ही पाहायला मिळाले. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसे' या १९४९ मध्ये लिहिलेल्या कादंबरीमध्ये हे पडसाद अधिक प्रमाणात उमटले. तसेच व्यंकटेश माडगूळकरांच्या त्याच काळात आलेल्या ग्रामीण जीवनावर आधारित कथांमध्ये देखील नवसाहित्याचा प्रभाव दिसून आला. जसे— 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१), 'हस्ताचा पाऊस' (१९५३), 'सीताराम एकनाथ' (१९५१), 'काळी आई' (१९५४), 'जांभळीचे दिवस' (१९५७). माडगूळकरांनी ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण चित्रण आपल्या साहित्यात केले आहे. त्यांच्यापासून ग्रामीण साहित्यात वास्तववादी साहित्यकृतींच्या लेखनाला प्रारंभ झालेला दिसून येतो. त्या काळातील ग्रामीण साहित्याचे आणखी एक दमदार साहित्यिक म्हणजे शंकर पाटील आहेत. त्यांच्या 'वळीव', 'भेटीगाठी', 'आभाळ', 'धिंड' या कथासंग्रहांमधून ग्रामीण कुटुंबांचे दु:ख, त्यांचे शोषण व्यक्त झाले आहे. सखा कलाल, बाजीराव पाटील, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, रणजित देसाई यांच्या कथांनी देखील नवसाहित्याच्या प्रभावातून ग्रामीण साहित्याला बळ देण्याचे काम केले.

बा. सी. मर्ढेकर हे मराठीतील प्रथितयश साहित्यिक आहेत. त्यांनी पाणी, तांबडी माती या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनातील उद्ध्वस्त झालेले जीवन साकारले आहे. तर श्री. ना. पेंडसे यांच्या 'एल्गार' (१९४९), 'हद्दपार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२), गो. नी. दांडेकर यांच्या 'पडघवली' (१९५५), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५७), 'माचीवरचा बुधा' (१९५८) इ. अत्यंत महत्त्वपूर्ण कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यांनी ग्रामीण साहित्याला वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम केले. मराठी वाचकांनी या कादंबरीतून ग्रामीण जीवनाला अधिक जवळून न्याहाळले. या कादंबऱ्यांमधून कोकणातील जीवन साकार झालेले आहे. विभावरी शिरुरकर यांची 'बळी' (१९५०) ही ग्रामीण भागातील मांग—गारुडी या गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमातीच्या उपेक्षित व दरिद्री जगण्याचे चित्रण करणारी अतिशय महत्त्वाची वास्तवादी स्वरुपाची कादंबरी आहे. उपेक्षित असलेल्या या जाती—जमातींचा कसा बळी जातो, हे विभावरी शिरुरकर यांनी दाखवून दिले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही कादंबरी आहे. 'बनगरवाडी' मधून एका खेड्यातील धनगर समाजाचे जीवन, त्यांच्या रुढी—परंपरा, विविध स्वभाव, संस्कृती, सण—उत्सव इ. चे दर्शन समर्थपणे उभे झाले आहे. कादंबरीच्या शेवटी दुष्काळामुळे गावकऱ्यांना स्थलांतर करावे लागते. याचे चित्रण आले आहे.

## १९६० नंतरचे वास्तवदर्शी ग्रामीण साहित्य:

१९६० नंतर मराठी साहित्यात अधिक ठसठशीत बदल व्हायला सुरुवात झाली. ग्रामीण साहित्याचाही चेहरामोहरा बदलू लागला. वास्तववादी कादंबरीलेखनाला १९६० नंतर खऱ्या अर्थाने बहर आला. शिक्षणाच्या प्रसाराचा परिणाम समाजाच्या सर्व स्तरात दिसू लागला. या कालखंडात ग्रामीण भागात शिक्षण घेतलेल्यांची पहिली पिढी तयार झाली. विविध स्तरातील या लेखकांनी खेड्यातील जगण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असल्याने त्यांच्या

कथा–कादंबऱ्यांमधून संपूर्ण ग्रामीण जीवन, शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार, दलित, भटके इत्यादी वर्ग, त्यांचे दारिद्रय, वास्तविक अनुभवासह व्यक्त होऊ लागले. उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०) ही वैदर्भीय कष्टकरी 'कौतिक' ची कहाणी वाचकांच्या हृदयाला 'धग' लावून जाणारी ठरली! शंकर पाटील यांची 'टारफुला' या कादंबरीत ग्रामीण भागातील ताण–तणावाचे मार्मिक वर्णन आलेले आहे. अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' या कादंबरीतून जगण्याच्या संघर्षाची परिसीमा ओलांडलेली आहे! हमीद दलवाई यांची 'इंधन' (१९६८) ही आणखी एक महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. माडगूळकर यांची 'वावटळ' (१९६४), ना. धों. महानोर यांची 'गांधारी' (१९७३), आनंद यादव यांची 'गोतावळा', या कादंबरीत ग्रामीण जनतेच्या मनात नातेसंबंधांना घेऊन जो अनौपचारिक लळा असतो, त्याचे वर्णन आले आहे. हा गोतावळा मुक्या प्राण्यांशी देखील तितकाच असतो. रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१), मनोहर मल्हार यांची 'माणूस' इ. कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनाचे दर्शन वास्तविक स्वरुपात वाचकांना घडले.

'कृषिवल' संस्कृतीचे 'जिने' कवितेच्या माध्यमातून देखील अनेक ग्रामीण कवींनी मांडलेले आहे. 'निसर्गकन्या' म्हणून लौकिक असलेल्या बहिणाबाई चौधरी यांचा 'बहिणाईची गाणी' हा कवितासंग्रह ग्रामीण कवितेच्या संदर्भात उल्लेखनीय आहे. त्यांच्या कवितांमधून ग्रामीण स्त्रीचे जगणे, तिचे भावविश्व, घर, कामधंदा, कृषिसंस्कृतीतील असंख्य घटक ओवी, अष्टाक्षरी छंदातून मराठी वाचकांसमोर आले. अस्सल व अकृत्रिम ग्रामीण जीवनदर्शन हे त्यांच्या कवितांचे वैशिष्ट्य ठरले आहे. पुढे ना. धों. महानोर यांचा 'रानातल्या कविता' हा कवितासंग्रह.या कवितासंग्रहातील कवितांनी शेती व निसर्ग यांचे अनोखे दर्शन घडविले. इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेने ही मोलाची मदत केली आहे. आनंद यादव यांनी आपल्या एकूणच साहित्यातून ग्रामीण नाळ सतत जुळून ठेवलेली आहे. त्यांच्या शब्दा–शब्दात ग्रामीण अनुभव व्यक्त होत राहतो. कवितेतूनही आनंद यादव यांनी हा आविष्कार तरल पद्धतीने घडविला. 'हिरवे जग' हा त्यांचा महत्त्वपूर्ण कवितासंग्रह ठरला.

## २० व्या शतकाच्या उत्तरार्धा नंतरचे ग्रामीण साहित्य:

ग्रामीण साहित्य उत्तरोत्तर अधिकच प्रभावीपणे वाटचाल करीत आले आहे. १९७५ साली आनंद यादव, रा. रं. बोराडे यांनी ग्रामीण साहित्याची चळवळ सुरु केली. या चळवळीमुळे खेड्यातील बहुजन समाजातील नवशिक्षित तरुण लिहिते झाले. हे लेखक ग्रामीण भागातील विविध जाती–जमातीतील होते. त्यांनी व्यापक असे ग्रामीण जीवन आणि तेथील जीवन जाणिवा, आपली भाषा लेखनाचा विषय केला. त्यांच्या लेखनातून त्या त्या परिसरातील बोलीभाषा प्रकाशात येऊ लागली. प्रत्येक चळवळीमागे कुणाची तरी प्रेरणा, विचारधारा असते. महात्मा फुले व त्यांच्या समकालीन साहित्यिकांनी ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांच्या समस्या आदी विषयांना घेऊन पाया घातलेला होता. त्यालाच उपरोक्त साहित्यिकांनी अधिक सक्षमपणे कालानुरुप उभे केले. वास्तवामागील खऱ्याखुऱ्या वास्तवाचा शोध ते घेऊ लागले.

ग्रामीण जीवनात आलेल्या बदलाचे चित्रण कथा, कविता, कादंबरी इत्यादी वाङ्.मय प्रकारांतून अतिशय प्रभावीपणे ग्रामीण लेखकांनी केलेले दिसून येते. १९७५ नंतर चंद्रकुमार नलगे, नागनाथ कोत्तापल्ले, उत्तम बंडू तुपे, भास्कर चंदनशिव (जांभळं ढव्हं), वासुदेव मुलाटे (विषवृक्षाच्या मुळ्या), बाबाराव मुसळे (हाल्या हाल्या दुधू दे), सदानंद देशमुख (बारोमास, तहान) या कादंबऱ्यांमधून विदर्भातील शेतकऱ्याचे अतिशय केविलवाणी जिने मांडलेले आहे. बा. ग. केसकर, पुरुषोत्तम बोरकर – मेड इन इंडिया, अनुराधा गुरव, मोहन पाटील (लिगाड आणि खांदेपालट), श्रीराम गुंदेकर, गणेश आवटे, उत्तम बावस्कर, राजन गवस (तणकट, भंडारभोग, चौंडकं, कळप), प्रतिमा इंगोले, इंद्रजित भालेराव (टाहो), नारायण सुमंत, विठ्ठल वाघ (साय, काया मातीत मातीत), शंकर बडे, विश्वास पाटील (पांगिरा, झाडाझडती), प्रकाश होळकर, कृष्णात खोत (गावठाण), आसाराम लोमटे, विजय जावळे, तानाजी राऊ पाटील, कल्पना दुधाळ असे कितीतरी लेखक ग्रामीण साहित्यात मोलाची भर घालताना दिसून येत आहेत. वर्तमान परिस्थितीत कित्येक ग्रामीण साहित्यिक आपल्या लेखणीच्या बळावर ग्रामीण समस्यांना उजागर करीत आहेत. शेती, शेतकरी, शेतमजूर आदी विषयांना घेऊन वास्तवदर्शी लेखन करीत आहेत.

## निष्कर्ष :–

१) ग्रामीण साहित्याचे संदर्भ प्राचीन–मध्ययुगीन साहित्यात शोधता येतात.
२) म. फुले व समकालीनांचे साहित्य ग्रामीण व्यवस्थेविषयी अधिक बोलके आहे.
३) औद्योगिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर दूरगामी परिणाम झाला.
४) नव साहित्याचा प्रभाव ग्रामीण साहित्यावर पडला.

५) १९६० नंतर ग्रामीण साहित्य भक्कमपणे उभे राहिले.
६) ग्रामीण साहित्याने ग्रामीण जीवनाचे वास्तविक चित्रण केले.
७) ग्रामीण साहित्यातून ग्रामीण जीवनाच्या समस्या शब्दबद्ध झाल्या.

## संदर्भग्रंथ सूची :—

१) डॉ लुलेकर प्रल्हाद, प्रतिभेचे प्रदेश, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती जानेवारी २००२. पृष्ठ क्रमांक २५
२) संपा. गणोरकर प्रभा, वाङ्.मयीन संज्ञा व संकल्पना कोश, मुंबई २००१. पृष्ठ क्रमांक २००
३) कुळकर्णी मधु मंगेश, मराठी साहित्य पत्रिका, ग्रामीण साहित्य विशेषांक— जुलै डिसेंबर १९८०. पृष्ठ क्रमांक ४४—४५
४) बागले प्रभाकर, प्रतिष्ठान. मार्च—एप्रिल १९९५. पृष्ठ क्रमांक २५
५) मुनघाटे प्रमोद, साहित्य दलित आणि ग्रामीण.संपा— ईश्वर नंदापुरे व इतर. विजय प्रकाशन, नागपूर. प्रथमावृत्ती २००२. पृष्ठ क्रमांक १०४
६) कोतापल्ले नागनाथ, साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ति २००३. पृष्ठ क्रमांक १२९
७) कोतापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही. संपा— वासुदेव मुलाटे, पृष्ठ क्रमांक १०५
८) कोतापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य स्वरुप व शोध. स्वरुप प्रकाशन औरंगाबाद. तृतीय आवृत्ती २००६. पृष्ठ क्रमांक ८५
९) कोतापल्ले नागनाथ, चळवळ आणि साहित्य. संपा— सातपुते, शेळके इ. शब्दालय प्रकाशन. श्रीरामपूर. प्रथमावृत्ती ऑगस्ट २००९. पृष्ठ क्रमांक ३६

❖❖❖

# संत चोखामेळा यांचे वैचारिक बंड

प्रा. संजय जीवनलाल सिंगनजुडे
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स,
३१०–ब, नवीन नंदनवन, नागपूर ४४०००९, महाराष्ट्र (India)
Email: sanjayssinganjude@gmail.com भ्रमणध्वनी ९७६६९६२७२३

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील संत परंपरेचे मराठी वाङ्मयीन क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान आहे. संत परंपरेत अनेक पंथ उदयास आले. पण यासर्वांत वारकरी संप्रदायाचे कार्यक्षेत्र वेगळे आणि व्यापक आहे. कारण या संप्रदायात सर्वच सामाजिक स्तरातील लोकांचा समावेश आहे. अगदी चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ज्या स्तरातील जनतेला कोणतेही मत मांडण्याची मुभा नव्हती, अशा अस्पृश्यांनाही वारकरी पंथात आपले विचार मांडण्याची मुभा देण्यात आली. त्यात संत चोखामेळा व त्यांचे कुटुंबीयांचा समावेश होतो. चोखोबांच्या परिवारातून पत्नी सोयराबाई, बंका हा मेहुणा, धाकटी बहीण निर्मळा आणि मुलगा कर्ममेळा यांनी अभंगरचना केली. चोखोबांचे अभंग वगळून सोयराबाईचे एकूण बासष्ट अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या बहुतेक अंभगांतून 'चोख्याची महारी' असा उल्लेख सापडतो. संत चोखामेळाचे सखलसंतगाथेत एकूण ३४९ अभंग आहेत. तेव्हा चोखोबा आणि त्यांच्या कुटुंबियांनी मराठी वाङ्मयात केलेल्या कामगीरीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांनी केलेली वाङ्मयीन कारकिर्दीचा काळ फार प्रतिकूल होता.वैदिक धर्मावर उच्चवर्णीयांची जबरदस्त पकड असल्यानेकोणत्या शूद्रातिशूद्रांना आपले अंतरीचे दुःख त्यांच्यासमोर मांडता येत नव्हते. कारण त्यांच्या मते लिहिण्या–बोलण्याचा हक्क केवळ उच्चवर्णीयाचा आहे. तर तसा शास्त्रीय दंडक आहे, असे उच्चवर्णीय इतरांना सांगत. त्यासाठी त्यांनी वेदांचा आधार पुढे केले. तेव्हा तेराव्या शतकात विचलित झालेल्या सर्वसामान्याकरिता ज्ञानदेव आणि नामदेव ह्यांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला. त्यात श्रेष्ठ–कनिष्ट, जाती–वर्ण, स्त्रीपुरुष असा कोणतीही भेद न ठेवता समाजातील सर्वस्तरातील लोकांना प्रवेश दिला. ह्या आधारस्तभांनी–प्रणेत्यांनी सर्वसामान्यांना'शब्दभांडार' देऊन आंतरिक बळ दिले. हे बळ चोखामेळासारख्या जातीहीनालाही मिळाले. भक्तीचे श्रेष्ठत्व हे मनाचा निर्मळपणा, भक्तीभाव, विवेक, सदाचार, वैराग्य आदी गुणांवर अवलंबून असते. भक्तीच्या देखाव्यावर नाही. अशी शिकवण ज्ञानदेव–नामदेव संतांनी दिले. नामदेवांनी ज्ञानदेवांच्या जीवित कार्याचे वर्णन 'अध्यात्मविद्येचें दाविलिंसें रूप । चैतन्याचा दीप उजळिला' या शब्दांत केला आहे. ज्ञानदेव आणि नामदेवांनी भक्तीची रुजवणं सामान्याच्या मनात कोणत्याही पक्षपात न करता केली. त्यांचे लोकसंग्रहाचे कार्य हे अतुल्य आहे. त्यात अठरापगड जातीचे लोक समाविष्ट झाले. म्हणून चोखोबासारख्या सर्वसामान्यांनी आपला आदर्श ज्ञानदेव आणि नामदेवादी संतामध्ये शोधला.

## तत्कालीन सामाजिक परिस्थिती

संतचोखामेळा यांच्या समकालीन परिस्थिती वर्णव्यवस्थेच्या विचारांनी बुरसटलेली होती. तत्कालीन सर्वात बळकट व्यवस्था म्हणजे धर्मव्यवस्था होय. समाजजीवनाला स्पर्श करणारी धार्मिक, आर्थिक सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक याशिवाय, कला, विद्यादान, साहित्य आदी व्यवस्था धर्मव्यवस्थेच्या कक्षात येत. त्यामुळे धर्म व्यवस्थेतेच्या कक्षात येणाऱ्या समाजमनात असणारे अशुद्ध भाव, श्रेष्ठ–कनिष्ठ, उच्चनीचता, जातीयता यासारख्या गोष्टी दूर करणे काळाची गरज होती आणि ती गरज ज्ञानेश्वर आणि नामदेव यासारख्या संतश्रेष्ठीने ओळखली होती. त्यासाठी भागवत धर्माचा पाया त्यांनी रचला. सामान्याना मानसिक बळ दिले. वाङ्मय निर्मिती केवळ संस्कृत मधूनच होत नसून ती आपल्या मायबोलीतूनही होऊ शकते हे दाखवून दिले. आपल्या समाजव्यवस्थेतील बुरसटलेले विचार, प्रथा ह्या विषमतेवर आधारित आहेत, हे संत जाणून होते. वर्ण विषमतेचे कळवट अनुभव मनांत खदखदणाऱ्या विचारांना कोठेतरी प्रवाहित करण्याची गरज तसेच सामाजिक सलोखा राखण्याचे महत्त्कार्य संतांनी ओळखले होते. समाजव्यवस्थेत बदल घडविणे हा त्यांचा उद्देश नव्हता तर आपल्या आंतरिक शुद्धतेवर त्यांनी भर दिला. धर्माची सुत्रे ज्यांच्या हाती होती अशा उच्चवर्णीयांकडून धर्मसुधारणा–समाजसुधारणा होईल अशी त्यांना अपेक्षा नव्हती. कारण धर्मव्यवस्थेची सुत्रे हाती असलेल्यांना परिवर्तन नकोच होते. तरी एकीकडे धर्मव्यवस्थेची विरोध न पत्करता विषमविचारात समता, सद्‌भावनेचा, भक्तीचा विचार देऊन लोकमत जागृत करण्याची एक मोठी कामगीरी बजावली. हे कार्य करणे म्हणजे नाही म्हटले तरी व्यवस्थेविरुद्ध बंडच होय.

तत्कालीन काळात अस्पृश्यांची स्थिती कशी होती याचा आढावा गं. बा. सरदार यांनी त्रिं. ना. आत्रे यांच्या ‘गावगाडा’ या ग्रंथातून घेतला आहे. तो असा,‘महार हा गावकीतील वतनदार, सरकारी गावकामगार. बलुतेदारांच्या पहिल्या ओळीत त्याची गणना होते. महार वतन सामायिक असल्याने महार आपापसात वेसकरकी, गावकी व घरकी कामे वाटून घेत. पट्टीसाठी गावचा वसूल व कागदपत्र नेऊन पोचविणे, गाव स्वच्छ राखणे, काळीपांढरीत गस्त घालणे, आल्यागेल्याची खबर काढणे, वहिमी लोकांवर नजर ठेवणे, चोरीचा तलास लावणे, जन्म, मृत्यू व गुन्हे यांची वर्दी देणे, दवंडी पिटणे, जंगली जनावरे मारणे इत्यादी सरकारी कामे महारांना करावीच लागत. शिवाय रयतेची खाजगी कामेही ते करीत. कुणाब्याच्या जड सामानाची शेतात ने—आण करणे, सर्पण आणणे, चिठ्ठ्याचपाट्या बाहेरगावी पोचविणे, सरण वाहणे, मेलेली गुरे आढणे इत्यादी कामे त्यांच्याकडे असत. सारांश, महार म्हणजे गावकीचे व घरकीचे पडेल ते काम करणारा हरकाम्या.’१यावरून अस्पृश्य समाजाला कोणती कार्य करावे लागत होते याची कल्पना येते.

## व्यवस्थेला जाब विचारणे

संत चोखामेळांच्या अभंगातून अस्पृश्य समाजाच्या वेदनेचे आदिरूपाचे दर्शन घडते. चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून जी वेदना, दु:ख व्यक्त केली; ती केवळ त्यांची एकट्याची नव्हते. ते दु:ख तत्कालीन अस्पृश्य समाजाच्या वेदनेचे आदिरूप म्हणून प्रातिनिधिक स्वरूपात समोर येते. संत चोखामेळा यांचा उल्लेख भालचंद्र फडके यांनी आपल्या ‘दलित साहित्य वेदना व विद्रोह’ ह्या ग्रंथात ‘दलितांच्या वेदनेचे आदिरूप’२ असा केलेला उल्लेख योग्यच आहे. कारण चोखोबांच्या अगोदर अशा वेदना कुणी अस्पृश्यांनी मांडल्या नव्हत्या. अंतर्मन दुखावले गेल्याची भावना त्यांच्या कवितेतून प्रकटते. ते का? याचा विचार केला असता असे म्हणता येते की, चोखोबाला आलेले समाजभान. त्यांच्या विचाराना एक वैचारिक दिशा होती. शतकानुशतके उपरे म्हणून आलेले जगणे त्यांना नकोशे वाटत असावे. कारण प्रामाणिकपणे कार्य करूनही उच्चवर्गाकडून त्यांना मिळणाऱ्या वागणुकीत विशेष काही फरक पडत नव्हता. ह्या नरक यातनेतून आपली आणि आपल्या समाजबांधवांची सुटका व्हावी असे त्यांना मनोमन वाटत असावे. पण धर्मव्यवस्थेच्या बाहुपाशातून सुटने एवढे सहज शक्य नाही. यांचीही त्यांना जाणीव होती.

वेद आणि धर्मशास्त्राच्या आधाराने शेकडो वर्षे शुद्रातिशुद्र हे अन्याय, अत्याचार सहन करत आले. त्या व्यवस्थेविरुद्ध जाब विचारण्याचे बळ तळागळातील माणसांना कोणी दिले? याचे उत्तर वारकरी सप्रदायाने सुरू केलेल्या भक्ती आंदोलनाने. वर्षानुवर्षे मनात घुटमळत असलेला श्वास मोकळे करण्याची ताकत, अभिव्यक्त होण्याचे सामर्थ्य संतसंगतीच्या सहवासाने आलेले विचारविवेकानी दिला. खांदेजड झालेला वेदप्रामाण्याचे मत झुगारल्याशिवाय आपली अन्यायी समाजव्यवस्थेतून सुटका नाही, हे त्यांना माहीत होते. तसेच धर्मव्यवस्थेने प्रबळ असलेले हे सनातनी लोक आपला छळ केल्याशिवाय राहणार नाही. ह्याची कल्पनाही त्यांना होतीच. परंतु आज नव्हे तर उद्यातरी चांगले दिवस पाहायला मिळतील या आशेने भागवत धर्मात मिळालेल्या मोकळिकतेचा आधार घेऊन आणि देवाला उद्देशून आपले अंतरीचे बोल हा समाज बोलू लागला. त्याचे एक कारण असेही म्हणता येईल की, त्यावेळी चातुर्वर्ण्य व्यवस्थेला, धर्मव्यवस्था तोडीसतोड अशी सत्ता नव्हती. त्यामुळे उघडउघड धर्मव्यवस्थेविरुद्ध कोणी बोलण्याचे धाडस करत नसे. जर कोणी तसा प्रयत्न केला तर त्यांच्या विरुद्ध ह्या सनातनी धर्मव्यवस्थेतेने त्यांचा काटा काढला, त्यांना त्रास सहन करावा लागला. कोणाची ग्रंथ नदीत बुडवली गेली, तर कुणाला अविचारी लोकांना समोरे जावे लागले. हे तुकाराम, नामदेव, चक्रधरस्वामी यांना झालेला त्रासांवरून सांगता येते. ‘शोषितांना शोषकाकडून होणाऱ्या शोषणाची जोपर्यंत जाणीव होत नाही. तोपर्यंत हे दु:ख ते कारुण्याची भीक मागत व्यक्त करतात. पण आपण फसविले जात आहोत. याची जाणीव होताच मग करुणा मागे पडते आणि क्रांती जन्म घेऊ लागते. आवाहनाची वृत्ती मग आव्हानाच्या भाषेत बोलू लागते. क्रांती मग ती आध्यात्मिक, सामाजिक की राजकीय असो; अशी जन्म घेते.’३ह्या क्रांतीची चिन्ह चोखोबाच्या अभंगातून शोधता येतात. आपण फसवल्या गेल्याची जाणीव शेकडो वर्षे शोषणाच्या बळी पडलेल्या वर्गाला झाली आणि ते आपल्या अनुभवांना शब्दबद्ध करू लागले. हे आविष्कार सामर्थ्य अस्पृश्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संत चोखामेळा यांनी सर्वप्रथम मांडले.

जी भावना चोखोबांमध्ये होती तिच भावना तीव्र रूप घेऊन त्यांचा मुलगा कर्ममेळामध्ये उतरली. कर्ममेळाच्या अभंगात शब्दांना तीक्ष्ण धार आहे. समाज व्यवस्थेत त्यांच्या वाटेला आलेले उपरे जीणे असह्य होते. त्यातून तो देवालाच प्रश्न विचारतो.

‘अमुची केली हीन याती। का न कळे तुज श्रीपती।।
जन्म गेला उष्टे खाता। लाज नये तुझ्या चित्ता।।’

आपल्याला उपरे जीवन जगण्यास भाग पाडणाऱ्या ह्या कृत्याची देवाला लाज यायला पाहिजे, असे तो स्पष्ट करतो. ही भावना म्हणजे त्याच्या अंतरीची तळमळ होय, जी देवालाही जाब विचारण्यापासून मागेपुढे पाहात नाही.

## विचारातील भाबडेपणा आणि जातीहीनतेचे दु:ख

चोखोबा वृत्तीने सज्जन, प्रामाणिक भाबड्या स्वभावाचा त्यामुळे समाज सांगते त्या गोष्टींवर त्यांनीही विश्वास ठेवला, तो भाबड्याभावातूनच. तेराव्या शतकातील महार समाजाला जे तिरस्कृत जीवन, दु:ख, अपमान वाट्याला आले होते. त्यातून चोखोबाही सुटले नाही. समाजाचा जो भोग परंपरेप्रमाणे वाट्याला आला. तो भोगावाच लागेल ती पूर्वजन्माचे फळ आहेत. अशी परंपरेची शिकवण होती. विटाळ, शिवाशिव, स्पर्श, देवदर्शनापासून वंचित हे वैदिक धर्म पुन: पुन: मनांवर बिंबवत होती. चोखोबाच्या भक्तीला, मनातील भावनेला, शुद्ध आचरणाला त्याकाळी काही महत्त्व नव्हते. तरी हा पूर्व जन्मीचा भोग त्यांच्या वाट्याला आलेला असे मानून ते सहन करीत होते. या पूर्वग्रहाचा प्रभाव चोखामेळांवरही दिसतो. ते म्हणतात—

शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा
यातीहीन मी महार । पूर्वी निळाचा अवतार
कृष्ण निंदा घडली होती । म्हणोनि महार जन्मप्राप्ती
चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वीचे हे फळ

हा विचार त्या काळाच्या लोकांमध्ये अगदी खोलवर रुजला होता. भोळी जनता हा पूनर्जन्माचे भोग आहे असे समजून ते गप्प बसून हे सारे दु:ख भोगत होते. अशा खुळ्या विचारांची रुजवण धर्ममार्डंतांनी शूद्रातिशूद्रामध्ये केली. पूर्वजन्मीचे हे दु:ख भोगणे हाच आमचा धर्म आहे. असा भोळा भाव मनाच्या एका कोपऱ्यात चोखोबांनी जोपासला होता. त्यामुळे उपरेपणाचे जीवन जगणे हे आमच्या प्रारब्धातच लिहिले आहे अशी त्यांची समजूत होती. हे दु:ख व्यक्त करताना चोखोबा म्हणतात—

आमुचें संचित भोग क्रियमाण । तुमचे कारण तुम्ही जाणा
होणार ते होय न होणार ते न होय । सुखदु:ख पाहे कर्माधीन
आमुचें संचित जैसे जैसे आहे। तेथे तो उपाय नचले काही
कर्माचे संचित प्रारब्धाचा भोग । न सुटे भागा भाग निढळीचा

अशा धर्मव्यवस्थेच्या विचारांचा पगडा त्यांच्या मनावर होता, हे नाकारता येत नाही. पण ह्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावरून उत्तरोत्तर कमी होत गेला हेही तेवढेच खरे आहे.

चोखोबांनी आपल्या अभंगातून स्वत:च्या शुद्धतेची नोंद केली असली तरी परंपरेने त्यांच्या हाकेकडे दुर्लक्ष केले. एका विकृत समाजव्यवस्थेत आपण वावरत आहोत याची त्यांना जाणीव होती. त्यामुळेच आपण कितीही आपल्या शुद्धतेची गऱ्हाणी सांगितली तरी हा समाज काही ऐकून घेणार नाही. म्हणून आपले मनातील दु:ख देवापुढे मांडताना ते म्हणतात—

'हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।।
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रीती ।।
माझा लागताची कर । सिंतोडा घेती करार ।।
माझ्या गोविंदा गापाळा । करुणा भाकी चोखामेळा ।।

याकडे केवळ चोखोबाचे दु:ख म्हणून पाहणे योग्य नाही. तर त्यातून त्यांची आंतरिक तळमळ त्याकाळातील अस्पृश्य समाजाला लाचारीचे जीणे, आपल्या हातून काही अपराध घडेल म्हणून इतरांपासून दूर राहणे, भीत भीत राहणे, माणूस म्हणून जन्माला आलो तरी माणूस म्हणून येथे योग्य वागणूक जातीभेदामुळे मिळत नाही. आणि हा जातीभेद, विषमता देवनिर्मित नाही तर मानवनिर्मित, कृत्रिम आहे. म्हणून आपले मनाचे दु:ख ते देवापुढे मांडतात. ऐवढेच नव्हे तर या जातीत जन्माला का घातलास असा सवालही ते देवाला विचारतात. हे साहस चोखोबामध्ये आहे. ते देवाला उद्देशून म्हणतात—

'असे करणे होते तुला। तरी का जन्म दिला मला ।।
जन्म देवोनी सांडिले । का हो मन निष्ठूर केले।।
कोठे गेला माझे वेळी । केले कोणाचे सांभाळी ।।
चोखा म्हणे देवा । नका मोकलू केशवा ।।

याप्रकारे चोखोबा आपल्या वेदना मांडतात.

## सामाजिक विषमतेचे वास्तव

चोखोबा एक प्रामाणिक संत होते. संताची काय भूमिका असावी हे त्यांचा काव्यातून दिसून येते. ज्या काळात धर्मव्यवस्था–चातुर्वर्ण्य व्यवस्था प्रबळ होती. तेव्हा संतांनी जातीपातीतील भेद दूर ठेऊन माणसाला माणसाशी जोडण्याचे कार्य केले. माणसातील माणूसपण जागवून जातीतील उच्चनिचता कमी करण्यावर भर दिला. याप्रकारे जातीतील श्रेष्ठ–कनिष्ठ हा धार्मिक भेद मोडून पाडला. पण वर्णव्यवस्थेची पकड ऐवढी जबरदस्त होती की त्यात जनसामान्य भरडले गेले. ह्या सामाजिक विषमतेचे चित्र चोखोबाच्या दृष्टीतून कसे सुटणार, त्यांनी या गोष्टींनाही आपल्या काव्याचा विषय बनवले. हे वास्तव मांडताना त्यांच्या शाब्दिक तडाख्यातून देवही सुटत नाही. मनात उठणाऱ्या प्रश्नांचा पेच ते आपल्या अभंगातून मांडतात. हे दुःख म्हणजे सामाजिक विषमतेच्या वेदनांना दिलेले शब्दरूप होय. ही त्यांची बोलणी त्या देवाला ऐकायला गेली असेल वा नसेल हा भाग वेगळा; पण हे विचार ज्यांच्या मुठीत देव होता त्या सनातनी लोकांना नक्कीच ऐकू गेले असतील. तेव्हा त्यांच्या अंगाची आग झाली असेल. यात नवल नाही. हीन जातीतील माणसात वैचारिक जाणीव निर्माण झालेल्या ह्या भक्ताचा पाणउतारा करण्यासाठी धर्ममार्तंडानी देवाचा हार चोरीचा खोटा आरोप घेऊन त्यांना बदडून काढले. ज्या जातीहीनांना मंदिरात प्रवेश नाही. तो खरोखर धर्मव्यवस्थेविरुद्ध याप्रकारची कृती करू शकणार का? असा प्रश्न सहज डोक्यात येतो. याप्रसंगावरून बडव्यांची सुढबुद्धी दिसून येते. पण चोखोबा यावरही चूप बसले नाही. ते देवाला आवाहन करताना म्हणतात —

'धाव घाली विठू आता चालू नको मंद।बडवे मज मारिती ऐसा काही तरी अपराध ।।
विठोबाचा हार तुझे केंठी कैसा आला ।शिव्या देती महारा म्हणती देव बाटविला।।
अहो जी महाराज तुमचे द्वारीचा कुतरा । नको जी मोकलू चक्रपाणी जिमेदारा ।।
जोडोनिया कर चोखा विनवितो देवा।बोलिलो उत्तरे परि राग नसावा।।

असा मनातील उद्वेग चोखोबा देवासमोर मांडतात. उच्चवर्णियांच्या विरोधात आपले म्हणणे ते येथे मोकळ्या मनाने मांडतात. वरील अंभागातून तत्कालीन वास्तवाचे दर्शन घडते. यातून जातीय विषमता त्या काळात किती प्रबळ होती स्पष्टपणे लक्षात येते. तर त्यांचा सामना करताना देवाला मध्यस्थी ठेवून चोखोबा आपले म्हणने स्पष्टपणे मांडतात. ह्या अजीजीच्या बोलण्यात देव मध्यस्थी आहे, कारण असे उच्चवर्णीयांना स्पष्ट बोलणे त्याकाळी सामाजिक गुन्हा समजला जायचा. त्यामुळे कोणी हे धाडस कुणी करत नव्हते. ते केल्यानंतरच्या यातना सहन करण्याचे बळ त्यांच्यात कदाचित नव्हते. पण तरीही परंपरविरुद्ध बंडाचे प्रतिध्वनी चोखोबांच्या अभंगातून उमटतात. कारण देवावर उच्चवर्णियांचा अधिकार, त्यातही आपल्यापेक्षाही एक अस्पृश्य जातीतील माणसाला मिळणारी प्रसिद्धी बडव्यांना सहन कशी होणार. त्यातून बडव्यांच्या मनातील कटकारस्थान, त्यांची बुरसटलेली मानसिकता वरील अभंगावरून अधोरेखीत होते. हे आपले बोलणे जनसामान्यांसमोर मांडणे हे परंपरेविरुद्ध बंडच दर्शविते. तत्कालीन अपृश्य समाजातील लोकांच्या मनातील दुःख चोखोबांनी प्रातिनिधिकपणे मांडले. चोखोबांच्या शब्दांना तीव्र धार नव्हती असे नव्हे, तर त्याकाळात सावध राहून आपले उरीचे दुःख आजीजीच्या रूपात ते मांडताना दिसतात. प्रसंगी मनातील वेदना अनावर झाल्या तेव्हा त्यांनी देवाची लाज काढली. देवाला तुमच्या घरी न्याय नाही असा सवाल करून तत्कालीन सामाजिक, आर्थिक विषमतेचे दर्शन घडवून ह्या दोन वर्गातील विषतमेवर नेमकेपणाने बोट ठेवतात. उच्चवर्णीयांचे प्रतिष्ठित जिणे आणि अस्पृशांचे दारिद्र्य व अपमानित, उपरे जिणे यांचे वास्तविक रूप त्यांनी देवापुढे, पर्यायाने समाजापुढे मांडतात. सुज्ञ व्यक्तींना सामाजिक, आर्थिक विषमतेच्या विचारांच्या पलीकडे जाऊन माणुसकीच्या नात्याने ह्या विषम वास्तवावर विचार करण्यास भाग पाडतात.

त्यांनी जे विचार मांडले त्यातून केवळ आपण भोगत असलेले दुःखच नव्हेतर उच्चवर्णीयांचा अस्पृश्यांप्रती वागणूक, छळ, सामाजिक विषमतेबरोबर आर्थिक विषमतेचेही वास्तव मांडले. प्रसंगी देवालाच दोष देत आपले दुःख मांडले. त्यांची शब्दकडा सडेतोड अशी असलीतरी त्यात विनंतीवजा, अजीजीची आर्जवी सूर आहे. त्यांच्या शब्दरचना देवाला उद्देशून असलीतरी समाजव्यवस्थेचे खरे रूप उजागर होते.

जन्मोजन्मीचे तुम्ही सांगाती । काहो मज घातिले भ्रान्ती ।।
नाही कोठे सुख विश्रान्ती । पंढरी वाचोनि सर्वथा ।।
विठोबा का न कळे तुम्हा । सर्व जगाचा तू आत्मा ।।
पुराण पुरुष परमात्मा । आम्हा दीना उपेक्षिसी ।।
पहा न्याय नाही तुमचे घरी । एका दुःख एक राज्य करी ।।
ऐसी नीत नव्हे बरी । साजे थोरी थोरपणे ।।

चोखा म्हणे नवलाव । आम्हा न कळे ठाव भाव ।।
तुमचा कैसा घाव डाव । काहीच तो विठोबा ।।

या अभंगातून सामाजिक विषमतेचे रूप दिसून येते. तर देवाच्या न्यायप्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेला आहे. कारण थोरांचे थोरपण त्यांच्या न्यायप्रियतेवर अवलंबून असते. परंतु चोखोबा देवाच्या न्यायदानावर दुजाभावाचा आरोप करताना. त्यांची नियत बरी नसल्याचे बोलतात. पर्यायाने ते उच्चवर्णीयांच्या न्यायदानावर बोट ठेवतात. असेच दुज्याभावाचे कडक समाचार घेताना ते म्हणतात–

'काहो केशिराजा दुजे पै धरिता । हे तो आश्चर्यता वाटे मज ।।
एकासी आसन एकासी वसन। एक तोचि नग्न फिरताती ।।
एकासी कदान्न एकासी मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न मागताची ।।
एकासी वैभव राज्याची पदवी । एक गावोगावी भीक मागे ।।
हाचि न्याय तुमचे दिसतो की घरी । चोखा म्हणे हरी कर्म माझे।।

परंपरेनेच दारिद्र्याचा वारसा शुद्रांना आणि सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेचा वारसा वैदिक उच्चवर्णीय ब्राह्मणांना मिळाला होता. ह्या आर्थिक विषमतेचा चोखोबा निर्देश वरील अभंगातून करतात.

'ऐसी नीत नव्हे बरी' असा इशारा ते देवाला देतात. कारण एकाला न्याय तर दुसऱ्याला अन्यायाचा दऱ्हीत ठेवून त्याच्या अब्रूचे धिंडवडे निघताना चोखोबांनी प्रत्यक्षपणे पाहिले. त्यामुळे देवाच्या दारी अस्पृश्यांना गरिबांना न्याय नाही. त्यामुळे ते विठ्ठलाला उद्देशून 'ऐसी नीत नव्हे बरी' अशा शब्दांत समाजातील न्याय प्रक्रियेला दोष देऊन त्याचा तीव्र शब्दांत धिक्कार करतात. तसेच हजारो वर्षाचे दु:ख सहन करत आलेल्या अस्पृश्याने जे विषमतेप्रती प्रश्न विचारले. ते म्हणजे अस्पृश्यांना अज्ञानातून आलेली जाग आहे ती चोखोबाच्या रूपाने सर्वप्रथम मांडली गेली.

## विटाळ संकल्पनेला विरोध

चोखोबांना जातीहीनतेचे चटके रोज सहन करावे लागत होते. ब्राह्मण जातीहीनतेवरून त्यांना रोज बोलायचे, तू हीनजातीचा आहे. तुझी सावली आम्हावर किंवा स्पर्श होईल तर आम्हाला विटाळ होईल, असा अन्याय ते रोजच सहन करीत. हीनजातीत जन्म झाला म्हणून हीन समजावे. हे त्यांच्या मनाला न पटणारे होते. ब्राह्मण स्वत:ला पवित्र आणि महारांना अपवित्र समजायचे हा प्रश्न त्यांना पडला होता. ही सर्व सृष्टी मानव देवाने निर्माण केली तेव्हा त्या देवाचा वास सर्वांच्या ठिकाणी असेल. मग एक पवित्र आणि दुसरा अपवित्र कसा? हा त्यांचा प्रश्न होता. विटाळ ही कल्पना त्यातलीच. येथे जन्माला येणारा प्रत्येक व्यक्ती विटाळलेली आहेत. मग विटाळ हा सर्वत्रच आहे. मग केवळ अस्पृश्यांची सावलीने किंवा त्यांच्या स्पर्शाने विटाळ होतो हा वैदिकधर्मातील सिद्धान्त न पटणारा होता. म्हणून चोखोबा म्हणतात –

पंचही भूतांचा एकचि विटाळ । अवघाचि मेळ जगीनांदे ।
तेथे तो सोवळा वोवळा तो कोण। विटाळाचे कारण देह मूळ।
आदिअंती अवघा विटाळ संचला। सोवळा तो झाला कोण न कळे।।
चोखा म्हणे मज नवल वाटते। विटाळ परते आहे कोण।

तसेच

'वेदाशी विटाळ शास्त्राशी विटाळ । पुराणे अमंगळ विटाळाची ।
जीवाशी विटाळ शिवाशी विटाळ । काया अमंगळ विटाळाची ।।
ब्रम्हीया विटाळ विष्णूशी विटाळा । शंकरा विटाळ अमंगळ ।
जन्मता विटाळ मरता विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदि अंती।।

याप्रकारे विटाळाच्या कल्पनेतून त्रिदेवतरी सुटले नाही मग वेद शास्त्रे पुराणे हे सर्व काही विटाळालेलेच आहे. या भूतलावर सर्व विटाळले असताना ब्राह्मण सोवळे कसे? हा प्रश्न ते विचारतात. स्वत:ला पवित्र समजणाऱ्यांना उपहासाने चोखोबा सहज प्रश्न ते विचारतात. या जगात जन्म, मृत्यू, सुख दु:खातही विटाळच सामावलेला आहे. मग आपण सोवळेओवळ्याचे जे स्तोम करता ते कशा पायी. असे विचारून त्यांची फजिती करतात. त्यांच्या मते, विटाळ हा विचारात आहे. तेव्हा विचार शुद्ध असेलतर आपली दृष्टीही निर्मळ होईल आणि आपण निर्मळ दृष्टीने सर्वत्र पाहू तर आपल्याला सर्वत्र निर्मळच दिसेल. मन विटाळाचा भावनेने भरलेला असेलतर सर्वत्र विटाळ आपल्या दृष्टीस पडेल. म्हणून मन आणि विचार यांच्या शुद्धतेवर भर देणे गरजेचे आहे. ते म्हणतात, स्पर्शाने देव विटाळत नाही कारण तो शुद्ध आहे. त्यानेच ही सृष्टी निर्माण केली. तेव्हा त्याला विटाळ कसा होईल,

असे ते विचारतात. येथे सोवळे—ओवळे मानणाऱ्यांच्या विचारापलीकडे विचारकरणारी दृष्टी चोखोबांच्या विचारातून दिसून येते. त्यांनी आपल्या विचारानी कर्मकांड करणाऱ्या, ढोंगी सोवळेकऱ्याचे पितळे उघडे पाडले. देवाला सोवळे ओवळे आवडत नसून त्याला केवळ मनाच्या निर्मळपणातून केलेली भक्तीच प्रिय आहे. हे ते आत्मविश्वाने सांगतात. ते अंतर्बाह्य निर्मळपणावर भर देतात. ते म्हणतात—

'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिये रंगा ।।
कमान डोंगी परी तीर नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिये रंगा।।
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिये रंगे।।
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिये रंगा।।

वर्णव्यवस्थेचे कारण पुढे करून छळणाऱ्या लोकांना चोखोबा सडेतोड प्रश्न विचारतात. देवाची भक्ती करताना केवळ अंतर्मनात शुद्ध भाव हवा तो त्याला प्रिय असतो. त्यासाठी ऊस, कमान, नदी या सारख्या गोष्टी जरी वाकड्या असल्यातरी ऊसातील रस, कमानीतून सुटणारा तीर, नदीतील पाणी वाकडे नसतात. तेव्हा वरवरचा रंग, जात पाहून शुद्धाशुद्धतेची कसोटी कशी ठरवता येते. कमानीतून निघणारा तीर सरळ लक्ष्याला भेदतो. तेव्हा जातीने हीन असला तरी त्याच्या मनातील भाव हा शुद्धच आहे. देवांची भक्ती ही वर्णहीनतेवरून श्रेष्ठ ठरत नाही तर भक्ताच्या मनातील त्या देवाविषयी असलेली अस्सीम भक्ती भावावरून ठरत असते. व्यक्ती केवळ वरल्या रंगावर विसंबून भक्तीची श्रेष्ठत्व नोंदवू शकत नाही. असा ते सवालच धर्मव्यवस्थेला विचारून याकडे सर्वांचे लक्ष वेधतात आणि बाह्य अंडबर माजविणाऱ्यांना समज देतात.

ज्या काळात शुद्रातिशुद्रांना काही बोलण्याचा अधिकार नव्हता त्या काळात संत चोखामेळा आपल्या अंतरीचे, सामाजिक उपेक्षेचे दु:ख व्यक्त करतात. याप्रकारे दु:ख, वेदना आपल्या कवितेतून व्यक्त करणारा अस्पृश्य जातीतील पहिला कवी असावा. कारण चोखोबांच्या अगोदर अस्पृश्य जातीतील लोकांनी आपले दु:ख काव्यरूपाने अथवा कोणत्याही प्रकारे समाजासमोर मांडल्याचे दिसत नाही. ह्या दुतोंडी समाजव्यवस्थेविषयी चोखामेळ्याला विश्वास नव्हता. ह्या धर्मव्यवस्थेकडून केवळ उपेक्षा मिळणार असा त्यांचा ठाम विश्वास होता. ज्या माणसाच्या शरीरातून वाहणाऱ्या रक्ताचा रंग एकाच आहे. तेव्हा तो एकमेकांपेक्षा हीन कसा, समानतेची वागणूक न देता शुद्धाशुद्ध जातीभेद मानने धर्माचा आधार घेऊन उच्चवर्णीयांनी माजविलेली धर्मसंकल्पना गुणदोष, यज्ञयाग, ह्या गोष्टी निरर्थक ठरतात. ही भावना चोखोबाला सातत्याने वेदना देत असतील. त्यातूनच त्यांची कविता ह्यावर प्रकाश टाकते.

'नाही देह शुद्ध आति अमंगळ । अवघे वोंगळ गुणदोष ।।
करूं जाता विचार अवघा अनाचार । आणिक प्रकार काय बोलू ।।
वाणी नाही शुद्ध धड न ये वचन । धि:कारिती जन सर्व मज ।।
अंगसंग कोणी जवळ न बैसे । चोखा म्हणे ऐसे जीवित माझे ।।

यावरून त्या काळातील समाजव्यवस्थेचे चित्र लक्षात येते. चोखोबा जातीने अस्पृश्य त्यामुळे धर्मव्यवस्थेतील उच्चवर्णीयांनी त्यांना देवदर्शनापासून वंचित ठेवले. तेव्हा देवालाच ते थेट सवाल करतात— 'हीन याती माझी देवा। कैसी घडे तुमची सेवा'.

याप्रकारे विटाळ ह्या कल्पनेविषयीही चोखोबा आश्चर्य व्यक्त करताना म्हणतात, 'कोण तो सोवळा कोण तो ओवळा । दोन्हीच्या वेगळा विठू माझा।' समाजात अनेक कल्पित—अकल्पित, बऱ्या—वाईट संकल्पना रुजलेल्या आहेत. त्यापैकी 'विटाळ' ही संकल्पना ह्या विटाळापासून कोणीतरी सुटलं आहे का असा विचार चोखोबांचा मनात आहे. म्हणून ते म्हणतात, 'देहासि विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध' केवळ देहासि विटाळ आपण मानतो परंतु आत्म्याला काही विटाळ नाही तो शुद्ध आहे.

## समारोप

संत चोखामेळा याच्या वरील विवेचनावरून काही बाबी स्पष्ट होतात. चोखोबा प्रामाणिकपणे वास्तव आपल्या अंभगातून मांडतात. त्यातून जातीय विषमता त्या काळात किती प्रबळ होती स्पष्टपणे लक्षात येते.त्यांच्या लेखनातून येणाऱ्या वेदनांचे चित्रण समाजाचे प्रातिनिधीक रूप होऊन प्रकटतात.वारकरी संप्रदायात त्यांच्या मनाला शांती आणि स्थिरता मिळाली कारण आपल्या मनीच्या वेदना, जातीहीनतेचे दु:ख आणि आपल्या विचारांना शब्दरूप देता आले. शुद्धाचरण आणि प्रामाणिकता हे संताचे गुण त्यांच्या अंगी होते. त्यांनी पारंपरिक दांभिक सनातनी व्यवस्थेवर, भोंदू संतांवर त्यांनी ताशेरे ओढले. तसेच खऱ्या संताचे कार्य बजावले.जातीहीनतेचे दु:ख ते आपल्या अभंगातून नोंदवतात. त्याबरोबर त्यातून आपल्या जाती बांधवाची सुधारणा व्हावी अशी मनोमन इच्छा व्यक्त होते.

त्यांच्या अभंगातून विटाळ संकल्पना, जातीव्यवस्थेने लादलेले कर्म, सामाजिक, आर्थिक विषमतेचे विषयीचे धर्मव्यवस्थेला विचारलेले प्रश्नांनी अनुत्तरीत केले. त्यांच्या संपूर्ण विचारांचा विचार केला तर ते विचार म्हणजे तत्कालीन धर्मव्यवस्थेविरुद्ध बंड म्हणता येते. धर्मव्यवस्थेच्या विचारांचा पगडा त्यांच्या मनावर होता, हे नाकारता येत नाही. पण ह्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावरून उत्तरोत्तर कमी होत गेलेला दिसतो.जातीभेद, विषमता देवनिर्मित नाही तर मानवनिर्मित, कृत्रिम आहे. असा निष्कर्ष त्यांच्या अभंगातून पुढे येतो.सुज्ञ व्यक्तींना सामाजिक, आर्थिक विषमतेच्या विचारांच्या पलीकडे जाऊन माणुसकीच्या नात्याने तत्कालीन विषम वास्तवावर विचार करण्यास भाग पाडतात. चोखोबा विठ्ठलाला उद्देशून 'ऐसी नीत नव्हे बरी' अशा शब्दांत समाजातील न्याय प्रक्रियेला दोष देऊन त्याचा तीव्र शब्दांत तत्कालीन सामाजिक सुडबुद्धी वैचारिकतेचा निषेध नोंदवतात. यावरून संत चोखामेळा यांच्या विचारातून तत्कालीन व्यवस्थेविरुद्ध वैचारिक बंड स्पष्ट होतो.

## संदर्भ:


१. गं. बा. सरदार, 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', लोकवाङ्मय गृह, मुंबई, नववी आवृत्ती, २०१४, पृष्ठ क्र. ७५

२. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, २०००, पृष्ठ क्र. ३५

३. प्रा. डॉ. सुरेश शिंदे, 'संतांचा विद्रोह', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, पृष्ठ क्र. १६४


❖❖❖

# नामदेव ढसाळांच्या कवितेतील विचारदर्शन

प्रा.डॉ.सौ. वीरा पवन मांडवकर
सहायक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email: veeramandavkar@gmail.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव असलेले एक विद्रोही कवी नामदेव ढसाळ. त्यांनी दलित समाजात जन्माला आल्याने खूप दु:ख भोगले. म्हणूनच आजूबाजूला चाललेला अन्याय, विषमता पाहून विराट विद्रोहाने पेटलेल्या या कवीची झेप झंझावातासारखी आहे. मार्क्सवादी विचाप्रणालीची काही तत्त्वे नामदेव ढसाळांच्या कवितेमध्ये प्रतिबिंबीत झाल्याचे दिसून येते. 'अत्त दीप भव!' आणि 'बहुजनहिताय बहुजन सुखाय' हे बुद्धाच्या तत्वज्ञानाचे आशयसूत्र नामदेव ढसाळांनी आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे. ढसाळांनी आपल्या कवितेतून चार्वाकाप्रमाणेच वैदिकांना प्रखर नकार व्यक्त केला आहे. माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या, त्याला उकिरड्यावरील अन्नालाही वंचित करणाऱ्या आणि संवेदनाशून्य बनवणाऱ्या या समाज व्यवस्थेला आणि सांस्कृतिक परंपरेला त्यांनी नाकारले आहे. असे असले तरी ढसाळांची विचारसरणी त्यांच्या स्वतंत्र दृष्टिकोनाने विकसित झाली होती आणि ते स्वतंत्र प्रतिभेचे कवी होते.

## प्रस्तावना :

नामदेव ढसाळ हे १९६० नंतरच्या दशकातील एक विद्रोही कवी. प्रस्थापित समाजव्यवस्थेला विरोध करून आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणाऱ्या तरुण पिढीचे प्रतिनिधी म्हणून साहित्यक्षेत्रात ओळखले जातात. अमेरिकेतील ब्लॅक पँथरच्या धर्तीवर ढसाळांनी दलित पँथरला जन्म दिला. या संघटनेने संपूर्ण महाराष्टा वैचारिकरीत्या ढवळून काढला. दलित पँथरमुळेच दलित समाजातील तरुणांच्या विचारकक्षा रुंदावल्या. आपल्या अस्तित्वाची, सामर्थ्याची जाणीव त्यांच्यात निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेला विरोध करण्यासाठी ढसाळांनी एका प्रभावी शस्त्राचा वापर केला, ते म्हणजे जळजळीत आग ओकणारे आणि समाजाच्या डोळ्यात अंजन घालणारे साहित्य. चाकोरीत अडकून पडलेल्या साहित्य क्षेत्राला ढसाळांनी नव्या काव्यविषयांची ओळख करून दिली. हेतूपुरस्सर नजरेआड केलेले हे जग ढसाळांनी अत्यंत प्रभावीपणे समोर आणले. 'गोलपिठा', 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र प्रियदर्शिनी', 'तुही इयत्ता कंची?', 'खेळ', 'हाडकी हाडवळा', 'आंधळे शतक' अशा कित्येक रचनांमधून त्यांनी जो नवा विचार समाजासमोर आणला, त्यामुळे ढसाळ मराठी साहित्यात एक मैलाचा दगड मानले जाऊ लागले.

**बीजशब्द** : दलित, अस्तित्ववाद, विचारप्रणाली, अस्वस्थता, चळवळ, वास्तव, विषमता, तत्त्वज्ञान, समाज

## विषय विवेचन :

नामदेव ढसाळांच्या साहित्यात व्यक्त झालेले विचार जाणून घेताना त्यांच्या आयुष्याची, त्यातल्या अनुभवांची पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते. त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव असल्यामुळे त्यांच्या विचारांची बैठक बुद्ध तत्त्वज्ञानावर आधारित आहे. विज्ञान विवेकनिष्ठ, विद्रोह आणि विश्वात्मकता ही त्यांची अंत:धारणा व ध्येय आहे. मुंबईच्या कामगारांच्या समस्यांचा जवळून परिचय असल्यामुळे त्यांच्यात मार्क्सवादी विचारसरणीचाही प्रभाव दिसतो. भांडवली व्यवस्थेचे चित्र आणि कामगारांच्या बकालपणाचे अनुभव या दोन्ही गोष्टी ढसाळांनी आपल्या कवितेत चितारल्या आहेत.त्यामुळेच ढसाळांच्या कवितेत मार्क्सवादाचे दर्शन घडते. 'अत्त दीप भव' आणि 'बहुजनहिताय बहुजन सुखाय' हे गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचे आशयसूत्र आहे. ढसाळांच्या कवितांवरही याच तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसतो. नामदेच ढसाळांचा परंपरांना जो नकार आहे, त्याला चार्वाकांपासूनची विद्रोही परंपरा आहे. चार्वाक जसे सत्य निर्भीडपणे मांडत असत, तद्वतच ढसाळांनी चार्वाक दर्शनातील सत्य हा विचार स्वीकारून आपल्या अवतीभोवतीचे वास्तव त्याच स्वरूपात त्याच रूपात आपल्या कवितेतून मांडले आहे. नामदेव ढसाळांनी

अनेक चळवळी जवळून पाहिल्या. काही चळवळींत ते सहभागी झाले. काही चळवळी त्यांनी निर्माण केल्या. या घडामोडींत जी माणसं, जे अनुभव त्यांना जवळून पाहता आले, त्याच्या अनुषंगानेच त्यांच्या विचारसरणीला दिशा मिळत गेली आणि हाच स्वविचार त्यांच्या साहित्यातूनही प्रतीत झाला. अशा विविध विचारसरणींचा त्यांच्या साहित्यावर, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला प्रभाव त्यांचे साहित्य पाहिल्यास सहजपणे दिसतो.

## आंबेडकरी विचार :

आंबेडकरी विचार हा भक्कम अशा बुद्धिवादावर उभा आहे. गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अवलंबिले. विज्ञानविवेकनिष्ठ विद्रोह आणि विश्वात्मकता ही त्यांची अंत:धारणा व ध्येय आहे. जुन्या बुरसटलेल्या रूढी—परंपरा, बुवाबाजी, ग्रंथप्रामाण्य, विभूतीपूजा, पोथीवाद, आंधळे धर्माचरण, कर्मकांडांचा अतिरेक या सर्वच गोष्टींना आंबेडकरांनी विरोध केला. 'सामाजिक स्तरावर दिसून येणारी अन्यायकारी वृत्ती व विषमता मूलक परिस्थिती जोपासणाऱ्या स्थितीप्रिय प्रवृत्तीवर प्रहार करून तिच्या वर्णजातीय समाजव्यवस्थेला मोडून नवी समाजरचना आणि मानवतेची प्रस्थापना करू पाहणाऱ्या आजच्या दलित चळवळीला विद्रोह, बंड, नकारार्थ व स्वीकारार्थ लाभलेले तसेच समाजात जनाला पोषक व प्रेरक तत्त्व प्रस्तुत करणारे आंबेडकरी विचारदर्शन म्हणजे आंबेडकरवाद.'[१] आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य व बंधुता या मानवी मूल्यांना आपले तत्त्वज्ञान मानले. नामदेव ढसाळांनी स्वत: दलित म्हणून खूप दु:ख भोगले आहे. म्हणूनच आजूबाजूला चाललेला अन्याय, विषमता त्यांना पटकन टोचते. विराट विद्रोहाने पेटलेल्या या कवीची झेप झंझावातासारखी आहे. डॉ. बाबासाहेबांमुळेच दलित वस्तीची दु:खे समाजासमोर आलीत. त्यांनी तळागाळात पेटवलेल्या ज्ञानज्योतींमुळेच दलित समाज ढवळून निघाला. आंबेडकरांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या तत्त्वांवर सूरू झालेली सामाजिक परिवर्तनाची चळवळ अशीच चालू रहावी यासाठी त्या समाजाचे पाठबळ आवश्यक आहे, हे ढसाळ जाणून आहेत. म्हणूनच ते आपल्या अंधारात खितपत पडलेल्या समाजबांधवांना म्हणतात,

'सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षांनंतर लाभला
आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे' (गोलपिठा, पृ ३०)

इथे सूर्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सूर्यफुले म्हणजे आंबेडकरी विचार होय आणि फकीर या संबोधनातून त्यांची नि:स्वार्थ वृत्ती दर्शित होते. डॉ. बाबासाहेब हे ढसाळांच्या कवितेतील मूळ शक्तीस्रोत आहे. त्यांच्याकडूनच ढसाळांनी स्फूर्ती, हुरूप आणि हिंमत घेतली. पुढे आंबेडकरांच्या दलित चळवळीचे विभाजन होताना पाहून संधीसाधू, स्वार्थी दलित पुढाऱ्यांवर ढसाळ कडाडून टीका करतात. त्यांचे सच्चे अनुयायी, समर्थक असलेले ढसाळ दिवसेंदिवस नेत्यांच्या बदलत जाणाऱ्या वृत्ती प्रवृत्तीवर, तत्त्व आणि व्यवहाराच्या होणाऱ्या फारकतीवर आपल्या कवितांतून प्रहार करतात.

'हे आर्ष चालीतले तुझे अनुयायी
कंठाला लंगोट बांधून डिंग्या मारतात' (तुही इयत्ता कंची?, पृ १०९)

लोक स्वार्थापोटी आंबेडकरांच्या कार्याला विसरून गेले, पण नामदेव ढसाळ सतत ठासून सांगतात, मी त्यातला नाही. ते दलित चळवळीतील हाडाचे कार्यकर्ते, राजकीय पुढारी आणि प्रतिभावंत कवी असल्यामुळे ते आंबेडकरी विचारसरणीशी आपण एकनिष्ठ आहे हे दर्शविण्यासाठी स्वत:ला 'तुझ्या मातीची प्रतिष्ठा गाणारा शाहीर' असे म्हणतात.

'आणि मी झालो आहे तुझ्या मातीची प्रतिष्ठा गाणारा शाहीर
मी तुझा आणि तुझ्या शतकाचा एल्गार म्हणतो
ज्यांना बेइमान व्हायचे असेल त्यांना खुशाल होऊ द्या
मी माझ्यापुरते कापरासारखे छान जळून
तुझे नाव दिगंतात गाजवीन'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उत्तुंग विचार नामदेव ढसाळांनी नेहमीच आपल्या काव्यातून मांडण्याचा प्रयत्न केला.

## मार्क्सवादी विचार :

भारतात औद्योगिकरण झाल्यानंतर भांडवली अर्थव्यवस्था निर्माण झाली. त्यावेळी या उद्योगांमध्ये अनेक कामगार संघटना पुढे आल्या. त्यांनी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे आदर्श समोर ठेवले होते. मुंबईच्या बकालपणाचे आणि

भांडवली अर्थव्यवस्थेचे चित्र या दोन्हीसोबत ढसाळांनी जीवनाचा बराच प्रवास केल्यामुळे ढसाळांना या दोन्ही गोष्टींचा जवळून परिचय होता. म्हणूनच त्यांच्या कवितांमध्ये मार्क्सवादी विचारदर्शन होते. 'नामदेव ढसाळ यांच्या कवितेतून अस्तित्ववादी विचारप्रणालीप्रमाणेच मार्क्सवादी विचारप्रणालीचेही दर्शन घडते यात आश्चर्य नाही. कारण दलित साहित्याच्या पाठीशी डॉ. आंबेडकरांची प्रेरणा आहे आणि डॉ. आंबेडकरांनीही मार्क्सची विचारसरणी योग्य बदलांसह स्वीकारली होती. हे लक्षात घेता मार्क्सवादी विचाप्रणालीची काही तत्त्वे नामदेव ढसाळांच्या कवितेमध्ये प्रतिबिंबीत झाली असतील तर नवल नाही.'[२] समाजव्यवस्थेने ज्यांना तीन हजार वर्षे ज्ञान, संपत्ती, प्रतिष्ठा यापासून पारखे केले, अशा दलित वर्गाचा मी कवी आहे, असे ढसाळ स्वतःला म्हणतात. त्यांची कविता समाजवादाला, भांडवलशाहीला सुरुंग लावते. वर्गाधिष्ठित रचनेला विरोध करते.

'ही लोकशाही नाहीहे ही विटंबना सतरा पिढयांची
म्हणा म्हणा कॉम्रेड दंड ठोकून म्हणा
'हाण सख्या तुझीच बारी
लोकशाही मेली तर डेगण्या मारी
द्या दवंडी कॉम्रेड
ही लोकशाही नाहीहे
विडंबना सतरा पिढयांची
मूग गिळून पोसलेली (गोलपिठा, पृ. ८४)

खाजगी औद्यागिकरणामुळे मालक हे भांडवलदार होऊन श्रमिकांचे आत्यंतिक शोषण करत आहेत. आपण त्या शोषणव्यवस्थेला बैलासारखे जुपलेले आहोत. त्यामुळे दलित कामगारांच्या कष्टकऱ्यांच्या हक्काची ह्या भांडवलशाहीत पायमल्ली होत आहे. ही गोष्ट ढसाळांना अंतर्बाह्य अस्वस्थ करते. म्हणून ते म्हणतात,

आपल्याला प्रगतीची दिशा
नि तिचे सर्वसाधारण अंतिम फळ
याचे झाले नाही स्पष्ट आकलन
'पवित्र खाजगी मालमत्तेचे जू'
आपण घेतलेहे मानेवर
नि भंडवलशाहीच्या तिढ्याभोवती
ढापणं लावलेल्या बैलागत फिरतोय (मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले, पृ. २९)

आपल्या पत्नीलाही ते आपल्या समाजव्यवस्थेविरुद्धच्या बंडात सामील होण्यासाठी प्रवृत्त करतात. निसर्गतः स्त्रीपुरुष समान आहेत. भौतिक विश्वाच्या उत्क्रांतीची भाषा आपण बोलायला हवी. तू माझी दासी नाही, मी तुझा राजा नाही. आपण कॉम्रेड आहोत. श्रमिकांची सर्वाधिकारी सत्ता सांगणाऱ्या स्त्रीपुरुष विषमतेबद्दल आवाज उठविणाऱ्या आणि भांडवलशाही विरुद्ध बंड पुकारणाऱ्या मार्क्सवादी विचारांची जाणीव ढसाळांच्या कवितांतून दिसते.

## बुद्धतत्त्व विचार :

बौद्ध तत्त्वज्ञान हे बुद्धिवाद आणि तर्क यांच्या कसोट्यांवर आधारलेले असून त्यातील समतेचे धोरण हेच दलितांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. शांती, अहिंसा, स्वातंत्र्य आणि सत्य या तत्त्वांचाच त्यांनी विचार केला. कारण जे स्वतः बुद्धीचा वापर करत नाही, तो अज्ञानामुळे दुःखी होतो. म्हणून गौतम बुद्धांनी स्वयंप्रकाशित होण्यावर भर दिला आहे. तुमच्या विकासाच्या आड ज्या रूढ धर्मसंकल्पना येतील त्या तोडून टाका आणि योग्य मार्गाने वाटचाल करा. 'अत्त दीप भव!' आणि 'बहुजनहिताय बहुजन सुखाय' हे बुद्धाच्या तत्वज्ञानाचे आशयसूत्र नामदेव ढसाळांनीही आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे.

'खरंच
राजकीय ठकसेनांना कसं
कळणार व्रतस्थ माणसाचं अंतःकरण
आणि त्यामधील
'बहुजन सुखाय' चा
प्रबुद्ध गजर (प्रियदर्शिनी.......पृ. ७)

बुद्धाने सांगितलेल्या अष्टांगिक मार्गाने आपण गेलो तर आपल्या मनातील षड्विकार पापपुण्याच्या भ्रामक कल्पना नष्ट होऊन मानव स्वयंप्रकाशित जीवन जगू शकतो व प्रगतीपथावर जातो. ढसाळ हे समाजाशी बांधिलकी असणारे कवी आहे. त्यांच्या कवितेवर वैचारिकतेचा प्रभाव आहे. ही विचारांची खोली त्यांना विविध विचारवंतांच्या अभ्यासातून आलेली आहे. आंबेडकर, मार्क्स, बुद्ध चार्वाक यांच्या विचारांचा परिपाक त्यांच्या कवितांतून दिसून येतो. आपले हे विचार विविध राज्यकर्त्यांनीही आपलेसे केले पाहिजे यासाठी ते प्रियदर्शिनी इंदिरा गांधी यांना विनंती करतात.

'खरंच प्रियदर्शिनी
भुकेने व्याकुळ झालेलो असतानाही
आम्ही आमच्या अश्रूपूर्ण डोळ्यांनी अनुभवलाय
दगडी लेण्यामधला बुद्ध'

कवी म्हणतात, आम्ही भुकेकंगाल असलो तरीही आम्हाला बुद्धाच्या विचारांचे अधिष्ठान आहे. त्यामुळे तुम्ही आणि तुमच्यासारख्या मंडळींनी आमच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलली पाहिजे. ढसाळांच्या काव्यातून बुद्ध तत्त्वज्ञानाचा विचार प्रामुख्याने प्रवाहित होताना दिसतो. ढसाळांनी आपल्या कवितेच्या तत्त्वज्ञानाचे अंतिम ध्येय बुद्धाचा सम्यक क्रांतीचा विचार हे ठरविले आहे अणि आपल्या कवितांतून ते प्रभावीपणे मांडले आहे.

## चार्वाक विचार :

चार्वाकाने वैदिकांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाला प्रखर विरोध केला. चार्वाकांनी सांगितलेले तत्त्वज्ञान अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. वेद हे अप्रमाण आहेत, हा पुकारा प्रथम चार्वाकांनीच केला. वेद अपौरुषेय नाहीत. ईश्वर ही मानवाने निर्माण केलेली संकल्पना आहे. पूर्वजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक ह्या संकल्पना भोळ्याभाबड्या, साध्या माणसांना फसविण्यासाठी बनविण्यात आलेले मृगजळ आहे. जातिभेद, वर्णभेद, पातिव्रत्य अशास्त्रीय आणि विशिष्ट लोकांना आपल्या आधिपत्याखाली ठेवण्यासाठी केलेले षडयंत्र आहे. असे अनेक स्फोटक आणि समाजाच्या परंपरागत धारणांना हादरवून सोडणारे विचार चार्वाकाने मांडले. त्यामुळे तो सर्व वैदिकांना कायम अप्रियच राहिला. 'चार्वाक सतत पराभूत होत राहिले अणि तरीही चार्वाकांची धास्ती सतत राहिली यातच त्यांच्या भूमिकेचे मोठेपण आहे कारण सर्वांच्याच सर्वविद्रोही जाणिवेचा चार्वाक हा गाभा आहे'[३] नामदेव ढसाळांनी आपल्या कवितेतून चार्वाकाप्रमाणेच वैदिकांना प्रखर नकार व्यक्त केला आहे. माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या, त्याला उकिरड्यावरील अन्नालाही वंचित करणाऱ्या आणि संवेदनाशून्य बनवणाऱ्या या समाज व्यवस्थेला आणि सांस्कृतिक परंपरेला त्यांनी नकार देणे स्वाभाविक आहे.

'कर्मकांडात/वर्णभेदात/जातिभेदात/शोषणात
त्यांनी भविष्यालाच सडत ठेवलं
त्यांनी काळोखाची पूजा बांधली
त्यांनी माणसातल्या पशुतेचं गायन केलं
जीवन म्हंजे मृत्यूचं तांडव
जीवन म्हंजे व्यस्तता, त्रस्तता नि शून्यता
त्यांनी ब्रम्हाच्या हाती सर्व काळसंदर्भ देऊन टाकला
येणाऱ्या दिवसासाठी असलेली सुखसमृद्धशांती
त्यांनी नाकारली (प्रियदर्शिनी ....... पृ. १९)

ढसाळांनी बाबासाहेब आंबेडकरांची कायम महती गायली. पण त्यांना कधी दैवी पुरुष मानले नाही. जडवादी तत्त्वज्ञानातील एक तत्त्वज्ञानी असा त्यांचा उल्लेख करून त्याची नाळ चार्वाकापर्यंत नेली. आपल्या अवतीभोवतीच्या भयाण वास्तवतेकडे हा समाज सोयीस्करपणे दुर्लक्ष करतो, या गोष्टीची चीड ढसाळांना स्वस्थ बसू देत नाही. म्हणूनच चार्वाकांचे लोकायत तत्त्वज्ञान ढसाळ अनेक ठिकाणी आपलेसे करताना दिसतात. पुनर्जन्मातील पापाच्या नावाने या जन्मी नरकयातना देणाऱ्या या समाजाला आपला कुरूप चेहरा दाखविताना अत्यंत भेदक, निडर भाषा ते वापरतात.

## ढसाळांचा स्वविचार :

ढसाळांनी कविता लिहिताना अनेक विचारवंतांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवले असले तरी त्यांच्या विचारांचे त्यांनी अंधानुकरण केले नाही. तसेही ढसाळांचा नेहमीच विभूतीपूजनाला विरोध होता. त्यांची विचारसरणी त्यांच्या स्वानुभवांनी, त्यांच्या स्वतंत्र दृष्टिकोनाने विकसित केलेली होती. या अनुषंगाने ढसाळ हे स्वतंत्र प्रतिभेचे कवी आहेत. ढसाळांनी अनेक चळवळी जवळून पाहिल्या आहेत. काही राबविल्या आहेत तर काही स्वतंत्रपणे निर्माण केल्या आहेत. त्यांची प्रत्येक कृती त्यांच्या काव्यविषयाला साह्यभूत होत गेलेली आहे. त्यांचे 'आंधळे शतक' हे पुस्तक वाचताना त्यांचा स्वविचार प्रकर्षाने व्यक्त झाल्याचे जाणवते. यातील लेखांमधले मुख्यसूत्र आजूबाजूला घडलेल्या घटनांशी त्यांचा स्वत:चा संबंध दर्शवितात. स्वविचाराने ते त्या घटनांवर भाष्य करतात. याविषयी एका मुलाखतीत ते स्वत: म्हणतात, 'कवी स्वत:च्या ग्रोथप्रमाणे वाढत गेला पाहिजे. आता गोलपिठ्याचंच उदाहरण आहे. त्यात किती फॅक्टर्स आहेत. त्यावेळेच्या पोलिटिकल सिच्युएशन्स आहेत. माझ्या बाकीच्याही इतर गोष्टी आहेत. मी ज्या ठिकाणी आलोय तो माझ्या मॅच्युरिटीचा भाग आहे. शब्दसुद्धा आले ते आपसुक आले. ते सरळ आणि सोपे होत गेले कारण मी ग्रोथप्रमाणे गेलो.'[४] ढसाळांच्या दृष्टीने साहित्यिक कोण असतो? तर तो आपल्या सभोवती चालणाऱ्या घटना, प्रसंग, वाङ्मयीन घटना यातील सांस्कृतिक अर्थ शोधत आपल्या साहित्यातून ते वास्तविकपणे मांडण्याचा प्रयत्न करतो. स्वचिंतन करतो. या स्वचिंतनातून ढसाळांची कविता साकार झाली आहे. समाजामध्ये चालणाऱ्या विचारसरणीचा बारकाईने अभ्यास करून त्याची चिकित्सा करत, त्याची प्रस्थापित घटनांशी संगती लावत ढसाळ आपली कविता साकारतात. त्यामुळे ढसाळांची स्वविचार निर्मित स्वत:ची अशी काव्यप्रतिभा निर्माण झाली आहे. त्यांनी कल्पना आणि भावनेपेक्षा रोखठोक सत्य आणि गेयता, ओजस्वीतेपेक्षा समतेचा विचार महत्त्वाचा मानून आपली कविता सजवली. म्हणूनच ती ह्रदयाला भिडणारीच नाही तर बुद्धीला हलवून जागे करणारी आहे.

## निष्कर्ष :

१. आंबेडकरी विचार हा भक्कम अशा बुद्धीवादावर उभा आहे

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ढसाळांच्या कवितेतील मूळ शक्तीस्रोत आहे. त्यांच्याकडूनच ढसाळांनी स्फूर्ती, हुरूप आणि हिंमत घेतली.

३. मुंबईच्या बकालपणाचे आणि भांडवली अर्थव्यवस्थेचे चित्र या दोन्हीसोबत ढसाळांनी जीवनाचा बराच प्रवास केल्यामुळे ढसाळांना या दोन्ही गोष्टींचा जवळून परिचय होता. म्हणूनच त्यांच्या कवितांमध्ये मार्क्सवादी विचारदर्शन होते.

४. जे स्वत: बुद्धीचा वापर करत नाही, तो अज्ञानामुळे दु:खी होतो. म्हणून गौतम बुद्धांनी स्वयंप्रकाशित होण्यावर भर दिला आहे.

५. चार्वाकाने वैदिकांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाला प्रखर विरोध केला.

६. ढसाळांची विचारसरणी त्यांच्या स्वानुभवांनी, त्यांच्या स्वतंत्र दृष्टिकोनाने विकसित केलेली होती. या अनुषंगाने ढसाळ हे स्वतंत्र प्रतिभेचे कवी आहेत.

## संदर्भ :

१ कसबे प्रा. रावसाहेब, 'आंबेडकरवाद', बुद्धिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर. प्रथमावृत्ती, १९७८, पृ. ३२

२. तायडे डॉ. विलास, नामदेव ढसाळांच्या कवितेतील विचारदर्शन 'नामदेव ढसाळांची कविता : स्वरुप आणि आकलन', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती, २०१६, पृ. २४९

३ पाटील म.सु. 'दलित कविता', लोकवाङ्मय मुंबई, प्रथमावृत्ती, १९८१, पृ ८२

४ काळसेकर सतीश, लोखंडे प्रज्ञा, नामदेव ढसाळांशी मुक्त संवाद, अनुष्टुभ, जुलै/ऑगस्ट ९७ पृ. ५६, ५७

## संदर्भग्रंथ :

१ काळे डॉ. अक्षयकुमार, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', पा.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९९

२ कुंभोजकर डॉ. ललिता, 'दलित कविता : एक दर्शन', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८४

३ जाधव रा.ग., 'निळी क्षितिजे', अमेय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९८२

४ मेश्राम योगेन्द्र, 'दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८

❖❖❖

## Form IV
(See Rule 8)

Statement about ownership and other particular about the Journal

## Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

Email: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For Research centre: researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE



| | | |
|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal |
| IFSC code | - | MAHB0000047 |
| MICR coe | - | 445014001 |
| A/c No. | - | 60175373000 |
| A/C Name | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre |

p -ISSN 2349-9370

e -ISSN 2582-4848

(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)